८८
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र.

RFIBK-0004355

90422

21

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. नं. १०५९९

# समाजस्वास्थ्य

## मासिकांतील निवडक लेख

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ०३५४५

### वर्ष १ ते ३

REFBK-0004355

संपादक—र. धों. कर्वे, एम्. ए.

किंमत २॥। रुपये

मुद्रक—**बी. जी. गण्डभीर,** धी पॉप्युलर प्रिंटिंग प्रेस,
सूर्यमहाल ठाकुद्वार मुं. नं. ४.

प्रकाशक—**र. धों. कर्वे, राइट् एजन्सी,**
जयकर बिल्डिंग, नवी भटवाडी, गिरगांव, मुंबई.

१०५८८

# प्रस्तावना

'समाजस्वास्थ्य' मासिकाच्या मागील अंकांस बरीच मागणी असते व ते सर्व पुन्हा छापून काढण्याविषयींही आमचेकडे सूचना आलेल्या आहेत; परंतु तें पैशाचे दृष्टीने जवळ जवळ अशक्य आहे. तेव्हां पहिल्या तीन वर्षांतील निवडक लेख तेवढेच छापावे असें ठरवून हें पुस्तक तयार केलें आहे. यांत बहुतेक महत्त्वाचे लेख आलेले आहेत. कामशास्त्रावरील लेखमाला मात्र स्वतंत्र रूपाने काढण्याचा विचार असल्यामुळें त्या लेखांचा यांत समावेश केलेला नाहीं. पत्रव्यवहार वेगळा दुसऱ्या भागांत दिला आहे.

ज्या लेखाविषयीं 'लिहून आलेला मजकूर' असा उल्लेख किंवा कोणाची सही किंवा टोपणनांव नाहीं, ते संपादकीय समजावे. संपादकाने आजपर्यंत या मासिकांत किंवा कोठेंही टोपणनांवाने लेख लिहिलेले नाहींत. मासिकांतील पत्रव्यवहार खरा असतो किंवा आम्ही तो काल्पनिक बनवून लिहितों, अशी शंका कित्येकांनीं आमचे-जवळ बोलून दाखविली आहे. काल्पनिक लिहावा असें एकदां आमचे मनांतही आलें होतें, परंतु पत्रें भरपूर येऊं लागल्यामुळें तसें करण्याचा प्रसंगच आला नाहीं, व एका हातीं लिहिलेल्या पत्रांत इतकें वैचित्र्य आलें असतें कीं नाही याची शंकाच आहे.

विस्तारभयास्तव कित्येक ठिकाणीं संक्षेप करावा लागला आहे व कांहीं ठिकाणीं शाब्दिक फरकही केलेला आहे. तथापि मूळचा अर्थ बदलूं नये अशी खबरदारी घेतली आहे. दुसऱ्या भागांतही पुनरुक्ति होऊं नये म्हणून कित्येक पत्रांतील जरूर तितका भाग गाळला आहे.

कार्यबाहुल्यामुळें व मासिकांतील सबंध मजकूर दर महिन्यास लिहून काढ-ण्याचा बहुतेक भार संपादकावरच पडत असल्यामुळें मासिकाचा आकार वाढवणें तूर्त

तरी अशक्यच दिसतें. शिवाय पैशाची अडचण आहेच. आकार वाढवण्याचा आमचा फार दिवसांपासून मानस आहे, परंतु योग कधीं येईल तो येवो.

गिरगांव, मुंबई
२९ एप्रिल १९३१.

र. धों. कर्वे,
संपादक.

# अनुक्रमणिका

## भाग पहिला


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १. विनय म्हणजे काय ? | ५ |
| २. उपयुक्त संस्था. | ७ |
| ३. ब्रह्मचर्य. | ८ |
| ४. गर्भपाताचें एक कारण. | ९ |
| ५. मांसाहार. | ९ |
| ६. शिक्षण व प्रजोत्पादन. | १० |
| ७. कायदे करणारांची अक्कल. | ११ |
| ८. स्वयंपाकांत स्वच्छतेचें महत्त्व. | ११ |
| ९. पाणी किती प्यावें ? | १२ |
| १०. रानटी लोकांच्या चालीरीती | १२ |
| ११. कॉलरा कसा टाळावा ? | १३ |
| १२. वेश्या व गुप्तरोग. | १४ |
| १३. संततिनियमनाची एक दिशा | २० |
| १४. सॉव्हिएट राज्यांतील विवाहाचा कायदा. | २२ |
| १५. बोबडे बोल. | २४ |
| १६. संततिनियमन. | २४ |
| १७. गुप्तरोग. | २५ |
| १८. श्री. ऋषींची भुताटकी. | २५ |
| १९. व्हिटॅमीन अथवा जीवनतत्वें. | २९ |

| विषय | | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|
| २०. वांझपणाचें एक कारण. | ... | ... | ... | ३२ |
| २१. ग्रंथपरीक्षणः 'बाहेरख्यालीचे दुष्परिणाम.' | | ... | ... | ३२ |
| २२ वेश्यांसंबंधीं कायदे | ... | ... | ... | ३६ |
| २३ मनुष्याची उत्पत्ति | ... | ... | ... | ५१ |
| २४ तोतरेपणा ... | ... | ... | ... | ५२ |
| २५ गर्भधारणेसंबंधीं रानटी कल्पना ... | | ... | ... | ५४ |
| २६ ग्रंथपरीक्षणः ' लंघनचिकित्साशिक्षक ' | | ... | ... | ५४ |
| २७ ' स्तुतीस कीं ईश्वर पात्र होतो '... | | ... | ... | ५९ |
| २८ वेश्या कोठें असाव्या ? | ... | ... | ... | ६१ |
| २९ बळजबरीचे खटले | ... | ... | ... | ६२ |
| ३० वेश्यांच्या जाहिराती | ... | ... | ... | ६३ |
| ३१ धुपणी ... | ... | ... | ... | ६४ |
| ३२ हातांची जोपासना... | ... | ... | ... | ६५ |
| ३३ उंदीर ... | ... | ... | ... | ६७ |
| ३४ स्त्रियांचें दूध ... | ... | ... | ... | ६७ |
| ३५ वेश्यांसंबंधीं जर्मनींतील नवीन व्यवस्था. | | ... | ... | ६८ |
| ३६ ओनीडा समाजाची हकीकत | ... | ... | ... | ६९ |
| ३७ त्वचा व तिची काळजी | ... | ... | ... | ७१ |
| ३८ संकेतगृहें ... | ... | ... | ... | ७७ |
| ३९ मागसलेले विचार... | ... | ... | ... | ८० |
| ४० मुलें न होण्याचीं कारणें व आधुनिक उपाय | | ... | ... | ८२ |
| ४१ संततिनियमनावरील कांहीं आक्षेप | | ... | ... | ८७ |
| ४२ डोळ्यांची काळजी... | ... | ... | ... | ८८ |
| ४३ गर्मीचा उगम ... | ... | ... | ... | ९० |

# अनुक्रमणिका


| विषय | पृ |
|---|---|
| ४४ वस्त्र कसें असावें ? ... ... ... | ९० |
| ४५ खऱ्या गोष्टी ... ... ... ... | ९३ |
| ४६ फांकलेलें प्रेम. ... ... ... | ९४ |
| ४७ पतिपत्नींचा परस्पर संबंध ... ... ... | ९५ |
| ४८ घटस्फोट ... ... ... | ९९ |
| ४९ 'असे पति देवाचि ललनांना' ... ... ... | १०३ |
| ५० 'विषादप्यमृतं ग्राह्यम्' ... ... ... | १०५ |
| ५१ पावित्र्य. ... ... ... ... | १०७ |
| ५२ हवा. ... ... ... ... | ११० |
| ५३ दाक्तरांचा अधाशीपणा ... ... ... | ११२ |
| ५४ बाहेरख्यालीचे दुष्परिणाम ... ... ... | ११४ |
| ५५ प्रचलित विवाह ... ... ... | ११७ |
| ५६ पचन कसें होतें ? ... ... ... | ११८ |
| ५७ आपली विवाहसंस्था ... ... ... | १२२ |
| ५८ आगगाडींत ऐकलेला संवाद ... ... ... | १२५ |
| ५९ आणखी एक दाक्तर ... ... ... | १२७ |
| ६० पडसें ... ... ... ... | १४० |
| ६१ स्त्रियांचे लेख ... ... ... .. | १४१ |
| ६२ संततिनियमनाचा नवीन उपाय ... ... ... | १४२ |
| ६३ एक वैवाहिक आयुष्य ... ... ... | १४३ |
| ६४ ग्रंथपरीक्षणः 'स्त्रीजीवनावर प्रकाश' ... ... | १४५ |
| ६५ सुखाचा संसार ... ... ... ... | १५० |
| ६६ मूत्राचें पावित्र्य ... ... ... ... | १५३ |
| ६७ संमतिवयाची कमिटी ... ... ... | १५४ |

| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| ६८ | संपूर्ण जीवन. | १५५ |
| ६९ | ग्रंथपरीक्षणः 'विधवावपनशास्त्रार्थासंबंधीं अखेर निर्णय.' | १५६ |
| ७० | प्रणयी पत्र. | १५७ |
| ७१ | फ्रान्सच्या राज्यक्रांतीचीं कारणें. | १५८ |
| ७२ | मांसाहार. | १५९ |
| ७३ | अमेरिकन मूर्खपणा. | १६० |
| ७४ | नग्नतेचा प्रचार. | १६० |
| ७५ | पोहण्याचे सार्वजनिक तलाव. | १६१ |
| ७६ | ग्रंथपरीक्षण. १. 'भगवान श्रीकृष्ण', २. 'गोपालन' | १६२ |
| ७७ | धोक्याची सूचना | १६३ |
| ७८ | पतिता कीं पतिव्रता? | १६४ |
| ७९ | पतिव्रताच–पतिता खास नव्हे | १६७ |
| ८० | नग्न कां रहावें? | १६९ |
| ८१ | धुरकटणें | १७३ |

## भाग दुसरा

| | | |
|---|---|---|
| १ | पत्रव्यवहार | १७५ |
| | सूचीपत्रक | २५२ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६३२९

# विनय म्हणजे काय ?

विनय या शब्दाचा निरभिमान किंवा निरहंकार असाही अर्थ आहे, परंतु हा अर्थ येथें घेण्याचा आमचा विचार नाहीं. त्याचा दुसरा अर्थ म्हणजे मर्यादशील-पणा याचा विचार येथें कर्तव्य आहे. हा गुण स्त्रियांमध्यें स्वाभाविक असतो व त्यांनाच तो विशेष शोभतो अशी सामान्य कल्पना प्रस्तुत कालीं दिसून येते. प्रस्तुत कालीं म्हणण्याचें कारण प्राचीन कालीं जवळ जवळ सर्व देशांत स्त्रियांचें वर्चस्व होतें, व तेव्हां हा गुण विशेषतः पुरुषांनाच उचित व स्वाभाविक समजला जात असे, असा शोध अलीकडे लागला आहे (The Dominant Sex, by E. & C. Paul). आपल्या समाजांत या गुणामुळें स्त्रियांस पुरुषांचे देखत सरळ बसतां किंवा उभें राहतां येत नाहीं; मुरकावें लागतें, किंवा मान खालीं घालावी लागते. अनोळखी पुरुषाशीं आपण होऊन बोलणें लांबच, परंतु त्यानें एखादा प्रश्न विचारल्यास त्याचें धड उत्तरही स्त्रियांकडून मिळणें कठिण. यामुळें यजमान घरीं आहेत कीं नाहींत ही बातमी सुद्धां स्त्रीकडून परक्या पुरुषास मिळणें शक्य नसतें. या गुणाचा आणखी एक परिणाम म्हणजे शृंगारविषयक बोलणें निघालें असतां स्त्रियांनीं उठून जाणें, किंवा तें शक्य नसल्यास न ऐकलेंसें करणें. देशकालपरत्वें शरीराचे निरनिराळे विशिष्ट भाग किंवा सर्व शरीर पुरुषांचे दृष्टीस उघडें पडल्यास लज्जेचा अगदीं कळस होतो.

विनय किंवा लज्जा हा स्त्रियांचा स्वाभाविक गुण नसून सामाजिक परिस्थिती-मुळें उत्पन्न होतो हें थोड्याशा विचारांतीं सहज दिसून येईल. मुलींमध्यें स्वाभा-विक रीतीनें लज्जा उत्पन्न होत नसून आया मुलींस लाजण्यास शिकवतात असें आमच्या पाहण्यांत आहे. अर्थात हा सामाजिक गुण असल्यामुळें जोंपर्यंत स्त्री दुसऱ्याच्या, विशेषतः पुरुषांच्या दृष्टीस पडत नाहीं, तोंपर्यंत विनयाचा प्रश्नच उप-स्थित होत नाहीं. यामुळेंच उघडपणें पुरुषांकडे पाहिल्यानें जरी विनयास बाध येतो, तरी स्त्रिया शक्य असल्यास चोरून पाहतात हें सर्वांस माहीत आहे. यासंबंधीं सर्व

## समाजस्वास्थ्य

निर्बंध पुरुषांच्या वर्चस्वाचा परिणाम होत, व पडदा, बुरखा वगैरेचे जाचक नियम केवळ पुरुषांच्या दराऱ्यांमुळेंच पाळले जातात. पडदानशीन स्त्रियांचा पडदा पुष्कळ वेळां घरांतल्या पुरुषांपुरताच असतो व इतर पुरुषांच्या दृष्टीस पडल्याबद्दल त्यांना बिलकूल वाईट वाटत नाहीं. अशी एखादी स्त्री घरांतील पुरुषाबरोबर गाडींतून जात असल्यास त्या दोघांच्या मध्यें पडदा असतो, परंतु स्त्री मागच्या खिडकींतून रस्त्यांतील मौज पहात असते ! प्रसिद्ध फ्रेंच लेखक प्येर लॉती यांनीं तुर्की स्त्रिया संबंधीं असें लिहिलें आहे कीं त्यांच्या बुरख्याची जाडी सौंदर्याच्या व्यस्त प्रमाणांत असते, म्हणजे स्त्री जितकी अधिक सुंदर तितका बुरखा पारदर्शक होतो ! सौंदर्य झांकून ठेवण्याची बुद्धि स्वाभाविक कशी असेल ?

शरीराचे कोणते भाग कोणत्यावेळीं लज्जास्पद समजावे याबद्दल निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या विचित्र समजुती आढळतात. कांहीं रानटी जातींत स्त्रिया व पुरुष नेहमींच नग्न असतात हें पुष्कळांस माहीत असेल. परंतु कपडे घालणाऱ्या रानटी लोकांसही नग्नपणाची लाज वाटत नाहीं इतकेंच नव्हे तर सणाच्या दिवशीं स्त्रियांनीं नग्न होऊन नाच करण्याची वहिवाट असते. न्यू गिनीमधील नर्तकींचें डॉ. सेलिग्मन् यांनी पुढील वर्णन दिलें आहेः—नाचतांना त्यांच्या जघनास इतकी वेगाची गति मिळते कीं त्यामुळें नेसलेलें वस्त्र साफ वर उडून जघनावरचें गोंदणें दृष्टीस पडतें.

आणखी एका लेखकानें पुढील वर्णन दिलें आहे. कांहीं लोक दुसऱ्या दिवशीं होणाऱ्या जंगी नाचाची तयारी म्हणून नग्न स्त्रियांच्या व मुलांच्या अंगावर रंगी बेरंगी चित्रें काढीत होते. दुसऱ्या दिवशीं नाच करतांना त्या स्त्रियांचे अंगावर भडक रंगांशिवाय कांहींही आच्छादन नव्हतें, व नाच संपल्यावरही त्या तशाच इकडे तिकडे हिंडत होत्या, परंतु त्यांच्या चेहऱ्यावर लज्जेची छाया बिलकूल दिसली नाहीं.

आफ्रिकेंतील नीग्रो लोक रतिसंभोगाबद्दल आपसांत उघडपणें चर्चा करतात, परंतु परकी मनुष्यासमोर मात्र ते स्पष्ट बोलत नाहींत. समागम म्हणजे पाप, ही कल्पना रानटी लोकांत नसते व म्हणूनच या कल्पनेची आनुषंगिक लज्जाही त्यांच्यांत दिसत नाहीं. टॅसमॅनिआमधील मूळच्या रहिवाश्यांबद्दल मि. रॉथ् म्हणतात कीं त्यांचे

नग्न नाच युरोपीय लोकांस कसेसेच दिसतील हें खरें, परंतु त्यांच्या कोणत्याही कृतींत किंवा हालचालींत बीभत्सपणा नसतो.

आतां सुधारलेल्या लोकांतील विनयाचे कांहीं प्रकार पाहूं. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या लोकांच्या स्त्रियांचे पोषाख पाहिल्यास, कोठें नखसुद्धां कोणाच्या दृष्टीस पडूं नये अशी व्यवस्था असते, तर कोठें मध्यवर्ती विशिष्ट भाग तेवढाच झांकण्याची इच्छा दिसते. जवळ जवळ नग्न राहणाऱ्या कांहीं, व सर्वांग झांकणाऱ्या कांहीं जाती वर्ज केल्यास, डोकें, हात व पाय यांशिवाय बाकी बहुतेक शरीरं झांकण्याचा प्रघात दिसतो. पारंपरिक महाराष्ट्रीय स्त्रियांचे पोटाचा कांहीं भाग, व चालतांना जंघांपर्यंत पाय दिसल्यास विनयभंग होत नाहीं इतकेंच नाहीं तर हे भाग झांकण्याकरतां पोलकीं किंवा मोजे घातल्यानेंच मर्यादेचें उल्लंघन होतें असें पुराणमत आहे. शिवाय नदींत किंवा समुद्रांत स्त्रिया व पुरुष एकत्र स्नान करतांना दोघांचेंही जवळ जवळ सर्व शरीर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें परस्परांस दृश्य झाल्यास त्यापासून विनयास बाध येत नाहीं.

तोंडावर बुरखा किंवा पदर घेणाऱ्या कांहीं जातींतील स्त्रियांस फक्त चेहऱ्याची मात्र लाज वाटते, व इतर सर्व शरीर लोकांस दाखवण्यास त्यांची हरकत नसते, तें शरीर कोणाचें आहे हें समजलें नाहीं म्हणजे झालें !

इंग्लंडांत स्त्रियांचे पाय–पाऊलसुद्धां–उघडें दिसतां कामा नये, परंतु खांद्यापर्यंत हात व चूचुकांशिवाय स्तनांचा बाकीचा भाग उघडा असल्यास चालतो इतकेंच नव्हे, तर निदान उच्च दर्जाच्या स्त्रियांस सायंकाळीं मेजवानीचे किंवा नाचाचे प्रसंगीं हे भाग उघडे ठेवावेच लागतात. अर्धवट पोषाख केलेला किंवा रात्रीचे कपडे (निजतेवेळीं युरोपांत सैल कपडे घालतात) घातलेला पुरुष दृष्टीस पडल्यास स्त्रियांनी लाजलें पाहिजे असा तेथें निर्बंध आहे. या संबंधीं एका फ्रेंच लेखकानें एक मजेदार गोष्ट दिली आहे, ती अशीः—मी इंग्लंडांत एका ओळखीच्या गृहस्थाकडे उतरलों असतां त्याची तरुण मुलगी माझ्याच वयाची असल्यामुळें आमची चांगली गट्टी जमली. एके दिवशीं सकाळीं मी रात्रीच्या कपड्यांनिशींच स्नानगृहाकडे जात होतों तों जिन्यांत तिची गांठ पडली. मी 'गुड् मॉर्निंग्' म्हटलें, पण जणूं काय

मी दिसलोंच नाहीं असें मिष करून ती चालती झाली. तिची मर्जी खप्पा होण्याचें कारण मला कांहीं केल्या समजेना. नंतर मी पोषाख करून भोजनगृहांत गेलों तों तेथें ती नेहमींप्रमाणें बोलूं लागली, तेव्हां मी तर्क बांधला कीं हा पोषाखाचा परिणाम असावा ! कांहीं वेळानें तिला घेऊन मी एका होडींतून नदीवर फिरावयास गेलों. कांहीं अंतर जातों तों कांहीं पुरुष तेथील रिवाजाप्रमाणें दिगंबर होऊन एका फळीवरून नदींत उड्या मारीत होते,तें पाहून त्या मुलीला लाज वाटली नाहीं इतकेंच नाहीं तर त्यांपैकीं तिच्या ओळखीचा एक तरुण पोहत आमच्या होडी जवळ आला व अशा स्थितींत ती त्याच्याशीं गप्पा मारीत राहिली ! मीं आपल्या मनाशीं ठरवलें कीं इंग्रजांच्या विनयाच्या कल्पना कांहीं अजब आहेत.

ही गोष्ट काल्पनिक परंतु संभवनीय आहे, व पुढील प्रकार आम्ही स्वतः पाहिला आहे. सकाळचे प्रहरीं आमची बोट सुएझच्या कालव्यांतून संथपणें चालली होती. कालवा अरुंद असल्यामुळें कांठावरील गोऱ्या लष्कराचें ठाणें अगदीं जवळ होतें. त्यांतून कांहीं सैनिक नग्न स्थितींत पोहत बोटीच्या अगदीं जवळ आले, व बोटींतील बहुतेक सर्व युरोपीय स्त्रिया हा प्रकार बिलकूल लाजल्याशिवाय पहात होत्या !

आमचे एक हिंदी मित्र एका जपानी गृहस्थाचे घरीं पाहुणे गेले असतां एके दिवशीं स्नानाचे खोलींत स्नान उरकून पाहतात तों कपडे निजावयाचे खोलींत राहिले. तसेंच तेथपर्यंत पळत जावें तर वाटेंत घरची मालकीण शिवीत बसली होती. हे स्नान करून बाहेर कां येत नाहींत, म्हणून तिनें तपास केला व कारण समजलें तेव्हां तिला मोठें हंसूं कोसळलें ! 'त्यांत लाजण्याचें कांहींच कारण नव्हतें, आमचा हा प्रघातच आहे' असें तिनें सांगितलें. जपानी पुरुष व स्त्रिया एकमेकांचे देखत उघडपणें नग्न स्नान करतात हें विश्रुतच आहे.

यावरून स्त्रियांमधें कांहीं विशेष प्रकारचा नैसर्गिक विनय असतो ही कल्पना खरी दिसत नाहीं. स्त्रियांच्या आपसांतल्या गोष्टी त्यांना नकळत ऐकण्याची संधी मिळाल्यास याचा अनुभव येतो. विनय म्हणजे एक सामाजिक ढोंग आहे. मनुष्यास वेड लागल्यास त्याच्या मनावरचा सामाजिक दाब नाहींसा होतो, व त्याबरोबर

लज्जाहि साफ नाहींशीं होते. डॉ. फॉरेल बरींच वर्षे वेड्यांचे इस्पितळावर होते, त्यांनीं लिहिलें आहे कीं ज्या स्त्रियांची विनयशीलतेबद्दल विशेष ख्याती असते त्यांस वेड लागलें असतां त्या इतरांपेक्षां जास्त बीभत्स होतात.

वस्तुतः स्त्रीच्या किंवा पुरुषाच्या नग्न शरीरांत, तटस्थ वृत्तीनें पहाणारास लाज वाटण्यासारखें कांहींच नाहीं. परंतु नैसर्गिक प्रवृत्ती दडपून टाकूं पाहणाऱ्या सामाजिक निर्बंधांच्या तडाख्यांत मनुष्याची तटस्थ वृत्ति रहावी कशी ? स्त्रीपुरुषांच्या परस्पर आकर्षणामुळें परस्परांचें अनावृत शरीर पाहण्याची दोघांसहि इच्छा असणें स्वाभाविक आहे. ही इच्छा नैसर्गिक असल्यामुळें ती दाबण्याचा जितका प्रयत्न करावा तितकी ती अधिक प्रबल होते. नग्न चित्रें व पुतळे लोकांस विशेष आवडतात यांतील इंगित हेंच आहे. नग्न चित्रें विकणें कायद्यानें बंद केल्यास लोक दसपट किंमती देऊन तीं घेण्यास तयार होतात. उलटपक्षीं ज्यांस अशीं चित्रें किंवा शरीरें वारंवार दिसतात त्यांची ही इच्छा नेमस्त राहते.

ईश्वराचें अस्तित्व मानणारांस तरी निदान ईश्वरनिर्मित मानवी शरीरांत कांहीं लज्जास्पद दिसणार नाहीं असें कोणास वाटेल, परंतु हे लोक ईश्वरासही नीति आणि विनय शिकवूं पाहतात ! स्पेनमधील ख्रिस्ती जोगिणींच्या मठांतील विद्यार्थिनींचें लक्ष भलतीकडे जाऊं नये म्हणून त्यांस जननेंद्रिय धुण्याची सक्त मनाई असते ! ऑस्ट्रिआमधील पुष्कळ जोगिणी, ख्रिस्तानें आपणांस नग्न पाहूं नये म्हणून निजतांना त्याचे मूर्तीवर रुमाल टाकतात ! अलीकडे कॅथोलिक पंथाच्या ईश्वराचे प्रतिनिधि पोप यांनीं स्त्रियांचे हात अस्तनीबाहेर अमुक इंचांपेक्षां जास्त दिसतां कामा नये असा फर्मान सोडला आहे. या बहादरांना हातही अश्लील दिसूं लागले ! हा प्रकार वाढत गेल्यास शरीराचा कोणताही भाग अश्लीलतेच्या आरोपांतून सुटणार नाहीं.

ग्रीक व रोमन लोकांच्या भरभराटीचे वेळीं स्त्रीपुरुषांचे व देवादिकांचे पुतळे नग्न असत व त्यांची त्यांस लाज वाटत नसे. नंतर ख्रिस्ती धर्माबरोबर दांभिक वृत्ति वाढत गेल्यामुळें पुतळ्याचे मध्यभागीं अश्वत्थपत्र खोदण्याची पद्धत पडली.

यामुळें अश्वत्थपत्राचें नांव काढल्याबरोबर अश्लील कल्पना मनांत येऊं लागल्या व गरीब विचारें झाडाचें पान सुद्धां अश्लील होऊन बसलें ! याच तत्त्वावर इंग्लंडांत ‘ विजार ’ या अर्थाचा शब्द अश्लील झाला आहे व तो स्त्रियांच्या देखत उच्चारीत नाहींत ! आपल्या समाजांत पतिपत्नींनीं परस्परांचें नांव न घेण्याच्या पद्धतीच्या मुळाशीं अश्लीलतेच्या फाजील कल्पनाच असाव्या असें दिसतें.

सारांश, अशा रीतीनें अश्लीलतेच्या व विनयाच्या कल्पनांस फाजील व्यापकता देणें अत्यंत हास्यास्पद आहे, व या कल्पना वर सांगितल्याप्रमाणें स्वच्छतेच्या आड येऊं लागल्यास तें धोक्याचें आहे. स्वच्छतेपेक्षां विनयाचें महत्त्व जास्त समजणें समाजास घातक आहे व या प्रकारास शक्य तितक्या लवकर आळा घातला पाहिजे. नग्न राहणाऱ्या रानटी लोकांचें शरीर कोणत्याही सुधारलेल्या लोकांपेक्षां मजबूत व बांधेसूद असतें याचें एक कारण नग्नता हेंच आहे. दुसरें कारण म्हणजे त्यांचे व्यायामाचे प्रकारः—पळणें, चालणें नव्हे, उड्या मारणें व विशेषतः पोट घुसळून निघेल अशा प्रकारचे त्यांचे विशिष्ट नाच, यांमुळें सुधारलेल्या लोकांचा मुख्य रोग जो मलावरोध, तो त्यांस होत नाहीं. ( Sex and Exercise, by Miss Ettie Rout. )

समाजाच्या अंगीं खिळलेल्या कल्पना एकदम बदलणें शक्य नाहीं हें खरें, परंतु या दृष्टीनें प्रत्येकानें जोराचा प्रयत्न केला पाहिजे. त्याची पूर्व तयारी म्हणजे प्रत्येकानें शरीराचे सर्व भाग शक्य तितके स्वच्छ ठेवण्याचा मनापासून यत्न केला पाहिजे. जसें कित्येक लोकांच्या घरीं दिवाणखान्यांत खूप ऐट केलेली असून बाकीच्या खोल्या घाणेरड्या असतात, त्याचप्रमाणें कांहीं लोक हात, तोंड वगैरे शरीराचे दृश्य भाग तेवढेच स्वच्छ ठेवतात व बाकीच्या शरीराची तितकी निगा राखीत नाहींत, हें योग्य नाहीं. आपणास कोणीं नग्न पाहिलें असतां त्यास किळस येतां कामा नये अशी प्रत्येकाची तयारी पाहिजे. "शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्."

( हा लेख प्रथम लिहिला तेव्हां ‘ समाजस्वास्थ्य ’ अस्तित्वांत नसल्यामुळें तो ‘ किर्लोस्कर खबर ’ कडे पाठवला होता, परंतु त्यांनीं नाकारला. अशा प्रकारच्या मागसलेल्या किंवा ढोंगी पत्रकारांस असे लेख छापण्याचें धाडस होत नसे, हेंच मुख्यतः

'समाजस्वास्थ्य' मासिक काढण्यास कारणीभूत झालें. इतर पत्रकारही आतां थोडेसे धीट होत आहेत व याचें मुख्य श्रेय आम्हांसच आहे असें आम्ही समजतों, लोक याला पाहिजे तर अहंकार म्हणोत–संपादक )

---

**उपयुक्त संस्था.** बर्लिन म्युनिसिपालिटीनें जून १९२६ मध्यें विवाहेच्छु स्त्रीपुरुषांसाठीं एक ऑफिस उघडलें. तेथें वधूवरांस तपासून तीं प्रकृतीच्या दृष्टीनें एकमेकांस योग्य आहेत किंवा नाहींत व त्यांस सुप्रजा होणें शक्य आहे कीं नाहीं हें सांगतात व पाहिजे असल्यास सर्टिफिकिटें देतात. येथेंच विवाहित जोडप्यांसही कामशास्त्रासंबंधीं अडचणी असल्यास त्यांस योग्य उपदेश देतात व संततिनियमनाचीहि माहिती देतात. या आफिसांत जाणाऱ्या लोकांसंबंधीं कोणतीही माहिती बाहेर न फोडण्याची तेथील सर्व कामगारांस शपथ घ्यावी लागते. या सर्व कामाबद्दल बिलकुल फी पडत नाहीं.

अशा प्रकारच्या संस्थांची निदान प्रत्येक शहरांत तरी विशेष आवश्यकता आहे. म्हणजे वधूवरांपैकीं एकास क्षय किंवा गर्मीसारखा एखादा संसर्गजन्य रोग असल्यास त्यापासून दुसऱ्याचें जन्माचें नुकसान होणार नाही.

---

विवाहासंबंधीं चोवीस प्रसिद्ध लोकांचे विचार एकत्र करून **काउंट केसरलिंग** यांनीं प्रसिद्ध केले आहेत. या पुस्तकाकरतां लेख लिहिण्यास **बर्नार्ड शॉ** यांस विनंति केली असतां त्यांनीं लिहिलें, 'स्वतःची बायको जिवंत असतां कोणीहि पुरुष विवाहासंबंधीं आपले खरे विचार लिहूं शकणार नाहीं. एखादा पत्नीचा द्वेष्टा कदाचित् खरें लिहूं शकेल, परंतु मी तसा नाहीं. खऱ्या मुद्द्यांची टाळाटाळी लोक कशी करतात हें पाहण्याकरतां मी हें पुस्तक वाचीन, परंतु मी त्यांत लिहिणार नाहीं !' व हें पुस्तक खरोखरच उडवाउडवीच्या लेखांनीं भरलेलें आहे असें पुष्कळांचें मत आहे.

यावरून **बर्नार्ड शॉ** यांचे विचार निदान प्रचलित विवाहपद्धतीस फारसे अनुकूल नाहींत असें अनुमान काढण्यास हरकत दिसत नाहीं. शिवाय, 'दोन माणसें

एका बिछान्यावरच काय, पण एका खोलींत तरी कशीं निजूं शकतात कोण जाणे !' असे विचार त्यांनीं एका ग्रंथांत प्रकट केले आहेत.

---

**ब्रह्मचर्य.** या बाबतींत पशूंची व मनुष्यांची निरर्थक तुलना करण्याची खोड ब्रह्मचर्याच्या अध्वर्यूंस असते. वास्तवीक पाहतां आहार, निद्रा, मैथुन वगैरे शारीरिक गरजा जरी इतर प्राण्यांप्रमाणें मनुष्यासही असतात, तरी त्यांचे समाधान सर्व प्राणी सारखेंच करतात असें नाहीं. कोणत्याही दोन प्राण्यांच्या राहणींत या बाबतींत फरक दिसून आल्यास त्यांतील एकास चांगलें व दुसऱ्यास वाईट म्हणण्याचा अधिकार कोणसही पोहोंचत नाहीं. मनुष्याचे आनुवंशिक संस्कार व परिस्थिति इतर प्राण्यांपेक्षां निराळीं असल्यामुळें त्याची वागणूक इतर प्राण्यांपेक्षां वेगळी असल्यास नवल नाहीं. इतर प्राण्यांची कामवासना कालमानावर अवलंबून असते तशी मनुष्याची नसते, यावरून मनुष्य कमी प्रतीचा ठरत नाहीं व इतर प्राण्यांवर आत्मसंयमनाचा आरोप करण्याचेंहि कारण नाहीं. तरीही इतर प्राण्यांसंबंधीं पाहिजे तीं विधानें ठोकून देणारांनीं खालील गोष्टींचा विचार करण्यासारखा आहे. कोणत्याही इतर प्राण्यांतील मादी ऋतुकालाशिवाय नरास जवळ येऊं देत नाहीं हें जरी खरें असलें तरी अशा कालीं किती वेळां समागम घडतो, हें पाहिल्यास मनुष्य थक्क होतो. 'न्यू जनरेशन्' च्या जाने. १९२७ च्या अंकांत एच्. एस्. जॉइस् लिहितातः—

'एके दिवशीं मी आपली बंदुक घेऊन हिंडत असतां एका हरिणीमागें आठ हरिण पळतांना पाहिले. मधून मधून त्यांपैकीं एखादा हरिणीस पकडी व त्यांचा समागम होई. मला त्या हरिणीची दया येऊन काय करावें असा विचार करतों तों ती सर्व टोळी माझ्या अगदीं जवळून गेली, तेव्हां मीं त्यांतील म्होरक्यास गोळी घातली. तरी त्याकडे बिलकुल लक्ष न देतां बाकीचे सर्व हरिण त्या हरिणीमागें तसेच पळत गेले.

मनुष्यास अगदीं जवळचा प्राणी म्हणजे बिनशेपटीचे वानर, यांतील एका जोडप्याचा अर्ध्या तासांत पांच वेळां समागम झालेला मी प्रत्यक्ष पाहिला आहे.'

## गर्भपाताचें एक कारण

वरील मासिकाच्या त्याच अंकांत एका शेतकऱ्यानें आपला अनुभव दिला आहे. 'एका डेअरीमध्यें ६० गाई एका वर्षांत गाभण करण्याची कामगिरी एका बैलाकडे असे. गाय भरांत असेल त्यावेळीं २४ तासांत तीन चार वेळां समागम होतो व इतकेंहि करून काम होतेंच असा नियम नाहीं.'

या बाबतींत मनुष्याची इतर प्राण्यांशीं तुलना करून कोणताही अर्थ निष्पन्न होत नाहीं.

---

**गर्भपाताचें एक कारण.** वेश्यांस ज्याप्रमाणें फारशी संतति होत नाहीं, तशीच कामुक जोडप्यांस संतती कमी असा सामान्य अनुभव आहे. या दोन्ही गोष्टींचें कारण असें आहे कीं समागमाच्या पुनःपुनरावृत्तीमुळें पुष्कळ वेळां गर्भपात होतो, व गर्भधारणेनंतर लौकरच पात झाल्यास तो लक्षांतहि येत नाहीं. कधीं कधीं पहिल्याच महिन्यांत तर कधीं दोन तीन महिन्यांत या कारणानें गर्भपात झाल्याचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. अशा जोडप्यांस जर संततीची इच्छा असेल तर त्यांनीं गर्भावस्थेंत पूर्ण विश्रांती घेतली पाहिजे. ज्यांची कामेच्छा फारशी तीव्र नसते परतु जे पूर्ण ब्रह्मचर्य पाळीत नाहींत अशाच लोकांस सर्वांत जास्त मुलें होतातसें दिसतें.

---

**मांसाहार.** मांसाहारास विरोध करणारांनीं खालील गोष्टी लक्षांत घेण्यासारख्या आहेत. **स्टीफनसन** यांनीं उत्तर ध्रुवाकडे सफर करून त्या प्रदेशांत एकंदर ११॥ वर्षें घालवलीं. यांपैकीं एकंदर ९ वर्षें त्यांचा आहार केवळ मांसमय होता, व पैकीं एकदां लागोपाठ ९ महिने त्यांनीं मांसाशिवाय कांहीं खाल्लें नाहीं. त्यांचें सर्वांत अधिक वजन यावेळीं झालें व त्यांची प्रकृति उत्तम व मन उल्लासित होतें. यावेळीं त्यांनीं व्यायाम केला किंवा न केला तरी व हवामान कसेंहि असलें तरी त्यांस नेहमीं बरेंच वाटलें. मलावरोध कधींहि झाला नाहीं. एक महिनाभर बिलकुल व्यायाम केला नाहीं तरी मलावरोध झाला नाहीं व क्षीणता आली नाहीं. त्यांचे केंस अधिक दाट झाले व डोक्याची त्वचा सुधारली. केवळ मांसाहारी ६०० एस्किमो लोकांपैकीं एकासही तीन वर्षांत एकदांही मलावरोध झाला नाहीं असें तें म्हणतात...

## समाजस्वास्थ्य

डॉ. लिएब् यांनीं दोन गृहस्थांची हकीकत दिली आहे. त्यांपैकीं एक ४५ वर्षांचा होता, पण त्याचें वय बरेंच कमी दिसत असे. तो दिवसांतून तीनदां गोमांस खात असे, हाच त्याचा आहार. आपण कधींही व्यायाम घेत नाहीं अशी त्यास घमेंड असे, तरीही त्याला १२ सेकंदांत १०० यार्ड पळतां येत असे व तो ५ मैल पोंहल्यानेंहि दमत नसे. दुसरा ५५ वर्षांचा असून तोहि केवळ मांसाहारीच असे तरी त्याचें पोट, मूत्रपिंड, हृदय वगैरे चांगल्या स्थितींत होतीं.

---

**शिक्षण व प्रजोत्पादन.** प्रजोत्पादनासंबंधीं खरी माहिती मुलांमुलींस द्यावी कीं नाहीं व दिल्यास ती कोणीं, केव्हां व कशी द्यावी हा आजकालच्या वादग्रस्त प्रश्नांपैकीं एक आहे. आपल्या समाजांत रजस्वला स्त्री बाजूला बसते व लहान मुलांनीं याचें कारण विचारल्यास ' कावळा शिवला ' असें उत्तर देतात. त्याचप्रमाणें इंग्लंडांत एखाद्या लहान मुलानें नवीन भावंड पाहून तें कोठून आलें असें विचारल्यास, बगळ्यानें आपल्या चोंचींतून किंवा डाक्तरानें बॅगेंतून आणलें असें सांगण्याची पद्धत आहे. फ्रान्समध्यें तें कोबीच्या कांद्यांत सांपडलें असें सांगतात. अर्थात् अशा उत्तरांनीं मुलांचें फारसें समाधान होत नाहीं व तीं नेहमीं खऱ्या उत्तराच्या शोधांत असतात, व आईबाप खरें बोलत नाहींत असें मनांत पक्कें समजतात. ही लज्जास्पद व लपवण्यासारखी गोष्ट आहे अशी त्यांची समजूत होते.

खेड्यापाड्यांत इतर प्राण्यांपासून त्यांस पुष्कळ वेळां खरा प्रकार समजतो, परंतु तेंहि कोणी मोठीं माणसें जवळ नसल्यास ! यूरोपांतील एका खेड्यांत एक कुत्री वीत असतां घरांतील सर्व मुलें टक लावून पहात आहेत असा प्रकार एका पाद्याच्या दृष्टीस पडला. त्या मुलांची जिज्ञासा स्वाभाविक नव्हती असें कोण म्हणेल ? परंतु या पाद्रीसाहेबानें बिचाऱ्या कुत्रीला मारून तेथून हांकून दिली व मुलांस त्यांच्या भयंकर गुन्ह्याबद्दल रागें भरून खोलींत कोंडून ठेवलें !

या एकंदर लपवालपवीचा परिणाम मुलांचे मनावर चांगला होत नाहीं असें अलीकडे लोकांस वाटूं लागलें आहे......यासंबंधीं शक्य तितकी स्पष्ट माहिती आईबापांनीं किंवा शिक्षकांनीं न दिल्यास मुलांची जिज्ञासा वाढत जाऊन तीं नोकर-

१०५८८

चाकरांचे नादीं लागतात व पुष्कळ वेळां बिघडतात....मुलांचा आईबापांवर विश्वास असल्यास तीं त्यांसच हे प्रश्न प्रथम विचारतात व ते त्यांनीं कितीही लहान वयांत विचारले तरी त्यांस थोडीबहुत खरी माहिती देण्यास हरकत नसते. या बाबतींत दिरंगाई करण्यानें नुकसान होण्याचा संभव असतो. या संबंधांत उघड बोलण्याची चाल नाहीं असें त्यांस माहिती देतांनाच प्रेमानें सांगितल्यास तीं ऐकतात....

---

**कायदे करणारांची अक्कल**! संततिनियमनाची माहिती देणें किंवा त्याचा उघड पुरस्कार करणेंहि फ्रान्स देशांत गुन्हा आहे व इटालींतहि असाच कायदा झाला आहे. गुप्तरोगप्रतिबंधाची माहिती देणें किंवा त्याचीं साधनें विकणें हा गुन्हा नाहीं, व या दोहोंचे कांहीं उपाय सारखेच असल्यामुळें फ्रान्समधेंहि संततिनियमनाचीं कांहीं साधनें ( उदाहरणार्थ रबरी पिशव्या ) रोगप्रतिबंधाकरतां म्हणून उघडपणें विकतात !

इंग्लंडांत याचे उलट स्थिती आहे. रोगप्रतिबंधाचीं साधनें विकणें हा गुन्हा आहे, परंतु संततिनियमनाचीं विकलेलीं चालतात. एका कंपनीनें स्त्रियांकरतां संततिनियमन व रोगांचा प्रतिबंध अशीं दोन्ही कामें करणाऱ्या वड्या तयार केल्या, तेव्हां सरकारकडून त्यांस सूचना मिळाली कीं त्या वड्या संततिप्रतिबंधक म्हणून विकण्यास हरकत नाहीं, परंतु त्यांनींच रोगप्रतिबंध होतो ही गोष्ट बाहेर फोडूं नये !

शेंकडा ३० या प्रमाणांत ‘कॅलोमेल’ घातलेलें मलम असल्यास त्यानें गर्मीचा प्रतिबंध होतो असें **मेचनिकॉफ** यांच्या शोधावरून पुष्कळांस माहीत झालें आहे. असें मलम कोणीं मागितल्यास तें विकलेलें चालतें, परंतु रोगप्रतिबंधाचा उपाय म्हणून तेंच मलम विकणें गुन्हा होतो ! अकलेचे खंदक सर्वच देशांत असतात इतकेंच नव्हे तर कायदे करण्याचें काम त्यांवर सोंपवण्यांत येतें !

---

**स्वयंपाकांत स्वच्छतेचें महत्त्व.** १९१३ सालीं यूरोपांत एका मेजवानीस हजर असलेल्या लोकांपैकीं ३८ लोक आजारी पडले व त्यांपैकीं १० मेले. यांच्या प्रेतांत पॅराटायफॉइड्चे जंतु सांपडले, व हेच जंतु मेजवानीच्या

एका पक्वान्नांत व स्वयंपाकिणीच्या मलांत सांपडले. यावरून ते लोक कसे आजारी पडले याची संगति सहज लागते. सावणानें हात धुण्याची व्यवस्था संडासांत असणें जरूर आहे, व केव्हांहि हात धुण्यास सावण वापरणें बरें. जेव्हां पुष्कळ माणसांस एकच सावण वापरावा लागतो, तेथें सावणाचे वडीऐवजीं पातळ सावणाची बाटली ठेवावी. बाटलींतून ओतून घेतांना आंतील सावणास स्पर्श होत नाहीं.

---

**पाणी किती प्यावें ?** मोठ्या मनुष्यानें दिवसांतून ६ पासून ८ ग्लास पाणी प्यावें ( ग्लास म्हणजे अजमासें ६ औंस किंवा १५ तोळे ). जेवणाबरोबर अगदीं थोडें पिऊन नंतर एक तासपर्यंत आणखी पिऊं नये. अर्थात हिंवाळ्यापेक्षां उन्हाळ्यांत जास्त पाणी प्यावें लागतें व दमट हवेपेक्षां कोरड्या हवेंत जास्त लागतें. लहान मुलांस कमी लागेल, परंतु त्यांस तहान लागेल तेव्हां पाणी दिल्यास तीं बहुधा जरूर तितकेंच पाणी पितात.

---

## रानटी लोकांच्या चालीरीति

इ. स. १७६६–६९ मध्यें कांहीं फ्रेंच लोकांनीं गलबतांतून पृथ्वी-प्रदक्षिणा केली, त्यांपैकीं एकानें **टाहिटी** बेटांतील मूळ रहिवाश्यांचें वर्णन दिलें आहे तें बरेंच मनोरंजक आहे.

‘ आम्ही कांहीं वेळ फिरून त्या गृहस्थाचे घरीं गेलों तों तेथें त्याची बायको व १२–१३ वर्षांची मुलगी होती. त्यांच्या आग्रहावरून आम्हीं कांहीं नारळ, केळीं वगैरे खाल्लीं. नंतर त्या लोकांपैकीं प्रत्येकानें एक एक झाडाची डाहाळी घेऊन ते आमच्या सभोंवतीं उभे राहिले व ती मुलगी आमचे शेजारीं एका चटईवर बसली, ते सर्व लोक आम्हांस खुणा करूं लागले व त्यांपैकीं एक अळगुज वाजवूं लागला. परंतु आमच्या सुधारलेल्या कल्पनांमुळें आम्हांस याचा कांहीं अर्थच कळेना. शेवटीं आमच्या लक्षांत येऊन आमच्यापैकीं एकजण तिच्या जवळ जाऊन बसला. तिच्या अंगावर फारसे कपडे नव्हतेच, परंतु आतां तिनें तेहि साफ काढून टाकले. त्या सर्वांच्या हावभावांवरून आम्हांस इतकें कळून चुकलें कीं उघड-

पणें समागम करण्यांत त्यांस कांहींच वावगें दिसत नसे व पाहुणचार करण्याची त्यांची ही रीत असे. तरीही सुधारलेल्या कल्पनांचें उल्लंघन करण्याची आमच्या-पैकीं कोणाचीहि छाती होईना. याचें त्यांस मोठें आश्चर्य वाटलें व वाईटही वाटलें व नंतर आमच्यापैकीं पुष्कळांनीं खाजगी रीतीने त्यांचें समाधानहि केलें.

त्यांच्यांत एका पुरुषास पुष्कळ बायका असूं शकतात, व त्यांचा विवाह वर सांगितल्याप्रमाणें सर्वांसमक्ष होतो. यावरून त्यांच्यांत नीतीच्या कल्पनाच नाहींत असें मात्र समजतां कामा नये. विवाहित स्त्रिया पतिव्रता असतात व त्या नवऱ्याचे परवानगी-शिवाय आमचेसमोर साफ नग्न होत नसत. नवरे कधीं कधीं आम्हांस स्पर्श करण्याचीहि परवानगी देत असत व कधीं कधीं तर त्यांस आमचेकडे पाठवीतहि असत. परंतु नवऱ्याचे परवानगीशिवाय जर कोणी पुरुष त्यांचे वाटेस गेला तर त्यास मात्र देहांत शासन देण्याची त्यांची वहिवाट होती असें दिसतें. आमचे बरोबरच्या एका गृहस्थांनीं एकदां एका राजपत्नीस स्पर्श केला तेव्हां त्या राजानें आम्हांस हें स्पष्ट दर्शवलें. कुमारिकांस व विधवांस मात्र या बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य असे व त्या खुशाल आमचेकडे येत जात असत.'

अशा रीतीनें त्यांची चैन चालली होती व ते रानटी लोक त्यांच्याशीं इतक्या सलोख्यानें वागत होते तरीही शेवटीं भांडणें उपस्थित झालीं. याचें कारण त्यांच्या गलबतावरील कांहीं खलाशी क्षुब्ध लालसेनें बेफाम होऊन त्यांनीं त्या गरीब बिचाऱ्या लोकांवर जुलूम करण्यास सुरवात केली व कांहींनीं तर त्यांचेवर गोळ्याहि झाडल्या. हें पाहून ते लोक अशा घातकी लोकांस सोडून दूर गेले. शेवटीं फ्रेंच लोकांच्या प्रमुखांनी त्या लोकांस कांहीं बक्षिसें देऊन व खलाशांस शिक्षा करून तेथून आपला तळ हालवला. यांत अधिक रानटी कोण ?

---

**कॉलरा कसा टाळावा.** कॉलरा ( पटकी ) एका विशिष्ट जंतूमुळें होतो व हा जंतु कोणत्यातरी रीतीनें मनुष्याचे पोटांत गेल्याशिवाय हा रोग होणें शक्य नसतें. हे जंतु रोग्याच्या विष्टेंत सांपडतात व त्याच्या किंवा इतरांच्या हलगर्जीपणामुळें हे अन्नांत किंवा पिण्याच्या पाण्यांत शिरून त्यावरोबर पोटांत जातात, व रोगाचा फैलाव होतो. यूरोपांत एक बाई कॉलऱ्याचे सांथीचे वेळीं

आपल्याकडून स्वच्छतेची शिकस्त करीत असे व घराचे बाहेरहि पडत नसे. तरी तिला कॉलरा झाला व शोधाअंतीं तिच्या स्वयंपाकिणीच्या मलांत कॉलऱ्याचे जंतु सांपडले. कांहीं लोकांचे अंगांत जंतु असतांहि त्यांस रोग होत नाहीं व यामुळें इतरांस शंका येत नाहीं. ही बाई अशापैकीं होती व तिच्या अस्वच्छतेमुळें ते जंतु अन्नांत शिरले. हा शोध करणाऱ्या डाक्टरानें पुढील उपाय सुचवला:—कॉलऱ्याचे जंतु थोड्या उष्णतेनें देखील मरतात; तेव्हां कोणताहि पदार्थ गरम असल्याशिवाय तोंडात घालायचा नाहीं असा नियम केल्यास कॉलरा होणें शक्य नाहीं. विशेषतः ज्या पदार्थास हात लागण्याचा संभव असतो त्यांबद्दल विशेष काळजी घेतली पाहिजे. चमचे, कांटे, ताटें, वशा वगैरेहि अर्थात गरम पाहिजेत. चटण्या, कोशिंबिरी गरम केल्या पाहिजेत व आइस्क्रीम सारखे पदार्थ खातां कामा नये, वास्तवीक खाण्याचे पदार्थांस खाणाऱ्याशिवाय दुसऱ्या कोणाचाहि हात लागूं नये हें उत्तम, परंतु हें नच साधल्यास प्रत्येक पदार्थ आयत्यावेळीं गरम करून खावा.

युरोपांत संडासांत कागद वापरण्याची पद्धत आहे व आपलेकडे पाणी वापरतात, म्हणून आम्ही त्यांचेपेक्षां श्रेठ अशी कांहीं लोक घमेंड मारतात, परंतु कागद वापरल्यास हातास विष्टेचा संपर्क न होऊं देणें शक्य असतें व हा मुद्दा अत्यंत महत्वाचा आहे. अर्थात साबणानें हात धुण्याची योग्य व्यवस्था असल्यास पाणीच वापरणें बरें. परंतु हातास माती लावल्यानें मात्र जंतु मरत नाहींत व हातही तितके स्वच्छ होत नाहींत, तेव्हां साबणाची सोय नसल्यास कागदच बरे.

## वेश्या व गुप्तरोग

पॅरिस येथें डॉ. लुई केरा यांचें २४ मार्च १९२७ रोजीं व्याख्यान झालें, त्याचा सारांश पुढें दिला आहे. ते म्हणाले:—

‘ गुप्त रोगप्रतिबंधाचे दृष्टीनें वेश्यांसंबंधीं कायदे करावे कीं नाहीं व केल्यास ते कसे असावे, हा हल्लींच्या बिकट प्रश्नांपैकीं एक आहे...याचा निःपक्षपातानें विचार केला पाहिजे, कारण कोणत्याही चालू पद्धतीला दोष देणें सोपें असतें, परन्तु त्यांत सुधारणा करणें सोपें नसतें.

# वेश्या व गुप्तरोग

कोलंबसाबरोबर अमेरिकेंत गेलेल्या लोकांनीं जेव्हां १४९३ सालीं गर्मीचा रोग आपल्याबरोबर परत आणला (याबद्दल मतभेद आहे, कित्येकांचे मतें हा प्राचीन काळीं चीन देशांत होता असा पुरावा सांपडतो. संपादक) तेव्हां तो तावडतोब सर्वत्र पसरला व विशेषतः १४९३–९५ च्या लढाईमुळें तो पसरण्यास मदत झाली.

हल्लीं गर्मी कितीहि भयंकर वाटो, त्या वेळच्या रोगाची कल्पनाहि त्यावरून येणार नाहीं. त्या वेळीं त्यावर कोणताहि उपचार माहीत नव्हता, व सर्व शरीरावर भयंकर व्रण पडून डोळे, नाक व कधीं कधीं हाडें सुद्धां रोगानें खाल्ल्यामुळें रोग्यांची सर्वांस भीति वाटून त्यांजवळ कोणी बोलत नसे व त्यांजकडे पहावतही नसे. प्लेगच्या रोग्यांप्रमाणें ते रस्त्यांत किंवा शेतांत मरून पडत असत. परंतु लोक इतके भिऊन दूर रहात असतांहि रोग पसरतच गेला.

शेवटीं १४९६ मध्यें या रोगासंबंधीं पॅरिस शहरांत पहिला कायदा झाला. तो असा:—कोणीही रोग्यानें रोग बरा झाल्याशिवाय घरा बाहेर पडूं नये; विदेशी रोग्यांनीं २४ तासांचे आंत निघून गेलें पाहिजे, नाहींतर फांशींची शिक्षा होईल; गरीब रोग्यांकरतां गांवाबाहेर जागा ठेवली आहे, तेथें त्यांनीं राहिलें पाहिजे. रोग संसर्गजन्य आहे यापलीकडे कांहींच माहीत नसल्यामुळें इतकेंहि करून तो थांबेना. तेव्हां १४९८ मध्यें कायदा मोडणारांस नदींत फेकून दिलें जाईल, असा हुकूम सुटला. तरीहि रोग्यांची संख्या इतकी वाढली कीं बाहेर नेमलेली जागा भरून गेली. अशा रोग्यांकरतां एक इस्पितळ नेमून दिलें व नंतर २०० वर्षेंपर्यंत त्यांची सोय तेथें होत असे. ही सोय म्हणजे आरंभीं कांहीं फटके मारून नंतर कांहीं दिवसांनीं पुनः फटके मारून त्यांस हांकून देणें, इतकीच असे! उपचारांचें नांव नसे.

यानंतरचे सर्व कायदे वेश्यांस मात्र अनुलक्षून केलेले असून त्यांत पुरुषांचें नांवच नसे. हल्लीं येथें अंमलांत असलेले कायदे अशाच प्रकारचे आहेत.

रस्त्यांत स्त्रियांचे वागणुकीवर लक्ष ठेवण्याकरतां साधा पोषाख केलेले पोलीसचे लोक ठेवलेले असतात. फ्रान्समधें वेश्यावृत्ति गुन्हा नाहीं. आपल्या शरीराचा

हवा तसा उपयोग करण्याचा प्रत्येकाला हक्क असतो व यांतच वेश्यावृत्तीचा समावेश होतो. यास अपवाद म्हणजे १८ वर्षांचे आंतील मुलें. परंतु अव्यवस्थित वागणुकी मुळें जर शहरांतील शिस्त बिघडूं लागली, किंवा संसर्गजन्य रोगांचा प्रसार होऊं लागला तर मात्र तें कायद्याखालीं येतें व त्यावर देखरेख ठेवणें भाग पडतें. ही पद्धत येथें कशी अमलांत येते तें पाहूं.

एखादी स्त्री बऱ्याच वेळां रस्त्यांत पुरुषांस गांठून त्यांस मोह घालण्याचा प्रयत्न करते असें नक्की वाटल्यास पोलीसचे लोक तिला पकडून सरकारी दवाखान्यांत पाठवतात. तेथील अधिकाऱ्यानें तिला प्रश्न विचारून त्याची खात्री झाल्यास तेथील डॉक्टर तिला तपासतो व तपासणीची नोंद ठेवतो. ती निरोगी असल्यास तिला सोडून देतात. तिला एखादा गरमी, परमा वगैरे संसर्गजन्य रोग असल्यास उपचाराकरतां इस्पितळांत पाठवतात, व संसर्गाचा संभव नाहींसा झाल्यावर तिला सोडून देतात. तिचें वय १८ पेक्षां कमी असल्यास तिला आईबापांकडे पाठवतात व ते नसल्यास बालगुन्हेगारांची एक वेगळी शाळा असते तेथें पाठवतात व २१ वर्षें पुरीं होईपर्यंत ठेवतात. अशा तऱ्हेनें एखाद्या स्त्रीला बऱ्याच वेळां पकडल्यास ती वेश्या आहे असें ठरवून तिच्या नांवाची नोंद करून तिला एक तिकीट देतात ( हें तिकीट असल्यास विशेष गैरशिस्त वागणूक झाल्याशिवाय पोलीस तिच्या वाटेस जात नाहींत. सं. )

हीं तिकिटें दोन प्रकारचीं असतात. गर्मी असलेल्या वेश्यांस तांबडें तिकीट मिळतें व त्यांस दर आठवड्यास तपासणीकरतां दवाखान्यांत जावें लागतें. गर्मी न झालेल्या वेश्यांस पांढरें तिकीट देतात व त्यांस दर १५ दिवसांनीं तपासणीस जावें लागतें. पन्नासपेक्षां अधिक वयाच्या वेश्यांस महिन्यांत एकदांच तपासणी असते. इतक्या वयांत सुद्धां धंदा चालू ठेवणाऱ्या वेश्या पुष्कळ असतात. चवदाव्या वर्षी धंदा सुरू करून ७५ वयांतही तो सतत चालू ठेवणाऱ्या वेश्येचें एक उदाहरण मला दवाखान्यांत आढळलें.

पॅरिसमध्यें नोंदलेल्या वेश्या ७००० आहेत. त्या नेमल्यावेळीं तपासणीस जातात कीं नाहीं हें त्यांच्या तिकिटांवरून समजतें. त्यावर त्यांचें नांव, जन्मदिवस व स्थान, व तपासणीकरतां नेमलेल्या तारखा असतात. ज्या तारखेस तपासणी

झाली त्या तारखे समोर छाप मारतात. वेश्यांचा फोटो लावण्याकरतां जागा असते, परंतु तो लावलाच पाहिजे हा नियम अलीकडे रद्द झाला आहे. ही मोठी चूक आहे, कारण आतां तिकीट कोणाचें हें समजण्यास मार्ग नाहीं.

गर्मी असलेल्या वेश्यांस सुद्धां धंदा चालू ठेवण्याचा हक्क राहतो हें ऐकून तुम्हांस आश्चर्य वाटेल. या वेश्यांची ८ दिवसांनीं तपासणी होते हें खरें, परंतु ती अर्थातच विशेष काळजीपूर्वक न झाल्यामुळें बारीकसारीक व्रण लक्षांत येत नाहींत, परंतु त्यांनीं संसर्ग होऊं शकतो. वास्तवीक रोग्याचें रक्त तपासलें पाहिजे, परंतु तें क्वचितच होतें. अशा तपासणीनंतर वेश्यांकडे जाण्यांत धोका नाहीं असें समजणें किती चुकीचें आहे, हें यावरून तुमच्या लक्षांत येईल. तांबड्या तिकिटाच्या वेश्यांकडून संसर्ग झालेल्या कांहीं लोकांचीं उदाहरणें मीं प्रसिद्ध केलीं आहेत.

वेश्यांस ऋतुमानाप्रमाणें सायंकाळीं ७ पासून ९ वाजण्यापूर्वी व मध्यरात्री-नंतर, रस्त्यांत गिऱ्हाईक गांठण्याची सक्त मनाई आहे; आगगाडीचीं स्टेशनें, शाळा, देवळें, मोठे रस्ते, चौक व सार्वजनिक बगीचे यांच्या आसपास हिंडण्याची त्यांस परवानगी नाहीं.

रस्त्यांत पोलिसानें पकडलेल्या किंवा तिकीट घेऊन तपासणीस येणाऱ्या वेश्यां-खेरीज आणखी नोंदलेल्या वेश्यागृहांतील वेश्यांची तपासणी दाक्तरांस करावी लागते. हीं वेश्यागृहें पॅरिस शहरांत व उपनगरांत मिळून सुमारें ३० आहेत. प्रत्येक गृहांत दर आवठड्यास दाक्तर जाऊन तपासणी करतो व कोणास रोग असल्यास तिची इस्पितळांत रवानगी होते. या गृहांत पांढऱ्या व तांबड्या तिकिटांच्या व कांहीं तिकिटांशिवाय वेश्या असतात. विनतिकिटाच्या वेश्यांस तेथें जाण्यापूर्वीं निरोगी असल्याबद्दल दाक्तराचें सर्टिफिकीट लागतें व वय निदान २१ असावें लागतें.

याशिवाय पॅरिसमध्यें सुमारें २५० संकेतगृहें आहेत. (येथें वेश्या रहात नाहींत, फक्त धंद्यापुरत्या येतात.—सं.) येथेंहि आठवड्यांत एकदां तपासणी असते व रोग्यांस इस्पितळांत पाठवतात. याशिवाय एक सरकारी दवाखाना आहे तेथें इस्पितळांतून सोडलेल्या वेश्यांस व इतर स्त्रीपुरुषांसहि फुकट उपचार केला जातो.

इतकी व्यवस्था आहे खरी, परंतु अंमलबजावणींत पुष्कळ दोष आहेत. पोलिसांनें प्रथम पकडलेल्या स्त्रीस गर्मी असली तरी तिची वेश्या म्हणून नोंद होत नाहीं. दोन तीन वेळां पकडल्यावरच नोंद होते, यामुळें गर्मी असलेल्या कांहीं स्त्रियांस धंदा करण्याची मोकळीक मिळते, ( हें सर्वथैव खरें नाहीं. प्रथम तपासणीचे वेळींहि इस्पितळांत पाठवून संसर्गाचा संभव नाहींसा झाल्यावर सोडतात, असें याच व्याख्यानांत वर सांगितलें आहे.—सं. ) व यामुळें समाजास मोठा धोका आहे. तपासणीचे वेळीं ज्यांचे शरिरावर गर्मीचें कांहीं चिन्ह दिसत नाहीं त्यांस पांढरें तिकीट देतात ही मोठी चूक आहे. अशा स्त्रियांचे अंगांत सुद्धां गर्मीचे जंतु असू शकतील व त्यामुळें शरिरावर व्रण उत्पन्न होऊन संसर्ग होऊं शकेल. याकरतां वारंवार त्यांचें रक्त घेऊन तें तपासलें पाहिजे. या स्त्रियांस निरोगी समजून उपचार न करणें अतिशय धोक्याचें आहे. शिवाय वेश्यागृहींतील वेश्यांस रोग झाल्यास त्या पुष्कळ वेळां तपासणी चुकवतात. असें होतां कामा नये.

तपासणारे डाक्टर या विषयांतील तज्ज्ञ असले पाहिजेत. हल्लीं असलेले बहुतेक सर्व डॉक्टर लायक आहेत व नेकीनें काम करतात हें खरें. तथापि सुमारें दहा डाक्टरांची नेमणूक केवळ वशिल्यानें झालेली आहे. नालायक लोकांस अशा कामावर नेमणें म्हणजे रोगप्रसार करणें आहे.

वशिल्यामुळें कांहीं संकेतगृहांची तपासणीच कधीं होत नाहीं व याबद्दल तक्रारीचा उपयोग होत नाहीं. सरकारी दवाखान्यांतील व्यवस्था तपासणीच्या दृष्टीनें असावी तशी नाहीं. यांत सुधारणा पाहिजे. संकेतगृहांस परवानगी देतांना तीं आरोग्य दृष्ट्या योग्य आहेत कीं नाहीं हें एखाद्या डाक्तरास विचारण्याची कल्पना अधिकाऱ्यांस अजून सुचलेली नाहीं..........

वेश्यांसंबंधीं कायद्याच्या अंमलबजावणींत कशी अव्यवस्था होते हें आतांपर्यंत पाहिलें, परंतु कायद्यांतहि सुधारणा पाहिजे आहे. प्रथमतः पुरुषांस व स्त्रियांस एकच कायदा पाहिजे. एखाद्या स्त्रीनें रस्त्यांत पुरुषांस मोह घालण्याचा प्रयत्न केल्यास तिला पोलीस पकडतात, परंतु पुष्कळ पुरुष रस्त्यांत, दुकानांत, पोष्ट ऑफिसांत, फार काय देवळांत सुद्धां तरुण स्त्रियांसच नव्हे तर कोंवळ्या मुलींसहि

भुरळ पाडण्याचा प्रयत्न करितात व तो पुष्कळ वेळां सफळहि होतो, त्याची वाट काय? अशा प्रकारचा पद्धतशीर प्रयत्न विशेषतः टायपिस्ट (यंत्रलेखक) व दुकानांत काम करणाऱ्या तरुण स्त्रियांवर चालतो. यांस भुलवणाऱ्या पुरुषांस पोलीस कांहीं करीत नाहीं व त्याच प्रकारचा प्रयत्न स्त्रियांनीं केल्यास पोलीस त्यांस पकडतात.

शिवाय हे पुरुष पुष्कळदां रोगी असतात. स्त्रीला जुलमानें तपासून ती रोगी असल्यास इस्पितळांत पाठवतात, परंतु रोग पसरणाऱ्या पुरुषांस पोलीस कांहीं करीत नाहीं. हे सर्व बदललें पाहिजे व या बाबतींत स्त्रीपुरुषांत भेद असूं नये. याकरतां वेगळे लोक नेमण्याचें कारण नाहीं. रस्त्यांतल्या पोलीसचे शिपायावर हें काम सोंपवावें. कोणाही स्त्रीची किंवा पुरुषाची वागणूक अयोग्य दिसल्यास त्यांस पकडून नांव व पत्ता उतरून घ्यावा. तपासून घेण्याची त्यांची खुषी असल्यास तपासावें, नसल्यास पहिल्या व दुसऱ्या वेळीं बजावून सोडून द्यावें, परंतु तिसऱ्या वेळीं मात्र सक्तीनें तपासावें व रोग्यांस इस्पितळांत पाठवावें.

रोगी पुरुषांनीं किंवा स्त्रियांनीं उपचार करण्याचें कबूल केल्यास त्यांस सोडावें, परंतु त्यांनी उपचारांचा पुरावा दाखवला पाहिजे, कारण मुळींच किंवा पुरेसे उपचार न करणारे निष्काळजी रोगी पुष्कळ असतात, व त्यांपासून इतरांस धोका असतो. इतकेंच नाहीं तर 'हा रोग मला स्त्रीपासून लागला, तेव्हां शक्य तितक्या स्त्रियांस रोग देऊन मी त्याचा सूड घेणार! असें प्रतिपादणारा एक विद्यार्थी मला भेटला होता.'

इस्पितळांतील रोग्यांस डॉक्टराचे हुकुमाशिवाय बाहेर जाऊं देतां कामा नये. हल्लीं ते पाहिजे तेव्हां जाऊन सर्वत्र रोग पेरूं शकतात. हा कायदा बदलला पाहिजे. गुप्त रोगांचे बाबतींत स्वीडन् देशांतील कायदे मला फार आवडतात, त्यांतील मुख्य असेः—

( ३ ) गुप्त रोगांचा प्रसार होऊं नये म्हणून प्रत्येक रोग्यानें डॉक्टराचें औषध घेऊन तो सांगेल त्याप्रमाणें वागलें पाहिजे. ( ४ ) कोणालाही गुप्त रोग आहे असें दाक्तरास समजल्यावरोबर त्यानें रोग्यास सांगितलें पाहिजे, औषध दिलें पाहिजे व इतरांस संसर्ग होऊं नये म्हणून कसें वागलें पाहिजे हें लिहून दिलें पाहिजे. त्यांत

रोग बरा होईपर्यंत लग्न न करण्यासंबंधीं व रोगाचा प्रसार न करण्यासंबंधी काय कायदे व शिक्षा आहेत हें लिहिलें पाहिजे. (११) गुप्त रोग ज्या डाक्तराच्या नजरेस येईल त्यानें त्याचा संसर्ग कसा व कोणापासून झाला हें जाणण्याचा शक्य तितका प्रयत्न केला पाहिजे. शिवाय सांगितल्याप्रमाणें उपचार वगैरे करतो असें सर्टिफिकीट रोग्यानें डॉक्टराकडून घेऊन आरोग्याधिकाऱ्यांस दाखवावें लागतें, व उपचार बरोबर होत नाहीं असें दिसल्यास इस्पितळांत जावें लागतें. कायदा मोडणाऱ्या रोग्यांस जबर शिक्षा ठेवली आहे.

कोणींही कोणाचें नकळत सुद्धां नुकसान केल्यास तें भरून दिलें पाहिजे हें तत्त्व गर्मीचे संसर्गाचे बाबतींत कां लावूं नये ? या प्रश्नावर बराच वाद होऊन आतां बरेच लोक कबूल करतात कीं याबद्दल कायदा पाहिजे.

वरील विवेचनावरून आपल्या लक्षांत आलेंच असेल कीं वेश्यावृत्ती-संबंधींच कायदे करून उपयोग होत नाहीं. ही व्यवस्था बदलली पाहिजे. या बाबतींत लोकांस शिक्षण देणें, गर्मी व परम्याचे रोगी शोधून काढून त्यांचे अंगांतील जंतु मारण्याचे उपाय करणें, संसर्गप्रतिबंधाचे नियम पाळण्यास लावणें,...या दिशांनीं प्रयत्न झाले पाहिजेत. हल्लींचा सरकारी दवाखाना व इस्पि-तळांत पोलीसची कुचकामाची देखरेख बंद केली पाहिजे. रोग्यांस प्रेमानें वागवलें पाहिजे, संसर्ग न होऊं देण्याचा उपदेश केला पाहिजे, परंतु जे ऐकणार नाहींत त्यांची मात्र दया करतां कामा नये. हल्लींच्या ज्ञानाचा योग्य उपयोग केल्यास थोड्याच वर्षांत गर्मीचा भयंकर रोग जगांतून नाहींसा करता येईल. पोलीसची देख-रेख काढून टाकून सर्वांस पूर्ण स्वातंत्र्य दिलें पाहिजे हें मत मला मान्य नाहीं.

पुरुषांस व स्त्रियांस समतेनें वागवलें पाहिजे हें सांगितलेंच. शिवाय मी डाक्तर असून गर्मीचा विशेष अभ्यास केला आहे, तेव्हां हा रोग नाहींसा करणें शक्य आहे हें माहीत असतां व्यक्तिस्वातंत्र्याच्या विचित्र कल्पनांस फाजील महत्त्व देऊन या कार्यास उशीर लावावा हें मला कबूल नाहीं. जेथें समाजास धोका उत्पन्न झाला तेथें व्यक्तिस्वातंत्र्य संपलें.

---

## संततिनियमनाची एक दिशा.

पुरुषांवर किंवा स्त्रियांवर शस्त्रक्रिया करून त्यांची संगमाची इच्छा किंवा

शक्ति कमी न होतां फक्त प्रजोत्पादन बंद करतां येतें हें पुष्कळांस माहीत असेल ( नसल्यास आमचें ‘ संततिनियमन ’ पहा. ) ज्यांस सुदृढ व निरोगी मुलें होणें शक्य नाहीं अशा स्त्रीपुरुषांनीं अशी शस्त्रक्रिया करून घेण्यास आपण होऊन तयार व्हावें हें इष्टच व अशा लोकांवर शस्त्रक्रिया फुकट करण्याची व्यवस्था समाजानें केली पाहिजे. परंतु समाजहिताची इतकी जाणीव फारच थोड्यांस असते व वेडसर लोकांस बहुधा मुळींच नसते. परंतु वेड्या किंवा अर्धवेड्या लोकांस सुदृढ संतति होणें शक्य नसतें, तेव्हां या लोकांवर थोडासा जुलूम करण्याचा हक्क समाजास पोहोंचतो.

शिवाय अनावर कामवासनेमुळें किंवा केवळ आडदांडपणानें जे पुरुष स्त्रियांवर बलात्कारादि अत्याचार करतात त्यांवर थोडीशी निराळी शस्त्रक्रिया करून त्यांची संगमाची इच्छा व शक्तीही नाहींशी करणें जरूर पडेल.

अमेरिकेंत कॅलिफोर्निआ संस्थानांत असे प्रयोग केलेले आहेत. तेथें ६ वेड्यांचीं इस्पितळें आहेत व दुबळ्या मनाच्या असहाय लोकांस आश्रय देणारी संस्था आहे. या सर्व संस्था मिळून सुमारें ४००० वेड्यांवर व १००० दुबळ्यांवर गेल्या १८ वर्षांत शस्त्रक्रिया केली. वरिष्ठ दाक्तराच्या मतानें रोग्याचे मर्जीविरुद्ध देखील शस्त्रक्रिया करतां येते.

या प्रयोगानें एकंदर प्रकृतीसही फायदा होतो व हाच याचा मूळ उद्देश होता, परंतु आतां संततिनियमनास अधिक महत्त्व देतात. येथें ज्या स्त्रियांवर प्रयोग केले, त्यांपैकीं शेंकडा २४ अविवाहित, ६४ विवाहित, ३ विधवा व ९ काडी मोडलेल्या होत्या. विवाहित स्त्रियांची संख्या इतकी जास्त असण्याचें कारण असें कीं कांहीं स्त्रियांस बाळंतपणानंतर वेड लागतें व त्या प्रत्येक बाळंतपणानंतर कांहीं महिने इस्पितळांत राहून परत जाव्या असें होऊं लागलें. शिवाय कांहीं आनुवंशिक रोगामुळें आपणांस सुदृढ मुलें होणार नाहींत अशा समजुतीमुळें किंवा फार मुलें झाल्यामुळें गर्भधारणेच्या भीतीनेंच कांहीं स्त्रियांस वेड लागतें, व शस्त्रक्रियेनें त्यांची भीति संपल्याबरोबर त्या बऱ्या होतात असा अनुभव आला. हल्लीं कोणीही संस्था सोडून

जातांना त्यावर हा प्रयोग करतात. कांहीं वेडगळ मुलांचे आईबाप त्या वयांत येण्या-पूर्वींच त्यांचेवर शस्त्रक्रिया करवतात.

अशा प्रकारच्या लोकांस संततिनियमनाचे इतर मार्ग शिकवणेंहि कठिण व ते त्यांचा उपयोग करतील अशी आशाही करणें शक्य नसतें. शस्त्रक्रियेनें त्यांचे बिलकुल नुकसान होत नाहीं, तेव्हां पुढाल पिढीच्या आरोग्याच्या दृष्टीनें त्यांचेवर सक्तीनें हा प्रयोग करणें हें समाजाचें कर्तव्य आहे.

---

## सोव्हिएट राज्यांतील विवाहाचा कायदा.

आपल्या सामाजिक रीती चांगल्या व दुसऱ्याच्या वाईट समजणें जरी स्वाभावीक व सार्वत्रिक असलें तरी विचारी माणसांस शोभत नाहीं. हल्लीं यूरोप व अमेरिकेंत एके वेळीं एकापेक्षां अधिक पति किंवा पत्नी असतां कामा नये असा कायदा असल्यामुळें हीच पद्धत श्रेष्ठ असें ते लोक म्हणतात व ख्रिस्ती धर्माचे पुरस्कर्ते याचें श्रेय स्वतःकडे घेतात, परंतु बायबलांत यास बिलकुल आधार नाहीं.

विवाहासंबंधीं कायदे कोणत्याही देशांत समाधानकारक नाहींत. इतर कोणत्याही प्रकारचा करार ज्या दोन माणसांनी केला असेल त्यांच्या खुषीनें मोडत येतो. मग हाच कां येऊं नये ? आमचे मतें हा करार दोघांच्या खुषीनें मोडतां यावा इतकेंच नाहीं तर दोहोंपैकीं एकाच्या खुषीनेंही मोडतां आला पाहिजे व करार करतांनाच त्यांत अशी अट घालण्यांत शहाणपणा आहे. नवराबायकोस एकमेकांपासून किंवा एकास दुसऱ्यापासून त्रास होऊं लागला तर त्या दोघांस एकत्र रहावयास लावणें म्हणजे जुलूम आहे. ज्या देशांत काडी मोडण्याची वहिवाट आहे, तेथेंही केवळ दोघांच्या इच्छेनें लग्न मोडतां येत नाहीं. एकानें दुसऱ्याविरुद्ध व्यभिचाराची फिर्याद करून कोर्टांत पुरावा द्यावा लागतो व दोघांचें संगनमत आहे असें वाटल्यास कोर्ट परवानगी देत नाहीं. अमेरिकेंतील कांहीं संस्थानांत मात्र क्षुल्लक कारणांवरून काडीमोड करूं देतात, व वास्तवीक हेंच बरोबर आहे. शिवाय सर्व जगभर कायद्याच्या दृष्टीनें स्त्री म्हणजे नवऱ्याच्या जंगम इस्टेटीचाच भाग समजतात. स्त्रियांस स्वतःचें पोट भरण्याची ताकत बहुधा नसल्यामुळें विवाह हा

स्त्रियांचा धंदाच होऊन बसला आहे व त्यांस स्वातंत्र्याची किंमतहि कळत नाहींशी झाली आहे.

अशा प्रकारचे कायदे बदलून ते अधिक न्याय्य करण्याचा प्रयत्न फक्त सॉव्हिएट् ( रशियांतील हल्लींचें राज्य ) राज्यांत झाला आहे. त्यांच्या नव्या कायद्यांतील कांहीं कलमें:—

( १३३ ) जेथें अपत्य झालें तेथें कुटुंब स्थापन झालें. तें औरस आहे कीं नाहीं हें कायदा पहात नाहीं. औरस व अनौरस मुलांस सारखेच हक्क आहेत. ( १४० ) एखादी अविवाहित स्त्री गरोदर असेल तर बाळंत होण्यापूर्वी निदान ३ महिने, सरकारी रजिस्टरांत तिला भावी मुलाच्या बापाचें नांव व पत्ता, व गरोदर होण्याची वेळ नोंदतां येईल. विवाहित स्त्री गरोदर असून होणाऱ्या मुलाचा बाप तिचा नवरा नसल्यास तिलाही वरील नोंद करतां येईल. ( १४३ ) नोंदलेला मनुष्यच मुलाचा बाप आहे असें कोर्टास वाटल्यास गर्भारपण, बाळंतपण व मुलाचें संगोपन यांस लागणाऱ्या खर्चाचा कांहीं भाग त्यानें द्यावा असें कोर्ट फर्मावतें. ( १४४ ) गरोदर होण्याचे सुमारास तिचा आणखी कोणाशीं संबंध होता असें कोर्टास दिसल्यास अशा सर्व लोकांस वरीलप्रमाणें खर्चाचा हिस्सा द्यावा लागतो. ( १४८ ) मूल १४ वर्षांचें होईपर्यंत त्याचा धर्म कोणता हें आईबापांस एकमतानें ठरवतां येईल, परंतु मतभेद झाल्यास त्याला कोणताहि धर्म नाहीं असें समजण्यांत येईल. ( १६० ) आईबापांच्या मालमत्तेवर मुलांचा हक्क नाहीं व मुलांच्या मालमत्तेवर आईबापांचा नाहीं ( कोणीहि मेल्यास मालमत्ता सरकारजप्त होते. ) ( १०४ ) दंपत्यापैकीं एकानें वसतिस्थान बदलल्यास दुसऱ्यानें तेथें गेलेंच पाहिजे असें नाहीं. ( १०५ ) विवाहामुळें मालमत्ता सामायिक होत नाहीं. ( ८६ ) घटस्फोटानें विवाह मोडतां येतो. ( ८७ ) दोघांच्या खुषीनें किंवा एकाच्या इच्छेनेंही घटस्फोट करतां येईल.

या कायद्याच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे कीं ‘ अविवाहित प्रेमसंबंधापेक्षां विवाहांत कोणताहि अधिक फायदा नाहीं. विवाह करणें व मोडणें तितकेंच सोपें आहे. विवाहांत पुरुष व स्त्री ( कायद्याच्या दृष्टीनें ) सारखीं आहेत. प्रजोत्पत्ति हा

विवाहाचा उद्देश नव्हे. औरस, अनौरस या शब्दांस आतां कांहीं अर्थ नाहीं, कायद्याच्या या उदार दृष्टीमुळें विवाहाची संस्थाच हलुहळू नाहींशी होईल.'

ही कलमें वाचून कांहीं लोक बेशुद्ध होऊन पडतील हें आम्हीं जाणून आहों; परंतु या प्रश्नाचा विचार करतांना पूर्वग्रह बाजूला ठेवले पाहिजेत. दोन माणसांस जबरीनें एकत्र रहावयास लावतां येईल, पण मनावर जबरदस्ती चालत नाहीं, व मन नाहीं तेथें शरीराची काय किंमत? व अशा स्थितींत विवाहित स्त्रीपुरुष जरी कृतीनें शुद्ध असलीं तरी त्यांस सुख कसें होणार? जगांत सुख पुष्कळ आहे, तें मिळविण्याची अक्कल मात्र पाहिजे.

---

**बोबडे बोल:**—लहान मुलांचे बोबडे बोल ऐकून आईबापांस व इतरांसहि कौतुक वाटून तेहि त्यांच्याशीं बोबडेंच बोलूं लागतात. यामुळें मुलांस तेच उच्चार बरोबर वाटून ते सुधारण्याचा प्रयत्न न केल्यामुळें त्यांना बोलावयास शिकण्यास वेळ लागतो व कधीं कधीं लहानपणचेच उच्चार कायम होतात. यामुळें कांहीं मोठ्या माणसांसहि 'र' सारखे कठिण उच्चार येत नाहींत व अर्थात् मोठेपणीं त्याचें कौतुक न वाटतां लाज येते. लहान मुलांचे कानांवर कधींहि चुकीचे उच्चार पडणार नाहींत अशी सर्वांनीं खबरदारी घेतली पाहिजे, कारण एकदां चुकीचा उच्चार तोंडांत बसला कीं तो बदलणें कठिण होतें. बोबडे बोल ऐकण्यांत लोकांस जी मौज वाटते, त्यापेक्षां लहान मुलांस चुका दुरुस्त करण्यास शिकवण्यांत अधिक मौज वाटते असा आमचा अनुभव आहे.

---

**संततिनियमन:**—महात्मा गांधी म्हणतात, विवाहित स्त्री पुरुषांनींही संततीच्या हेतूनेंच समागम करावा, एरवीं करूं नये. श्रीकृष्ण भगवान म्हणतात: 'मा कर्मफलहेतुर्भूः मा ते संगोऽस्त्वकर्मणि' म्हणजे फलाची अपेक्षा केल्याशिवाय कर्म कर. आतां महात्मा गांधी खरे, कीं भगवद्गीता खरी?

---

**गुप्त रोगः—इंडोचायना** या फ्रेंच वसाहतींतील **टॉंकिन** शहरांतील युरोपीयांस रोगप्रतिबंधाचे मार्ग माहीत झाल्यापासून गुप्त रोगांचें प्रमाण पुष्कळ कमी झालें आहे ( १९२७ ). १९१५ सालीं या रोगामुळें १०० त १७ लोक इस्पितळांत जात असत, तें प्रमाण आतां १००० त ७ झालें आहे. तेथील मूळ रहिवाश्यांस मात्र हें ज्ञान नसल्यामुळें त्यांच्यावर परिणाम झालेला नाहीं.

---

**डॉ. रॉबिनसन** यांनीं **न्यू यॉर्क** येथील जागरूकसंघासंबंधीं एक मजेदार गोष्ट दिली आहे. एक गृहस्थ आपल्या बायकोबरोबर फिरत असतां तो एका दुकानांत शिरला व ती बाहेर उभी राहिली. इतक्यांत एक ओळखीचा गृहस्थ आला तेव्हां तिनें स्मित केलें व तो कांहीं वेळ तिच्याशीं बोलून निघून गेला. वरील संस्थेच्या एका मनुष्यानें हें पाहिलें व ही बाई स्मित करून पुरुषांस जवळ बोलावून त्यांच्याशीं गुप्त संकेत करते अशी कल्पना करून तो तिचा हात पकडून तिला पोलिसाकडे नेऊं लागला. नवऱ्यानें हा प्रकार दुकानांतून पाहिला व बाहेर येऊन त्या उपद्व्यापी जागरूक गृहस्थास एक ठोंसा मारून खालीं पाडलें व त्याचा चांगला समाचार घेतला ! मुंबईतहि असा उपद्व्याप करणारे लोक आहेत.

---

## श्री. ऋषींची भुताटकी

वेडगळ समजुती हिंदुस्थानांत जणूं काय पुरेशा नाहींत म्हणून ही आधुनिक भुताटकी श्री. ऋषींनीं मुद्दाम विलायतेंतून मागवलेली आहे. या विलायती मालाची थोडी तपासणी करणें जरूर आहे.

कोणत्याहि गोष्टीवर विश्वास ठेवायचा कीं नाहीं हें त्या गोष्टीच्या संभाव्यतेवर अवलंबतें. कितीहि विश्वासू व प्रामाणिक मनुष्यानें एखादी गोष्ट सांगितली तरी ती अगदीच असंभाव्य वाटल्यास आपला त्यावर विश्वास बसणार नाहीं. उदाहरणार्थ राणीच्या पुतळ्यानें काल व्याख्यान दिलें असें जर कोणी सांगूं लागला तर, तो कितीहि सत्यवक्ता असला तरी, आपण तें खरें मानणार नाहीं. तो चेष्टा करीत नाहीं असें नक्की वाटल्यास त्याचें डोकें फिरलें असें आपण समजूं.

# समाजस्वास्थ्य

नास्तिकांचा ईश्वरावर विश्वास बसत नाहीं याचें कारण त्यांस ईश्वराचें अस्तित्व असंभाव्य वाटतें हेंच होय. तो निर्गुण, निराकार कल्पिल्यास त्याचें अस्तित्व कोणास समजणेंच शक्य नसल्यामुळें त्यासंबंधीं पाहिजे त्याला पाहिजे तीं विधानें करण्यास मुभा असते. परंतु भुतेखेतें, आत्मे वगैरेंची गोष्ट तशी नाहीं. त्यांना अमुक रूप असतें, तीं तमुक करणार असें म्हटलें म्हणजे त्यास पुरावा असल्यासच तें मानणें रास्त होईल, कारण या गोष्टी सकृद्दर्शनीं असंभाव्य दिसतात. परंतु गूढताप्रिय लोकांस विचार करण्याची जरूर भासत नाहीं इतकेंच नाहीं तर विचार केल्यास आपल्या या आवडत्या कल्पनांस रजा द्यावी लागेल अशी त्यांस भीति वाटते.

धर्मावर लोकांचा विश्वास एका कल्पनेच्या आधारावर टिकूं शकतो; ती ही कीं ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं शंका घेणें किंवा वाद करणें पाप आहे. सुदैवानें भुताटकीची गोष्ट तशी नाहीं. भुतांच्या अस्तित्वाबद्दल धार्मिक लोकांस सुद्धां शंका घेतां घेईल. हे भुताटकीवाले लोक 'मृतांचे आत्म' वगैरे परिभाषा वापरीत असतात, परंतु आत्म्यांला आकार नसतो व तो दिसत नाहीं अशी जुनी कल्पना असल्यामुळें आम्ही भुतेंच म्हणतों. हीं आधुनिक भुतें सर्वांशीं बोलूं शकत नाहींत, त्यांस मध्यस्थ लागतात, त्या मध्यस्थांचे द्वारें तीं कांहीं निरोप पाठवीत असतात व कधीं कधीं तर मध्यस्थांचे अंगचे गूढ शक्तीमुळें त्यांस दृश्य स्वरूप प्राप्त होतें, असें त्यांचे अनुयायी म्हणतात.

आजपर्यंत यूरोपांत व अमेरिकेंत ज्या ज्या मध्यस्थांनीं भुतांचे निरोप आणले ते सर्व लोकांस फसवीत होते असें कोर्टांत सिद्ध होऊन त्यांस शिक्षा झालेल्या आहेत, तरी देखील या लफंग्यांच्या नादीं मोठमोठे विद्वान लोकही लागले आहेत. कांहीं लोकांची मनःप्रवृत्तिच अशी असते कीं त्यांस अद्‌भुत गोष्टींवर विश्वास ठेवल्याशिवाय बरें वाटत नाहीं. आधुनिक शास्त्रवेत्ते देखील कधीं कधीं धर्मांध असतात, त्याचें कारण हेंच. अशा लोकांची एक लांबलचक यादी श्री. ऋषींनी प्रसिद्ध केली आहे व हे लोक ज्या अर्थी भुतांवर विश्वास ठेवतात त्या अर्थी तीं खरींच असलीं पाहिजेत असें त्यांचें म्हणणें आहे. इंग्लंडांतील प्रमुख शास्त्रज्ञ **सर ऑलिव्हर लॉज** हे यांपैकीं आहेत. यांनीं शास्त्रीय शोध लावलेले आहेत हें खरें, परंतु शास्त्रीय

विचारसरणी या विषयास लावतां कामा नये या मताचे ते असल्यामुळें त्यांस कोणीहि सहज फसवतो. त्यांच्या स्वतःच्या पुस्तकांत अशा पुष्कळ गोष्टी आहेत, त्या वाचकांस धडधडीत फसवेगिरीच्या वाटतात, पण त्यांस त्या खऱ्या वाटल्या.

एखादा मनुष्य लफंगा आहे असें सिद्ध झाल्यावरहि हे लोक त्यावर विश्वास ठेवतात, कारण लफंगा मनुष्य नेहमीं खोटें बोलेल असें नाहीं ! जेव्हां सांपडेल तेव्हां तो खोटा, नाहीं तर तो खरा ! खरी गोष्ट अशी आहे कीं सामान्य लोकांस या लोकांच्या युक्त्या ओळखणें शक्य नसतें. जादूचे प्रयोग करणारांचा धंदा लोकांस राजरोस फसवण्याचाच असल्यामुळें तेच यांतील बिंगें बाहेर काढूं शकतात व त्यांनीं हें काम केलेंही आहे इंग्लंडांतील प्रसिद्ध जादुगार **मॅस्केलिन** यांनीं असें जाहीर केलें होतें कीं कोणाहि मध्यस्थानें गूढ शक्तीच्या नांवानें दाखवलेला कोणताहि प्रयोग मी आठ दिवसांचे आंत करून दाखवीन, व न करतां आल्यास १००० पौंड बक्षीस देईन. ते मरेपर्यंत हें बक्षिस कोणासहि मिळालें नाहीं ! यावर भुताटकीवाले म्हणतात कीं जादूगार ज्या गोष्टी फसवणुकीनें करतात, त्याच मध्यस्थ आपल्या गूढ शक्तीनें करतात ! सारांश, आम्ही विश्वास ठेवणार, तुम्ही कांहींहि म्हणा !

हे मध्यस्थ धंदेवाल्या जादूगारांइतके कुशल नसल्यामुळें ज्या गोष्टी जादूगार उजेडांत करूं शकतो त्याच करण्यास मध्यस्थास अंधाराची जरूर लागते. मध्यस्थांच्या प्रयोगांचे वेळीं कोणीं उजेड करतां कामा नये अशी त्यांची अट असते. एकदां एक मध्यस्थ एका हातावर चेंडू घेऊन, दुसरा हात त्याचेवर कांहीं अंतरावर उपडा धरून, चेंडू कांहीं आधाराशिवाय हवेंतून वर जातो असें दाखवीत असतां एका संशयी मनुष्यानें विजेचा दिवा लावला, तों मध्यस्थाचे दोन हातांचेमध्यें दोऱ्या दिसल्या व त्याची पूर्ण फजिती झाली. तरीहि तेथें श्री. ऋषींच्या जातीचे एक गृहस्थ होते, ते म्हणाले कीं त्या दोऱ्याच अद्भूत शक्तीनें उत्पन्न झाल्या ! विश्वासाला औषध नाहीं.

या भुतांचें आस्तित्व शास्त्रीय पद्धतीनें सिद्ध होतें असें **सर ऑलिव्हर लॉज** देखील म्हणत नाहींत. भुतांवर केवळ **विश्वास ठेवणाऱ्या** शास्त्रज्ञांची

यादी श्री. ऋषींनीं दिली आहे. याचे उलट मताच्या शास्त्रज्ञांची यादी सहस्रपट लांब होईल व सर्वांत मोठीं नांवें या दुसऱ्या यादींत येतील.

**फ्लॅमॅरिऑं** नांवाच्या फ्रेंच ज्योतिर्विदाचा भुतांवर विश्वास असे, त्यांनीं स्वतः लिहिलें आहे कीं ' शनीला आठ उपग्रह आहेत असें भुतें मला नेहमीं सांगत असत. परंतु नंतर आणखी उपग्रहांचा शोध लागला तेव्हां माझी खात्री झाली कीं जें भुतें सांगतात असें मला वाटत असे तें माझें स्वतःचेंच ज्ञान होतें.' परंतु इतक्यानेंहि त्यांची विश्वास ठेवण्याची खोड गेली नाहीं. फ्रेंच प्रोफेसर **रिशे** यांचें नांव श्री. ऋषि पुढें करतात परंतु त्यांनीं तर ' ३० वर्षांच्या अनुभवावरून मला यांत कांहीं तथ्य दिसत नाही,' असें जाहीर केलें आहे !

मध्यस्थांनी आणलेल्या निरोपांची मजल त्यांच्या स्वतःच्या अकलेपलीकडे जात नाहीं व त्यांनीं आजपर्यंत कोणताही नवीन शोध लावलेला नाहीं. प्रसिद्ध फ्रेंच लेखक **व्हिक्टर ह्युगो** यांचे घरीं भुताटकीच्या बैठकी होत असत, तेथें एकदां अंड्रोक्लीजाच्या गोष्टींतील सिंहाचें भूत ( भुतानें स्वतः नांव सांगितलें ) येऊन कविता सांगू लागलें. या कविता त्या लेखकाच्या कवितांशीं तंतोतंत जुळतात ! तसेंच शेक्सपिअर, मोलिअर, येशु ख्रिस्त वगैरेंचीं भुतें येऊन तीं सर्व व्हिक्टर ह्युगोच्याच भाषेंत बोलत !

वाचकांस शेवटीं एक इशारा दिला पाहिजे. भुतांकडून निरोप आणणारे मध्यस्थ व त्यांवर विश्वास ठेवणारे लोक या दोघांसही पुष्कळ वेळां मज्जातंतूंचे विकार होतात. कधींकधीं मध्यस्थांसच भ्रम होऊन ते बरळूं लागतात व हे भुतांचे निरोप असें लोकांस वाटतें. या गोष्टींवर विश्वास ठेवणारे लोक वेडगळ तर खरेच, परंतु कित्येक वेळां त्याचा अतिरेक होऊन त्यांस खरोखरच वेड लागतें. मध्यस्थ पुष्कळ वेळां स्त्रिया असतात, कारण मज्जातंतूंचे विकार स्त्रियांसच जास्त होतात. केवळ जिज्ञासेनें अशा बैठकींस जाऊं लागून नंतर त्यावर विश्वास बसून पुढें वेड लागल्याचीं उदाहरणें आहेत. अशा अनुयायांपैकीं एकानें लिहिलें आहे कीं या नादीं लागणारे लोक भुतांचे तावडींत सांपडतात व तीं पुष्कळ वेळां द्वाड असल्यामुळें आपणास मारतील, वेड लावतील किंवा इतर रोग उत्पन्न करतील हें विसरतां कामा नये.

कित्येक प्रसिद्ध मध्यस्थ व त्यांचे अनुयायी वेड लागून मेलेले आहेत. श्री. ऋषींच्या बैठकीस जाण्याची ज्यांस जिज्ञासा होईल त्यांनीं ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे.

---

## व्हिटॅमीन् अथवा जीवनतत्त्वें.

( शोधक **कॅसिमीर फंक** यांच्या व्याख्यानावरून )

आपण जें अन्न खातों त्याचे दोन प्रकारचे उपयोग असतात. कांहीं प्रकारच्या अन्नानें शरीराची वाढ किंवा दुरुस्ती होते व कांहीं प्रकाराच्या अन्नानें हालचाल करण्यास लागणारी शक्ति व उष्णता उत्पन्न होते. परंतु इतक्यानेंहि काम पुरें होत नाहीं, आणखी कांहीं तत्त्वांची शरिरास जरूरी असते असा शोध १९११ सालीं लागला, तेव्हांपासून या विषयावर अनंत लेख प्रसिद्ध झाले आहेत. या नवीन पदार्थांस जीवनतत्त्वें असें नांव देऊं. ( व्हिटॅमीन् )

ही तत्त्वें निरनिराळ्या प्रकारच्या अन्नांत अतिशय सूक्ष्म प्रमाणांत सांपडतात, तरीहि त्यांचें महत्त्व इतकें आहे कीं तीं नसल्यास प्रकृति विघडते व हें फार दिवस चालल्यास मनुष्य मरतो. आजपर्यंत ( १९२७ ) अशा सहा सात तत्त्वांचा शोध लागला आहे. यांस अ, ब, क, ड, इ, फ, प म्हणूं.

या शोधास सुरवात बेरीबेरी नांवाच्या रोगापासून झाली. ज्यांचा मुख्य आहार भात आहे व जे यंत्रानें साफ केलेले तांदूळ वापरतात त्यांसच हा रोग होतो असें आढळलें. यावरून प्रयोग करून असें ठरलें कीं भाताच्या कोंड्यांत एक जीवनतत्त्व असतें व यंत्रानें तो साफ निघाल्यामुळें हा रोग होतो. याचा पुरावा म्हणजे तेच तांदूळ यंत्रानें साफ न करतां खाल्यास तो रोग बरा होतो. अशाच रीतीनें नंतर पुष्कळ तत्त्वें सांपडलीं. त्यांची थोडक्यांत माहिती देतोंः—

**अ.** या तत्त्वाच्या अभावीं डोळे येतात. हें पित्ताशय, मूत्रपिंड वगैरे इंद्रियें, अंडीं, दूध, पालेभाज्या, द्विदळ धान्यें, धान्याचे मोड व टोमाटो यांत सांपडतें.

**ब.** याच्या अभावीं बेरीबेरी नांवाचा रोग होतो व मनुष्य क्षीण होऊन झिजून मरतो. हें कोंडा, द्विदळ धान्यें, पालेभाज्या, बटाटे, नारिंगें व इतर ताजीं फळें,

ताजे किंवा टिकवलेले टोमाटो, मांस, अंडीं, साधें किंवा मलई काढलेलें दूध व आंब यांत सांपडतें. पिष्ठमय पदार्थ पचण्यास या तत्त्वाची मदत होते व तें कमी पडल्यास पीठ आंतड्यांतून तसेंच्या तसेंच बाहेर पडतें व त्याचा शरिरास उपयोग होत नाहीं. यासंबंधीं सर्वांत अलीकडचा शोध म्हणजे बेरीबेरीचा एक विशिष्ट रोगजंतु असून या तत्त्वानें त्याचे वाढीस अडथळा होतो.

**क.** हें नसल्यास स्कर्व्ही नांवाचा रोग होऊन दाढा सुजून त्यांतून रक्त येतें व एकंदर क्षीणता येते. हें पित्ताशय वगैरे इंद्रियें, पालेभाज्या, बटाटे, ताजीं फळें, टोमाटो, अंडीं व दूध यांत सांपडतें.

**ड.** याचा मनुष्यास उपयोग होतो कीं काय हें अजून समजलें नाहीं, परंतु अतिसूक्ष्म जंतु याशिवाय जगत नाहींत.

**इ.** याच्या अभावीं हाडें वाढत नाहींत, तीं मऊ होऊन वांकडीं होतात. हा रोग बहुधा लहान मुलांस होतो, परंतु मोठ्या माणसांसहि होऊं शकतो असें गेल्या लढाईंत सिद्ध झालें आहे. हें तत्त्व दोनच पदार्थांत खात्रीनें सांपडलें आहे, अंडीं व कॉड् लिव्हर ऑइल्. म्हणून हा रोग झाल्यास कॉड् लिव्हर ऑइल् देतात.

**फ.** याचे अभावीं जननेंद्रिय व इतर अंगभूत इंद्रियांची क्रिया बंद पडते. हें ताज्या भाज्या व धान्याचे मोड यांत सांपडतें.

**प.** याचे अभावीं पेलॅग्रा नांवाचा रोग होऊन त्वचेस भेगा पडतात व शेवटीं मज्जातंतूंस बाधा होऊन वेडहि लागतें. जेथें मका हें मुख्य अन्न आहे, तेथें हा रोग विशेष आढळतो. हें तत्त्व पित्ताशय वगैरे इन्द्रियें, अंडीं, दूध व आंब यांत सांपडतें.

शेवटच्या दोन तत्त्वांबद्दल अजून खात्री नाहीं, परंतु प्रयोग चालू आहेत. या सर्व तत्त्वांसंबंधीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं पदार्थ ताजा असतांना त्यांत जीं तत्त्वें असतील तीं तो शिळा झाल्यावर किंवा शिजवल्यावर असतीलच असें नाहीं. यांतील कांहीं तत्त्वें १२०° उष्णता झाल्यास नाहींशी होतात (उकळत्या पाण्याची उष्णता १००°).

## व्हिटॅमिन अथवा जीवनतत्त्वें

या सर्व तत्त्वज्ञानाचा व्यवहारांत उपयोग करावयाचा म्हणजे पुढील गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे. १. पथ्याकरतां व इतर कारणांनीं ज्यांस एकाच प्रकारचें अन्न खावें लागतें ( अंगावर पिणारीं मुलें, मधुमेही वगैरे ) त्यांच्या आहारांत हीं सर्व तत्त्वें येतील अशी खबरदारी घेतली पाहिजे. २. भोजनांत नेहमीं कांहीं ताजे, न शिजवलेले पदार्थ असावे, उदाहरणार्थ टोमाटो, फळें, हिरव्या पालेभाज्या (यूरोपांत अशा भाज्या तेल व शिरका घालून खाण्याची पद्धत आहे, परंतु शिरक्या-ऐवजीं लिंबाचा रस घालणें अधिक बरें ). ३. बाटल्यांत किंवा डब्यांत राखून ठेवलेल्या पदार्थांत हीं तत्त्वें असण्याचा संभव कमी ( टोमाटो हा अपवाद आहे ). याकरितां केवळ अशा पदार्थांवर उपजीविका करूं नये. गेल्या लढाईत सैन्यास अशा पदार्थांवर रहावें लागल्यामुळें बरेच रोग उद्भवले, ४. पदार्थ शिजवल्यास त्यांतील पाणी टाकूं नये, कारण त्यांत हीं तत्त्वें असतात. उष्णता जितकी अधिक, तितकी या दृष्टीनें वाईट.

वाढीच्या वयांत याकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. मूल अंगावर पीत असेल तोंपर्यंत आईच्या आहारास जपलें पाहिजे. आहारांतून क व इ हीं तत्त्वें काढून टाकल्यास दांत किडतात.

मधुमेह, कॅन्सर व इतर कांहीं रोग या तत्त्वांच्या अभावामुळें होतात असें मी १९१२ सालापासून सांगत आलों आहें; शरीरांतील सूक्ष्म गोलकांची फाजील वृद्धि झाली म्हणजे कॅन्सर ( दुष्ट व्रण ) होतो. मी असें म्हणतों कीं अन्नांतील कांहीं तत्त्वांमुळें ही वृद्धि वाढते व कांहींमुळें कमी होते. त्याचप्रमाणें कांहीं तत्त्वां-मुळें रक्तांतील साखरेचें प्रमाण वाढतें, कांहींनीं कमी होतें. तें फाजील वाढणें हाच मधुमेह. अनीमिआ ( रक्तक्षय ) व स्प्रू (अपचन, तोंडास फोड येणें, क्षीणता वगैरे ) हे रोगही असेच होत असावे. यासंबंधीं अधिक शोध लागतील तेव्हां उत्तम शरीर बनण्यास व निरोगी राहण्यास कशा प्रकारचें अन्न खाल्लें पाहिजे हें सांगतां येईल.

---

**वांझपणाचें एक कारण.** समागमाचे वेळीं योनिमार्गांत रेतस्राव होऊन त्यांतील असंख्य रेतजंतु प्रथम गर्भाशयांत जातात व तेथें स्त्रीच्या रजागोलाची गांठ न पडल्यास गर्भाशयासून बीजकोशाकडे जाणाऱ्या दोन्ही बाजूच्या नलिकांत शिरतात. रजोगोलहि याच मार्गानें गर्भाशयाकडे येतो. या दोहोंचें मीलन होणें म्हणजेच गर्भधारणा. अर्थात हा मार्ग मोकळा असला पाहिजे. कधींकधीं हा मार्ग परम्यामुळें बंद होतो किंवा इतर कांहीं विकारामुळें होतो किंवा आकुंचित झाल्या-मुळें पुरेशी वाट मिळत नाहीं. कधींकधीं गर्भाशयाचे द्वारें या नळ्यांत हवा फुंकून मार्ग मोकळा करतां येतो. कधींकधीं शस्त्रक्रियाहि करतात, परंतु त्याचा फारसा उपयोग होत नाहीं.

---

## ग्रंथपरीक्षण: 'बाहेरख्यालीचे दुष्परिणाम'

लेखकः—डॉ. के. भा. लेले, एम्. सी. पी. एस., किं. ४ आणे.

सामान्य वाचकांस गर्मी, परमा वगैरे रोगासंबंधीं माहिती मुळींच नसते म्हटलें तरी चालेल. परमा थोडा जास्त जहाल झाला म्हणजे गर्मी होते, अशा प्रकारचीं विधानें सुद्धां लोक ठोकून देत असतात, व हें अज्ञान दूर करण्याकरतां हें ३२ पानांचें पुस्तक डॉ. लेले यांनीं लिहिलें आहे. यांतील माहिती या दृष्टीनें अत्यंत उपयोगी आहे, व रोग झाल्यास जाहिराती देणाऱ्या वैदूकडे जाण्या-पेक्षां पदवीधर दाक्तरांवरच विश्वास ठेवणें बरें, हा त्यांचा उपदेश घेण्यासारखा आहे. ते स्वतः दाक्तर असल्यामुळें असें म्हणतात असें कोणास वाटेल, परंतु आम्ही दाक्तर नसतांहि तसेंच म्हणतों. सर्व दाक्तरांस या रोगांसंबंधीं पुरेसें ज्ञान असतें असें नाहीं व सर्वच दाक्तर प्रामाणिक असतात असेंहि नाहीं, तथापि एकंदरींत वैदूपेक्षां दाक्तरांकडे जाण्यांत धोका कमी, हें खरें.

या रोगांस लेखकानें 'बाहेरख्यालीचे रोग' हें नांव दिलें आहे, तें आम्हांस कबूल नाहीं, कारण बाहेरख्याली न करणाऱ्या लोकांसहि हें होतात हें निर्विवाद आहे. येथील गुप्तरोगनिवारणसंघानें प्रसिद्ध केलें आहे कीं त्यांचेकडे उपचारा-करतां येणाऱ्या स्त्रियांपैकीं निमेहून अधिकांस हे रोग नवऱ्याकडून लागलेले असतात.

१०५८८

# बाहेरख्यालीचे दुष्परिणाम

क्वचित प्रसंगीं नवऱ्यासहि हे रोग बायकोकडून लागतात. इंग्रजींत या रोगांस रति-संबंधी रोग म्हणतात. हें नांव अधिक बरोबर आहे कारण शेकडा ९० रोग्यांस संसर्ग संभोगाचेवेळीं होतो. परंतु एरवींहि संसर्ग होऊं शकतो, म्हणून तेंहि नांव योग्य नाहीं. गुप्तरोग हें नांव आम्हांस अधिक पसंत आहे.

या पुस्तकांतील विचारसरणी आम्हांस जरा चमत्कारिक वाटते. तिसऱ्या पानावर लेखक म्हणतातः—'बाहेरख्यालीचे बाबतींत स्त्रियांपेक्षां पुरुषांकडेच अधिक दोष येतो, कारण पुरुषांच्या गिऱ्हाइकीकरतां स्त्रियांनीं दुकानें मांडलेलीं आहेत तशीं स्त्रियांकरतां तीं पुरुषांना काडावीं लागलीं नाहींत यांतच पुरुषांचा विषयलंपट हलकेपणा व्यक्त होतो.' पुरुषांनीं दुकानें काढलीं नाहींत याचें मुख्य कारण शारीरिक आहे. स्त्रिया एका रात्रींत पंचवीस किंवा अधिक पुरुषांशीं समागम करूं शकतात, परन्तु असा प्रकार पुरुषांस अशक्य आहे, हा त्यांचा दोष नाहीं. शिवाय पुरुष जसे अंगवस्त्रें ठेवतात, तसे स्त्रियांनीं ठेवलेले पुरुषहि आमच्या पाहण्यांत आहेत. स्त्रियांस वासनाच कमी असते असें लेखकाचें म्हणणें असेल तर हाही पुरुषांचा दोष म्हणतां येणार नाहीं; व स्त्रिया जास्त मनोनिग्रही असतात असें म्हणणें असेल, तर तो मनोनिग्रह नैसर्गिक नसून त्यांस स्वातंत्र्य नसल्यामुळें तो त्यांच्यावर लादलेला आहे, तेव्हां नीतिदृष्ट्या तो कवडीमोल आहे.

पान २०:—बाहेरख्याली करणारांस आत्मघातक्यांची उपमा दिली आहे व आत्मघातक्यांप्रमाणेंच हे रोग झालेल्यांस तुरुंगांत टाकलें पाहिजे असें लेखकाचें म्हणणें आहे. आमचे मतें आत्मघातक्यांस शिक्षा करणें हीहि चुकूच आहे व बाहेरख्याली करणारांस तुरुंगांत टाकण्याचे परिणाम अत्यंत भयंकर होतील. आधींच हे रोग लपवून ठेवण्याची लोकांची प्रवृत्ति असते व रोगांच्या प्रसाराचें हें एक मुख्य कारण आहे. तुरुंगाऐवजीं इस्पितळांत पाठवून त्यांची काळजी घेतली तरच उपयोग होईल.

पान २१:—वेश्यांची सक्तीनें, तपासणी केल्यास हे रोग जास्तच फैलावतील असें लेखकास वाटतें, परंतु रोगी वेश्यांस बऱ्या होईपर्यंत इस्पितळांत ठेवल्यास

असें होण्याचें कारण नाहीं, व जेथें अशी तपासणी आहे तेथील अनुभवहि असा नाहीं. मात्र इस्पितळांत त्यांस कैद्यांसारखें न वागवतां रोग्यांप्रमाणें वागवलें पाहिजे.

पान २५:–विधवा [ म्हणजे विनवारशी माल. सं. ] चटकन ओळखत येऊं नये म्हणून त्यांनींहि कुंकूं लावावें अशी लेखकाची सूचना आहे. रंग लावून अंग सुशोभित करण्याची चाल रानटी अवस्थेंतील अवशेष आहे व नवऱ्याच्या अस्तित्वाचा कुंकवाशीं पारंपरिक कल्पनेंतहि कांहीं संबंध आहे असें दिसत नाहीं कारण कुमारिकाही कुंकू लावतात. पोषाखाचे व अलंकारांचे बाबतींत आपलें शरीर पाहिजे त्या रीतीनें सुशोभित करण्यास प्रत्येकास मुभा असली पाहिजे व त्यां कोणत्याही प्रकारची सक्ती असतां कामा नये. विधवा ओळखूं येऊं नये अशी इच्छा असल्यास कुंकू सर्वांनीच सोडून देणें हाहि एक उपाय आहे.

पान २६:–लेखकाचे मतें शृंगाररसप्रधान नाटकें व सिनेमा, व चहा, चिवडा, चिरूट व दारू यांचीं दुकानें बाहेरख्यालीला पोषक आहेत. यांपैकीं चिरूट व दारू शिवाय इतर गोष्टी आमचे मतें उपयोगी आहेत व बाहेरख्यालीला पोषक अस सर्व गोष्टी बंद करणें शक्य नाहीं व इष्टहि नाहीं.

'ख्रिस्ती धर्मांत एक पत्नीव्रताचा अनुवाद केलेला दिसतो,' हा लेखकाचा गैरसमज आहे. बायबलांत त्याचें नांवही नाहीं.

पान २८–२९:–'योग्य कारणाशिवाय कोणत्याहि तरुण व सुंदर स्त्री संभाषण करणें अगर तिच्याकडे नुसतें पाहणें ही बाहेरख्यालीची पहिली पाय होय...ज्याला आत्मोन्नति करून घ्यावयाची असेल त्यानें पहिल्या पायरीवर पा पडतांच आपल्या मनाला बेडी ठोकली पाहिजे.' याप्रमाणें कृति शक्यच नाहीं म्ह तरी चालेल. अशा मनुष्यानें समाजांत न राहतां अरण्यांत राहिलें पाहिजे.

पुस्तकाच्या शेवटीं लेखकानें 'ब्रह्मचर्यप्रतिष्ठायां वीर्यलाभः' हा पतंजल उतारा देऊन त्याचें समर्थन केलें आहे. वीर्य शरिरांत राहिलें असतां तें र मिसळून शक्ति वाढते या प्राचीन कल्पनेला कोणताहि शास्त्रीय आधार नाहीं. एकदां बनलें म्हणजे ते बाहेर पडलेंच पाहिजे (वास्तवीक वीर्याचे सर्व घटक वेग

तयार होतात व स्खलनापर्यंत साचून राहतात ), न पडल्यास तें सांचल्यामुळें प्रकृति बिघडते; हें लक्षांत ठेवलें म्हणजे ब्रह्मचर्याचें माहात्म्य एकदम बरेंच कमी होतें इतकेंच नव्हे तर प्रकृति सुदृढ राहण्याला जसा नियमित आहार तसाच समागमहि अवश्य आहे असें सिद्ध होतें. अर्थात नियमित म्हणजे किती हें ज्याच्या त्याच्या प्रकृतीवर व वयावर अवलंबेल.

पान ३०:—येथें बाहेरख्यालीसंबंधीं सामान्य सिद्धांत दिले आहेत, त्यांपैकीं दोन आम्हांस विशेष महत्त्वाचे वाटतात, ते असेः—

६. बाहेरख्यालीविषयीं प्रत्येक मनुष्यानें असें लक्षांत ठेवावें कीं आपल्याला पशानें वश होणारे स्त्रीपुरुष आपणापूर्वींच दुसऱ्या कोणी विकत घेतलेले असतील; तर मग त्यांच्या शारीरिक आरोग्याबद्दल खात्री नाहीं.

७. बाहेरख्यालीविषयीं प्रत्येकानें हेंहि लक्षांत ठेवावें कीं आपल्या तारुण्याला व सौंदर्याला भाळणारे स्त्रीपुरुष यापूर्वींसुद्धां हल्लींप्रमाणेंच दुसऱ्यावर फिदा झालेले असतील; तर मग त्यांच्या शारीरिक आरोग्याबद्दल मुळींच खातरी नाहीं.

या दोन्ही गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत; परंतु यांपैकीं विशेषतः दुसरी गोष्ट पार विसरून जाण्याइतका अहंकार पुष्कळांत असतो.

पान २९:—गुप्त रोगांचा प्रतिबंध करतां येतो, म्हणजे स्त्रीपुरुषांपैकीं एकास रोग असतांहि तो समागमाचे वेळीं दुसऱ्यास लागूं नये अशी तजवीज रासायनिक रीत्या करतां येते ही गोष्ट लेखकानें नुसती सुचवून , ज्यांस अधिक माहिती पाहिजे असेल त्यांनीं १ रुपया पाठवून ‘ विषयांधाच्या कानांत ’ हें स्वतंत्र पत्रक मागवावें, असें लिहिलें आहे.

या बाबतींत आमचा तीव्र मतभेद आहे. ‘अशा प्रकारच्या प्रतिबंधक उपायांचें ज्ञान झाल्यानंतर सर्वसाधारण मनुष्याची प्रवृत्ति विषाची परीक्षा पाहण्याकडे साहजिकच होणार,’ हें कांहीं अंशीं खरें आहे, परंतु रोगांचे भीतीनें जो मनुष्य नीतीनें राहतो, त्याची नीति फार दिवस टिकत नाहीं. शिवाय नैसर्गिक मार्गाचे अभावीं स्वसंभोगादि वाईट संवयी लागतात, त्यांस आम्ही नीति म्हणत नाहीं.

असें होण्याचें कारण नाहीं, व जेथें अशी तपासणी आहे तेथील अनुभवहि असा नाहीं. मात्र इस्पितळांत त्यांस कैद्यांसारखें न वागवतां रोग्यांप्रमाणें वागवलें पाहिजे.

पान २५:–विधवा [ म्हणजे विनवारशी माल. सं. ] चटकन ओळखतां येऊं नये म्हणून त्यांनींहि कुंकूं लावावें अशी लेखकांची सूचना आहे. रंग लावून अंग सुशोभित करण्याची चाल रानटी अवस्थेंतील अवशेष आहे व नवऱ्याच्या अस्तित्वाचा कुंकवाशीं पारंपरिक कल्पनेंतहि कांहीं संबंध आहे असें दिसत नाहीं, कारण कुमारिकाही कुंकूं लावतात. पोषाखाचे व अलंकारांचे बाबतींत आपलें शरीर पाहिजे त्या रीतीनें सुशोभित करण्यास प्रत्येकास मुभा असली पाहिजे व त्यांत कोणत्याही प्रकारची सक्ती असतां कामा नये. विधवा ओळखूं येऊं नये अशी इच्छा असल्यास कुंकूं सर्वांनींच सोडून देणें हाहि एक उपाय आहे.

पान २६:–लेखकाचे मतें शृंगाररसप्रधान नाटकें व सिनेमा, व चहा, चिवडा चिरूट व दारू यांचीं दुकानें बाहेरख्यालीला पोषक आहेत. यांपैकीं चिरूट व दारू-शिवाय इतर गोष्टी आमचे मतें उपयोगी आहेत व बाहेरख्यालीला पोषक अशा सर्व गोष्टी बंद करणें शक्य नाहीं व इष्टहि नाहीं.

'ख्रिस्ती धर्मांत एक पत्नीव्रताचा अनुवाद केलेला दिसतो,' हा लेखकाचा गैरसमज आहे. बायबलांत त्याचें नांवही नाहीं.

पान २८–२९:–'योग्य कारणाशिवाय कोणत्याहि तरुण व सुंदर स्त्रीशीं संभाषण करणें अगर तिच्याकडे नुसतें पाहणें ही बाहेरख्यालीची पहिली पायरी होय...ज्याला आत्मोन्नत्ति करून घ्यावयाची असेल त्यानें पहिल्या पायरीवर पाऊल पडतांच आपल्या मनाला बेडी ठोकली पाहिजे.' याप्रमाणें कृति शक्यच नाहीं म्हटलें तरी चालेल. अशा मनुष्यानें समाजांत न राहतां अरण्यांत राहिलें पाहिजे.

पुस्तकाच्या शेवटीं लेखकानें 'ब्रह्मचर्यप्रतिष्ठायां वीर्यलाभः' हा पतञ्जलीचा उतारा देऊन त्याचें समर्थन केलें आहे. वीर्य शरिरांत राहिलें असतां तें रक्ताशीं मिसळून शक्ति वाढते या प्राचीन कल्पनेला कोणताहि शास्त्रीय आधार नाहीं. वी[र्य] एकदां बनलें म्हणजे तें बाहेर पडलेंच पाहिजे (वास्तवीक वीर्याचे सर्व घटक वेगवेग[ळे]

तयार होतात व स्खलनापर्यंत साचून राहतात ), न पडल्यास तें सांचल्यामुळें प्रकृति विघडते; हें लक्षांत ठेवलें म्हणजे ब्रह्मचर्याचें माहात्म्य एकदम बरेंच कमी होतें इतकेंच नव्हे तर प्रकृति सुदृढ राहण्याला जसा नियमित आहार तसाच समागमहि अवश्य आहे असें सिद्ध होतें. अर्थात नियमित म्हणजे किती हें ज्याच्या त्याच्या प्रकृतीवर व वयावर अवलंबेल.

पान ३०:—येथें बाहेरख्यालीसंबंधीं सामान्य सिद्धांत दिले आहेत, त्यांपैकीं दोन आम्हांस विशेष महत्त्वाचे वाटतात, ते असेः—

६. बाहेरख्यालीविषयीं प्रत्येक मनुष्यानें असें लक्षांत ठेवावें कीं आपल्याला पशानें वश होणारे स्त्रीपुरुष आपणापूर्वींच दुसऱ्या कोणी विकत घेतलेले असतील; तर मग त्यांच्या शारीरिक आरोग्याबद्दल खात्री नाहीं.

७. बाहेरख्यालीविषयीं प्रत्येकानें हेंहि लक्षांत ठेवावें कीं आपल्या तारुण्याला व सौंदर्याला भाळणारे स्त्रीपुरुष यापूर्वींसुद्धां हल्लींप्रमाणेंच दुसऱ्यावर फिदा झालेले असतील; तर मग त्यांच्या शारीरिक आरोग्याबद्दल मुळींच खातरी नाहीं.

या दोन्ही गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत; परंतु यांपैकीं विशेषतः दुसरी गोष्ट पार विसरून जाण्याइतका अहंकार पुष्कळांत असतो.

पान २९:—गुप्त रोगांचा प्रतिबंध करतां येतो, म्हणजे स्त्रीपुरुषांपैकीं एकास रोग असतांहि तो समागमाचे वेळीं दुसऱ्यास लागू नये अशी तजवीज रासायनिक रीत्या करतां येते ही गोष्ट लेखकानें नुसती सुचवून , ज्यांस अधिक माहिती पाहिजे असेल त्यांनीं १ रुपया पाठवून ‘ विषयांधाच्या कानांत ’ हें स्वतंत्र पत्रक मागवावें, असें लिहिलें आहे.

या बाबतींत आमचा तीव्र मतभेद आहे. ‘अशा प्रकारच्या प्रतिबंधक उपायांचें ज्ञान झाल्यानंतर सर्वसाधारण मनुष्याची प्रवृत्ति विषाची परीक्षा पाहण्याकडे साहजिकच होणार,’ हें कांहीं अंशीं खरें आहे, परंतु रोगांचे भीतीनें जो मनुष्य नीतीनें राहतो, त्याची नीति फार दिवस टिकत नाहीं. शिवाय नैसर्गिक मार्गाचे अभावीं स्वसंभोगादि वाईट संवयी लागतात, त्यांस आम्ही नीति म्हणत नाहीं.

असें होण्याचें कारण नाहीं, व जेथें अशी तपासणी आहे तेथील अनुभवहि असा नाहीं. मात्र इस्पितळांत त्यांस कैद्यांसारखें न वागवतां रोग्यांप्रमाणें वागवलें पाहिजे.

पान २५:–विधवा [ म्हणजे विनवारशी माल. सं. ] चटकन ओळखतां येऊं नये म्हणून त्यांनींहि कुंकू लावावें अशी लेखकाची सूचना आहे. रंग लावून अंग सुशोभित करण्याची चाल रानटी अवस्थेंतील अवशेष आहे व नवऱ्याच्या अस्तित्वाचा कुंकवाशीं पारंपरिक कल्पनेंतहि कांहीं संबंध आहे असें दिसत नाहीं, कारण कुमारिकाही कुंकू लावतात. पोषाखाचे व अलंकारांचे बावतींत आपलें शरीर पाहिजे त्या रीतीनें सुशोभित करण्यास प्रत्येकास मुभा असली पाहिजे व त्यांत कोणत्याही प्रकारची सक्ती असतां कामा नये. विधवा ओळखूं येऊं नये अशी इच्छा असल्यास कुंकू सर्वांनींच सोडून देणें हाहि एक उपाय आहे.

पान २६:–लेखकाचे मतें शृंगाररसप्रधान नाटकें व सिनेमा, व चहा, चिवडा चिरूट व दारू यांचीं दुकानें बाहेरख्यालीला पोषक आहेत. यांपैकीं चिरूट व दारू-शिवाय इतर गोष्टी आमचे मतें उपयोगी आहेत व बाहेरख्यालीला पोषक अशा सर्व गोष्टी बंद करणें शक्य नाहीं व इष्टहि नाहीं.

'खिस्ती धर्मांत एक पत्नीव्रताचा अनुवाद केलेला दिसतो,' हा लेखकाचा गैरसमज आहे. बायबलांत त्याचें नांवही नाहीं.

पान २८–२९:–'योग्य कारणाशिवाय कोणत्याहि तरुण व सुंदर स्त्रीशीं संभाषण करणें अगर तिच्याकडे नुसतें पाहणें ही बाहेरख्यालीची पहिली पायरी होय...ज्याला आत्मोन्नत्ति करून घ्यावयाची असेल त्यानें पहिल्या पायरीवर पाऊल पडतांच आपल्या मनाला बेडी ठोकली पाहिजे.' याप्रमाणें कृति शक्यच नाहीं म्हटलें तरी चालेल. अशा मनुष्यानें समाजांत न राहतां अरण्यांत राहिलें पाहिजे.

पुस्तकाच्या शेवटीं लेखकानें 'ब्रह्मचर्यप्रतिष्ठायां वीर्यलाभः' हा पतञ्जलीचा उतारा देऊन त्याचें समर्थन केलें आहे. वीर्य शरिरांत राहिलें असतां तें रक्ताशीं मिसळून शक्ति वाढते या प्राचीन कल्पनेला कोणताहि शास्त्रीय आधार नाहीं. वीर्य एकदां बनलें म्हणजे ते बाहेर पडलेंच पाहिजे (वास्तवीक वीर्याचे सर्व घटक वेगवेगळे

तयार होतात व स्खलनापर्यंत साचून राहतात ), न पडल्यास तें सांचल्यामुळें प्रकृति विघडते; हें लक्षांत ठेवलें म्हणजे ब्रह्मचर्याचें माहात्म्य एकदम वरेंच कमी होतें इतकेंच नव्हे तर प्रकृति सुदृढ राहण्याला जसा नियमित आहार तसाच समागमहि अवश्य आहे असें सिद्ध होतें. अर्थात नियमित म्हणजे किती हें ज्याच्या त्याच्या प्रकृतीवर व वयावर अवलंबेल.

पान ३०:–येथें बाहेरख्यालीसंबंधीं सामान्य सिद्धांत दिले आहेत, त्यांपैकीं दोन आम्हांस विशेष महत्त्वाचे वाटतात, ते असेः—

६. बाहेरख्यालीविषयीं प्रत्येक मनुष्यानें असें लक्षांत ठेवावें कीं आपल्याला पशानें वश होणारे स्त्रीपुरुष आपणापूर्वीच दुसऱ्या कोणी विकत घेतलेले असतील; तर मग त्यांच्या शारीरिक आरोग्यावद्दल खात्री नाहीं.

७. बाहेरख्यालीविषयीं प्रत्येकानें हेंहि लक्षांत ठेवावें कीं आपल्या तारुण्याला व सौंदर्याला भाळणारे स्त्रीपुरुष यापूर्वीसुद्धां हल्लींप्रमाणेंच दुसऱ्यावर फिदा झालेले असतील; तर मग त्यांच्या शारीरिक आरोग्यावद्दल मुळींच खातरी नाहीं.

या दोन्ही गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत; परंतु यांपैकीं विशेषतः दुसरी गोष्ट पार विसरून जाण्याइतका अहंकार पुष्कळांत असतो.

पान २९:–गुप्त रोगांचा प्रतिबंध करतां येतो, म्हणजे स्त्रीपुरुषांपैकीं एकास रोग असतांहि तो समागमाचे वेळीं दुसऱ्यास लागूं नये अशी तजवीज रासायनिक रीत्या करतां येते ही गोष्ट लेखकानें नुसती सुचवून , ज्यांस अधिक माहिती पाहिजे असेल त्यांनीं १ रुपया पाठवून ‘ विषयांधाच्या कानांत ’ हें स्वतंत्र पत्रक मागवावें, असें लिहिलें आहे.

या बावतींत आमचा तीव्र मतभेद आहे. ‘ अशा प्रकारच्या प्रतिबंधक उपायांचें ज्ञान झाल्यानंतर सर्वसाधारण मनुष्याची प्रवृत्ति विषाची परीक्षा पाहण्याकडे साहजिकच होणार,’ हें कांहीं अंशीं खरें आहे, परंतु रोगांचे भीतीनें जो मनुष्य नीतीनें राहतो, त्याची नीति फार दिवस टिकत नाहीं. शिवाय नैसर्गिक मार्गाचे अभावीं स्वसंभोगादि वाईट संवयी लागतात, त्यांस आम्ही नीति म्हणत नाहीं.

पत्रकाची किंमत १ रुपया ठेवली तर अत्यंत गरीब लोकांस ही माहिती मिळणार नाहीं. पांचशें रुपये ठेवली तर त्याहूनहि कमी लोकांस मिळेल, परंतु त्यांत फायदा कोणता ?

प्रतिबंधाचे मार्ग सर्वांस माहीत झाले पाहिजेत असें आमचें मत आहे. विवाह-व्यतिरिक्त संभोग म्हणजे अनीति असें धरून चाललें तरी रोगांच्या प्रसारापेक्षां अनीतीचा प्रसार आम्हांस पतकरतो. याकरतां उपायांची सविस्तर माहिती आमच्या 'गुप्त रोगांपासून बचाव' या १२ आण्यांचे पुस्तकांत दिली आहे, व इतकाही खर्च ज्यांस करावयाचा नसेल त्यांस ही माहिती आम्ही फुकट देतों.

---

असुक मुलाचा बाप कोण ? असा प्रश्न एखादे वेळीं उपस्थित होतो व त्याचें खात्रीलायक उत्तर आईस सुद्धां देतां येईल असा नियम नसतो, व देतां आलें तरीही ती खोटें बोलण्याचा संभव असतो. अलीकडे शास्त्रीय पद्धतीनें रक्त तपासून अमुक मनुष्य बाप असणें शक्य नाहीं असें कधीं कधीं खात्रीनें सांगतां येतें.

---

## वेश्यासंबंधीं कायदे

( ही माहिती १९२६ सालीं प्रसिद्ध झालेल्या एका फ्रेंच ग्रंथांतून घेतली आहे. सं. )

प्राचीन हिंदुस्थानांत व ईजिप्तमध्येंहि वेश्यावृत्तीचा धर्माशीं बराच संबंध असे ( येथें अजूनही आहे ). ज्यू लोक ईजिप्तमधून पळून जाईपर्यंत त्यांचेमध्येंहि वेश्या-वृत्ति प्रचलित होती. परंतु तेथपर्यंत कोठेंहि वेश्यांसंबंधीं कायद्यांचा उल्लेख सांपडत नाहीं.

**मोझेस्**नें ज्यू लोकांना ईजिप्तमधून काढून नेलें व वेश्यांसंबंधीं पहिला कायदा केला. तो असा कीं ज्यू स्त्रियांनीं वेश्यावृत्ति करतां कामा नये, व वेश्यांच्या संततीस दहा पिढ्यांपर्यंत देवळांत येऊं देऊं नये. तरीहि इतर लोकांच्या बायकांशीं संबंध ठेवण्यांत त्यांस कांहीं गौण वाटत नव्हतें असें दिसतें. या कायद्याचा उपयोग न होतां रोगप्रसार इतका झाला कीं सर्व रोग्यांस त्यानें हांकून दिलें. या रोगांत गर्मी होती

असें कांहीं म्हणतात, परंतु मतभेद आहे. रोगांचा प्रसार शेवटीं इतका झाला कीं **मोझेस्**नें २३००० पुरुष व ३२००० स्त्री कैद्यांची कत्तल करण्याचा हुकूम दिला; यानंतर सुंता करण्याची रीत सुरु झाली.

ग्रीस देशांतील सात प्रसिद्ध शहाण्यांपैकीं **सोलन्** नांवाचा एक होता (ख्रिस्ती शकापूर्वी ६४०–५५८), त्यानें उत्तम कायदे केले अशी प्रसिद्धी आहे. यावेळीं जननेंद्रियांस देव समजण्याची कल्पना आशियामधून ईजिप्तमध्यें व तेथून ग्रीसमध्यें जाऊन लोकप्रिय झाली होती, व जननेंद्रियास प्रामुख्य दिलेल्या मूर्ति जिकडे तिकडे असत. कुमारिकांचें कौमार्य हरण करण्याचें काम प्रथम या मूर्तीकडे असे व तेंच काम पुढें मूर्तीच्या पुजाऱ्यांकडे आलें. नंतर देवस्थानास पैसे मिळवण्याकरतां कुमारिकांनीं वेश्याकर्म करण्याची सुरवात झाली व यांतील कांहीं हिस्सा त्यांच्या आईबापांसहि मिळत असे. या सर्व धार्मिक प्रकारामुळें त्यावेळीं ग्रीक लोक अत्यंत उल्लू बनले होते व समसंभोगासारख्या अनैसर्गिक चालीहि त्यांच्यांत सुरू झाल्या होत्या. यापेक्षां नैसर्गिक प्रकार बरा, म्हणून सोलन्‌नें म्युनिसिपालिटीतर्फे कुंटणखाने स्थापन करवले. सोलन्‌ची नीतीची कल्पना इतकी कडक होती कीं तो व्यभिचारिणींस मृत्यूची शिक्षा देत असे व कुमारिकांची व विवाहित स्त्रियांची अब्रू सुरक्षित रहावी म्हणूनच त्यानें ही व्यवस्था केली. त्यानें आशियांतील कांहीं स्त्रिया गुलाम म्हणून विकत घेतल्या व त्यांस **आथेन्स** शहरांत बंदराच्या आसपास वेश्यागृहांत ठेवल्या. या वेश्यांस गिऱ्हाइकांकडून ठरलेली रक्कम मिळत असे व वेश्यागृहांवर कर असे. याशिवाय कांहीं खाजगी गृहेंहि असत व त्यांचा दरवर्षी लिलांव (दारूच्या दुकानांप्रमाणें) होत असे. शिवाय स्वतंत्र वेश्याहि असत व त्या ओळखतां याव्या म्हणून त्यांना विशिष्ट पोषाख करावा लागत असे व सूर्य मावळण्यापूर्वीं त्यांस शहरांत फिरण्याची परवानगी नसे.

या सुमारास **स्पार्टा** येथील व्यवस्था पाहिल्यास दोहोंतील फरक विचार करण्यासारखा आहे. तेथें **लायकर्गस** यानें शरीरसंपत्तीस विशेष महत्त्व दिलें होतें व त्यामुळें तेथील लोक सुप्रजाजननाच दृष्टीनें सुदृढ व देखण्या पुरुषांस आपले

घरीं बोलावून त्यांजकडून हें काम करून घेत असत. असा प्रकार सोलन्नें कधींहि चालूं दिला नसता.

**रोम** येथें विवाहबाह्य समागम करणाऱ्या सर्व स्त्रियांस वेश्या समजत असत. धंदा करण्यास पोलीसची परवानगी लागे. त्यांचीं नांवें नोंदीत व ज्या नोंदवणार नाहींत त्यांस देशपार करीत. मी धंदा करणार असें उघडपणें सांगावें लागणें ही वेश्यांस पुरेशी शिक्षा आहे असें ते समजत. ही समजूत इतकी खोटी ठरली की उच्च दर्जाच्या स्त्रियांचीं नांवेंही नोंदणीबुकांत दिसूं लागलीं. तेव्हां सरदार घराण्यांतील स्त्रियांस नांव नोंदूनहि वेश्या होतां येणार नाहीं असा कायदा झाला. यानंतर वेश्यांनीं वेश्यागृहांतच राहिलें पाहिजे असा कायदा झाला.

नंतर **सीझर** ही पदवी धारण करणारे जेवढे रोमचे बादशहा झाले ते बहुतेक सर्व अत्यंत उल्लू असल्यामुळें, त्यांनीं भयंकर कायदे करूनहि उपयोग झाला नाहीं. **टायबेरियस सीझर** यास सरदारांकडे मेजवान्या होत तेव्हां तेथें वाढावयास नग्न स्त्रिया असत.

**कॅलिग्यूला** याचा आपल्या सर्व बहिणींशीं संबंध असे, तो स्वतःची नग्न स्त्री मित्रांस दाखवीत असे व मोठमोठ्या लोकांच्या बायकांचा त्यांचे देखत उपमर्द करीत असे. शेवटीं त्यानें स्वतःच्या राजवाड्यांत वेश्यागृह ठेवलें, व त्याचे सेवक गिऱ्हाईक शोधीत हिंडत !

**अलेक्झांडर** बादशहानें बरीच सुधारणा केली, परंतु त्यावेळीं समसंभोग इतका पसरला होती कीं तो बंद करण्याची त्याची छाती झाली नाहीं. पुढें याविरुद्ध ख्रिस्ती बादशहा **कॉन्स्टंटाईन** यानें कायदा केला, परंतु वेश्यांचे बाबतींत त्यानेंहि सोलनचेंच धोरण स्वीकारलें.

**जस्टिनिअन** यानें नंतर बऱ्याच वर्षांनीं वेश्यांसंबंधीं जो कायदा केला त्यावरून दिसतें की लहान मुलींस फुसलावून आणून वेश्यागृहांत ठेवणें, त्यांची बहुतेक मिळकत लुबाडून घेणें, दहा वर्षांचे आंतील मुलींवरहि वेश्यावृत्ति लादणें वगैरे प्रकार त्यावेळींहि होते. तो कायदा असाः—वेश्यांस कोणीं थारा देतां कामा नये, विवाहित

व अविवाहित स्वतंत्र स्त्रिया किंवा गुलाम यांस बिघडवतां कामा नये; त्यांस अन्न-वस्त्र किंवा दागिन्यांचें आमिष दाखवून फुसलावतां कामा नये, इत्यादि. त्यानें सर्व कुंटणांस कॉनस्टॅंटिनोपलमधून हांकून दिलें व कोणी राहिल्यास त्यास मृत्यूची शिक्षा फर्माविली. एके काळीं उल्लू म्हणून प्रसिद्ध असलेल्या त्याच्या राणीनेंहि यावेळीं सभ्यपणाचें अवसान आणून, पांचशें वेश्यांस कोंडून ठेवतां येईल अशी इमारत स्वतःचे खर्चानें सजवली व त्यांस तेथें कंटाळा येऊं नये म्हणून शक्य तितकी आरामाची सोय केली. इतकें करूनहि त्यांपैकीं बहुतेकांनीं रात्रीं समुद्रांत जीव दिला! यावेळींही वेश्यावृत्ति गुन्हा समजत नसत. फक्त कुंटणपणा हा गुन्हा होता.

फ्रान्समध्यें रोमन लोकांचाच कायदा बरेच दिवस चालू होता, परंतु इ. स. ५०६ मध्यें ..लॅरिक नांवाच्या राजानें अत्यंत कडक कायदे केले. वेश्यावृत्ति हा गुन्हा ठरवून वेश्येस ३०० फटके देऊन हद्दपार करीत असत व ती परत आल्यास पुनः ३०० फटके देऊन एखाद्या गरीब मनुष्याकडे नोकर ठेवीत व तिला घराबाहेर पडण्याची परवानगी नसे. कुंटणांसही फटक्यांचीच शिक्षा असे. हे कायदे फुकट जाऊन लोक अधिकच उल्लू बनले.

यानंतर इ. स. ८०० मध्यें शार्लमॅन्य नांवाच्या प्रसिद्ध राजानें आणखी कायदे केले. ज्या घरांत वेश्या सांपडेल त्या घराच्या मालकानें तिला खांद्यावर घेऊन बाजारचौकांत नेली पाहिजे व तिला फटके मारले पाहिजेत, तसें न केल्यास दोघांसहि तेथें नेऊन फटके मारावे असा कायदा केला. त्याच्या मुलानें आणखी कायदा केला कीं वाईट चालीच्या स्त्रियांच्या कपाळावर चिठ्ठी मारून त्यांचे कमरेच्या वरचा भाग उघडा ठेऊन रस्त्यांत फिरवाव्या. तरीहि फायदा झाला नाहीं. राजे व दरबारी लोकच काय, परंतु ख्रिस्ती जोगी व जोगिणींच्याहि दुर्वर्तनाला ताळ उरला नाहीं. वेश्यांच्या धंद्यास तेजी येऊन त्यांच्या एका संस्थेची वार्षिक मिरवणूक निघत असे.

वेश्यांनीं विशिष्ट प्रकारचा पोषाख करून सोनेरी कमरपट्टा घातला पाहिजे असा कायदा आठव्या लुईनें केला. नंतर १२५४ सालीं **सेंट लुई** राजानें त्यांस शहरांत किंवा खेड्यांतहि राहू देऊं नये असें फर्मावलें व ज्या सुधारतील त्यांस

राहण्याकरतां एक इमारत बांधली. न ऐकणारांची मालमत्ता जप्त होई व त्यांस कोणीं भाड्यानें घर दिल्यास तेंहि जप्त होई. कुंटिणीस प्रथम अपराधाबद्दल फटके व पुनः सांपडल्यास देहांत शासन होत असे.

याचे अगोदर प्रत्येक शहरांत वेगळा कायदा असे. **नारबोन्** येथें एक रस्ता वेश्यांकरतां राखलेला असे; **टुलूज** येथें एक वेश्यागृह असे, त्याच्या उत्पन्नांतून शहराच्या दागदुजीस व इस्पितळांस मदत होत असे.

**मार्सेल्स.** येथें शहाराच्या कांहीं भागांतच वेश्यांस परवानगी असे यामुळें नवीन कायदा अंमलांत आणणें कठिण झालें व खुद्द पॅरिस शहरांतूनहि त्या नाहींशा न होतां सभ्यतेचा आव आणून राहूं लागल्या. याचा परिणाम असा झाला कीं कोणती स्त्री मिळण्यासारखी आहे हें उल्लू लोकांस न समजल्यामुळें ते कधीं चुकून व कधीं मुद्दाम, सर्वच स्त्रियांस त्रास देऊं लागले. यामुळें राजानें वरील कायदा त्याच वर्षीं रद्द केला, वेश्यांकरतां कांहीं स्थळें नेमून दिलीं, व त्यांनीं अमुक पोषाख केला पाहिजे, अमुक वाजतां घरीं गेलें पाहिजे वगैरे नियम केले, व सरकारी हुद्देदारांस त्यांजकडे जाण्याची बंदी केली.

**सोलन व सेंट् लुई** यांच्या कालांत १८०० वर्षांचें अंतर होतें, दोघेहि उत्तम कायद्यांबद्दल प्रसिद्ध आहेत, व दोघांसहि वेश्यावृत्तीस परवानगी द्यावी लागली, तरी दोघेहि विचारशील, नीतिमान व धार्मिक होते.

लंडन येथें ११६१ सालीं प्रथम कायदा झाला. या वेळीं सार्वजनिक स्नानगृहांत वेश्यावृत्तीस परवानगी असे व कायद्यानें असें फर्माविलें कीं कोणत्याहि स्त्रीनें समागमाबद्दल पैसे घेतल्यास तिनें सबंध रात्र एकाच पुरुषाबरोबर घालवली पाहिजे, व स्नानगृहांच्या मालकांनीं रोगी स्त्रियांस तेथें राहूं देऊं नये.

बर्लिन येथें वेश्यांस कांहीं रस्ते व घरें नेमलेलीं असत, विशिष्ट पोषाख असे व कोणीं नियम मोडल्यास फटके मारून गांवाबाहेर हांकून देत असत. शिवाय जत्रेच्या ठिकाणीं जाणाऱ्या फिरत्या वेश्या असत. इ. स. १४१४ मध्यें **कॉन्स्टन्स** येथें भरलेल्या महापरिषदेच्या सभासदांकरतां व बरोबरच्या इतर लोकांकरतां ६०० वेश्या राखून ठेवल्या होत्या.

# वेश्यांसंबंधीं कायदे

**ल्यूथरच्या** धार्मिक क्रांतीनंतर **बर्लिन** येथें कायदे करून वेश्यांस हांकून दिलें. लवकरच व्यभिचार, बालहत्या, गर्भपात इतके वाढले कीं पुनः कायदा बदलावा लागला व लोकसंख्येच्या मानानें वेश्या पुरेशा नसल्यामुळें त्यांची संख्या वाढवावी असा ठराव झाला !

बर्न येथें स्नान-गृहांत वेश्या असत व याच गृहांत स्त्रियाहि स्नानास जात असत. स्पेनमध्यें फ्रान्ससारखीच स्थिति होती. इ. स. १२६० मध्यें आल्फानसो राजानें कायदा केला कीं गिऱ्हाइकानें वेश्येस अगाऊ पैसे दिल्यावर तिनें करार मोडल्यास कायदेशीर इलाज नसे. या वेळीं वेश्यागृहें राजाच्या मर्जीतल्या अधिकाऱ्यांस बक्षिस दिलेलीं असत व त्यांपासून मोठी मिळकत असे.

यानंतर १५६० मध्यें फ्रान्समध्यें पुनः कडक कायदे केले. कांहीं शहरांत फर्माविलें कीं वेश्यांनीं २४ तासांत धंदा बदलला पाहिजे व तसें न केल्यास हजामत करून, फटके मारून हांकून देण्याची धमकी दिली.

१६०० सालीं वेश्यांकरतां एक तुरुंग बांधला, परंतु त्यावेळच्या गरीबीमुळें तुरुंगांत जाण्यास मिळावें म्हणून स्त्रिया मुद्दाम वेश्याकर्म केल्याची वर्दी स्वतःच पोलिसांत देत असत व कांहीं कुमारिकांनीं सुद्धां आईबापांच्या सांगण्यावरून खोटीच वर्दी देऊन पोटापाण्याची सोय तुरुंगांत लावली ! यामुळें तपासणी सुरू झाली व कुमारिका नसलेल्या स्त्रियांसहि शपथ घ्यावी लागे कीं मुद्दाम तुरुंगांत जाण्याकरतां वेश्याकर्म केलें नाहीं. कुमारिका म्हणून परत पाठवलेल्या स्त्रीस पुनः कधींही तुरुंगांत घेत नसत, व थकल्यामुळें देवधर्माला लागलेल्या वेश्यांनीं तेथें येऊं नये म्हणून, ३० वर्षांच्या पुढील वेश्यांस तुरुंगांत घेत नसत. या स्थितीमुळें हा तुरुंग लवकरच बंद करावा लागला !

परंतु १६६५ मध्यें जास्त तुरुंग बांधले व तेथें वेश्यांनीं प्रार्थना करावी, काम करावें, धार्मिक पुस्तकांचें वाचन ऐकावें, वगैरे प्रकारांनीं त्यांचे हाल करूं लागले. गुप्तरोगांवरहि याचवेळीं प्रथम सक्तीनें उपचार करूं लागले. यावेळचा एक लष्करी कायदा सांपडतो कीं **व्हेर्साय्** ( पॅरिसपासून ११ मैल ) येथें लष्करी शिपायांबरोबर

कोणी वेश्या सांपडल्यास तिचें नाक व कान कापले जातील ! सर्व कडक कायद्यांप्रमाणें हेही ढिले पडले, व जत्रांतूनहि वेश्यांचीं दुकानें दिसूं लागलीं.

१६४२ मध्यें एका शहरांत कायदा केला कीं वेश्यांकडे कोणींही जातां कामा नये ! १८ व्या शतकाचे आरंभीं **व्हेनिस्** येथून वेश्यांस हांकून दिल्यामुळें लोकांनीं गर्ती स्त्रियांवर व जोगिणींवर हल्ला केला. यामुळें सरकारनें वेश्यांस परत बोलवून त्यांस राहण्यास जागा व धंदा चालूं लागेपर्यंत पैशाचीहि मदत केली !

१७७८ मध्यें पॅरिस येथें कडक नियम अंमलांत आणल्यामुळें वेश्या पोलीसच्या देखरेखीखालीं राहण्याऐवजीं सर्वत्र पसरल्या व रोगप्रसार इतका झाला कीं १७८९ मधील राज्यक्रांतीचे वेळीं सर्व इस्पितळें गर्मीच्या रोग्यांनीं भरलीं होतीं व नवीन रोग्यांस जागा मिळण्यास वर्ष वर्ष थांबावें लागे. राज्यक्रांतीनंतर वेश्यांचे बाबतींत पोलीसचा जुलूम कमी करण्याकडे लोकांचा कल होता, परंतु कुंटणकीवर मात्र कटाक्ष होता. वेश्यांकडे दंगाधोपा झाल्यास मात्र त्यांस शिक्षा होई, परंतु धंद्यास मोकळीक असे. परंतु १७९५ सालीं कडकपणाची आणखी एक लाट आली व वाईट चालीच्या स्त्रियांस पकडण्याकरतां एक कमिटी नेमली. त्यांनी घरोघर हिंडून ज्या स्त्रियांस उपजीविकेचें साधन सांगतां आलें नाहीं त्यांस पकडलें. अर्थात यांत पुष्कळ गर्ती स्त्रियाहि सांपडल्या. इतकें करूनहि उल्लूपणा वाढतच गेला. नन्तर १८३० चे सुमारास पुनः देखरेखीखालीं वेश्यांस परवानगी व सक्तीची तपासणी सुरू झाली, व येथून हीच व्यवस्था यूरोपांत सर्वत्र पसरली.

वरील सर्व हकीकतीवरून दिसतें कीं आजपर्यंत कोणासही कोणत्याहि मार्गानें वेश्यांचा नायनाट करतां आलेला नाहीं; इतकेंच नाहीं तर वेश्यांविरुद्ध जितके अधिक कडक कायदे करावे त्या मानानें लोकांसच त्यांपासून जास्त त्रास व धोका उत्पन्न झालेला आहे. वेश्यावृत्तीचा नायनाट करूं पाहणारांनीहि कबूल केलें आहे कीं उघड वेश्यावृत्तीपेक्षां चोरटी अधिक धोक्याची आहे. ज्या ज्या वेळीं ती जबरीनें नाहींशी करण्याचा प्रयत्न झाला, त्या त्या वेळीं हें सिद्ध झालेलें आहे. असा प्रयत्न म्हणजे चोरट्या वेश्यावृत्तीस आव्हानच होय.

# वेश्यांसंबंधीं कायदे

१९ व्या शतकापर्यंत हा केवळ नीतीचा किंवा धर्माचा प्रश्न समजत असत व गुप्त रोगांचा विचारच या बाबतींत होत नसे. याचें मुख्य कारण म्हणजे या रोगांवर खरोखर उपायच सांपडलेले नव्हते, व प्रतिबंधाचा मार्ग म्हणजे वेश्यांस कोंडून ठेवणें हाच होता. वेश्यांस जेथें परवानगी असे तेथें त्यांस कांहीं रस्ते नेमून दिलेले असत, परंतु इतर धंद्यांचीही अशीच व्यवस्था असल्यामुळें त्यांत विशेष कांहींच नसे.

आतां हल्लीं निरनिराळ्या देशांत यासंबंधीं काय कायदे आहेत तें पाहूं(१९२६).

**फ्रान्स.** वयांत आलेल्या प्रत्येक मनुष्यास आपल्या शरीराचा व मनाचा पाहिजे तसा उपयोग करण्याचा पूर्ण हक्क आहे, मात्र त्यापासून इतरांस त्रास होतां कामा नये, हें तत्त्व कायद्यानें मान्य केल्यामुळें, १८ वर्षांवरील स्त्रियांस वेश्यावृत्तीची पूर्ण मुभा आहे, परंतु रोगांपासून संरक्षणाकरतां वेश्यांसंबंधीं कायदे आहेत. याकरतां प्रत्येक वेश्येस पोलिसांत नांव नोंदावें लागतें व कोणी आपण होऊन न नोंदल्यास पोलिसास तें सक्तीनें नोंदतां येतें. वेश्यागृहांतील वेश्यांची ८ दिवसांनीं व स्वतंत्र वेश्यांची १५ दिवसांनीं डाक्तरी तपासणी असते, व कोणीं धंदा सोडून दिला असें सिद्ध केल्यास तिचें नांव नोंदणीबुकांतून काढून टाकतात. वेश्यांनीं रस्त्यांत लोकांस खुणेनें किंवा शब्दांनीं बोलावतां कामा नये असा कायदा म्युनिसिपालिटीस करतां येतो. त्याचप्रमाणें अमुक ठिकाणीं त्यांनीं जाऊं नये, अमुक वेळीं रस्त्यांत उभें राहूं नये, आपल्या हद्दींत परवानगीशिवाय वेश्यागृह उघडूं नये, असेहि कायदे करतां येतात, परंतु स्वतंत्र वेश्यांनीं उपाहारगृहांत जाऊं नये असा कायदा करतां येत नाहीं असें वरिष्ठ कोर्टानें ठरवलें. नोंदलेल्या वेश्यांपैकीं कोणास रोग आहे असें आढळल्यास त्यांस जबरीनें इस्पितळांत पाठवतात, परंतु त्यास कायद्याचा आधार नाहीं. ही केवळ पोलीसची अरेरावी आहे, परंतु सार्वजनिक हिताची असल्यामुळें त्याचा कोणी जास्त खल करीत नाहीं. याच अरेरावीनें पोलीसचे वरिष्ठ अधिकाऱ्यांस १५ दिवसपर्यंत तुरुंगाची शिक्षाहि फर्मावतां येते. १८ वर्षांचे आंतील मुलीनें वेश्येचा धंदा केल्यास तिला आईबापांकडे किंवा एखाद्या सार्वजनिक संस्थेंत पाठवतात.

**प्रशिया.** जर्मनी व डेन्मार्क या दोन देशांत सरकारी परवान्याशिवाय वेश्येचा धंदा गुन्हा समजून सक्त मजुरीची शिक्षा देतां येते. प्रशियांतील कांहीं कायदे:—वेश्यांनीं वेश्यागृहांतच राहिलें पाहिजे; हीं गृहें मोठ्या रस्त्यावर असूं नयेत; त्यांवर नेमलेल्या मॅजिस्ट्रेटानें दाक्तरास घेऊन तेथें वारंवार तपासणीकरतां गेलें पाहिजे; तेथें मादक पेयें विकतां कामा नये. व दुसऱ्या स्त्रीस तेथें येऊं देतां कामा नये. वेश्येस रोग असल्यास मालकिणीनें ही गोष्ट मॅजिस्ट्रेटास लगेच कळवून उपचाराविषयीं व संसर्गाविषयीं खबरदारी घेतली पाहिजे. वेश्येनें रोग लपवल्यामुळें कोणास संसर्ग झाल्यास ६ महिने तुरुंग व ५० फटके मिळतील. वेश्यागृहांत चोरी, मारामारी झाल्यास इतर मार्गाचे अभावीं मालकिणीला नुकसान भरून द्यावें लागेल...इतर धंदा करणारी स्त्री देखील समागमाबद्दल पैसे घेत असेल तर वेश्या समजली जाईल.

जर्मन साम्राज्यांत खालील नियम आहेतः —वेश्यांनी सार्वजनिक ठिकाणीं इतर वेश्यांबरोबर किंवा कुंटणांबरोबर किंवा असभ्य रीतीनें फिरतां कामा नये व उघडपणें गिऱ्हाईक मिळवण्याचा प्रयत्न करतां कामा नये. शाळा, देवळें, सार्वजनिक इमारती, नाटकगृहें, सर्कशी वगैरेचे आसपास रेंगाळतां कामा नये व अज्ञान मुलांशीं कोणताही संबंध ठेवतां कामा नये. पोलीसांस केव्हांही घरांत येऊं दिलें पाहिजे व तथील कोणत्याही मनुष्याबद्दल माहिती दिली पाहिजे, व पत्ता बदलल्यास पोलिसास कळवलें पाहिजे.

**इंग्लंड.** येथें वेश्यांसंबंधीं कोणतेहि कायदे नाहींत व कायद्याच्या दृष्टीनें इंग्लंडांत वेश्या नाहींत असें इंग्रज लोक प्रतिपादतात, तें कितपत खरें आहे पाहूं.

१८८६ मधें इंग्लंडमधील ‘ सांसर्गिक रोगांचा कायदा ’ बंद झाला व प्रस्तुत कायदा असाः—‘कोणीही वेश्या गिऱ्हाईक मिळवण्यकरतां रस्त्यांतील लोकांस थांबवून व विनवणी करून अडथळा करील, त्रास देईल किंवा संकटांत आणील ’ तर तिला वारंटाशिवाय पकडून ४० शिलिंग पर्यंत दंड किंवा १५ दिवसपर्यंत तुरुंगाची शिक्षा देतां येते. या कायद्यानें वेश्यांनीं गिऱ्हाइक मिळवण्याचा प्रयत्न करणें गुन्हा नाहीं, त्रास देणें गुन्हा आहे. वेश्यांची नोंद नसल्यामुळें अमुक स्त्री वेश्या आहे असा पुरावा

होणें कठिण जातें. त्रास दिल्याचा पुरावाही सोपा नसतो कारण पुरुष अशी साक्ष देण्यास नाखुष असतात. पोलीसचे लोक वर्तमानपत्रांच्या टीकेस भितात, यामुळें लंडनमधील मोठ्या रस्त्यांत व रेलवेच्या स्टेशनांवर वेश्यांचा सुळसुळाट असतो. परंतु कायद्याच्या दृष्टीनें वेश्या नाहींत !

बरें, वेश्यागृहें नसतील म्हणावें तर वेश्यावृत्तीचे कट्टे शत्रू **फ्लेक्स्नर** काय म्हणतात पहाः—' कुंटणखान्यांस बंदी आहे खरी, परंतु इंग्लंडांत कुंटणखान्याची व्याख्याच कांही और आहे. स्त्रिया व पुरुष जेथें समागमाकरतां जातात तो कुंटण-खाना. परंतु जेथें एखादी स्त्री एकटीच राहील, किंवा पुष्कळ एकाच घरांत परंतु स्वतंत्र गाळ्यांत राहतील, व त्यांच्यावर कोणाचाही तावा नसेल, तेथें पुरुष समाग-माकरतां गेले तरी तो कुंटणखाना होत नाही.' म्हणजे स्वतंत्रपणें धंदा करतां येतो, परंतु दुसऱ्याच्या ताब्यांत राहून करतां येत नाहीं. याचा अर्थ वेश्यांच्या मिळकतीवर इतरांनीं उपजीविका करूं नये, व हें रास्त आहे. मात्र म्हणून वेश्यावृत्ति नाहीशी झाली म्हणणें ढोंग आहे. शिवाय यांत रोगांचा विचार नाहींच. वरील कायदाही धड अंमलांत आलेला नाही, गुप्त कुंटणखाने पुष्कळ आहेत व स्नानगृहें, चंपीगृहें वगैरे नांवाखालींही पुष्कळ आहेत. यामुळें गुप्तरोगांच्या प्रसारास बिलकूल आळा पडलेला नाहीं असें आंकडे सांगतात.

**नॉर्वे, स्वीडन्, डेनमार्क.** या देशांत रोगांचा विचार कायद्यानें केलेला आहे. दाक्तराकडे रोगी गेल्यावरोबर त्यानें सरकारांत कळवलें पाहिजे, व हा कायदा वेश्यांसच नव्हे तर इतरांसही लागू आहे. दुसऱ्यास संसर्ग होऊं दिल्यास शिक्षा होते, त्याचप्रमाणें दाक्तरानें सांगितलें असतां इस्पितळांत न गेल्यासही होते. उघडपणें गिऱ्हाईक मिळवण्याचा प्रयत्न केल्यास वेश्यांस शिक्षा होते व याला पोलीसची साक्ष पुरते. परंतु त्यांस पाहिजे तेथें हिंडण्यास मोकळीक आहे. **डेनमार्क**मधेंही जर्मनी-प्रमाणेंच वेश्यांस रिकामटेकड्या भटक्या लोकांचे सदरांत समजतात व त्यांस भटक-ण्याबद्दल १२ पासून ९० दिवस तुरुंगवजा कारखान्यांत ठेवतां येतें. याच्या अंमलबजावणीची पद्धत अशीः—एखादी स्त्री वेगवेगळ्या वेळीं रस्त्यांत हिंडतांना दिसल्यास तिला धंदा नाहीं असें समजून तिला पोलीसकडून इशारा मिळतो. त्याचा

परिणाम न झाल्यास तिचें नांव व पत्ता उतरून घेऊन, ' कांहीं तरी नोकरी पहा व पोलीसला कळव ' अशी छापील चिठ्ठी तिला पाठवतात. तसें न केल्यास मात्र तिला शिक्षा करतात. वेश्यागृहें कायद्यानें बंद केल्यामुळें इंग्लंडप्रमाणेंच चोरटीं गृहें अनेक नांवांखालीं अतोनात वाढलीं आहेत.

**स्वीडनमध्यें** १८१८ पासून वेश्यावृत्ति बंद केली. तेथें वेश्यांस कोंडून ठेवतात, कुंटणांस कडक शिक्षा करतात व गुप्तरोगांच्या उपचाराची व्यवस्था फुकट करतात. रोग्यांवर नजर ठेवतात व ज्यांपासून संसर्गाचें भय आहे असें वाटेल त्यांस सक्तीनें तपासतात. गुप्तरोग असल्यास लग्न होत नाहीं व रोगाचें कारण काडी मोडण्यास पुरतें. रोगांच्या दृष्टीनें हे कायदे उत्तम आहेत व फ्रान्समध्यें असे कायदे करण्याचा प्रयत्न चालू आहे.

**हॉलंड.** वेश्यागृहें बंद केल्यामुळें वेश्यांस इतर नांवाखालीं धंदा चालवावा लागतो. रस्त्यांतील वागणुकीसंबंधीं कायदा इतर देशांप्रमाणेंच आहे, परंतु अशानें वेश्या सुधारणें शक्य नाहीं असें फ्लेक्स्नर कबूल करतात. ते म्हणतात ' वेश्या रस्त्यांत क्वचित दिसतात परंतु दारूचे दुकानांत जास्त दिसतात.' शिवाय स्नानगृहें, नर्तनगृहें वगैरे इतर ठिकाणीं त्यांस आपला धंदा चालवावा लागतो. परंतु त्यांस हा लपंडावच पसंत आहे.

**स्वित्झर्लंड.** येथें निरनिराळ्या विभागांत निरनिराळे कायदे आहेत. जिनीव्हा येथें फ्रान्सचाच कायदा आहे. झ्यूरिच् येथें कडक कायदा आहे व कुंटणांस जबर दंड व ५ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा आहे. इतकेंही करून वेश्या नाहींशा झाल्या काय ? फ्लेक्सनर म्हणतातः–' लहान रस्त्यांत चिरुटांचीं खोटीं दुकानें असतात. तेथें चिरुटांच्या बहुतेक रिकाम्या पेट्या व नटलेल्या स्त्रिया असतात. तेथें कोणी मोठें नाणें दिल्यास मोड कधींहि मिळत नाहीं, परंतु त्याचा मोबदला अन्य रीतीनें मिळू शकतो. वेश्या स्वतः दुकानावर बसत नाहींत. त्या आंत बसतात. ' कायद्यानें वेश्या नाहींशा होणें शक्य नाहीं.

**इटाली.** १८८८ पर्यंत येथें परवान्याची पद्धत होती. परंतु या वर्षी ती रद्द केल्यामुळें लष्करांतील शिपायांत गुप्त रोगांचें प्रमाण शेंकडा ६२ नीं वाढलें,

म्हणून १८९१ मध्यें पुनः जुनी पद्धत सुरू केली. कायद्यानें वेश्यांस तपासणीची सक्ती नाहीं, परंतु कोणी तपासणीस कबूल नसल्यास तिला रोग आहे असें समजून उपचार करतात.

**स्पेन, पोर्तुगाल, रुमॅनिया, बेल्जिअम** या सर्व देशांत जवळजवळ फ्रान्सचीच नोंदणीची पद्धत आहे. १९२५ सालीं ब्रुसेल्स व ॲन्टवर्प या दोन शहरांत वेश्या नाहींशा करण्याचा प्रयत्न फुकट गेला.

**जपान.** सर्व शहरांत वेश्यांकरतां स्वतंत्र जागा असते व टोकिओ मधील 'योशिवारा' प्रसिद्ध आहे. ही व्यवस्था टोकिओंत १६१७ मध्यें अंमलांत आली. वेश्यांची जागा शहरापासून कांहीं अंतरावर असून तिकडे ट्रॅमवेचा एक फांटा गेला आहे. वेश्यांनीं वेश्यागृहांतच राहिलें पाहिजे. 'योशिवारा'च्या आवाराबाहेर जाण्यास त्यांस पोलीसची परवानगी लागते. गृहाच्या मालकाशीं वेश्यांचा कायदेशीर करार होतो. त्यांची नोंद व सक्तीची तपासणी असते. एका प्रसिद्ध जपानी डाक्तरानें लिहिलें आहे कीं १९०० पासून १९०४ पर्यंत टोकिओंतील 'योशिवारांत' ५,००० वेश्या असत व यांत रोग्यांचें प्रमाण शेंकडा ३½ ते ४½ असे. परंतु चोरटा धंदा करणाऱ्या वेश्यांत हें प्रमाण १३½ ते १९ असे.

**छेकोस्लोव्हॅकिआ.** हा प्रजासत्ताक प्रांत यूरोपांत लढाईनंतर स्थापन झाला. तेथें सर्व व्यवस्था फ्लेक्स्नेर व त्यांच्या अनुयायांच्या मताप्रमाणें झाली आहे, तेव्हां त्याचे परिणाम पाहणें जरूर आहे. तेथें १९२२ मध्यें नवा कायदा केला त्याचीं मुख्य कलमें:—कोणासही गुप्त रोग असल्यास उपचारांची सक्ती आहे, गरीबांस सरकारी मदत मिळते. कोणाही व्यक्तीसंबंधीं संसर्गाचा संशय आल्यास सक्तीनें तपासून इस्पितळांत पाठवतात व सर्व रोग्यांस ठराविक मुदतीनें सक्तीची तपासणी असते. हे कायदे डॉक्टरानें रोग्यांस सांगितले पाहिजेत व कोणींही पत्रव्यवहारानें उपचार करतां कामा नये. कुंटणगिरीसंबंधीं कायद्यामुळें वेश्यागृहांस परवानगी नाहीं. वेश्यांस सुधारण्याकरतां सरकारी संस्था आहेत. निष्काळजीनें कोणीं संसर्ग होऊं दिल्यास दंड व कैद आहे व कोणीं मुद्दाम संसर्ग घडवल्यास जास्त कैद आहे. नवराबायको किंवा त्याच नात्यानें राहणाऱ्या स्त्रीपुरुषांचे बाबतींत तक्रार आल्याशिवाय संसर्गाचा

खटला होत नाहीं. कोणींहि—स्त्रीनें किंवा पुरुषानें—उघडपणें कोणास समागमाकरत आव्हान केल्यास तो गुन्हा होतो. या पद्धतींत एक मोठा दोष असा आहे कीं संसर्ग झाल्यावर शिक्षा केल्यानें रोगांचा प्रसार थांबत नाहीं. अशा कायद्यानुळें वेश्यांस चोरून धंदा करावा लागतो व रोगांचा प्रसार जास्त होतो. तरी देखील फ्रान्समध्येंहि याचे पुरस्कर्ते आहेत.

नोंदणीचा कायदा फ्रान्समध्यें १८०२ सालीं झाला व १८६९ मध्यें तो सर्व यूरोपभर पसरला. परंतु याच सुमारास इंग्लंडांत विरुद्ध चळवळ सुरू झाली व त्यामुळें १८८६ मध्यें इंग्लंडांत व १८८८ मध्यें हिंदुस्थानांत सक्तीचे कायदे रद्द झाले. तरीही १८८८ मध्येंच फ्रान्समधील ‘अॅकॅडेमी’नें कायद्यांस दुजोरा दिला. तेव्हां-पासून दोन पक्षांतील भांडण चालू आहे. नवीन पक्षाचें म्हणणें असें:—शरीराचे बाबतींत प्रत्येक मनुष्य स्वतंत्र आहे. नीतीचे नांवाखालीं कायद्यानें कोणासही अप-वाद मानतां कामा नये. सक्तीच्या तपासणीनें पुरुषांस अनीतीचे मार्ग सुरक्षित केल्यास नीतीचा पायाच ढांसळून पडतो. वेश्याकर्म खाजगी गोष्ट असल्यामुळें कायद्यास त्यांस हात घालणें झाल्यास पुढील मुद्यांवरच घालतां येईल. अज्ञान मुलांस वाईट मार्गास लावणें गुन्हा होईल. त्याचप्रमाणें अश्लील हल्ला, सार्वजनिक ठिकाणीं अश्लीलता, फूस लावणें किंवा कुंटणपणा गुन्हे होतील. यासंबंधी कायदे स्त्रीपुरुषांस सारखेच असले पाहिजेत. म्हणून वेश्यांकरतां कोणतेहि विशेष कायदे करूं नये.

यांत कितपत तथ्य आहे पाहूं. व्यक्तिस्वातंत्र्याचें तत्त्व कोणीहि कबूल करील. अनीतीचे मार्गांत शिरल्यास रोगरूपी शिक्षा झालीच पाहिजे, ती टाळण्याची सवड देणें म्हणजे अनीतीस सवड देणें आहे, हें म्हणणें अज्ञानमूलक आहे. चुकीबद्दल शिक्षा झालीच पाहिजे, हें म्हणणेंच रानटी आहे, मग वेश्यांकडे जाणें पाप आहे कीं काय हा प्रश्न वेगळा. शिक्षा झालीच पाहिजे असें असेल तर रोगांवर उपचारहि करतां कामा नये, कारण त्यानें शिक्षा कमी होते. शिवाय निरपराधी माणसांसहि ही शिक्षा होते, उदाहरणार्थ आईबापांमुळें मुलांस जन्मतःच गर्मी असूं शकते. या स्वातंत्र्यवादी लोकांनीं वेश्यांस उडाणटप्पूंचे सदरांत घालण्याचा प्रयत्न केला आहे, हें त्यांच्याच तत्त्वाविरुद्ध आहे. पुरुषांस वेश्यांचा धंदा शक्य नसतो म्हणून या बाबतींत स्त्री

पुरुषांत फरक करणें जरूर पडतें. वेश्येनें एका रात्रींत ४५ पुरुषांस रोग दिल्याचें उदाहरण आहे. पूर्ण स्वातंत्र्याच्या आड येणारे कायदे सर्व देशांत असतात. दुसऱ्यास त्रास होऊं लागला म्हणजे स्वातंत्र्याची मर्यादा संपली. रोगी वेश्येस बरी होईपर्यंत सक्तीनें इस्पितळांत ठेवल्यानें रोगप्रसार कमी होत नाहीं असें म्हणणें म्हणजे डोळे मिटून आंधळ्यांत शिरण्यासारखें आहे. वकिलांनाही नांव नोंदवून सनद घ्यावी लागते, मग वेश्यांच्या नोंदणीनेंच जुलूम कसा होतो ? नोंदणीनें वेश्यांच्या धंद्यास परवानगी मिळते हें खोटें आहे. वेश्यावृत्ति गुन्हाच नसल्यामुळें ही परवानगी सर्वत्रच आहे. नोंदणीनें थोडाबहूत अडथळाच होतो.

नोंदणीसंबंधी या लोकांचा आणखी एक आरोप आहे कीं नोंदलेल्या वेश्यांस धंदा सोडणें शक्य नाहीं. हें म्हणणें खरें नाहीं व पॅरिसमध्यें त्यांना या बाबतींत सर्व प्रकारची सवलत दिली जाते व पुष्कळ वेश्या नोकरी किंवा लग्न करण्याकरतां धंदा सोडतातहि.

वेश्यांचे बाबतींत नीतिकल्पनांपेक्षां रोगांचें महत्त्व जास्त आहे हें इंग्लंडांतील नवीन पक्षाचे पुरस्कर्ते साफ विसरतात, व हा मूर्खपणा आहे. नवीन व्यवस्थेचे परिणाम पाहण्याकरतां पुढील उदाहरणें पहा.

इंग्लंडांतील वेश्या कमी झाल्या असें म्हणतां येत नाहीं. ब्रिटीश सैन्यांतील गुप्त रोग कमी झाले असें कांहीं लोक म्हणतात, परंतु तरीही हें प्रमाण फ्रान्स किंवा युरोपांतील इतर देशांपेक्षां जास्त आहे. गुप्त रोगांचा विचार कायद्यानें केला नाहीं इतकेंच नाहीं, तर अशा रोग्यांस सार्वजनिक इस्पितळें घेत नाहींत. असें असतांही केवळ वेश्यांची तपासणी बंद केल्यामुळें रोग कमी झाले हें कोणाही समंजस मनुष्यास खरें वाटणार नाहीं.

**कोलमारचा अनुभव.** बेकायदा पक्षाकडून हें नांव वारंवार ऐकूं येतें. हें शहर यूरोपांत ॲलसास् प्रांतांत आहे. लढाईपूर्वी हा प्रांत जर्मनीकडे होता. येथें १८८१ सालीं एका मॅजिस्ट्रेटाचे प्रयत्नानें शहरांतून वेश्या अजीबात नाहींशा झाल्या. यावरून त्याच उपायांनीं त्यांचा सर्वत्र नायनाट करतां येईल असें म्हणणें ही घोडचूक आहे. एका शहरांत त्रास झाल्यास वेश्या दुसऱ्या शहरांस जातात. धंदा सोडीत नाहींत. शिवाय येथें वेश्यावृत्ति हा गुन्हा मानल्यामुळें वेश्यांस पळून जावें

लागलें, व बेकायदा पक्षाच्या मतानें तर हा गुन्हा नव्हे, तेव्हां हें उदाहरण कसें लागू पडतें ? हा प्रांत नंतर फ्रेंचांच्या ताब्यांत आल्यावरही त्यांनीं तोच कायदा ( म्हणजे न नोंदतां वेश्यावृत्ति गुन्हा आहे ) कायम ठेवला. असें कायद्याचें पाठबळ असतांहि म्युनिसिपालिटीनें नोंदणी व तपासणी पुनः सुरू केली आहे !

**ब्रुसेल्स.** येथील अनुभव सर्वांत अलीकडचा आहे. येथें १ जून १९२४ पासून वेश्यांची नोंद व तपासणी बंद करण्याचें ठरलें. पॅरिस येथील डॉ. गूजरो हे या प्रयत्नास अनुकूल होते, परंतु तेच जुलै १९२५ मधें एका मासिकांत लिहितातः—‘ ब्रुसेल्स येथील बऱ्याच वैद्यकी संस्था या प्रयत्नाचे विरुद्ध असून याचे परिणाम अनिष्ट होतील असें भाकीत त्यांनीं अगोदरच केलें होतें. हे परिणाम इतके अनिष्ट झाले, रोगांचें प्रमाण इतकें वाढलें कीं म्युनिसिपालिटींत बेकायदा पक्षाचें बहुमत असतांही त्यांस हा प्रयत्न सोडून द्यावा लागला व सहा महिन्यांतच पुनः सक्तीनें नोंदणी व तपासणी सुरू करावी लागली ! यावरून हें सिद्ध होतें कीं बेकायदा पद्धतीचे परिणाम नवीन पक्षाच्या लोकांच्या डोक्यांत जितके चांगले होतात, त्याच्या शतांशही अनुभवास उतरत नाहींत.

गुप्त रोगांचे दृष्टीनें सर्व रोग्यांस योग्य उपचार सक्तीनें व फुकट झाले पाहिजेत. रोग्यांस गुन्हेगार न समजतां त्यांस सहानुभूतीनें वागविल्यास ते आपण होऊन उपचारांस तयार होतील, व डॉक्टरांनींही नीतिविषयक तत्त्वज्ञानाच्या भानगडींत न पडतां वरील गोष्ट लक्षांत ठेवल्यास रोगी वैदूंकडे न जातां त्यांचेकडे जातील व यांत समाजाचा व त्यांचाही फायदा आहे.

शेवटीं एक महत्त्वाची गोष्ट राहिली. फार थोड्या खर्चांत व थोडीशी काळजी घेतल्यास रोगी स्त्रीपासूनही रोग लागू नये अशी तजवीज पुरुषांस करतां येते. लष्करांतील अगदीं खालच्या दर्जाचे शिपाई सुद्धां हे मार्ग सहज वापरूं शकतात, तेव्हां यांत कौशल्याचें काम नाहीं. परंतु यांत दाक्तरांचा फायदा नसल्यानें यास कौशल्य लागतें असें कांहीं दाक्तर म्हणत असतात व त्यास एक नीतीचेंही शेंपूट चिकटवीत असतात. या प्रतिबंधक उपायांचें ज्ञान सर्वत्र पसरल्यास वेश्यांसंबंधीं

विशेष कायदे करण्याचें मुळींच कारण राहणार नाहीं व हें बेकायदा पक्षाच्या मना-सारखेंच होणार आहे. परंतु हा उपाय त्यांस पसंत नसतो. ‘ आम्ही जबरदस्तीनें तुम्हांस नीतिमान बनवणार, वेश्यांचे तपासणीनें रोग कमी होतात हें बरें नाहीं, वेश्यांकडे गेल्यास रोग झालेच पाहिजेत, म्हणूनच तपासणी नको ’ असा त्यांचे मनांत रानटी कावा असतो, व इंग्लंडांत वेश्यांचे ढोंगी कनवाळू त्यांस अनेक प्रकारांनीं छळूं पहात असतात.

वेश्यांस चोरून धंदा करावयास लावण्याचे परिणाम कसे होतात पहा. मिसेस नेस्बिट नांवाच्या बाईनें एका कमिटीपुढें साक्ष दिली कीं ‘ मी तरुण नाहीं तरी सुद्धां बाँड् स्ट्रीट मधून जातांना माझ्याशीं कोणी पुरुष बोलला नाहीं असें होत नाहीं.’

नीतीच्या कल्पना आरोग्याच्या पायावर उभारल्या पाहिजेत. रोगांचा प्रसार झाला तरी हरकत नाहीं पण नीति पाहिजे असें म्हणणारे लोक समाजाचे शत्रू आहेत. आपण म्हणूं तीच नीति व ती लोकांवर लादण्याचा आपला हक्क आहे अशी त्यांची कल्पना असते. या लोकांच्या बटबटीकडे लक्ष न देतां आरोग्यास अवश्य अशाच गोष्टी केल्या पाहिजेत. विशेषतः गुप्त रोगांपासून बचावाचे मार्ग सर्वांस जाहीर रीतीनें शिकवले पाहिजेत व ही सामग्री प्रत्येक वेश्येनें गिऱ्हाइकांस जरूर पडल्यास योग्य किंमतीस विकली पाहिजे व ती वापरण्याची रीत प्रत्येक वेश्येचे शय्यागृहाचे भिंतींवर ठळक रीतीनें लावण्याची सक्ती कायद्यानें केली पाहिजे, म्हणजे तपासणीची जरूर नाहीं.

---

## मनुष्याची उत्पत्ति

मनुष्य व बिनशेंपटीचे वानर या दोहोंचे पूर्वज एकच असले पाहिजेत, या शास्त्रीय तर्कास कांहीं प्रत्यक्ष पुरावा मिळाला तर पहावा या उद्देशानें आज जवळ जवळ वर्षभर प्रयत्न चालू आहेत. प्राण्यांच्या दोन जाती जितक्या जास्त जवळच्या असतील तितका त्यांपासून मिश्र उत्पत्ति होण्याचा संभव जास्त. घोडा व गाढव यांपासून खेचर होतें, परंतु कुत्रा व मांजर यांपासून मिश्र जात होत नाहीं. याप्र-

माणें मनुष्य व बिनशेंपटाचे वानर यांपासून मिश्र संतति होणें शक्य आहे कीं काय, याचा शोध करण्याकरतां मॉस्को येथील प्रो. इव्हॅनॉक यांचे देखरेखीखालीं फ्रेंच पश्चिम आफ्रिकेंत **किंद्या** येथील पॅस्तर इन्स्टिट्यूट्मध्यें प्रयोग करण्याची व्यवस्था केली आहे. याकरतां सॉव्हिएट् सरकारनें १०००० डॉलर दिले आहेत व अमेरिकेंतील नास्तिक लोकांची एक संस्था व कांहीं शास्त्रवेत्ते यांस मदत करीत आहेत. एकंदर खर्च १००००० डॉलर येईल असा अंदाज आहे.

अमेरिकेंतील धार्मिक लोकांनीं यासंबंधीं बरीच ओरड चालवली आहे. वास्तवीक पाहतां अशी मिश्र संतति उत्पन्न करण्याचे प्रयोग नैसर्गिक मार्गांनीं झाले तरीही त्यांत कोणाचेंच नुकसान नसल्यामुळें त्यांत ओरड करण्यासारखें कांहींच नाहीं, परंतु हे प्रयोग कृत्रिम गर्भधारणेनें, म्हणजे पिचकारीनें योनींत रेत घालून होत आहेत.

बिनशेंपटाच्या वानरांच्या चार प्रसिद्ध जातींपैकीं ओरँग–ओटँग ही जात पिंवळ्या म्हणजे मंगोलिअन् लोकांस जास्त जवळ आहे, गोरिला ही जात काळ्या म्हणजे शिद्दी लोकांस, व चिंपँझी ही गोर म्हणजे आर्य लोकांस जास्त जवळ आहे. चौथी जात गिवन ही यूरोपांतील आंखूड डोक्याचे लोकांस अधिक जवळ आहे. हें लक्षांत घेऊन त्या धोरणावर प्रयोग चालू आहेत. **किंद्या** येथील हवा या सर्व वानरांस व मनुष्यांस मानवते. तेथें हजारों एकर जागा फ्रेंच सरकारनें दिली आहे व त्याच्या व्यवस्थेकरतां २०००० फ्रँक् वार्षिक देऊन प्रयोगशाला वापरण्याची परवानगी दिली आहे.

---

**तोतरेपणा**:—बोलण्याची क्रिया मोठीशी कठिण आहे असें साधारणतः कोणाच्या मनांतही येत नाहीं; परंतु ती बरोबर होण्याकरतां पुष्कळ निरनिराळ्या स्नायूंस आपलें काम योग्य रीतीनें करावें लागतें. तें न झाल्यास तोतरेपणा किंवा उच्चाराचे इतर दोष उत्पन्न होतात. यामुळें २-३ वर्षांचे मुलांत थोडासा तोतरेपणा स्वभाविक असतो, कारण तीं बोलण्यास शिकत असतात. परंतु ज्या मज्जातंतूंचे द्वारें हे स्नायू हालतात त्यांत कांहीं दोष असल्यास तोतरेपणा कायम होतो.

## तोतरेपणा

तोतरेपणाचीं कारणें अनेक असतात. तोतऱ्या आईबापांचीं मुलें केवळ अनुकरणानें तोतरीं होतात. कधीं कधीं दुसऱ्याला वेडावून दाखवल्यामुळें स्वतःला तीच संवय लागते, कधीं भीतीमुळें किंवा एखद्या रोगामुळेंहि मुलें तोतरीं होतात. तोतरेपणाचें आणखी एक कारण म्हणजे डावखुऱ्या मुलांचा डावखुरेपणा काढून टाकण्याचा प्रयत्न. जोंपर्यंत मुलें दोन्हीं हात सारखेच वापरीत असतात तोंपर्यंत त्यांस इतरांचें उदाहरण दाखवल्यास तीं हळुहळू उजवा जास्त वापरूं लागतात. परंतु एखाद्या मुलाचा डावाच हात वापरण्याकडे कल दिसून आल्यानंतर त्याला रागें भरून किंवा धाक दाखवून उजवा वापरावयास लावण्याचा प्रयत्न केल्यास त्याचा परिणाम पुष्कळ वेळां तोतरेपणा होतो. याकरतां कधींहि जबरीनें उजवा हात वापरावयास लावूं नये.

कोणतीही गोष्ट दोन्ही हातांनीं सारखीच करण्यांत गंमत आहे असें मुलांस सांगितल्याचा कधीं कधीं इष्ट परिणाम होतो. नंतर इतर लोकांप्रमाणें उजवा हात वापरणेंच बरें असें सांगावें. जागा आकुंचित असल्यास डावखुऱ्या मनुष्यापासून इतरांस खरोखरच त्रास होतो, परंतु सौम्य उपायांनीं हें न साधल्यास मारून मुटकून साधण्याचा प्रयत्न करूं नये, कारण तोतरेपणानें कमीपणा येतो व त्याचे परिणाम जन्मभर सोसावे लागतात.

---

आपणास कोणताही सांसर्गिक किंवा आनुवंशिक रोग नाहीं असें सर्टिफिकीट वधूवरांनीं लग्नापूर्वी परस्परांस दाखवण्याची चाल फ्रान्समध्यें पडत आहे. अशी चाल सर्वत्र पडेल तर ठीक.

---

मूल उपजतांना आईच्या योनिमार्गांत परम्याचे जंतु असल्यास ते मुलाचे डोळ्यांत शिरून डोळे जाण्याचा संभव असतो, याकरतां उपजल्याबरोबर सर्व मुलांच्या डोळ्यांत औषध ( सिल्व्हर नाइट्रेट ) घालण्याचा प्रघात यूरोपांत आहे. नुकतेंच पॅरिसमध्यें एका स्त्रीचें पोट कापून मूल काढलें व त्यांत परम्याचे जंतूंचा संबंध नाही असें वाटल्यावरून डोळ्यांत औषध घातलें नाहीं. पांच दिवसांत मुलाचे

डोळे आले व त्यांत परम्याचे जंतु सांपडले. ते डाक्तराचे हातांनीं किंवा अन्य मार्गानें डोळ्यांत गेले असले पाहिजेत.

---

बल्गेरियामधील एका खेड्यांतील लोकांनीं, फार दिवस पाऊस न पडल्यामुळें, ईश्वरी कोप झाला असें समजून चार पुरुषांस बळी दिलें. कांहीं वर्षांपूर्वी यूरोपांत कांहीं लोकांनीं नरमांस खाल्याची हकीकत एका फ्रेंच पत्रानें प्रसिद्ध केली होती. धार्मिक वेडगळपणा, क्रूरता व रानटी प्रकार हिंदुस्थानातच सांपडतात असें नाहीं.

---

**गर्भधारणेसंबंधीं रानटी कल्पना.** मध्य ऑस्ट्रेलियांतील रानटी लोकांस, गर्भधारणेंत पुरुषांचा कांहीं संबंध असतो अशी कल्पनाच नसते! आग्नेय भागांतील लोकांचे मतें चंद्र मुलांचें बीज झाडांवर ठेवतो व या झाडाखालून स्त्री गेल्यास गर्भधारणा होते. मलाकामधील लोकांचे मतें त्यांचा मुख्य देव बीज आकाशांतून स्त्रियांचे अंगावर टाकतो व म्हणून गर्भ राहतो. अंदमानमधील लोकांचे मतें त्यांचा देव स्त्रियांचे शरीरांत मेलेल्या लोकांचे आत्मे घालतो...अशा प्रकारच्या हास्यास्पद समजुती आपल्यांतही कमी नाहींत.

---

## ग्रंथपरीक्षण

**‘लंघनचिकित्साशिक्षकः’ लेः—ल. ना. जोशी**; ‘मी सर्व जगांत अत्यंत हुशार, तेजस्वी व एकंदरींत सर्वगुणसंपन्न मनुष्य आहे, जगांत माझ्यासारखा कोणी नाहीं, मी करतों तें नेहमीं बरोबर असतें व मीं कधींही चूक केलेली नाहीं’ असें जर एखादा गोमाजी कापशे सांगूं लागला तर त्याला आपण वेडा किंवा निदान अहंमन्य म्हणूं. बरें, या गोष्टी स्वतःबद्दल सांगण्याऐवजीं तो आपल्या कुटुंबांतील सर्व माणसांबद्दल सांगूं लागला तर? तरीहि त्याला आपण मूर्खांत काढूं. परंतु याच गोष्टी जर तो आपल्या देशाबद्दल सांगूं लागला, तर आपण टाळ्यांचा गजर करून त्याला दे. भ. वगैरे पदव्या देतों. असें कां? (डॉ. रॉबिनसन.)

अशाच प्रकारचीं विधानें रा. जोशी यांनीं प्रस्तुत ग्रंथांत केलीं आहेत. २३ पानावर ‘प्राग्द्रवं पुरुषोऽश्नीयान्मध्ये च कठिनाशनः। अन्ते पुनर्द्रवाशी तु बलारोग्यैर्न मुंचति॥ असा विष्णुपुराणांतील उतारा देऊन त्यावर लेखक म्हणतातः—

अंक ६२

१०५८८

## ग्रंथपरीक्षण

' ही भोजनपद्धति अत्यंत संस्कृत असून ती फक्त आर्यजनांतच आहे. इतरत्र अन्य पद्धति आहेत. पाश्चात्य कोणतीही भोजनपद्धति दोषार्ह आहे '! ९१ पानावर ते म्हणतातः ' सांगण्याचें तात्पर्य म्हणून इतकेंच कीं, पूर्वीं आचार्यांनीं जे अबाधित सिद्धांत ठरविले आहेत, तेच खरे आहेत. '

आधुनिक शास्त्रीय ज्ञानाशीं विसंगत विधानें सर्व ग्रंथभर पसरलीं आहेत, त्यापैकीं कांहीं:—पान १३:—' आमचा स्नायुसमूह पुढें येणाऱ्या भावी आपत्तिसंबधानें स्वभावतःच आम्हांला रोगोत्पत्तीची सूचना देतो. ' ( गर्मी, कॅन्सर, क्षयरोग, अंगांत भिनेपर्यंत रोग्यास बिलकूल दाद नसते. सं. ). पान १४:—' शरीरांतील चुला म्हणजे जठराग्नि घाणेऱ्या वस्तूंस जाळून टाकण्यास सदासर्वदा प्रदीप्त झालेला असतो. ( हा जठराग्नि अजब आहे ! सं. ) पान १५:—' दूषित हवा बाहेर टाकण्याचें काम मुख्यत्वेंकरून आमची त्वचा करीत असते. ' ! पान २७:—' सर्व रोगांचें बीज अजीर्णांत असतें. ' ( ह्या पायावर सर्व ग्रंथाची उभारणी आहे, परंतु हेंच खोटें आहे. सं. ) पान २८:— ' कारण कोणचाही प्राणी, उपास पडल्यानें मरत नसून अजीर्णानें मरतो, असा परमेश्वरी, स्वाभाविक नियम आहे. ' ( तरी मुलांस वक्तशीर दूध पाजावें असें तेच सांगतात, तें कशा करतां ? मुळींच पाजलें नाहीं म्हणजे अजीर्णाची भीतीच राहणार नाहीं ! सं. ) पान ३०:—' सर्व व्याधींचा उदय आंतड्यांत होतो. ' ( हें साफ खोटें आहे. उदाहरणार्थ खरूज; ही एका विशिष्ट प्राण्यानें त्वचेंत घर केल्यामुळें होते व त्यांत आंतड्याचा बिलकूल संबंध नसतो. सं. ). पान ३९:—'औषधांनीं रोगांचा समूळ उच्छेद होणें अशक्य आहे. जी गोष्ट मानवी कृतीनें निर्माण झालेली नाहीं तिला मानवी कृतीनें म्हणजे कृत्रिमपणाने बरी करतां येणें शक्यच नाहीं.'(अधिक खाण्यानें अजीर्ण होतें व अजीर्णाने सर्व रोग होतात असें तेच म्हणतात. अधिक खाणें ही मानवी कृति नव्हे काय ? सं.) पान४०:—'औषधांत लाभदायक अंश जितका कमी असतो, त्यापेक्षां हानिकारक अंश जास्त असतो. ' ( याचा कांहीं अर्थ होत असेल तर त्याला पुरावा काय ? सं. ). पान ४७: 'मनुष्याला वाटेल त्या तऱ्हेचा कां रोग होईना, त्याला कोणत्याही प्रकारच्या औषधाची जरूर नाहीं. कारण त्यापासून रोग बरा होत नाहीं ! पान ५४: ' वास्तविक रोग एकच असतो, आणि

आम्ही जे अनेक रोग आहेत असें मानतों, तें...' पान ५९:–' सर्वांत पहिली गोष्ट ही आहे कीं, औषधी या विषमय आहेत [औषधींची ज्यांस बिलकूल नाहीं, तेच अशीं निरर्थक विधानें करीत असतात. औषधी कशास म्हणायचें ? लंघनांत लिंबाचा रस, आल्याची कोशिंबीर खावयास हेच ग्रंथकार सांगतात. हीं औषधें नव्हेत काय ? सं.) पान ५९:–'यामुळें खनिज व दुसरे जड पदार्थ आमच्या देहांत उतरल्याबरोबर त्यांचें विष बनतें.' (!) पान ६३: यूरोप, जर्मनी, अमेरिका वगैरे देशांतून पौष्टिक औषधांचें मुख्य, सारभूत द्रव्य स्पिरिट किंवा अल्कोहोल हें जसें असतें;...' ( खोटें. सं. ). पान ७३ :'काय चमत्कार आहे पहा कीं, काम करणारीं आम्ही माणसें मधें मधें विश्रांतीसाठीं सुट्या घेतों,...तद्वत् आपल्या पोटाला मात्र आपण कधीं सुट्टी देत नाहीं.' (हें खरें नाहीं. शरीराच्या प्रत्येक भागाला आपोआप सुट्टी मिळत असते. हृदय व फुप्फुसें एकसारखीं काम करतात असें आपणास वाटतें मात्र, परंतु त्यांतही प्रत्येक स्नायूला एकसारखें काम नसतें. पोटास तर पुष्कळच सुट्टी मिळते. निरनिराळ्या प्रकारचें अन्न पचवण्याचें काम अन्ननलिकेच्या निरनिराळ्या भागांत होतें व कोणत्याही एका भागास एकसारखें काम पडत नाहीं. शिवाय दररोज ८-१० तासपर्यंत बहुतेक लोक कांहीं खात नाहींत, ही पुष्कळच लांब सुट्टी होते. अधाशीपणा न केल्यास दररोज इतकी सुट्टी बस होते. नियमितपणें खाणारास लंघनाचें कारण नसतें. सं.)

पान ७४ वर ' धर्मग्रंथ व उपवास ' या सदराखालीं सांगितलें आहे कीं सर्व धर्मांत लंघनाची आज्ञा आहे तेव्हां तें चांगलें असलेंच पाहिजे. धर्मांत सांगितलेल्या गोष्टी शास्त्रीय दृष्टीनें चांगल्या असतात असें नाहीं. जी गाय मनुष्याची विष्टा खाते, तिची विष्ठा व मूत्र पवित्र समजून शुचिर्भूत ब्राह्मण तें खाऊन पवित्र होतात ! यानें कदाचित पुण्य लागत असेल, परंतु हें किळसवाणें आहे. **कॅथरीन मेयो** सारख्या लेखकांनीं याचा फायदा घेऊन ' हिंदूंच्या अत्युच्च जातीचे लोक सुद्धां गलिच्छ असतात ' असें कां लिहूं नये ? धर्मांतील उपोषणें प्रकृतीच्या दृष्टीनें सांगितलेलीं नसतात. शरीराचे जितके हाल करावे तितकें पुण्य लागतें या कल्पनेवर धर्माज्ञा बसवलेल्या असतात. याच कल्पनेनें ख्रिस्ती साधू चाबकाचे फटके मारून घेतात. त्यानेंही रोग बरे होतात

काय ? हिंदु धर्माची मोठी शिताफी ७५ पानावर सांगितली आहेः ' हिंदुस्थानांत आर्यधर्मीय स्त्रीपुरुषांत बायकांना अधिक व्रतें करण्यास धर्मग्रंथांनीं अनुज्ञा दिलेल्या आहेत. याचें कारण असें आहे कीं आमच्या स्त्रियांना पुरुषांच्या इतके श्रम व व्यायाम होत नाहींत आणि त्यांना खुल्या हवेंत हिंडायलाही फारसें सांपडत नाहीं. त्यामुळें त्यांना अपचन व बद्धकोष्ठाची व्यथा होण्याचा संभव फार असतो. यास्तव त्यांना जास्त उपवास आणि व्रतवैकल्यें करण्यास सांगितलें आहे. ' वाहवा ! खुल्या हवेची उणीव उपोषणानें भरून काढायची ! हिंदुधर्माची तारीफ करावी तितकी थोडी आहे !

पान ७९:–'श्रमाचीं कामें करणारे हमाल सुद्धां आठ आठ दिवस नुसत्या पाण्यावर राहून आपलीं कामें चोखपणानें करीत असलेले सध्या दृष्टीस पडतात.' ( पुराव्याशिवाय खरें वाटत नाहीं. सं. ). पान ८३:–'रोगी जेव्हां आहार सोडतो तेव्हां आहाराचें पाचन करणारी शक्ति रोग्याच्या रोगाचें शमन करण्यांत गुंतते व रोगी त्वरित मुक्त होतो.' ( वाफेच्या यंत्रांत कोळसा घेतल्यानें यंत्राची शक्ती तो जाळण्यांत खर्च होईल, तेव्हां तो न घालणें बरें ! सं. ) पान ८७:' जोंपर्यंत देहांत रोगाचें वास्तव्य असतें तोंपर्यंत देह निराहार स्थितींत राहूं शकतो' ( मग रोग बरा करण्याच्या भानगडींत पडा कशाला ? सं. ) पान १४५ :-'बऱ्याच डॉक्टरांचें असें म्हणणें आहे कीं भोजनसमयीं अन्नाव्यतिरिक्त जलपान मुळींच करूं नये. पण ही गोष्ट बरोबर नाहीं. साधारणतः सर्व लोकांनीं अन्नग्रहणासमवेत मध्यें मध्यें यथेष्ट जलपान करणें अवश्य आहे. आमच्या वैद्यशास्त्रांत पाण्याला 'अमृत' असें नांव दिलें असून त्यापासून कोणच्याही स्थितींत कोणच्याच प्रकारची हानि होत नाहीं. ' त्यासंबंधीं बराच मतभेद आहे, परंतु कोणत्याही प्रकारच्या अतिरेकानें नुकसानच होणार. जेवणाचेवेळीं अगदीं थोडें पाणी प्यावें व नंतर १ तासानें भरपूर प्यावें असें आधुनिक मत आहे व त्याला शास्त्रीय आधार आहे. निदान अर्धवट चावलेलें अन्न गिळण्यास पाण्याची मदत होतां कामा नये. सं. ) पान १४६–४८: ग्रंथकाराचें रेतासंबंधीं काय मत आहे याचा पत्ता लागत नाहीं. रेत किंवा शुक्र हा खाण्याचा पदार्थ आहे व त्यानें अजीर्ण बरें होतें असें हे म्हण-

तात, तें दाणेदार व स्वच्छ असावें, नसल्यास उकळत्या पाण्यांत बुडवल्यानें स्वच्छ होतें असें सांगतात:--' हजारों रोग्यांत एकही रोगी असा निघाला नाहीं कीं त्याला रेतव्यवहारानें हानि पोंचली आहे...साधारणतः प्रतिदिवशीं एकेंच तीन चमचे रेतस्फालन होऊं शकतें...उपवास न करणाऱ्यांनीही जडांश वाटला तर त्यांनीही रेतस्फालन करून अजीर्णांश नष्ट करावा. अजीर्ण नाहींसें करण्याचा दुसरा सोपा व साधा उपाय नाहीं. ' याचा अर्थ ग्रंथकारासच माहीत !

पान २३९:–' मांसाहारी लोक बहुधा उग्र, हिंसक, क्रूर आणि अत्याचारी असून, त्यांपासून इतर जीवांना त्रास सहन करावा लागतो...स्मार्त आणि शाक्त, हिंदु आणि यवन व ससाणा आणि पोपट अशीं उदाहरणें कितीतरी देतां येतील ! ( तीं-ही खोटीं ! हिंदूंपैकीं कांहीं प्रांतांतील ब्राह्मण तेवढेच शाकाहारी असतात. पोपट पिंजऱ्यांत ठेवल्यास शाकाहारी ठेवतां येतो, परंतु स्वभावतः नसतो. शाकाहारी गाय मारकुटी असूं शकते व पुष्कळ मांसाहारी कुत्रे अत्यंत गरीब असतात. हेच ग्रंथकार पुढच्याच पानावर मांसरसाची अत्यंत स्तुति करतात ! सं. ) पान २४३:–'एकंदर जगताचें बारकाईनें जर निरीक्षण केलें तर असेंच सिद्ध होईल कीं कोणचाही प्राणी स्वाभाविकपणें जन्मतःच मांसाहारी नसतो, पण दुग्धाहारी मात्र असतो. अस्सल मांसाहारी हिंस्र वाघिणीचीं पिलेंहि प्रथम दुग्धपानच करीत नाहींत का ? ' ( तर मग जन्मभर दूधच प्यावें, निदान शाकाहार करतां कामा नये. सं ) पान २४५:–' मांस-पचनाला आवश्यक असे जे आसवादि मादक पदार्थ... ( हे गृहस्थ स्वतः मांसाहारी नाहींत इतकेंच या अज्ञानावरून सिद्ध होतें. मांस पचण्याला कठिण नसतें व त्यास मादक पादार्थांचीहि जरूर नसते. सं. ). पान २४९:– ' पशु, पक्षी आहाराबाहेर व हवें तें कधींच खात नाहींत हें जसें प्रसिद्ध आहे तसेंच त्यांचें संगमसुखही फारच मर्यादित असतें, हें सर्वत्र प्रसिद्धच आहे.' ( हीं दोन्ही विधानें प्रसिद्ध अस-तील परंतु खोटीं आहेत. शिवाय सर्व प्राण्यांची राहणी सारखीच असली पाहिजे काय ? सं. ). पान २५५:–' जेथें स्वच्छ हवा फिरत असेल तेथें मच्छरें राहणें शक्यच नाहीं; कारण त्यांना अस्वच्छ हवेचीच आवश्यकता असते.' ( मच्छर स्वच्छ हवेनें मरत नाहीं व अस्वच्छ हवेची कोणत्याही प्राण्याला आवश्यकता नसते. सं.)

वरील उताऱ्यांवरून अशी कल्पना होते कीं या लेखकानें निदान ५० वर्षें झोंप घेतली असावी. रोगजंतु सुद्धां अजीर्णापासूनच उत्पन्न होतात अशी ज्यांची कल्पना, त्यांनीं लंघनानें सर्व रोग बरे होतात असें म्हटल्यास त्याचीही किंमत तितकीच ! एखादी वस्तू हरवली तर ती सांपडण्याकरतां तिच्या महत्त्वाच्या मानानें हे ३ पासून ७ दिवस लंघन सांगतीलसें वाटतें. महात्मा गांधींचे मतें हिंदुमुसलमानांचे दंगे बंद होणें किंवा इतर कोणतीही इष्ट गोष्ट लंघनानें होते, याचाही उल्लेख या ग्रंथांत जरूर पाहिजे होता, तो पुढचे आवृत्तींत येईल अशी आशा आहे. या लेखकाला लंघनचिकित्सेचें वेड लागलेलें दिसतें,तें बरें होईपर्यंत त्यांनीं स्वतः लंघन करावें अशी आमची सूचना आहे.मनुष्यानें अन्न किती खावें याचा हिशोब रोजच्या कामावरून अचूक करतां येतो.जास्त काम करणारांस जास्त अन्न खावें लागतें. धार्मिक उपोषणें विवक्षित वार, तिथि वगैरेवर अवलंबून असल्यामुळें ज्या दिवशीं जास्त कामामुळें जास्त अन्नाची जरूर असेल त्याच दिवशी धार्मिक उपोषण असूं शकेल, परंतु तें प्रकृतीस मात्र हितकर होणार नाहीं. ज्यांस भरपूर काम करावें लागतें त्यांनीं अन्नही भरपूर खाल्लें पाहिजे, हें डोकें वापरणारास सहज कळण्यासारखें आहे. घरकाम करणाऱ्या स्त्रियांस पुरुषांइतका व्यायाम होत नाहीं हें खोटें आहे. त्यांसही भरपूर अन्नाची जरूर असते. सारांश ‘ तातस्य कूपोऽयं’ म्हणून खारें पाणी पिण्याची ज्यांची तयारी असेल; ज्ञान काय तें संस्कृत श्लोकांत भरलें आहे, त्याव्यतिरिक्त ज्ञानच शक्य नाहीं अशी ज्यांची कल्पना असेल; ज्ञान म्हणजे एकच असतें, त्यांत पौर्वात्य, पौश्चिमात्य असा भेद नसतो, हेंही ज्यांस कळत नसेल; त्यांस हें पुस्तक वाचून कदाचित् बरें वाटेल; इतरांस तो वेळेचा अपव्यय होईल.

---

**स्तुतीस कीं ईश्वर पात्र होतो** ( फ्रेंचवरून). हे परमेश्वरा, तूं सर्वशक्तिमान्, सर्वसाक्षी सर्वव्यापी, असून अत्यंत दयाळू आहेस. तूं अगाध आहेस तरीसुद्धां मनुष्यानें तुला ओळखावें अशी तुझी इच्छा आहे. वीज, तुफान, ज्वालामुखी पर्वत, धरणीकंप, जलप्रलय हीं सर्व तुझ्या कृपेचींच फळें आहेत. प्राण्यांची वाढ बेसुमार होऊन त्यांस खावयास मिळूं नये ही तुझीच व्यवस्था आहे. दुष्काळ, दारिद्र्य, जीवनकलह, लढाया, खून वगैरे तुझ्याचमुळें होतात, कारण तुझ्या आज्ञेशिवाय

पान हालत नाहीं. पटकी, प्लेग वगैरे सांथी तूंच आमच्या कल्याणाकरतां पाठवतोस; क्षय, रक्तपिती वगैरे तूंच उत्पन्न केलींस. मनुष्यास कामवासना देऊन ती पूर्ण करण्याचा त्यानें प्रयत्न केल्यास परमा, गर्मी वगैरे रोग व्हावे, ही तुझीच युक्ति. बापाच्या कृत्यांबद्दल मुलांस शिक्षा तुझ्याशिवाय कोण करील ? लहान बालकांचे परम्यानें डोळे जावे, किंवा त्यांस आईबापांपासून गर्मी व्हावी, ही तुझीच कल्पकता, कारण इतका दयाळू दुसरा कोण आहे ? कांहीं बालकें जन्मांध, कांहीं बहिरीं, मुकीं असावीं ही तुझीच कृति. दृष्टीस दिसत नाहींत अशा रोगजंतूंकडून मोठ्या प्राण्यांचे हाल व नाश तूंच करतोस. तूं सर्वशक्तिमान असल्यामुळें या सर्व गोष्टी तुला बदलतां आल्या असत्या, परंतु तशी तुझी लहर लागली नाहीं व तुला याच गोष्टी बऱ्या वाटल्या. ही तुझी लीला अगाध आहे व तुझे आमच्यावर अनंत उपकार आहेत !

---

प्राचीन ग्रीक व रोमन लोकांचे वेळीं रस्त्यांत व रंगभूमीवर नग्नतेस कोणत्याही प्रकारचा बाध नसे व नंतर ख्रिस्ती लोकांनीं जरी शरीराला अपवित्र ठरवलें, तरी पडलेल्या रीतीमुळें १५०० वर्षें पर्यंत ख्रिस्ती धार्मिक नाटकांतही नग्न पात्रें दिसत असत. ख्रिस्ताला सुळावर देण्याकरतां नेतांना त्याचे अंगावरील सर्व वस्त्रें काढून घेतलीं असें रंगभूमीवर प्रत्यक्ष दाखवीत असत. हा प्रकार १५४८ मधें फ्रेंच कायद्यानें बंद केला.

---

लोकांनीं आपलें कौतुक करावें अशी लहानापासून थोरापर्यंत सर्वांची इच्छा असते, परंतु ती वयपरत्वें निरनिराळ्या स्वरूपांत दिसते. लहान मुलांस यामुळें नागवें हिंडावेंसें वाटतें व या नैसर्गिक इच्छेस कोणीं अडथळा केल्यास अत्यंत अनिष्ट परिणाम होतो. मुलींचे बाबतींत हा परिणाम भडक पोषाख करून लोकांचें लक्ष वेधण्यापलीकडे फारसा जात नाहीं. परंतु पुरुषांपैकीं मात्र कित्येकांस आपलें नग्न शरीर दुसऱ्यास दाखवल्याशिवाय राहवत नाहीं. असे पुरुष मुलींच्या शाळा सुटण्याचे सुमारास त्यांचे दृष्टीस आपलें जननेंद्रिय पडेल अशा रीतीनें उभे राहतात व अशा वागणुकीबद्दल पोलिसानें पकडून त्यांची कितीही फजीति झाली तरी त्यांची संवय

जात नाहीं. परंतु त्यांची इतर वागणूक वाईट नसते. याकरतां मुलांस जवरीने कपडे घालण्यास न लावलेलें बरें. त्यांत कोणाचेंही नुकसान नाहीं.

---

भ्रुणहत्येसंबंधीं बहुतेक सर्व देशांत सारखेच कायदे आहेत, व स्त्रीचा जीव वांचवण्याकरतां गर्भपात करण्याची डाक्टरांस परवानगी असते. रशियांत व स्वित्झर्लंड्मधें पहिल्या तीन महिन्यांत गर्भपात गुन्हा नाहीं. जिवास धोका आहे कीं काय हें दाक्तरांस ठरवावें लागतें. अशा वेळीं धार्मिक कल्पनांमुळें किंवा अज्ञानामुळें दाक्तरानें योग्य वेळीं गर्भपात न केल्यामुळें गर्भिणी मेल्यांचीं उदाहरणें आमचे पाहण्यांत आहेत.

---

परम्याचीं सर्व चिन्हें नाहींशीं झाल्यावरही त्याचे जंतु कधीं कधीं रेतांत सांपडतात, तेव्हां रोग्याचें रेत घेऊन त्यांत रोगजंतु असल्यास त्यांस वाढीस लावण्याचे प्रयत्न करूनही जर जंतु सांपडले नाहींत तरच तो बरा झाला असें समजावें, असें बुखारेस्ट् येथील एक फ्रेंच दाक्तर १६०० लोकांच्या रेतपरीक्षेवरून म्हणतात.

---

मँचेस्टर येथील मजुरांचे दाट वस्तीचे भागांत १००० पैकीं ७११ स्त्रियांस बाळंत होतांना सुद्धां एकांत मिळत नाहीं. तरीही लोकसंख्या कमीच आहे असें म्हणणारे लोक आहेत !

---

**वेश्या कोठें असाव्या ?** ‘ वेश्यांची जरूरी आहे, परंतु त्यांस मध्यवस्तींत राहूं न देतां लांब कोठें तरी जागा नेमून द्यावी,’ असें मत पुण्याचे हेल्थ ऑफिसर कर्नेल खंबाटा यांनीं कांहीं दिवसांपूर्वी प्रसिद्ध केलें होतें. यांतील शेवटचा भाग आम्हांस पसंत नाहीं. वेश्यांची जरूरी आहे, याचा अर्थच असा होतो कीं वेश्यांच्या गिन्हाइकांची सोय न झाल्यास अनिष्ट परिणाम होतील. वेश्यांस लांब नेऊन टाकल्यानें गिन्हाइकांची सोय होत नाहीं, तेव्हां गिन्हाइक जसें सर्व शहरभर पसरलेलें असतें तसेंच त्यांसही पसरूं दिलें तरच वेश्यांचा खरा उपयोग होईल.

---

# समाजस्वास्थ्य

## बळजबरीचे खटले

विवाहबाह्य समागमानें स्त्रीची बेअब्रु होते या सार्वत्रिक समजुतीमुळें, कोणतीही स्त्री बळजबरीची खोटीच फिर्याद कोर्टांत आणील हें संभवनीय दिसत नाहीं, व अब्रूदार स्त्रिया खरी बळजबरीसुद्धां लपवण्याचाच प्रयत्न करतात हें खरें. तथापि बळजबरीच्या बऱ्याच फिर्यादी खोट्या असतात असा अनुभव आहे. यास अनेक कारणें असूं शकतात. एखाद्या पुरुषाशीं असलेला बेकायदा संबंध बाहेर पडतो असें पाहिल्याबरोबर स्त्रिया शक्य असल्यास त्याच्यावर बलात्काराचा आरोप करून मोकळ्या होतात. परंतु यापेक्षांही, बलात्काराच्यां प्रयत्नाचा आरोप, किंवा अमुक मनुष्य माझ्यावर डोळा ठेवतो इतकाच आरोप केला म्हणजे अब्रूही वांचते !

१९२६ सालीं केनिया कॉलनीचें मुख्य शहर नैरोबी येथें आम्ही असतां तेथें बलात्काराचा एक चमत्कारिक खटला झाला. त्यांत एका ६० वर्षांच्या इंग्रज बाईनें एका शिद्दयावर बलात्काराची फिर्याद केली होती. रात्रीं ती निजली असतां खोलींत शिरून अंधारांत त्यानें हें कृत्य केलें अशी तिची हकीकत. तिनें जागें होऊन दिवा लावण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यानें तिला दाबून धरल्यामुळें तो सफल झाला नाहीं, तरी तिनें कांड्यांचे पेटीनें त्याचा हात ओरखडला, ही त्याला ओळखून काढण्यास एक खूण होती. शिवाय त्याचे अंगास घाण ( आफ्रिकेंतील कांहीं जातींचे गलिच्छतेमुळें त्यांचे अंगास घाण येते ) येत नव्हती व त्याचे हात मऊ होते असें ती म्हणाली. ओरखड्याचे खुणेवरून पोलीसानें एका शिद्दयास पकडला व नेहमींप्रमाणें त्याला इतर कांहीं लोकां-बरोबर उभा करून, तिचे डोळे बांधून, मऊ हातांवरून तिला ओळखण्यास सांगितलें. तिनें सर्वांचे हात चांचपून ' हाच तो ' असें दोन तीन माणसांबद्दल म्हणाली. म्हणजे तो मनुष्य तिला ओळखला नाहीं. शिवाय तिनें तावडतोब स्नान करून कपडे धुवून टाकले असें सांगितल्यामुळें बलत्काराबद्दल इतर पुरावा मिळणें शक्य नव्हतें व तिच्या शब्दाशिवाय पुरावा नव्हता, यामुळें ' बलात्कार झाला असेल, परंतु या मनुष्यावर आरोप शाबीत झाला नाहीं' असा निकाल असेसरांनीं दिला. तरी सुद्धां जज्जानें आरोपीस शक्य तितकी म्हणजे १४ वर्षे सक्त मजुरीची शिक्षा दिली.

क्वचित् प्रसंगीं कांहीं संबंध नसतांहि स्त्रिया अशा प्रकारचे आरोप करतात. याविषयीं डॉ. रॉबिनसन् यांनीं एक गोष्ट दिली आहे. एकदां एका अविवाहीत मुलीनें एका सद्गृहस्थावर बलात्काराचा आरोप करून त्या कृत्याची तपशीलवार हकीकत कोर्टांत सांगितली. त्या गृहस्थानें तें नाकबूल केलें. परंतु तें खरें असल्याशिवाय इतक्या बारीकसारीक गोष्टी अविवाहित मुलीला कशा माहीत होतील, असें सर्वांस वाटलें. परंतु डाक्तरनें तिला तपासतां ती कुमारीच होती असें ठरलें तेव्हां तिनें ती हकीकत काल्पनिक होती असें कबूल केलें. तिनें असेंहि सांगितलें कीं तिच्या मोठ्या वहिणीचा नुकताच विवाह झाला होता व पुष्कळ स्त्रियांच्या संवयीप्रमाणें ती प्रथमरात्रीची हकीकत आपल्या एका मैत्रिणीला सांगत असतां तिनें ऐकली होती व त्यावरून तिला ही कल्पना सुचली. सर्व लोकांचें लक्ष आपणाकडे लागावें म्हणून लहान मुलें पुष्कळ वेळां खोटें बोलत असतात. सारांश बलात्काराचे खटल्यांत आरोपीनें गुन्हा केला असला पाहिजे असें मानण्याची प्रवृत्ति चुकीची आहे.

---

**वेश्यांच्या जाहिराती:**—वेश्यांनीं गिऱ्हाइक मिळवण्याकरतां कोणताही उघड प्रयत्न करतां कामा नये असा कायदा जरी बहुतेक देशांत आहे, तरी तो कोणत्याही देशांत पुरा अंमलांत येत नाहीं. हलक्या प्रतीच्या वेश्या खिडकींतून खुणा करतात; त्याहून उच्च प्रतीच्या—विशेषतः युरोपांत—वर्तमानपत्रांत जवळजवळ उघड जाहिराती देतात. पॅरिस येथील कांहीं पत्रांत पुढील मासल्याच्या जाहिराती सांपडतात. ( १ ) **भाड्यानें देणें आहे**, उत्तम शृंगारलेल्या खोल्या. येथें गोंडस पुतळ्या माफक दरानें पहावयास मिळतील. दुपारीं दोनपासून दहा वाजेपर्यंत. ( २ ) **शिक्षण**, एक सुंदर तरुणी चालीरीतींचें शिक्षण देण्यास तयार आहे. वेळ सकाळीं ८ पासून रात्रीं १२. प्रत्येक धड्याची फी, २०. फ्रँक. ( ३ ) **सुंदर चित्रांचें प्रदर्शन**, ××बाई यांचे बंगल्यांत. वेळ सकाळीं १० पासून पहाटे ४. दर माफक. ( ४ ) **नावीन्य**. ज्यांस पाहिजे असेल त्यांनीं ××बाई यांची जरूर भेट घ्यावी. सौंदर्याचा मोठा संग्रह. दररोज सकाळीं ९ पासून सायंकाळीं ७॥. ( ५ ) एका १९ वर्षांच्या सुंदर, बांधेसूद, निमगोऱ्या, सुशिक्षित तरुणीवर वाईट प्रसंग आल्यामुळें

## समाजस्वास्थ्य

# बळजबरीचे खटले

विवाहबाह्य समागमानें स्त्रीची बेअब्रु होते या सार्वत्रिक समजुतीमुळें, कोणतीही स्त्री बळजबरीची खोटीच फिर्याद कोर्टात आणील हें संभवनीय दिसत नाहीं, व अब्रूदार स्त्रिया खरी बळजबरीसुद्धां लपवण्याचाच प्रयत्न करतात हें खरें. तथापि बळजबरीच्या बऱ्याच फिर्यादी खोट्या असतात असा अनुभव आहे. यास अनेक कारणें असूं शकतात. एखाद्या पुरुषाशीं असलेला बेकायदा संबंध बाहेर पडतो असें पाहिल्याबरोबर स्त्रिया शक्य असल्यास त्याच्यावर बलात्काराचा आरोप करून मोकळ्या होतात. परंतु यापेक्षांही, बलात्काराच्या प्रयत्नाचा आरोप, किंवा अमुक मनुष्य माझ्यावर डोळा ठेवतो इतकाच आरोप केला म्हणजे अब्रूही वांचते !

१९२६ सालीं केनिया कॉलनीचें मुख्य शहर नैरोबी येथें आम्ही असतां तेथें बलात्काराचा एक चमत्कारिक खटला झाला. त्यांत एका ६० वर्षांच्या इंग्रज बाईनें एका शिद्दयावर बलात्काराची फिर्याद केली होती. रात्रीं ती निजली असतां खोलींत शिरून अंधारांत त्यानें हें कृत्य केलें अशी तिची हकीकत. तिनें जागें होऊन दिवा लावण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यानें तिला दाबून धरल्यामुळें तो सफल झाला नाहीं, तरी तिनें कांड्यांचे पेटीनें त्याचा हात ओरखडला, ही त्याला ओळखून काढण्यास एक खूण होती. शिवाय त्याचे अंगास घाण ( आफ्रिकेंतील कांहीं जातींचे गलिच्छतेमुळें त्यांचे अंगास घाण येते ) येत नव्हती व त्याचे हात मऊ होते असें ती म्हणाली. ओरखड्याचे खुणेवरून पोलीसानें एका शिद्दयास पकडला व नेहमींप्रमाणें त्याला इतर कांहीं लोकां-बरोबर उभा करून, तिचे डोळे बांधून, मऊ हातांवरून तिला ओळखण्यास सांगितलें. तिनें सर्वांचे हात चाचपून ' हाच तो ' असें दोन तीन माणसांबद्दल म्हणाली. म्हणजे तो मनुष्य तिला ओळखला नाहीं. शिवाय तिनें तावडतोब स्नान करून कपडे धुवून टाकले असें सांगितल्यामुळें बलत्काराबद्दल इतर पुरावा मिळणें शक्य नव्हतें व तिच्या शब्दाशिवाय पुरावा नव्हता, यामुळें ' बलात्कार झाला असेल, परंतु या मनुष्यावर आरोप शाबीत झाला नाहीं' असा निकाल असेसरांनीं दिला. तरी सुद्धां जजानें आरोपीस शक्य तितकी म्हणजे १४ वर्षे सक्त मजुरीची शिक्षा दिली.

क्वचित् प्रसंगीं कांहीं संबंध नसतांहि स्त्रिया अशा प्रकारचे आरोप करतात. याविषयीं डॉ. रॉबिनसन् यांनीं एक गोष्ट दिली आहे. एकदां एका अविवाहीत मुलीनें एका सद्‌गृहस्थावर बलात्काराचा आरोप करून त्या कृत्याची तपशीलवार हकीकत कोर्टांत सांगितली. त्या गृहस्थानें तें नाकबूल केलें. परंतु तें खरें असल्या-शिवाय इतक्या बारीकसारीक गोष्टी अविवाहित मुलीला कशा माहीत होतील, असें सर्वांस वाटलें. परंतु डाक्तरनें तिला तपासतां ती कुमारीच होती असें ठरलें तेव्हां तिनें ती हकीकत काल्पनिक होती असें कबूल केलें. तिनें असेंहि सांगितलें कीं तिच्या मोठ्या बहिणीचा नुकताच विवाह झाला होता व पुष्कळ स्त्रियांच्या संवयी-प्रमाणें ती प्रथमरात्रीची हकीकत आपल्या एका मैत्रिणीला सांगत असतां तिनें ऐकली होती व त्यावरून तिला ही कल्पना सुचली. सर्व लोकांचें लक्ष आपणाकडे लागावें म्हणून लहान मुलें पुष्कळ वेळां खोटें बोलत असतात. सारांश बलात्काराचे खटल्यांत आरोपीनें गुन्हा केला असला पाहिजे असें मानण्याची प्रवृत्ति चुकीची आहे.

---

**वेश्यांच्या जाहिराती:**—वेश्यांनीं गिऱ्हाइक मिळवण्याकरतां कोणताही उघड प्रयत्न करतां कामा नये असा कायदा जरी बहुतेक देशांत आहे, तरी तो कोणत्याही देशांत पुरा अंमलांत येत नाहीं. हलक्या प्रतीच्या वेश्या खिडकींतून खुणा करतात; त्याहून उच्च प्रतीच्या—विशेषतः युरोपांत—वर्तमानपत्रांत जवळजवळ उघड जाहिराती देतात. पॅरिस येथील कांहीं पत्रांत पुढील मासल्याच्या जाहिराती सांपडतात. ( १ ) **भाड्यानें देणें आहे**, उत्तम शृंगारलेल्या खोल्या. येथें गोंडस पुतळ्या माफक दरानें पहावयास मिळतील. दुपारीं दोनपासून दहा वाजेपर्यंत. ( २ ) **शिक्षण**, एक सुंदर तरुणी चालीरीतींचें शिक्षण देण्यास तयार आहे. वेळ सकाळी ९ पासून रात्रीं १२. प्रत्येक धड्याची फी, २०. फ्रँक. ( ३ ) **सुंदर चित्रांचें प्रदर्शन**, ××बाई यांचे बंगल्यांत. वेळ सकाळीं १० पासून पहाटे ४. दर माफक. ( ४ ) **नावीन्य**. ज्यांस पाहिजे असेल त्यांनीं ××बाई यांची जरूर भेट घ्यावी. सौंदर्याचा मोठा संग्रह. दररोज सकाळीं ९ पासून सायंकाळीं ७॥. ( ५ ) एका २९ वर्षांच्या सुंदर, बांधेसूद, निमगोऱ्या, सुशिक्षित तरुणीवर वाईट प्रसंग आल्यामुळें

स्वतःचें पोट भरण्याची वळ आली आहे, व ती पैशाची मदत करणाऱ्या सुखवस्तु सभ्य गृहस्थाशीं पत्रव्यवहार करण्यास तयार आहे. ही जाहिरात अक्षरशः खरी आहे, तेव्हां भलत्याच लोकांनीं पत्रें लिहूं नयें. मध्यस्थांची जरूर नाहीं. ( ६ ) एका दुःखी विधवेस हजार रुपयांची जरूर आहे, कृतज्ञ होईल. ( ७ ) तावडतोब रु. ५०० देणाऱ्या, पन्नाशी उलटलेल्या गृहस्थांशीं मैत्री करण्याची इच्छा आहे. मी सुशिक्षित असून पुष्कळ लोक मला सुंदर समजतात. ( ८ ) मी टायपिस्टचें काम करून पोट भरतें, परंतु एकटें राहण्याचा कंटाळा आला आहे....इत्यादि. वेश्यांस उघडपणें धंदा करूं न दिल्यास त्यांस अशा पुष्कळ युक्त्या करतां येण्यासारख्या आहेत.

---

**धुपणी**. विवाहित व अविवाहित स्त्रियांच्या किंवा मुलींच्याहि योनिमार्गांतून कधींकधीं पांढरा द्रव बाहेर येत असतो. या रोगास धुपणी म्हणतात. हा प्रवाह दुधासारखा स्वच्छ पांढरा असल्यास त्यापासून फारसा धोका नाहीं, परंतु तो पिंवळसर किंवा हिरवा असल्यास मात्र तावडतोब उपाय केला पाहिजे. याचा संबंध कधीं एकंदर प्रकृतीशीं असतो व कधीं जननेंद्रियाच्या अस्वच्छतेशीं असतो. शरिरास जेथें जेथें छिद्र असतें तेथें रोग जंतु शिरण्यास वाव मिळतो, म्हणून अशीं सर्व छिद्रें स्वच्छ ठेवण्याची विशेष काळजी घ्यावी लागते. परंतु नाक, कान, डोळे यांप्रमाणेंच गुदद्वार व जननेंद्रिय स्वच्छ ठेवावें हे पुष्कळांस माहीत नसतें. ज्यांस धुपणीचा विकार आहे त्यांनी औषधी उपायांबरोबरच खालील सामान्य नियम पाळावे. १. शौचाचे वेळीं योनिद्वार देखील साबणानें स्वच्छ धुवावें. २. शक्य तितका वेळ मोकळ्या हवेंत काढावा व पुरेसा व्यायाम करावा. ३ जननेंद्रियाचे आसपास हवेचा संचार होईल असे कपडे घालावे. या दृष्टीनें कासोटा घालण्याची पद्धत वाईट आहे. ४. फार वेळ बसून रहावें लागेल अशीं कामें होतां होईल तों करूं नये. ५ अन्न शक्तिवर्धक असावें व नीट चावून खावें. ६. दांत तपासून घेऊन उत्तम स्थितींत ठेवावे.

# हातांची जोपासना

## हातांची जोपासना

आपणास बहुतेक सर्व कामें हातांनी करायचीं असतात व हातांचा आणि बोटांचा प्रत्येक ठिकाणीं संबंध येतो. स्पर्शज्ञान सर्व त्वचेनें होतें खरें, परंतु बोटां-इतकें सूक्ष्म रीतीनें होत नाहीं. उदाहरणार्थ कापडाचें सूत किती तलम आहे हें बोटांसच उत्तम समजेल. परंतु हें समजण्यास बोटांची त्वचा खडबडीत असतां कामा नये. शिवाय अस्वच्छ त्वचेवर रोगजंतूंची राहण्याची सोय चांगली होते यामुळें तेथें ते पुष्कळ असतात व सुई वगैरे टोंचल्यास ते रक्तांत शिरतात किंवा जेवतांना पोटांत जातात व अनेक रोग उत्पन्न करतात, यावरून स्वच्छ हातांचें महत्त्व लक्षांत येईल. शिवाय स्वच्छ हात हा सौंदर्याचा एक भाग आहे हे स्त्रियांस तरी सांगण्याचें कारण पडूं नये.

प्रत्येक जेवणाचे अगोदर व इतर केव्हांही हात खराब झाल्यास ते धुतले पाहिजेत. हातांस माती लावून धुतल्यानें ते स्वच्छ होतात ही प्राचीन समजूत सूक्ष्मदर्शक यंत्रानें खोटी ठरवली आहे. मातीनें सूक्ष्मजंतु मरत नाहींत व म्हणून हात स्वच्छ होत नाहींत. याकरतां साबण वापरणें जरूर आहे. हों साबण उत्तम वासाचा असला पाहिजे असें नाहीं, परंतु जंतुनाशक असून त्यानें त्वचेस इजा होतां कामा नये. जेथें एकच साबणाची वडी पुष्कळ माणसांस वापरावी लागते, तेथें साबणाच्या वडीऐवजीं पातळ साबणाची बाटली ठेवून त्यांतून कांहीं थेंब हातावर पडतील असें असावें, म्हणजे एकापासून दुसऱ्यास संसर्ग होणार नाहीं. अशा बाटल्या विकत मिळतात. हात धुण्यास गरम पाणी असल्यास उत्तम, व हात विशेष स्वच्छ ठेवणें असल्यास एक ब्रश घेऊन साबणानें हात घांसून काढावा व नंतर धुवून कोरडा करून ज्यांस परवडेल त्यांनीं थोडें कोलन् वॉटर चोळावें. त्वचा फार खडबडीत असल्यास एखादी चांगली ‘ क्रीम ’ लावावी.

**नखें.** रोगजंतूंच्या दृष्टीनें आपल्या शरीरांतील दोन सर्वांत गलिच्छ जागा म्हणजे तोंड व नखें होत. या दोन्ही ठिकाणीं असंख्य जंतूंची वाढ होते. नख

जितकें अधिक लांब, तितका त्यांस अधिक आसरा मिळतो व साबण न लावल्यास त्यांस चांगलेंच फावतें. घाणेरड्या नखांनीं त्वचा खाजवल्यास हे जंतु त्वचेंत जाऊन तेथें वाढतात. अंगावर गळवें वगैरे पुष्कळ वेळां घाणेरड्या नखांनीं होतात. नखें स्वच्छ असलीं तरीही त्यांचा उपयोग खाजवण्याकडे करूं नये.

कांही लोक नखें लांब वाढूं देतात व यूरोपांत कित्येक लोक लांब नखें हें श्रीमंतीचें लक्षण समजतात, कारण हातांनीं कांम करणारांस नखें लांब ठेवून चालणार नाहीं. नखें लांब असल्यास स्वच्छ ठेवणें कठीण असल्यामुळें तीं वारंवार कापून आंखूड ठेवणेंच इष्ट आहे. नखाच्या खालचा व बाजूचा मळ काढून, तीं बोटाच्या आकाराबरोबर कापून बारीक कानशीनें घांसावीं व नंतर साबण लावून धुवावीं. नखांच्या जोपासनेकरतां विशेष प्रकारचीं हत्यारें विकत मिळतात.

कपडे शिवणें वगैरे कामें करतांना हातांस विशेष जपलें पाहिजे. थंडीनें, उष्णतेनें किंवा फार वेळ ओलें राहिल्यानें त्वचेस इजा होते, याकरतां जरूर पडल्यास दिवसांतून दोन तीन वेळां किंवा निदान निजण्यापूर्वी 'क्रीम' लावावी. हात किंचित् भाजल्यास नुसता बांधून ठेवावा, जास्त भाजल्यास दाक्तराकडे जावें. फोड आल्यास तो फुटून कातडी निघून जाणार नाहीं अशी खबरदारी घ्यावी. सुई टोंचल्यास प्रथम बाजूस दाबून एक दोन थेंब रक्त येऊं द्यावें, नंतर 'टिंक्चर ऑफ् आयोडीन्' लावावें. अशा वेळीं कोळ्याचें जाळें किंवा इतर घाणेरडे पदार्थ जखमेवर लावूं नये व बांधण्याकरतां नेहमीं स्वच्छ कपडा-शक्य असल्यास विशेष प्रकारचा कापूस व कपडा विकत मिळतो तो-वापरावा. सुई नखाखालीं टोंचल्यास प्रथम सोसवेल तितक्या गरम पाण्यांत बोट शेकून नंतर वरील औषध लावावें. हात कापला असतां आपोआप रक्त आल्यामुळें रोगजंतूपासून धोका कमी होतो, परंतु तरीही वरील औषध लावावें. इस्तरीसारखें जड हत्यार वापरल्यानें हातास फोड आल्यास तो सुईनें फोडून वरील कातडें तसेंच राहूं द्यावें, व आंत नवी कातडी आल्यावर कापावें. केव्हांही सुईनें फोडण्यापूर्वी तिचें टोंक क्षणभर दिव्याचे ज्योतींत धरावें म्हणजे तीवरील जंतु मरतील. रक्ताभिसरण योग्य न झाल्यास अंग व

विशेषतः हात हिंवाळ्यांत फुटतात. याकरतां नेहमीं, किंवा निदान हिंवाळ्याचे अगोदरपासून सर्वांगाची व विशेषतः हातांची त्वचा जोरानें घांसून काढण्याची संवय ठेवावी, म्हणजे रुधिराभिसरण जोरानें होऊन अंग फुटणार नाहीं.

---

**उंदीर.** सर्व जगभर उंदीर हा प्राणी मनुष्याचा भयंकर शत्रू झालेला आहे. उंदरांमुळें दरवर्षी कोट्यवधि रुपयांचें नुकसान होतें इतकेंच नव्हे, तर त्यांमुळेंच प्लेग व इतर रोग सर्वत्र पसरतात. डेन्मार्कमध्यें यासंबंधीं कायदे आहेत व प्रत्येकास उंदरांच्या नाशाचे विशिष्ट उपाय वापरावे लागतात. एका उंदरिणीला दरवर्षी ६०० पासून ९०० पोरें होतात! दुष्काळ प्लेग वगैरेची भीति वाटल्यास उंदीर पळून जातात. हा प्राणी अतिशय हुशार असून सावधगिरीनें राहतो व त्यास मारणें कठीण असतें. परंतु स्वतःचें रक्षण करणें त्यापेक्षां सोपें असतें. याकरतां उंदरांस कोठेंही राहतां येणार नाहीं अशा रीतीनें सर्व इमारतींचें बांधकाम झालें पाहिजे. अन्न कधींही उघडें राहतां कामा नये इतकेंच नाहीं तर कचऱ्याच्या पेट्या बंद असून त्या सकाळपर्यंत तशाच राहूं देऊं नये. उंदरांस मारण्याकरतां विष वापरल्यास १५ दिवसांत तें त्यांच्या ओळखीचें होतें. सर्वांत उत्तम उपाय म्हणजे पिंजरा. परंतु त्यांतही रोज वेगवेगळे खाण्याचे पदार्थ ठेवल्यास बरें. तो दररोज दोनदां साफ करून पुनः लावून ठेवला पाहिजे. बोटीवर खलाशी लोक मांजरें बाळगतात. उंदरांस हा एक उत्तम उपाय आहे. बोटी बांधतांना उंदरांचा नेहमीं विचार करावा लागतो.

---

**स्त्रियांचें दूध.** न्यू यॉर्क येथें स्त्रियांच्या दुधाचें एक दुकान आहे. या स्त्रिया आपापल्या घरीं राहतात व त्यांची मर्जी असेल तेव्हां दुकानांत जातात. तेथें एक नर्स ठेवलेली असते, तिच्या देखत त्यांचें दूध काढतात व बाटल्यांत भरून विकतात. तें टिकण्याकरतां बर्फांत ठेवतात. सध्यां ( १९२८ ) तेथें ३२ स्त्रिया अशा रीतीनें दूध देतात. एका स्त्रीपासून एका दिवसांत ४२ औंस दूध मिळालेलें आहे. एक लिटर ( ३५ औंस ) दुधाची किंमत स्त्रीस अजमासें रु. १०। मिळते, व तें गिऱ्हा-

इकांस रु. १३॥ स विकतात, यामुळें यांत गाईचे दुधापेक्षां फायदा जास्त होतो, लहान मुलांस मानवी दूधच सर्वांत हितावह असल्यामुळें त्याला मागणी फार असते व किंमत चांगली येते. धंदा करण्यासारखा आहे.

---

## वेश्यांसंबंधीं जर्मनींतील व्यवस्था

( लिहून आलेला मजकूर )

आजपर्यंत यूरोपांतील इतर कांहीं देशांप्रमाणें जर्मनींतही वेश्यांसंबंधींच्या सर्व गोष्टींवर पोलीसाच्या एका स्वतंत्र खात्याची देखरेख असे व त्यांची नोंद करणें, वैद्यकीय तपासणी करवणें इत्यादि कामें या पोलिसाकडून केलीं जात असत. गेल्या ऑक्टोबर ( १९२७ ) च्या पहिल्या तारखेपासून मात्र या बाबतींत नवा कायदा अंमलांत आलेला असून सर्व व्यवस्था बदललेली आहे. अर्थात याला जरी फार वेळ झाला नसला तरी बर्लिनसारख्या मोठाल्या शहरांत तरी तिचा परिणाम काय झाला आहे हें तेवढ्यांत कळून येण्यासारखें आहे.या नवीन व्यवस्थेंतील मुख्य मुद्दे पुढीलप्रमाणें आहेत. (१) वेश्यांसंबंधींची सर्व देखरेख पोलीस खात्याकडून काढून आरोग्यखात्याकडे दिलेली आहे. (२) गुप्त रोगांपासून आपला बचाव कसा करावा याबद्दलची माहिती विशेषतः मजूर लोकांत या खात्यानें शक्य तितक्या मोठ्या प्रमाणावर पसरावी व हे उपाय सर्वांनीं योजावे अशा बद्दलची चळवळ व्याख्यानें, हस्तपत्रकें, जाहिराती इ. द्वारें करावी. ( ३ ) आरोग्यखात्याच्या नोकरांनी व डॉक्टरांनीं कोणालाही फी न घेतां तपासून औषध द्यावें, व आरोग्यखात्याचे दवाखाने कोठें आहेत याबद्दल रस्त्यावर ठिकठिकाणीं पाट्या लावून ठेवाव्या. ( ४ ) वेश्यांची नोंद आरोग्यखात्यानें करून त्यांची नियतकालिक तपासणी करण्याचा हक्क सरकारी अगर म्युनिसिपल डॉक्टरांना असावा. मात्र कोणत्याही खाजगी डॉक्टराकडून तपासणी करून घेऊन त्याचें सर्टिफिकिट पाठवल्यास मग वेगळ्या तपासणीची जरूर नसावी. ( ५ ) कोणाही जबाबदार रहिवाश्याला दुसऱ्या कोणाही व्यक्तीला गुप्त रोग असल्याचा संशय आला तर संशयाच्या कारणांसह त्यानें आरोग्यखात्याला आपलें नांव व पत्ता कळवून बातमी द्यावी. तपासणी करण्यास पुरेसा पुरावा आहे असें आरोग्यखात्यांतील अधिकाऱ्याचें

मत झाल्यास त्याकरतां त्या व्यक्तीस बोलावून प्रत्यक्ष चौकशी करण्याचा त्यास अधिकार आहे, व त्यानें हुकूम दिल्यास व्यक्तीनें सरकारी अगर खाजगी डॉक्टराकडून तपासणी करून आपल्याला रोग नाहीं अशाबद्दलचें सर्टिफिकिट सादर केलें पाहिजे, किंवा रोग असल्यास तो बरा होईपर्यंत औषध घेतलें पाहिजे. ( ६ ) गुप्त रोगांबद्दलचा संशय खात्याच्या इन्स्पेक्टरांना आला तरी देखील वरीलप्रमाणेंच व्यवस्था व्हावी व पुरुष व स्त्रिया या दोहोंस या बाबतींत सारखेच नियम असावे. ( ७ ) गुप्त रोगांवर औषध घेणाऱ्या सर्व रोग्यांची नोंद खाजगी डॉक्टरांनीं देखील केली पाहिजे व औषध मधेंच बंद केल्यास त्यांनीं रोग्याचें नांव व पत्ता ताबडतोब आरोग्यखात्यास कळवला पाहिजे.

या नवीन कायद्याचा एक विशेष परिणाम असा झालेला आहे कीं पूर्वी ज्या लोकांच्या बाबतींत गुप्तरोगांबद्दल तपासणी होणें शक्यच नव्हतें त्यांची तपासणी होऊं लागून त्यामुळें स्त्री व पुरुष या दोघांनाही रोगप्रसाराचें काम गुप्तपणें करण्यास प्रतिबंध झाला आहे. १ आक्टोबरपासून १ जानेवारीपर्यंत बर्लिन शहरांत जवळ जवळ १००० पत्रें आरोग्यखात्याकडे तक्रार करणाऱ्या रहिवाश्यांच्या नांवांसह आलीं व त्यांतील शेंकडा ९० पत्रांतील संशय खरा ठरून त्या व्यक्तींना रोगांवर उपचार करणें भाग पडलें. याशिवाय निनांवी पत्रें तर असंख्य आलीं पण कायद्याप्रमाणें त्यांजकडे दुर्लक्ष करणें भाग पडलें. या तीन महिन्यांत रोगांवरील उपचार मधेंच सोडून दिल्याबद्दल खासगी डॉक्टरांकडून सुमारें १३५० नांवें आलीं व यांनाही रोग बरा होईपर्यंत उपचार करून घेण्याची सक्ती केली.....

---

## ओनीडा समाजाची हकीकत.

अमेरिकेंत जे जे सामाजिक प्रयोग करण्यांत आले, त्यांत ‘ ओनीडा ’ समाज हा बराच महत्त्वाचा आहे. सुमारें १०० वर्षांपूर्वी अमेरिकेंत प्यूरिटन् पंथाच्या लोकांचें अतिशय प्राबल्य होतें. हे लोक अत्यंत धार्मिक असून कोणत्याही प्रकारचा ऐषआराम किंवा करमणूक सुद्धां त्यांस पाप वाटे. त्यांपैकीं उच्च कुटुंबांतील सुमारें २०० तरुण लोक, प्रत्येकीं ४०० डॉलर बरोबर घेऊन वेगळे झाले व त्यांनीं वरील

नांवाचा समाज स्थापन केला. त्यांतील सर्व स्त्रिया व पुरुष बरोबर काम करीत असत, परंतु अंगमेहनतीचें काम पुरुष करीत असत. परस्पर सहकारितेनें त्यांनीं घरकामाचा बोजा बराच कमी केला; व ते जरी दिवसांत सहाच तास काम करीत तरी ते दिवसेंदिवस श्रीमंतच होत गेले. अर्थात त्यांच्या क्रांतिकारक मतांमुळें त्यांचा छळ व्हावयाचा तसा झालाच.

स्त्रीपुरुषसंबंधांत लज्जास्पद कांहीं नाहीं असें ते प्रतिपादीत व समागम दोन प्रकारचा मानीत. एक प्रजोत्पादनाकरतां व दुसरा प्रेमाकरतां. एकाच व्यक्तीशीं प्रेम-संबंध ठेवला पाहिजे असें ते मानीत नसत, परंतु शरीरसंबंध ठेवण्यास दोन्ही व्यक्तींची इच्छा असली पाहिजे असा त्यांचा कायदा होता. हा संबंध कोणीतरी मध्यस्थानेंच जुळवून आणिला पाहिजे, व त्या दोन व्यक्तींची कामेच्छा कशा प्रका-रची आहे याचा मित्रमंडळींत खल होत असे, व त्यांत कांहीं निंद्य नाहीं असें ठरल्यासच त्यांस परवानगी मिळत असे. एकच स्त्री व एकच पुरुष विवाहानें जखडून टाकल्यास तीं आपलपोटीं होतात व नवरा आणि बायको यामध्यें परस्पर मालकीची भावना उत्पन्न होते, तशी या नवीन पद्धतीनें होणें शक्य नाहीं व यामुळें सर्व माणसें अधिक सुखी होतात, असें त्यांचें म्हणणें होतें. शिवाय एकंदर मालमत्ता सामाईक असल्यामुळें, टाकलेल्या बायका किंवा पोरकीं पोरें यांचे हाल होत नसत. या समाजानें पुष्कळ नवीन कल्पनांचा प्रसार केला. कामशास्त्राचें शिक्षण व संतति-नियमन या दोन गोष्टींचे अमेरिकेंतील प्रथम पुरस्कर्ते ते होते. दोन व्यक्तींनी एकमेकांचे प्रेमांत गुरफटून राहणें हें ते अत्यंत आपमतलबी व समाजविरुद्ध वर्तन समजत असत. मुलांच्या संगोपनाची व्यवस्था जरूर पडल्यास समाजाकडून होत असे. ते अतिशय उद्योगी व प्रामाणिक असत व दारू, तंबाखू व शिवीगाळ त्यांस वर्ज असे. ते इतर लोकांशीं संबंध ठेवीत नसल्यामुळें त्यांच्यांत गुप्तरोगांचा प्रसार झाला नाहीं. शेतकीपेक्षां कारखान्यांवरच त्यांची जास्त भिस्त होती व शेवटीं त्यांनीं दोनच प्रकारचे कारखाने ठेवले. उंदरांचे सांपळे व चांदीचें सामान त्यांचे-कडे अप्रतिम निघूं लागलें. परंतु हा सुखी समाज इतरांस पाहवेना. त्यांची विवाह-पद्धति हाणून पाडण्याकरतां जेव्हां नवीन कायद्यांचे मसुदे पुढें येऊं लागले, तेव्हां

आपली संपत्ति कोर्टांत भांडण्याकरतां वकिलांस देण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून त्यांनी ती पद्धतच रद्द केली; व १८८१ चे सुमारास हा समाज नामशेष झाला. नंतर त्यांतून एक लिमिटेड कंपनी निघाली व ती अजून वर सांगितलेले दोन प्रकार तयार करून विकते व ते अजूनही अप्रतिम आहेत.

---

## त्वचा व तिची काळजी.

त्वचा हें स्पर्शेंद्रिय असून शिवाय तिनें शरीराचें संरक्षण होतें. तिचें महत्त्व इतकें आहे, कीं त्वचेचा बराच भाग भाजल्यास मृत्यू येतो. त्वचेमध्ये दोन थर असतात, बाह्यत्वचा व अंतस्त्वचा सूक्ष्मदर्शक यंत्रांतून पाहिल्यास या अंतस्त्वचेंत रक्तवाहिन्यांचें एक जाळें पसरलेलें दिसतें. यांतील स्वेदोत्पादक ग्रंथींतून घाम येतो, व केंसांच्या मुळाशीं असलेल्या ग्रंथींतून केंसांस तुकतुकी आणणारें तेल येतें. याच त्वचेंत मज्जातंतूंचें एक जाळें असतें, त्यामुळें स्पर्शज्ञान होतें, म्हणजे एखाद्या पदार्थाची उष्णता, आकार, कठिनता वगैरेचा बोध होतो. त्वचेकडे इतकें महत्त्वाचें काम असतांही तिची योग्य काळजी फारच थोडे लोक घेतात.

त्वचेने दोन प्रकारांनीं शरीरसंरक्षण होतें. हवा, धूळ व इतर पदार्थांमुळें जे रोगजंतु त्वचेवर बसतात, ते अखंड त्वचेंतून शरिरांत जाऊं शकत नाहींत. त्वचेचा वरील थर हळुहळू निघून जाऊन त्याचे जागीं आंतील नवीन थर येत असतो. या वरील थराबरोबरच त्यास लागलेली धूळ व जंतु पडून जाऊन त्वचा स्वच्छ होते, व साबणानें व गरम पाण्यानें धुतल्यास यां नैसर्गिक स्वच्छतेस मदत होते.

या शिवाय थंडी व उष्णतेपासून त्वचेमुळें बचाव होतो. त्वचेंतील सूक्ष्म रक्तवाहिन्या थंडीनें संकोच व उष्णतेने विस्तार पावतात. यामुळें थंडीचे वेळीं त्वचेंतील रक्त कमी होऊन त्वचा फिकट होते व रक्तांतील उष्णता हवेंत पसरण्याचें प्रमाण कमी होतें. उन्हाळ्यांत त्वचा लाल होते व बाहेरील हवेच्या स्पर्शानें रक्त थंड होतें. [ अर्थात शरीरापेक्षां बाहेरील उष्णता अधिक असल्यास असा परिणाम होणार नाहीं.] शिवाय अधिक उष्णतेमुळें अधिक घाम येऊन त्याची वाफ होण्याकडे

वरीच उष्णता खर्च होते व त्यामुळें थंडावा येतो. यामुळें निरोगी शरिराची उष्णता नेहमीं जवळ जवळ सारखीच राहते. शिवाय घामाबरोबर शरिरांतील निरुपयोगी व हानिकारक पदार्थ बाहेर पडल्यामुळें मूत्रपिंडांचें व फुप्फुसांचें काम त्या मानानें हल्कें होतें.

**नित्यक्रम.** शरीराचे जे भाग उघडे असतात त्यांवर धूळ वगैरे बसून ते खराब होतात व निजण्यापूर्वी ते स्वच्छ धुण्याची जरूर असते. सामान्य नियम म्हणजे साबणानें व गरम पाण्यानें हात, पाय व तोंड धुवावें. विशेषतः ज्यांची त्वचा तेलकट असेल त्यांनीं तोंड धुण्यास होतां होईल तों थंड पाणी वापरूं नये. गरम पाण्यानें त्वचा अधिक स्वच्छ होते. कांहीं लोकांच्या त्वचेस साबण सोसत नाहीं, त्यांनीं व्हॅसेलीन लावून नंतर फडक्यानें पुसल्यास त्वचा स्वच्छ होईल. गोड्या बदमांचें तेल किंवा कोलनवॉटरनेंही हें काम होतें.

**स्नान.** हिंदुस्थानांत स्नानाचा प्रघात जरी सार्वत्रिक आहे, तरी स्नाना-बद्दल बऱ्याच विचित्र कल्पना प्रचलित दिसतात. अंगावर दोन तांब्ये पाणी ओतलें म्हणजे पुष्कळ लोकांचें स्नान होतें. अंगावरील वस्त्र भिजलें पाहिजे अशी सोंवळ्या ब्राह्मणांची कल्पना असते. परंतु अंग स्वच्छ झालें पाहिजे ही कल्पना क्वचितच दिसते. स्नान करतांना अंगावर वस्त्र असलें पाहिजे ही कल्पना कदाचित् धार्मिक असेल, परंतु गलिच्छपणास पोषक असते. सर्वांग स्वच्छ धुणें असेल तर स्नान नग्न स्थिती-तच केलें पाहिजे व याकरतां प्रत्येक घरांत स्वतंत्र खोली किंवा इतर तजवीज केली पाहिजे. जेथें विशेष घाम येतो तेथें दररोज साबण लांवणें जरूर आहे व आठवड्यांत एक दोन वेळां तरी सर्वांगास साबण लावावा. ज्यांस थंड पाणी सोसेल त्यांनीं थंड पाण्यानें स्नान करणें चांगलें, परंतु आठवड्यांत एक दोन दिवस गरम पाणी वापरावें.

**पाय.** बूट, मोजे वापरणारांचे पाय घामानें व इतरांचे मातीनें खराब होतात ते दररोज स्वच्छ धुणें जरूर आहे. सुती मोजांपेक्षां लोकरी मोजे—उन्हाळ्यांत पातळ

व हिवाळ्यांत जाड—वापरणें बरें, म्हणजे घामाचा त्रास कमी होईल. मोजे वारंवार धुवावे, बूट पायांस बरोबर बसतील असे असावे, नसल्यास घट्ट पडून व फोड येऊन त्रास होतो. बुटाचें टोंक अरुंद असल्यास व आंगठ्याचें नख बरोबर न कापल्यास कधीं कधीं तें वाढतांना त्वचेंत शिरतें. असें वाढलेलें टोंक कापून काढून त्याचे व त्वचेचे मधें कापूस घालून ठेवल्यास तें आंत शिरणार नाहीं. पायांस घाम फार येत असल्यास मोजांत थोडी टाल्क् पावडर, बोरिक पावडर किंवा चेहऱ्यास लावण्याची पावडर टाकावी.

**केंस.** जेथें धूळ उडण्याचा संभव असेल तेथें केंसावर आच्छादन असावें. केंसांस हवा लागण्याकरतां सायंकाळीं स्त्रियांनी केंस मोकळे सोडावे व नंतर ब्रशानें विंचरून सैल बांधून ठेवावे. सकाळीं पुनः सोडून बांधावे. केंस कोणत्याही पद्धतीनें बांधले तरी कधींही घट्ट बांधूं नये व त्यांत फारसे आंकडे, फण्या वगैरे घालूं नये. सामान्यतः केंसांस तेल वगैरे लावण्याची जरूरी नसते. महिन्यांतून एक दोन वेळां, किंवा उन्हाळ्यांत जास्त वेळां, केंस गरम पाण्यानें धुवावे, परंतु तें फार गरम असूं नये. कोणताही चांगला साबण किंवा डोकें धुण्याकरतां विशेष प्रकारचे पातळ साबण मिळतात. ते वापरावे. साबणाचा अंश डोक्यांत शिल्लक राहूं नये म्हणून शेवटीं पाण्यांत लिंबाचा रस पिळून त्यानें केंस धुवावे, व नंतर पुसावे. केंस वाळण्याकरतां जरूरीप्रमाणें थंड किंवा उष्ण हवेचा प्रवाह केंसांवर सोडणारें एक विजेचें यंत्र मिळतें, त्याचा फार उपयोग होतो व केंस ताबडतोब वाळतात. ते पके कोरडे होई-पर्यंत मोकळेच ठेवावे. फणीचे दांत फार जवळ असूं नये, कारण केंस तुटून त्वचेस त्रास होईल. केंसांच्या टोंकांस फांद्या फुटूं लागल्यास टोंकें कापावीं. शाळेंत किंवा इतर ठिकाणीं जेथें मुलांचा जमाव होतो, तेथें एकापासून दुसऱ्याच्या केसांत उवा जाण्याचा संभव असतो. नुसतें गलिच्छ राहण्यानें उवा होत नाहींत, त्या बाहेरून कोठून तरी केसांत जातात व तेथें अंडीं घालतात. अशा रीतीनें एक मादी दोन महिन्यांत १८००० अंडीं घालूं शकते. यांस लिखा म्हणतात. डोक्यांत उवा पडल्यास शिरका गरम करून त्यानें केंस धुवावें, म्हणजे उवा व लिखाही मरतात.

**कानः**—कानांत जो मेणासारखा चिकट पदार्थ उत्पन्न होत असतो त्याचे योगानें कानाच्या पडद्याचें थंडीवाऱ्यापासून व अपायकारक आवाजांपासून संरक्षण होतें, म्हणून हा पदार्थ अजीबात काढून टाकण्याचा प्रयत्न करूं नये. परंतु हा फार सांचल्यास कमी ऐकूं येण्याचा संभव असतो. कान साफ करण्याकरतां कोणतेंही टोंकाचें हत्यार कानांत घालूं नये, कारण कान फुटण्याचा संभव असतो. कान धुणें झाल्यास तो पिचकारीनें, उकळलेल्या पाण्यानें धुवावा. या पाण्यांत बोरिक ॲसिड् घालावें. असें केल्यास करंगळीनें ( त्यास फ्रेंचमधें कानांत घालण्याचें बोट असें नांव पडलें आहे ) कान खाजवण्याची जरूर पडणार नाहीं.

**नाक व घसा.** नाक स्वच्छ ठेवणें बरेंच कठिण असतें. नाकाच्या आंतील भाग साफ नसतो, तेथें पुष्कळ केंस व रक्तवाहिन्या असतात व येथील ग्रंथींतून नेहमीं थोडाबहुत द्रव बाहेर येत असतो. कधींकधीं सरदीनें हा द्रव जास्त येतो, कधीं रक्त येतें, कधीं केसांच्या मुळाशीं दाह होतो, कधीं कधीं तर नाकपुड्यांची रचना बरोबर नसमुळें नाकांतील द्रव नाकांतच राहून कुजूं लागतो व घाण येऊं लागते. तोंडाचा मागचा भाग, नाक, घसा व कान यांचा निकट संबंध असतो व नाकांत रोगजंतूंची वाढ झाल्यास ते घशांतून फुफ्फुसांपर्यंतही पोंचण्याचा संभव असतो. यामुळेंच पडसें झाल्यावर काळजी न घेतल्यास खोकला होतो. हवेंतील केर, जंतु वगैरे श्वासाबरोबर नाकांत जाऊन तेथें अडकून बसतात. याकरतां दररोज सकाळीं व संध्याकाळीं दोन्ही नाकपुड्या स्वच्छ कराव्या. एक ग्लासभर पाणी घेऊन त्यांत थोडें पांढरें मीठ विरवावें व तें पाणी नाकांत ओढावें. असें केल्यास या पाण्याबरोबर नाकांतील मळ आपोआप धुवून निघेल. बारापासून सतरा वर्षें वयाच्या मुलांच्या नाकांतून पुष्कळ वेळां रक्त येतें. तें थांबवण्यास डोकें वर करून कापसाचा बोळा गार पाण्यांत बुडवून नाकपुडींत घालावा, किंवा बर्फ असल्यास त्याचा लहानसा तुकडा नाकपुडींत वितळूं द्यावा. इतकेंही करून न थांबल्यास थोडेंसें 'ॲन्टिपिरीन्' कोरड्या कापसांत गुंडाळून ती सुरळी नाकपुडींत घालावी. यानेंहि न थांबल्यास डॉक्टरास बोलवावें. पुष्कळ रोग नाकांत व घशांत सुरू होतात. हे सर्व

टाळण्याकरतां सकाळीं, सायंकाळीं व प्रत्येक जेवणानंतर पाण्याच्या गुळण्या करून तोंड व घसा साफ धुतला पाहिजे. याकरतां पाण्यांत थोडें 'हायड्रोजन् पेरॉक्साइड्' घालावें. म्हणजे पुष्कळ सांथींपासून बचाव होईल.

**तोंड व दांत.** चेहऱ्याच्या साफसफाईपेक्षां तोंड व दांत स्वच्छ ठेवणें जास्त महत्त्वाचें आहे, कारण तोंडांत खाद्यपेयाचा अंश शिल्लक राहिल्यामुळें तें रोगजंतूंस वाढण्यास उत्तम स्थान होतें व शिवाय अस्वच्छ तोंडास घाण येते. दांत दररोज साफ न केल्यास त्यांवर कीट बसतें व ते किडण्यास मदत होते. दांत घांसण्याची संवय लहानपणापासून आईबापांनीं लावली पाहिजे. ते प्रत्येक जेवणानंतर घासलेले उत्तम, परंतु दिवसांतून एकदांच घांसणें असेल तर निजण्यापूर्वी घांसावे. बोटानें दांत स्वच्छ होत नाहींत, ब्रशानें घांसावे व ब्रश फार मऊ नसावा. तो एकानें दुसऱ्याचा कधींही वापरू नये, ब्रशाचे केंस दांतांचे फटींत शिरतील अशा रीतीनें दांत प्रत्येक वेळीं तीन चार मिनिटें घांशीत बसावें. संवय होईपर्यंत मिनिटें घड्याळानें मोजावीं, मनानें मोजूं नये. दंतमंजन कोणत्याही प्रकारचें वापरावें, परंतु ब्रशाचें महत्त्व अधिक आहे. त्याचे केंस झिजून गेल्यावर तसाच वापरूं नये, दुसरा घ्यावा. दांताची आंतली बाजू देखील घांसावी व नंतर कोमट पाण्यानें तोंड खळबळून धुवावें व ब्रश स्वच्छ करून ठेवावा. दोनदां घासणें असल्यास दोन ब्रश वापरावे, म्हणजे ब्रश नेहमीं ओला रहात नाहीं. वर्षांतून एकदां दांत डॉक्टराकडून तपासून घ्यावे म्हणजे तो जरूर असल्यास योग्य ते उपाय सुचवतो.

**त्वचेचे रोग,** गळवें व मुरूम. कांहीं जंतु त्वचेवर अति जलद वाढतात व संधि सांपडल्यास केंसांच्या मुळांत शिरून त्यामुळें गळवें वगैरे होतात. त्वचा खाजवण्यानें हे जंतु आंत शिरण्यास मदत होते. हीं प्रथमतः ज्या ठिकाणीं घट्ट कपडे व पट्टा वगैरेमुळें घर्षण होतें तेथें होतात व तेथून पसरतात. आरंभींच उपाय केल्यास व्हॅसेलीन व आयोडीन्च्या मिश्रणानें गळूं बरें होतें, न झाल्यास पक्क होऊं देऊन कापावें लागतें. त्याचे संसर्गानें दुसरीं गळवें होऊं नये म्हणून

त्यावर पट्टी डॉक्टरानेंच बांधलेली बरी. गळवें पसरल्यास बरीं होण्यास बरेच दिवस लागतात, परंतु याकरतां पोटांत औषध घेण्याची जरूर नसते.

सामान्यतः १४ पासून २० वर्षे वयाच्या मुलांमुलींच्या चेहऱ्यावर मुरमाच्या पुळ्या उठतात. या कधीं कधीं मानेवर, स्तनांचें मधें, पोटावर व पाठीवरही उठतात. हा त्वचेंतील स्नेहोत्पादक ग्रंथींचा रोग आहे व यावर प्रकृतीचें मान पाहून वेग-वेगळे उपाय करावे लागतात, ते डॉक्टराच्या सल्ल्यानें करावे. दिवसांतून दोनदां पाण्यांत कोलन वॉटर घालून तें लावावें व एकदां अतिसौम्य साबणानें धुवावें. याला नुसतें औषध लावून भागत नाहीं, खाण्यापिण्यास विशेष जपावें लागते. त्वचेचे बरेच रोग अन्नपाण्याच्या गैरव्यवस्थेमुळें होतात, त्यांवर डॉक्टराचा सल्ला घेणें बरें.

**त्वचेवर राहणारे प्राणीः**—खरजेचे किडे, उवा, पिसवा, ढेंकूण यामुळें त्वचेसच त्रास होतो असें नाहीं तर क्षयासारख्या रोगांचा संसर्ग यांचे योगानें होतो. खरूज एका विशिष्ट प्राण्यापासून होते. हा प्राणी विशेषतः मनगट, तळहात, बोटें व बेचकें, कोंपर, खांक वगैरे ठिकाणीं राहतो. अंग खाजवल्यानें तो सर्वत्र पसरतो. याची मादी त्वचेस एक भेग पाडते व अंडीं घालीत पुढें पुढें पोखरीत जाते. क्षय, धांवरें व गळवें यांचा संसर्ग यापासून होऊं शकतो. खरजेचा संसर्ग विशेषतः रात्रीचे वेळीं होतो, याकरतां अंथरुणाची व कपड्याची विशेष खबरदारी घेतली पाहिजे. कोठेंही निजण्याचा प्रसंग आला तरी चादर व उशी स्वतःची असावी. खरजेस सर्वांत सोपा उपाय म्हणजे निजतेवेळीं सर्वांगास राकेल तेल लावून रात्रभर तसें राहूं द्यावें. सकाळीं साबणानें धुवून सायंकाळीं फिरून लावावें. याप्रमाणें तीन दिवस केल्यास खरूज बरी होते. नंतर सर्व कपडे उकळावे. राकेल लावण्यापूर्वी खरजेचे फोड फोडले पाहिजेत; व एका घरांत पुष्कळ माणसांस खरूज झाली असल्यास सर्वांनीं हा उपाय एकदम केला पाहिजे.

घाणेरड्या माणसांच्या अंगावरही उवांसारखाच एक प्राणी राहतो, परंतु तो बहुधा कपड्यांत राहून संधि साधेल तेव्हां रक्तशोषण करतो. हा चुकून एखादे वेळीं आपल्या कपड्यांत शिरल्यास कपडे बदलून ते कपडे उकळावे.

## संकेतगृहें

पिसवा व ढेंकूण सर्वांस माहीत आहेत. पिसू अंधाऱ्या कोंपऱ्यांत व घाणेरड्या कपड्यांत अंडीं घालते, याकरतां कपडे वारंवार धुवावे व जमिनींल व भिंतींतील भेगा भरून काढाव्या. ढेंकूण राकेल तेलानें मरतात, परंतु त्यांचीं अंडीं मारणें कठिण असतें. फार ढेंकूण झाल्यास भिंतींतील, जमिनींतील व लांकडांतील सर्व फटी बुजवणें व लांकडी सामान 'कॉस्टिक् पोटॅश'च्या पाण्यांत बुडवणें एवढाच उपाय आहे.

---

## संकेतगृहें

( लिहून आलेला मजकूर )

संध्याकाळीं सात आठ वाजण्याचे पुढें वेश्या रहात असलेल्या शहराच्या भागांतून जातांना, सामाजिक हितासंबंधींची थोडीबहुत तरी कळकळ वाटणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचें हृदय द्रवल्याशिवाय राहणार नाहीं. मुंबईस फोरास रोड, फॉकलंड रोड व त्या बाजूचे इतर भाग यांमधून पायींच काय, पण ट्रॅममधून किंवा गाडींतून जाणाऱ्या माणसाच्या मनांत देखील, रस्त्यांतून जाणाऱ्या व्यक्तींचे पोषाख, हावभाव व भाषा व खिडक्यांतून आणि गजांच्या आडून रस्त्यावरील पुरुषांचीं मनें आकर्षून घेऊं पाहणाऱ्या वेश्यांचे समूह, हीं सर्व पाहून आपण ज्या मनुष्य-जातीचे एक घटक आहोंत त्याच जातींत ही मंडळीही मोडते, हा विचार येईल व आपल्या सामाजिक रचनेंत काय चुकतें आहे हें शोधून काढण्याकडे त्याची प्रवृत्ति झाल्यास नवल नाहीं. हा वर वर्णन केलेला सर्व प्रकार उत्तम आहे व त्यांत कांहीं वाईट नाहीं असें बहुधा कोणालाच वाटत नसेल अशी प्रस्तुत लेखकाची समजूत आहे, पण कित्येकांना जर फक्त त्यांतील अश्लीलपणा, गलिच्छपणा व दारिद्र्य हेंच वाईट वाटलें तर दुसऱ्या कित्येकांना वेश्यागमन हें कृत्यच मुळीं मुळा-पासून वाईट आहे असें वाटेल, एवढाच काय तो फरक.

हीन दर्जाची संतति उत्पन्न करून अथवा सांसर्गिक रोगांचा फैलाव करून दोन व्यक्ती ज्यावेळीं समाजस्वास्थ्याचा बिघाड करतील त्याचवेळीं फक्त त्यांच्या स्वतंत्रतेला आळा घालण्याचा समाजाला अधिकार राहील. या दोन्ही गोष्टींत

जर त्यांनीं योग्य ती खबरदारी घेतली तर मग वयांत आलेल्या कोणत्याही दोन स्त्रीपुरुषांना स्वतःच्या शरिराचा हवा तसा उपयोग करण्याची मोकळीक असली पाहिजे. अर्थात कोणत्याही स्त्रीला तिसऱ्याच एखाद्या व्यक्तीनें आपल्या शरीराचा विक्रय करण्यास भाग पाडतां कामा नये, व ही गोष्ट आतां कायद्यानें बहुतेक देशांत मान्य केलेली आहे. पण तिची स्वतःचीच इच्छा जर आपल्या शरिराचा विक्रय करण्याची असेल तर मग वरील दोन कारणांखेरीज दुसऱ्या कोणत्याही कारणाकरतां समाजाला—कायद्याला—त्यांत ढवळाढवळ करतां येणार नाहीं.

हे सर्व जरी खरें असलें तरी मुंबई किंवा कलकत्ता यासारख्या मोठ्या शहरांतूनच काय, पण दाट वस्तीच्या लहान लहान शहरांतून देखील वर वर्णन केल्यासारखे जे प्रकार रोज दिसतात ते मोठेसे इष्ट आहेत असें नाहीं. तहान, भूक इत्यादीप्रमाणेंच पण त्यापेक्षांही कित्येक वेळीं अतिशय महत्त्वाची अशी कामप्रवृत्ति प्रत्येक सामान्य स्त्रींत व पुरुषांत असते, आणि पाणी पिण्यास जसें स्वच्छ भांडें हवेंसें वाटतें, किंवा जेवायची जागा ज्याप्रमाणें नुसती स्वच्छच नव्हे तर शक्य तितकी प्रसन्न व सुशोभित असावी अशी आपण काळजी घेतों, त्याचप्रमाणें कामेच्छा जेथें तृप्त केली जाते ती जागाही सुशोभित व शक्य तितकी सुंदर असणें इष्ट आहे. कामेच्छा पूर्ण होण्यास नेहमीं दोन व्यक्ति लागतात व त्या दोघांचा एकमेकांशीं इतका निकट संबंध येतो कीं त्यांना एकमेकांविषयीं, निदान त्या वेळेपुरतें कां होईना अतिशय प्रेम वाटतें. कामेच्छा पूर्ण करून घेणें हा प्रत्येक मनुष्याचा हक्क आहे व कोणत्याही समाजाची आर्थिक, धार्मिक किंवा रूढिविषयक स्थिती जर या हक्काच्या आड येत असेल तर ती अवश्य बदलली पाहिजे. शिवाय, शारीरिक व मानसिक आरोग्याला अत्यंत आवश्यक अशी जी ही गोष्ट, ती अंधारांत, घाणेरड्या जागीं व दारू किंवा इतर मादक पदार्थांच्या निशेंत व्हावी ही गोष्ट अत्यंत अनिष्ट आहे. वेश्याव्यापार बंद करावा कीं न करावा व तें शक्य आहे कीं काय हा विचार बाजूला ठेवला तरी सद्यःस्थिती सुधारणें फार जरूर आहे हें उघड आहे. या दृष्टीनें संकेतगृहांसंबंधींची पुढें दिलेली सूचना फार महत्त्वाची असून सर्वांनीं विचार करण्यासारखी आहे.

# संकेतगृहें

स्त्रीपुरुषांचा शरीरसंयोग ( मग त्यांचा विवाह झालेला असो अगर नसो ) ही एक अत्यंत पवित्र गोष्ट असल्यामुळें, ज्यांना तो शक्य तितक्या सुशोभित व प्रसन्न ठिकाणीं करावयाचा असेल त्यांच्याकरतां सरकार किंवा म्युनिसिपालिटी यांनीं संकेतगृहें बांधावीं. या संकेतगृहांची व्यवस्था मानवी गुणधर्म समजून त्यांच्याबद्दल सहानुभूति बाळगणाऱ्या व्यवस्थापकांच्याच हवालीं केलेली असावी व प्रसूतिगृहां-प्रमाणेंच समाजहित संभाळणाऱ्या संस्थांतच त्यांची गणना व्हावी. या गृहांतील सर्व वातावरणच असें असावें कीं, कामेच्छा पूर्ण करणें हें एक कांहीं मिनिटांचें पाशवी काम नसून त्यांत एक विलक्षण जादू भरलेली आहे व तें पवित्र काम दोन्ही व्यक्तींना कल्पनातीत सुख व आरोग्य देणारें आहे, अशी प्रत्येकाची समजूत व्हावी. या गृहांतच 'संततिनियमन' व 'गुप्त रोगांपासून बचाव' यांची माहिती देणारे स्त्री व पुरुष डॉक्टर असून दोन्ही प्रकारचीं साधनेंही विकत मिळण्याची तेथेंच व्यवस्था असली पाहिजे. याशिवाय, मुलें व्हावीं अशी इच्छा असलेल्या जोडप्यांची वैद्यकीय तपासणी या गृहांतच करून त्यांना योग्य तो सल्ला देण्याची व्यवस्था असावी. त्याच-प्रमाणें खालच्या मजल्यावर भोजनाची व्यवस्था असून उत्तम प्रकारचीं स्नानगृहेंही असावींत. वरच्या मजल्यावरील खोल्यांचा उपयोग प्रत्येक जोडप्याला एक रात्र-भर करण्याची परवानगी असावी व त्याबद्दल त्यांचेकडून माफक भाडें घेण्यांत यावें. या खोल्यांत भिंतींवर नामांकित चित्रकारांच्या चित्रांच्या प्रतिकृति, स्वच्छ चादरी व पांघरुणें असलेले पलंग, थोडीं फार फुलें, स्वतंत्र मोरी व शौचकूप इ. सोयी असाव्या. शिवाय या गृहांतच संभाषण करीत बसतां येईल असे दिवाणखाने, वाचनालयें, रेडिओ इत्यादि सोईही असणें जरूर आहे. अशा प्रकारचीं संकेतगृहें जर निदान प्रत्येक मोठ्या शहरांत होतील तर अविवाहित जोडप्यांच्या संभोगाला देखील एक निराळेंच वळण लागेल व वेश्यागमन करणारे लोक देखील अशा गृहांचा उपयोग करूं लागतील. घाणेरड्या जागीं कामेच्छा तृप्त करण्याची कोणाला हौस असते असें नाहीं, व वेश्येला घेऊन कां होईना पण अशा संकेतगृहांत जर एखादा पुरुष गेला तर त्याला संतति व रोग हीं दोन्ही टाळतां येतील. इतकेंच काय, पण सुट्टीच्या दिवशीं गाडी करून

बायकोला राणीच्या बागेंत किंवा अपोलो बंदरावर घेऊन जाणारा मध्यम स्थितींतील मनुष्य सुद्धां कामेच्छा तृप्त करण्याकरतां बायकोसह जाऊन एखाद्या रात्रीपुरती संकेतगृहांतील एखादी सुंदरशी खोली भाड्यानें कां घेणार नाहीं?

संकेतगृहांसंबंधींच्या योजनेची केवळ रूपरेषा वर दिलेली आहे, त्यांत पुष्कळांना निरनिराळे फेरफार सुचवतां येतील. उदाहरणार्थ मादक पदार्थांच्या नशेंत असलेल्या कोणत्याही स्त्रीपुरुषांस अशा प्रकारच्या संकेतगृहांत प्रवेश मिळणार नाहीं. त्याचप्रमाणें ज्यांचें कपडे पुरेसे स्वच्छ नसतील त्यांना भाड्यानें परटाकडून आलेले कपडे वापरण्यास मिळण्याची सोय संकेतगृहांतच करण्यासारखी आहे. अशा बारीकसारीक बाबी पुष्कळ सुचवतां येतील. परंतु मुद्द्याची गोष्ट म्हणजे रुग्णालयें, व्यायामशाळा, इत्यादि संस्था चालवणें आपलें कर्तव्य आहे असें ज्या सरकारला वाटतें त्यानेंच संकेतगृहांची सोय कां करूं नये?

---

**मागसलेले विचार.** मे २८ ( १९२८ ) रोजीं येथें भरलेल्या नाट्यसंमेलनाच्या अध्यक्ष या नात्यानें सौ. गिरिजाबाई केळकर यांनीं जें भाषण केलें त्यांतील बरेच विचार आमचे मतें अत्यंत पारंपरिक व मागसलेले आहेतः—

१. मी जरी आतां पुरुषासारखी या खुर्चीवर बसलें आहें, तरी पण... ( खुर्चीवर बायकांसारखें कसें बसायचें ? सं ) २. अलीकडच्या नाटकांतून जे बीभत्स प्रकार आणि ग्राम्य विनोद दृष्टीस पडतात, ते पाहून लेखकांना सत्यसृष्टींत काय घडतें याची जाणीव नसावीसें वाटतें. ( हे प्रकार नाटकांशिवाय कोठेंही दिसत नाहींत काय ? सं. ) ३. एकंदर जे नवरस आहेत त्यांतील एक शृंगार जर थोडा कमी केला तर नाटकाची कोणत्याही प्रकारची विशेष हानि होईल असें वाटत नाहीं. ( अर्थात बीभत्स रसास आधींच चाट मिळाल्यामुळें सात रस राहिले. पुष्कळ झाले ! कालिदास, भवभूति वगैरे मूर्ख बेटे ! अशा रीतीनें नाटक नीरस झालें म्हणजे प्रेक्षकांचा विरस होणारच, हा दहावा रस सौ. गिरिजाबाईस पसंत आहेसें दिसतें. सं. )

४. ह्याचबरोवर आतां नवा येऊं पाहणारा प्रश्न स्त्रीनटांचा आहे. पाश्चात्यांचें अंध (=गिरिजाबाईस न आवडणारें. सं.) अनुकरण करण्याची जी आमची प्रवृत्ति तीच या बाबतींत दिसून येते...आम्ही हिंदु लोक, आमच्या संस्कृति फार निराळ्या आहेत...हिंदु लोक कधींही स्त्रीला आपल्या बरोबरचे लेखीत नाहींत तर तिला आपल्याहून वरिष्ठ समजतात. (साफ खोटें ! सं.) ५. स्त्री म्हणजे देव्हाऱ्यांतील देवता; तिचें काम म्हणजे स्वतः पवित्र रहायचें,...पहा बरें ! कोणच्याही देवळांतील देवता कधीं बाहेर पडली आहे काय? ह्या पवित्र वस्तूला नानारूपांत, नानावेषांत जगापुढें उभें करायला तुम्हांला योग्य वाटतें का ? ( स्त्रियांचे अंगीं विनय विशेष वसतो, असें सौ. गिरजाबाईच म्हणतात. तसें असतें तर एका स्त्रीच्या तोंडून हे विचार बाहेर पडले नसते ! सं.) ६. त्यांच्यांत जर कोणी पतित असतील, कोणाला उदरनिर्वाहाचें साधन मिळवणें भाग असेल, तर त्याकरतां कांहीं दुसऱ्या तजविजी करा (त्या कोणत्या ? सं. ) पण त्यांना नाटककंपन्यांत नटी होण्याची लालूच दाखवूं नका...मनुष्य एकदां टाळ्यांच्या गजराला व वरकरणी होणाऱ्या कीर्तीला भाळला म्हणजे तो स्वतःला, स्वतःच्या योग्यतेला विसरतो. मग ह्या तर काय ? बिचाऱ्या अवला ! ( देवता कोठें गेल्या ? सं.) यांना जर ' वन्स मोर'च्या टाळ्या मिळूं लागल्या किंवा वर्तमानपत्रांत छापलेलें नांव दिसलें तर यांच्यासारख्या अज्ञ बायका भुलल्यास नवल कोणतें ? या मायामोहांतून तरून जाणें मनुष्यमात्राला अवघड...(वक्त्यांसही टाळ्या मिळतात व त्यांचींही नांवें व फोटो प्रसिद्ध होतात, तरी सौ. गिरिजाबाई अध्यक्ष होतातच ! सं.) ७. म्हणून स्त्रियांच्या साहाय्याशिवाय आपली रंगभूमि चालली पाहिजे व त्यांत उत्तम नागरिक नट झाले पाहिजेत. ( एकंदरींत नाटकाचा धंदा हलकटच, पण आमची करमणूक तर झाली पाहिजे, तेव्हां पुरुषांनीं तो करावा. आम्ही देव्हाऱ्यांत बसूं आणि तुम्ही आमच्यापुढें नाचा, जरूर पडल्यास कांहींजण हिजडे व्हा व विशेषतः हें सर्व उत्तम नागरिकांनीं केलें पाहिजे ! वेश्यांनीं किंवा नायकिणींनी सुद्धां या धंद्यांत पडतां कामा नये, इतका हा हलकट आहे, परंतु उत्तम पुरुष नागरिकांनीं मात्र त्यांत पडावें, कारण ते पडले पुरुष ! विनयाचा कळस झाला ! सं.)

## समाजस्वास्थ्य

# मुलें न होण्याचीं कारणें व आधुनिक उपाय

बहुतेक स्त्रियांस कमीअधिक प्रमाणांत संतति पाहिजे असते व मूल न झाल्यास आयुष्य व्यर्थ गेलें असें पुष्कळांस वाटतें. परंतु मुलें न होण्याचीं कारणें बहुधा सहज समजण्यासारखीं नसतात, व समजलीं तरीहि त्यांवर उपाययोजना सोपी नसल्यामुळें ही गोष्ट मानवी शक्तीच्या बाहेरची समजून व ईश्वरावर हवाला ठेवून, पिंपळास प्रदक्षिणा किंवा अनेक प्रकारचीं व्रतें व नवस करण्यांत अशा स्त्रियांचा बहुतेक वेळ जातो. पण पिंपळाकडून किंवा ईश्वराकडून गर्भधारणा होणें शक्य नसल्यामुळें त्यांची निराशा होते. केवळ मेदोवृद्धीमुळें ज्या स्त्रियांस मुलें होत नसतील त्यांना व्यायाम व उपोषणें केल्यानें उपयोग होण्याचा संभव आहे, इतरांस नाहीं. इतकेंच नव्हे तर अशक्त स्त्रियांची प्रकृति उपोषणानें अधिक क्षीण होऊन गर्भधारणेचा संभव कमी होईल. तेव्हां हे काल्पनिक व वेडगळ उपाय बाजूला ठेवून आधुनिक उपायांचाच येथें विचार करूं. अर्थात कोणताही उपाय करण्यापूर्वी, गर्भधारणेपासून कांहीं अपाय होईल कीं काय, हें डॉक्टरांस बारकाईनें पहावें लागतें. हृदयाचे, फुप्फुसांचे व मूत्रपिंडांचे कांहीं विकार गर्भधारणेनें बळावतात. गर्भाशय, अंडाशय किंवा नलिकांचे विकार असल्यास ते बरे होईपर्यंत गर्भधारणा होणें इष्ट नसतें.

पुरुषाच्या शरीरांत उत्पन्न झालेला एखादा शुक्रजंतु व स्त्रीच्या शरीरांत प्रतिमासीं एक याप्रमाणें पक्क होणारा रजोगोल, यांचें मीलन होऊन एकजीव होणें, यालाच आपण गर्भधारणा म्हणतों. हा रजोगोल अंडाशयांत उत्पन्न होऊन अंडवाहक नलिकांतून गर्भाशयाकडे येतो, व समागमाचे अंतीं रेतस्रावांतून असंख्य रेतजंतू योनिमार्गांत पडतात व तेथून गर्भाशयांत व पुढें अंडवाहक नलिकांत रजोगोलाची गांठ पडेपर्यंत प्रवास करतात. रेतजंतूंचा अंडापासून जननेंद्रियापर्यंत व पुढें योनिमार्गांतून गर्भाशयापर्यंत व रजोगोलाचा अंडाशयापासून गर्भाशयापर्यंत, हे दोन्ही मार्ग मोकळे असले तरच गर्भधारणा शक्य असते. यांत कोठें अडचण येणें शक्य आहे तें पाहूं.

कित्येक स्त्रियांस गर्भाशयच नसतो किंवा तो पूर्ण वाढलेला नसतो व असें असल्यास कोणताही उपाय चालत नाहीं. कधीं गर्भाशय असून योनिमार्गच नसल्या-

मुळें समागम अशक्य होतो. असें असल्यास शस्त्रक्रियेनें कृत्रिम योनिमार्ग तयार करतां येतो, परंतु तो मधून मधून यंत्रानें ताणावा लागतो नाहींतर तो आकुंचित होऊन निरुपयोगी होतो. एका फ्रेंच स्त्रीला गर्भाशय व योनिमार्ग दोन्हीं नव्हतीं. तिचें एका पुरुषाशीं प्रेम जमलें व त्यांचें लग्नही ठरलें, परंतु अशा रीतीनें त्याला फसवणें बरें नाहीं असें वाटून ती एका डाक्तराकडे गेली व कृत्रिम योनिमार्ग करण्याची विनंति केली. परतु तो डाक्तर धार्मिक होता व तिला गर्भाशय नसल्यामुळें मूल होणें शक्य नाहीं असें पाहून, केवळ संभोगसुखाकरतां शस्त्रक्रिया करण्याचें त्यानें नाकारलें. अशा धार्मिक कल्पना वेड-गळ असतात इतकेंच नव्हे तर त्यांमुळें इतरांचें जन्माचें नुकसान होतें. परंतु सुख जितकें कमी होईल तितकें बरें, एरव्हीं स्वर्ग कसा लाभणार? अशी कांहींची कल्पना असते.

प्रथमसमागमाचे प्रसंगीं पुरुष जपून न वागल्यास स्त्रीचे जननेंद्रियास इजा होऊन त्यामुळें पुढें प्रत्येक समागमाचे वेळीं तेथील स्नायू भीतीनें संकोच पावतात व समागमास अडचण होते. ही स्थिती कित्येक महिने टिकूं शकते. अशावेळीं क्लोरोफॉर्म देऊन, योनिमार्ग यंत्रानें ताणून, तो ताणलेला राहण्याकरतां कापसाचा बोळा घालून ठेवल्यास ते स्नायु पुनः ताळ्यावर येतात, व नंतर अफू, बेलाडोना, नोव्होकाईन् वगैरे औषधांची एक गोळी योनिमार्गांत घातल्यास सर्व सुरळीत होतें.

समागमानंतर जंतुनाशक पाण्यानें योनिमार्ग धुतल्यास रेतजंतु मरण्याचा संभव असतो, तेव्हां ज्यांस मुलें पाहिजे असतील त्यांनीं जंतुनाशक पाणी वापरूं नये. परन्तु योनिमार्ग वारंवार साफ न धुतल्यास त्यांत आम्लता उत्पन्न होते. संयोगाचे वेळीं रेतस्राव गर्भाशयापासून लांब झाल्यास रेतजंतु गर्भाशयाशीं पोंचेपर्यंत वाटेंतच या आम्लतेमुळें मरण्याचा संभव असतो. याकरतां एक लिटर ( ३५ औंस, दारूची मोठी बाटली ) पाण्यांत ५: ग्रेन ' सोडिअम् बोरेट् ' घालून त्या पाण्यानें समागमापूर्वी योनिमार्ग धुतल्यास त्याची आम्लता नाहींशी होईल.

कधीं कधीं योनिमार्गाच्या व गुदद्वाराच्या मधला भाग फाटल्यामुळें योनिमार्गाचें तोंड पसरलेलें राहतें व समागमानंतर रेत लगेच बाहेर पडून जातें. ही स्थिति शस्त्रक्रियेनें दुरुस्त केल्यावर गर्भधारणा होऊं शकते. कधीं गर्भाशयाचें टोंक फार निमुळतें असून त्याचें तोंड लहान असतें. अशा वेळीं त्यांत नळ्या घालून किंवा कापून तें मोठें करतां येतें व तें पुनः मिळून येऊं नये म्हणून त्यांत कांहीं दिवस चांदीची नळी घालून ठेवतात.

गर्भाशयाचे तोंडास कोणत्याही कारणानें सूज येऊन वहात असल्यास त्यावर औषधोपचार करावा लागतो किंवा टोंक कापून काढावें लागतें. अशा स्त्रीला नंतर गर्भधारणा झाल्यास निदान पहिले चार महिने शक्य तितका वेळ पडून रहावें लागतें.

कधीं गर्भाशयाचा वरचा भाग दुमडून पडल्यामुळें गर्भाशयास घडी पडून आंतील मार्ग बंद होतो. अशा वेळींही वरीलप्रमाणें आंत नळी घालून ठेवल्यानें काम होऊं शकतें. गर्भाशयास आंतून सूज आली असल्यास त्यावर उपचार किंवा शस्त्रक्रिया न केल्यास गर्भपात होतो.

वांझपणाचें एक प्रमुख कारण म्हणजे अंडवाहक नलिका आंतून सुजल्यामुळें वाट बंद होणें, व याचें कारण बहुधा परमा असतो. बऱ्याच स्त्रियांस हा विकार नवऱ्यापासून लागतो व त्याची त्यांस दादही नसते. या नलिकांची तपासणी करण्याचे अलीकडे दोन नवीन मार्ग निघाले आहेत. पहिला मार्ग असा. या नलिकांत आक्सिजन् किंवा कॅर्बोनिक ॲसिड् वायु भरण्याकरतां एक यंत्र मिळतें. ऋतुस्रावानंतर पांचसहा दिवसांनीं, योनिमार्ग स्वच्छ धुवून, यंत्रानें ताणून धरून वरील यंत्राच्या नळीचें तोंड गर्भाशयांत घालतात. गर्भाशयाच्या अरुंद भागानें ही नळी दाबली जाऊन वाट बंद होते. ती बंद झाली आहे कीं नाही हें पाहण्याकरतां योनिमार्गांत पाणी घालून नळीजवळ बुडबुडे येतात कीं काय हें पाहतात. ही नळी बरोबर बसली म्हणजे यंत्रांतील दाब बेतानें वाढवून आंत वायू भरतात, म्हणजे नलिकांतून तो जातो कीं नाहीं हें समजतें. नळ्या बंद असल्यास यंत्रांतील दाब कमी होण्याऐवजीं वाढेल. एकादे वेळीं या दाबानेंच बंद असलेली नलिका उघडते, परंतु दाब फार वाढवणें धोक्याचें आहे.

नलिका साफ खुल्या असल्यास व गर्भाशयांत दोष नसल्यास अंडाशयांनच दोष असू शकेल, परंतु गर्भाशयांत रेत पोंचण्यासच कांहीं अडथळा आहे असें वाटल्यास पिचकारीनें गर्भाशयांत रेत घालणें शक्य आहे व त्यानें गर्भधारणा होईल. अंडवाहक नलिका किंचित् उघड्या असल्यास वेगवेगळ्या आधुनिक किरणांचे प्रयोग, औषधोपचार किंवा चंपी यांचा उपयोग होईल. त्या साफ बंद असल्यास कोठें बंद आहेत हें समजण्याकरतां वर सांगितल्यापैकीं दुसरा मार्ग वापरतात तो असा. लिपिऑडॉल् नांवाचें एक पातळ औषध मिळतें तें पिचकारीनें गर्भाशयांत घालतात व घालीत असतां क्ष-किरणांचे सहाय्यानें फोटो घेतात. या योगानें तें औषध नळ्यांत कोठपर्यंत पोंचतें व अडथळा कोठें होतो हें समजतें. नळ्यांच्या मोकळ्या टोंकांजवळ अडथळा असल्यास शस्त्रानें काढून टाकणें शक्य असतें, परंतु तो गर्भाशयाजवळच्या भागांत असल्यास शस्त्रक्रियेचा उपयोग होण्याचा संभव कमी. परंतु नळी सर्वथ खराब झाली असली तरी एक अंडाशय काढून तो गर्भाशयाच्या वरच्या कोपऱ्यांत बसवल्यानंतर गर्भधारणा झाल्याची उदाहरणें आहेत.

अंडाशयासही पुष्कळ रोग होतात व त्यामुळें रजोगोलच पक्क होत नाहींत. कधीं त्यांची पूर्ण वाढ न झाल्यामुळें ऋतुस्राव फारसा होत नाहीं, जननेंद्रियाची व जघनाची वाढ खुंटते व कामेच्छाही कमी असते. अशा वेळीं आरंभींच इतर प्राण्यांच्या अंडाशयाचें चूर्ण किंवा अर्क वगैरे आधुनिक औषधांचा परिणाम जादूसारखा होऊन शरिराची वाढ पूर्ण होते. परंतु हें लांबणीवर टाकल्यास उपयोग होत नाहीं. तरीपण योग्य वाढ झाल्यानंतर केव्हांही अंडाशयाचें कार्य कमी पडल्यास याचा उपयोग होतो.

योनिमार्ग, गर्भाशय व नलिका यांत कोठेंही अडचण नसून अंडाशयही आपलें कार्य करीत असेल तर दोष स्त्रींत नसून नवऱ्यांत असणें शक्य आहे. त्याची तपासणी अधिक सोपी असल्यामुळें ती स्त्रीचे अगोदरच करणें बरें. त्याच्या रेतामध्यें जिवंत व सुदृढ रेतजंतु सांपडतात कीं नाहीं हें पहावें लागतें व ते मुळींच नसल्यास किंवा मेलेले असल्यास गर्भधारणा शक्य नाहीं. नवरा डॉक्टराकडे जाण्यास तयार अस-

ल्यास ठीकच, नाहींतर रेत त्याच्या नकळतही तपासतां येतें. समागमानंतर दोन तासांचे आंत स्त्री दाक्तराकडे गेल्यास योनिमार्गांतून रेताचा अंश काढून सूक्ष्म-दर्शक यंत्रानें तपासतां येईल. अशा रीतीनें कधीं रेतजंतु मेलेले सांपडतात, पण बहुधा जिवंत असून लहान किंवा अपूर्ण वाढ झालेले सांपडतात. अशा मनुष्यास फॉस्फोरिक ॲसिड्, झिंक फॉस्फाइड् किंवा अंडाचें चूर्ण किंवा अर्क दिल्यानें उपयोग होतो. रेतांत रेतजंतु मुळींच नसल्यास, एक तर गालगुंडांमुळें, ब्रह्मचर्यामुळें किंवा इतर कांहीं कारणामुळें अंडयुग्म सुकून गेलें असलें पाहिजे, किंवा रेतवाहक नलिका बंद झाल्या असल्या पाहिजेत. या पुष्कळ वेळां परम्याच्या किंवा क्षयाच्या जंतूंमुळें बंद होतात व अशा वेळीं शस्त्र-क्रियेचा कधीं कधीं उपयोग होतो. निरनिराळ्या तज्ज्ञांचे मतें शेंकडा १० पासून ५० वेळां वांझपणाचें कारण पुरुष असतो. कधीं कधीं स्त्रीच्या फाजील लठ्ठ-पणामुळें गर्भधारणा होत नाहीं. ती कांहीं महिने दुग्धाहारावर राहिल्यास मेद झडून जाईल. चंपी व गरम पाण्याचें स्नान यांचाही याच दिशेनें उपयोग होतो.

संततीची इच्छा असलेल्या जोडप्यानें संभोगांत नेमस्तपणा राखला पाहिजे, म्हणजे सामान्यतः तो साप्ताहिक ठेवण्यास हरकत नाहीं. स्त्रीच्या कामेच्छेचा किंवा कामतृप्तीचा गर्भधारणेशीं कांहीं संबंध नसतो व बलात्कारानेंही गर्भधारणा होते. ऋतुस्रावापूर्वीच्या आठवड्यांत गर्भधारणेचा संभव सर्वांत कमी असतो व नंतरच्या आठवड्यांत सर्वांत जास्त असतो, परंतु महिन्यांतील कोणत्याही दिवशीं—ऋतुस्रा-वाचे दिवसांत सुद्धां—गर्भधारणा होणें शक्य आहे.

समागमाच्या कोणत्या आसनांत गर्भधारणेचा संभव सर्वांत अधिक असतो, याचें उत्तर स्त्रीपुरुषांच्या इंद्रियांच्या परस्पर प्रमाणावर अवलंबेल. गर्भाशयाचें व पुरुषाच्या इंद्रियाचें द्वार रेतस्रावाचे वेळीं बरोबर समोरासमोर येऊन लागल्यास गर्भधारणेचा संभव सर्वांत अधिक होईल हें उघड आहे. यापेक्षां जास्त खुलासा येथें देतां येत नाहीं.

---

## संततिनियमनावरील कांहीं आक्षेप

' कृत्रिम संततिनियमनासंबंधीं कांहीं भ्रममूलक समजुती ' अशा नांवाचें एक २४ पानी इंग्रजी पुस्तक एका वाचकानें आमचेकडे पाठवलें आहे. यास एका डॉक्टरानें प्रस्तावना लिहिली आहे, परंतु त्यानें लेखकाविषयीं कांहीं माहिती दिली नाहीं ( लेखक ' मे. एज्'). या लेखकाचें व ईश्वराचें बरेंच खासगी हितगुज असावें असें खालील विधानांवरून वाटतें. १. ईश्वराची संपत्ति सर्वांच्या उपयोगाकरतां दिलेली आहे, परंतु मनुष्याच्या चुकीमुळें कांहीं लोक मात्र श्रीमंत होतात ' ( म्हणजे ईश्वराला इच्छा असतांही स्वतःच्या संपत्तीची विल्हेवाट मनासारखी लावतां आली नाहीं ! सं. ) २. निसर्ग हें ईश्वराचें पुस्तक आहे. ३. ज्या सत्तेनें जग निर्माण केलें तिला आपल्याला फसवतां येणार नाहीं...ईश्वराशीं ज्यांची इतकी सलगी आहे, ते सामान्य लोकांशीं युक्तिवाद करण्याच्या भानगडींत पडतात कां ? ईश्वराचें असुक मत आहे इतकी बातमी दिली म्हणजे यापेक्षां आणखी हे काय सांगणार ? वास्तवीक हें सर्व ढोंग असतें. मनास वाटेल तें विधान ठोकून द्यायचें व त्याला सयुक्तिक आधार सांपडला नाहीं म्हणजे ईश्वराला पुढें ढकलायचा, हें स्वतःच्या कमकुवतपणाचें निदर्शक आहे. यांतील इतर कांहीं मुद्दे पाहूं.

१. पशुपक्ष्यांमधें समागम संततीपुरताच होतो ( हें विधान खोटें आहे, जुलै १९२७ चा अंक पहा ) २. मनुष्य प्रथम या बाबतींत इतर प्राण्यांसारखाच होता, परंतु त्यास विचार करतां येऊं लागल्यापासून त्याला त्यापेक्षां उच्च किंवा नीच पायरीवर जाणें शक्य झालें. तो उच्च पायरीवर गेला असता तर इतर प्राण्यांप्रमाणेंच नियतेंद्रिय राहिला असता ( मग ही पायरी उच्च कशी ? सं. ) व लोकसंख्येची वाढ झाल्यावर संयमन अधिकाधिक वाढवून समागम वर्षांतून एकदां करण्याऐवजीं पुष्कळ वर्षांतून एकदां करणें, किंवा फक्त तरुणांनींच समागम करावा अशी व्यवस्था करणें कठिण पडलें नसतें. (उचलली जीभ आणि लावली टाळ्याला ! या मूर्खपणाला उत्तर देण्याचें कारण दिसत नाहीं. आमच्या मनांत आलें नाहीं, नाहींतर हिमालय पर्वत एका हातानें उचलून केव्हांच फेंकून दिला

ल्यास ठीकच, नाहींतर रेत त्याच्या नकळतही तपासतां येतें. समागमानंतर दोन तासांचे आंत स्त्री डाक्तराकडे गेल्यास योनिमार्गांतून रेताचा अंश काढून सूक्ष्म-दर्शक यंत्रानें तपासतां येईल. अशा रीतीनें कधीं रेतजंतु मेलेले सांपडतात, पण बहुधा जिवंत असून लहान किंवा अपूर्ण वाढ झालेले सांपडतात. अशा मनुष्यास फॉस्फोरिक ॲसिड्, झिंक फॉस्फाइड् किंवा अंडाचें चूर्ण किंवा अर्क दिल्यानें उपयोग होतो. रेतांत रेतजंतु मुळींच नसल्यास, एक तर गालगुंडांमुळें, ब्रह्मचर्यामुळें किंवा इतर कांहीं कारणामुळें अंडयुग्म सुकून गेलें असलें पाहिजे, किंवा रेतवाहक नलिका बंद झाल्या असल्या पाहिजेत. या पुष्कळ वेळां परम्याच्या किंवा क्षयाच्या जंतूंमुळें बंद होतात व अशा वेळीं शस्त्र-क्रियेचा कधीं कधीं उपयोग होतो. निरनिराळ्या तज्ज्ञांचे मतें शेंकडा १० पासून ५० वेळां वांझपणाचें कारण पुरुष असतो. कधीं कधीं स्त्रीच्या फाजील लठ्ठ-पणामुळें गर्भधारणा होत नाहीं. ती कांहीं महिने दुग्धाहारावर राहिल्यास मेद झडून जाईल. चंपी व गरम पाण्याचें स्नान यांचाही याच दिशेनें उपयोग होतो.

संततीची इच्छा असलेल्या जोडप्यानें संभोगांत नेमस्तपणा राखला पाहिजे, म्हणजे सामान्यतः तो साप्ताहिक ठेवण्यास हरकत नाहीं. स्त्रीच्या कामेच्छेचा किंवा कामतृप्तीचा गर्भधारणेशीं कांहीं संबंध नसतो व बलात्कारानेंही गर्भधारणा होते. ऋतुस्रावापूर्वींच्या आठवड्यांत गर्भधारणेचा संभव सर्वांत कमी असतो व नंतरच्या आठवड्यांत सर्वांत जास्त असतो, परंतु महिन्यांतील कोणत्याही दिवशीं—ऋतुस्रावाचे दिवसांत सुद्धां—गर्भधारणा होणें शक्य आहे.

समागमाच्या कोणत्या आसनांत गर्भधारणेचा संभव सर्वांत अधिक असतो, याचें उत्तर स्त्रीपुरुषांच्या इंद्रियांच्या परस्पर प्रमाणावर अवलंबेल. गर्भाशयाचें व पुरुषाच्या इंद्रियाचें द्वार रेतस्रावाचे वेळीं बरोबर समोरासमोर येऊन लागल्यास गर्भधारणेचा संभव सर्वांत अधिक होईल हें उघड आहे. यापेक्षां जास्त खुलासा येथें देतां येत नाहीं.

---

# संततिनियमनावरील कांहीं आक्षेप

' कृत्रिम संततिनियमनासंबंधीं कांहीं भ्रममूलक समजुती ' अशा नांवाचें एक २४ पानी इंग्रजी पुस्तक एका वाचकानें आमचेकडे पाठवलें आहे. यास एका डॉक्टरानें प्रस्तावना लिहिली आहे, परंतु त्यानें लेखकाविषयीं कांहीं माहिती दिली नाहीं ( लेखक ' मे. एज्'). या लेखकाचें व ईश्वराचें बरेंच खासगी हितगुज असावें असें खालील विधानांवरून वाटतें. १. ईश्वराची संपत्ति सर्वांच्या उपयोगाकरतां दिलेली आहे, परंतु मनुष्याच्या चुकीमुळें कांहीं लोक मात्र श्रीमंत होतात ' ( म्हणजे ईश्वराला इच्छा असतांही स्वतःच्या संपत्तीची विल्हेवाट मनासारखी लावतां आली नाहीं ! सं. ) २. निसर्ग हें ईश्वराचें पुस्तक आहे. ३. ज्या सत्तेनें जग निर्माण केलें तिला आपल्याला फसवतां येणार नाहीं...ईश्वराशीं ज्यांची इतकी सलगी आहे, ते सामान्य लोकांशीं युक्तिवाद करण्याच्या भानगडींत पडतात कां ? ईश्वराचें अमुक मत आहे इतकी बातमी दिली म्हणजे यापेक्षां आणखी हे काय सांगणार ? वास्तवीक हें सर्व ढोंग असतें. मनास वाटेल तें विधान ठोकून द्यायचें व त्याला सयुक्तिक आधार सांपडला नाहीं म्हणजे ईश्वराला पुढें ढकलायचा, हें स्वतःच्या कमकुवतपणाचें निदर्शक आहे. यांतील इतर कांहीं मुद्दे पाहूं.

१. पशुपक्ष्यांमधें समागम संततीपुरताच होतो ( हें विधान खोटें आहे, जुलै १९२७ चा अंक पहा ) २. मनुष्य प्रथम या बाबतींत इतर प्राण्यांसारखाच होता, परंतु त्यास विचार करतां येऊं लागल्यापासून त्याला त्यापेक्षां उच्च किंवा नीच पायरीवर जाणें शक्य झालें. तो उच्च पायरीवर गेला असता तर इतर प्राण्यांप्रमाणेंच नियतेंद्रिय राहिला असता ( मग ही पायरी उच्च कशी ? सं. ) व लोकसंख्येची वाढ झाल्यावर संयमन अधिकाधिक वाढवून समागम वर्षांतून एकदां करण्याऐवजीं पुष्कळ वर्षांतून एकदां करणें, किंवा फक्त तरुणांनींच समागम करावा अशी व्यवस्था करणें कठिण पडलें नसतें. (उचलली जीभ आणि लावली टाळ्याला ! या मूर्खपणाला उत्तर देण्याचें कारण दिसत नाहीं. आमच्या मनांत आलें नाहीं, नाहींतर हिमालय पर्वत एका हातानें उचलून केव्हांच फेंकून दिला

असता ! सं. ) ३. मनुष्याची शारिरीक व मानसिक शक्ती कामतृप्तींत फुकट गेली नसती, तर ती अतिशय वाढली असती. (समागमानें मनुष्याची शक्ति कमी होते ही कल्पना निराधार आहे. सं. ) ४ बलात्कार, वेश्यावृत्ति, गुप्त रोग हे मनुष्याच्या स्वार्थाचे परिणाम आहेत. ( इतर प्राण्यांत बलात्कार होत नसल्यास त्याचें कारण मादीची शक्ति नरापेक्षां कमी नसते हेंच होय; नराला मादीविषयीं आदर वाटतो असें दिसत नाहीं. वेश्यावृत्ति स्वार्थाचा परिणाम असल्यास सुतारकी किंवा इतर कोणताही धंदा स्वार्थाचाच परिणाम आहे ! गुप्त रोग हा विशिष्ट जंतूंचा परिणाम आहे, स्वार्थाचा नव्हे. सं. ) ५ रोमन बादशहा जेवून पोट भरल्यानंतर ओकण्याचें औषध घेऊन पोट रिकामें झाल्यावर पुनः जेवावयास बसत असत, कृतिम संततिनियमन याच प्रकारचें आहे. ( या दोहोंत साम्य आहे असें वाटण्याइतकें कोणाचें डोकें मठ्ठ असेल अशी आमची कल्पना नव्हती. एखादा मनुष्याची कामतृप्ति झाल्यावर देखील जर तो औषधांच्या सहाय्यानें पुनः समागम करूं पाहील, तरच त्याची वरील रोमन बादशहांशीं तुलना करतां येईल. याचा संततिनियमनाशीं काय संबंध ? संतति व कामतृप्ति या दोहोंचा बिलकुल संबंध नसतो. संतति नको असल्यास समागम करूं नये असें म्हणणारे म. गांधींसारखे कांहीं विक्षिप्त लोक असले तरी समंजस माणसास त्यांजकडे लक्ष देण्याचें कारण नाहीं. सं. ) ६. संततिनियमन म्हणजे स्वार्थ आहे. ( अलबत आहे, परंतु त्यांतच समाजाचेंही हित आहे; शिवाय संगोपनाची ताकत नसतांही संतति निर्माण करून ती भुकेने मरूं देणारांस किंवा त्यांची जबाबदारी इतरांवर लादणारांस निःस्वार्थी म्हणायचें काय ? सं. )

---

## डोळ्यांची काळजी

प्रकृति नीट असल्यास दररोज चेहरा धुतेवेळीं डोळे धुणें बस आहे. परंतु डोळे हें अत्यंत नाजूक इंद्रिय आहे व ते कधींकधीं दुखतात व त्यांतून पाणी येतें. श्रम, जागरण किंवा दिव्यांचा उजेडाच्या हा परिणाम असल्यास डोळ्यांस विश्रांति

देणें व दिवसाच्या चांगल्या उजेडाशिवाय काम न करणें इतका उपाय पुरे आहे. परंतु पुष्कळ वेळां डोळ्यांच्या रचनेंतच दोष असतो, किंवा रोगही असूं शकेल.

**मायोपिआ.** वाचतांना पुष्कळ लोकांस पुस्तक फार जवळ धरावें लागतें, त्यास मायोपिआ म्हणतात. यास उपाय न केल्यास तो वाढत जाऊन डोळ्यांस पाणी येऊं लागतें. नंतर पुस्तक जवळ धरूनही धड दिसत नाहीं व विनाकारण श्रम होतात. यास योग्य चष्मा लावणें हा एकच उपाय आहे. परंतु चष्मा कोणता लावावा हें डॉक्टराकडून ठरवून घ्यावें, स्वतः ठरवूं नये.

याचे उलट प्रकार, म्हणजे पुस्तक फाजील लांब धरावें लागणें, यालाही चष्मा लावणें हाच उपाय आहे. अर्थात हा वेगळ्या प्रकारचा असतो. चांगल्या डोळ्यांस १२, १३ इंचांच्या अंतरावरून पुस्तक वाचतां आलें पाहिजे. तसें न आल्यास चष्मा लावावा.

' मायोपिआ 'ची प्रवृत्ति कधीं कधीं आनुवंशिक असते, परंतु तो बहुधा लहानपणीं हयगय झाल्यामुळें होतो. १२ इंचांपेक्षां कमी अंतरावर कधींही पुस्तक धरूं न दिल्यास हा दोष पुष्कळ कमी होईल. हा दोष जन्मतः नसतो, बहुधा शाळेच्या वयांत होतो. हा टाळण्याकरतां अभ्यासाचे किंवा शाळेचे खोलींत उजेड फक्त डाव्या बाजूनें व पुरेसा असावा. टेबल व खुर्ची किंवा बांक यांची उंची विद्यार्थ्यांच्या उंचीच्या मानानें असावी, ती अशी कीं त्यांस वांकल्याशिवाय लिहितां वाचतां आलें पाहिजे. शिवणकाम, कशिदा वगैरे बारकाईचीं कामें करण्यापूर्वी स्त्रियांनीं आपली दृष्टि तपासून घ्यावी व दाक्तरानें परवानगी न दिल्यास करूं नये.

याशिवाय डोळ्यांच्या पापण्यांस व डोळ्यांसही अनेक रोग होऊं शकतात. पापण्यांची आंतील बाजू सुजून दुखूं लागते व सकाळीं उठतांना डोळे चिकटलेले असतात, याला डोळे येणें म्हणतात. हे कधीं कधीं खूप गरम ( उकळलेल्या ) पाण्यानें वारंवार धुतल्यास बरे होतात. याकरतां डोळे धुण्याचा पेला मिळतो तो वापरावा. परंतु पू झाल्यास दाक्तराकडे जावें. शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं सांगितलेलीं औषधें करूं नये. कधीं कधीं मूल उपजतांना आईच्या योनिमार्गांतील परम्याचे जंतु डोळ्यांत

गेल्यामुळें दोन पासून पांच दिवसांत मुलाचे डोळे येतात व उपाय न केल्यास मूल आंधळें होतें, परंतु लगेच उपाय केल्यास डोळे वांचतात. डॉक्टर जवळ नसल्यास मूल उपजल्याबरोबर डोळे स्वच्छ कापसानें पुसून घेऊन डोळ्यांत लिंबाच्या रसाचे कांहीं थेंब पिळावे, म्हणजे काम होईल. हा रोग अत्यंत सांसर्गिक आहे. पुवाचा थोडासा अंश जरी कोणाच्या डोळ्यांत गेला तरी रोग होण्यास पुरे होतो. याकरतां डोळ्यास लागलेले हात फार काळजीपूर्वक जंतुनाशक औषधानें धुतले पाहिजेत. स्त्रिया कधीं कधीं डोळे आलेल्या मुलास जवळ घेऊन त्यांचें चुंबन घेतात व त्यांचे स्वतःचे डोळे जाण्याची वेळ येते. डोळे आलेल्या मुलास कधींही जवळ घेऊं नये.

**रांजणवाडीः**—झाल्यास एका औंसास २० ग्रेन या प्रमाणांत पाण्यांत 'बोरिक् ॲसिड्' मिसळून, तें खूप गरम करून त्यानें डोळा वारंवार धुवावा व पोट साफ ठेवावें.

---

**गर्मीचा उगम.** सुधारलेल्या राष्ट्रांत गर्मी हा रोग प्रथम कसा आला याबद्दल बराच मतभेद आहे. कांहीं लेखकांचें म्हणणें आहे कीं मध्य अमेरिकेंतील इंका नांवाच्या लोकांतील दंतकथांवरून या रोगाचा उगम तेथें झाला असावा असें दिसतें. हा रोग तेथील लामा नांवाच्या प्राण्यास प्रथम होता असें कांहीं तज्ज्ञ म्हणतात. ( या प्राण्याची लोंकर प्रसिद्ध आहे. ) गर्मीचा व्रण इंद्रियावर असलेल्या मनुष्याशीं समागमानें लामाच्या मादीस गर्मी झाली असें आढळलें. नंतर या प्राण्यांमधें एकापासून दुसऱ्यास असा १५० वेळां संसर्ग होण्याची व्यवस्था केली व यांतील शेवटच्या प्राण्याच्या अंगांतील रोगजंतु प्रयोगशाळेंत चुकून एका मनुष्याच्या रक्तांत शिरल्यामुळें त्याला गर्मी झाली. या रोगाचे परिणाम लामावर व मनुष्यावर सारखेच होतात. या संबंधीं आणखी प्रयोग चालू आहेत.

---

## वस्त्र कसे असावे ?

धुळीपासून, थंडीवाऱ्यापासून व सामान्यतः आघातांपासून शरीराचें रक्षण करणें हें वस्त्राचें काम आहे. परंतु इतकें करूनही नेहमींचीं कामें करण्यास त्यानें

अडचण होऊं नये. त्यांत हवा खेळली पाहिजे, कारण त्वचेच्या व्यापारास हवेची जरूर असते. तें सहज धुतां आलें पाहिजे, याकरतां रेशमी वस्त्र अंगाबरोबर वापरूं नये.

अंगापेक्षां सभोंवतालची हवा थंड असल्यास अंगांतील उष्णता बाहेर जाते, म्हणून थंड प्रदेशांत वस्त्रें ऊबदार असावीं, म्हणजे उष्णतावाहक नसावीं. हवा सर्वांत कमी उष्णतावाहक असते, याकरतां ज्यांचे योगानें शरिराजवळ एकच हवेचा थर कायम राहील, अशीं वस्त्रें सर्वांत ऊबदार असतात. अर्थात वस्त्र कशाचें विणलें आहे यापेक्षां तें कसें विणलें आहे हें अधिक महत्त्वाचें असतें. बारीक धाग्याचा व दाट विणीचा कपडा जाड धाग्याच्या व सैल विणीचा कपड्याइतका ऊबदार नसतो, कारण त्यांत हवा कोंडून राहूं शकत नाहीं. वर जरी विणीचें महत्त्व अधिक सांगितलें तरी लोंकरीच्या स्वभावधर्मामुळें तिच्या धाग्यांत अधिक हवा राहूं शकते, यामुळें लोंकरीचा पातळ कपडाही ऊबदार असतो व जाड कपडा अधिकच ऊबदार असतो.

त्याचप्रमाणें जेव्हां अंगांतील उष्णता बाहेर जावयास पाहिजे असेल तेव्हां तागाचा किंवा कापसाचा कपडा बरा. मात्र शरीरापेक्षां बाहेरील उष्णता जास्त असल्यास लोंकरीचा बरा, म्हणजे बाहेरील उष्णता आंत येणार नाहीं.

कपड्याचा ऊबदारपणा रंगावरही अवलंबतो. काळा कपडा सर्वांत अधिक ऊबदार; त्यानंतर निळा, तांबडा, दाट हिरवा, फिका हिरवा, खाकी, पिंवळा व पांढरा असा अनुक्रम येईल. सारांश जेव्हां उष्णतेपासून संरक्षण पाहिजे असेल तेव्हां पांढरे किंवा उजळ रंगाचे कापसाचे व तागाचे पातळ कपडे वापरावे. परंतु हवेची उष्णता शरीरापेक्षां जास्त असेल तेव्हां पांढऱ्या लोंकरीचे पातळ कपडे वापरणें बरें. थंड प्रदेशांत हिवाळ्यांत लोंकरीचे काळे जाड कपडे बरे.

वस्त्रांत हवा खेळली पाहिजे, म्हणून रबराचे किंवा रबर घातलेले कपडे फार वेळ घालूं नये, कारण त्यांतून हवा जात नाहीं. या दृष्टीनें पाहतां लोंकरीची फ्लॅनेल सर्वांत चांगली, नंतर कापसाची फ्लॅनेल, नंतर लोकरीचें, कापसाचें, रेशमाचें व तागाचें विणकाम व नंतर तागाचें व कापसाचें कापड असे नंबर लागतील. अर्थात पातळ कपड्यांत हवा जास्त खेळल.

कपडा ओला किंवा कोरडा असेल त्याप्रमाणें वरील गुणांत फरक पडतो. कोरडी हवा उष्णतावाहक नाहीं, परंतु ओली हवा अत्यंत उष्णतावाहक आहे, म्हणून ओलीं किंवा दमट वस्त्रें अंगावर ठेवूं नये. याच कारणाकरतां रात्रीं निजतांना कपडे बदलणें चांगलें. लोंकर लौकर भिजतही नाहीं व वाळतही नाहीं, म्हणून घाम किंवा पावसाचें पाणी वाळण्याकडे उष्णता खर्च झाल्यामुळें सरदी होण्याचा संभव कमी. तागाचा कपडा फार लवकर वाळतो. कापसाचा कपडा या दोहोंच्यामध्यें येईल व रेशमी कपडा तागाइतकाच वाईट. शिवाय लोंकरीचा कपडा भिजला तरी त्यांतून हवा जाऊं शकते, तशी इतर कपड्यांतून जात नाहीं.

सारांश तागाचा किंवा कापसाचा पातळ व मऊ कपडा अंगाशीं वापरणें बरें, परंतु बाहेरचा कपडा लोंकरीचा बरा. अंगाजवळचा कपडा वारंवार धुवावा लागतो, यामुळेंही ताग किंवा कापूसच बरा. शिवाय लोंकरीचा कपडा अंगाशीं घातल्यास त्याच्या घर्षणानें त्वचेवर फोड येतात.

दररोज स्नान करणें, शरीर शक्य तितकें स्वच्छ राखणें, तसेंच अंगाजवळचे कपडे ऐपतीप्रमाणें शक्य तितके लवकर बदलणें, हें प्रत्येकाचें सामाजिक कर्तव्य आहे. समाजांतील उच्च व नीच वर्गांत कोणत्याही देशांत हाच फरक दिसून येतो. परंतु उच्च व नीच वर्गांचा इतका निकट संबंध येतो कीं नीच वर्गांच्या अस्वच्छतेपासून उच्च वर्गांसही धोका पोंचतो. कोणत्याही देशांत जोंपर्यंत या स्वच्छतेच्या कल्पना नीच वर्गांपर्यंत पसरलेल्या नाहींत तोंपर्यंत तो सुधारण्यास पुष्कळ जागा आहे. दुर्दैवानें जगाच्या पाठीवर असा एकही देश नाहीं कीं ज्यांत गलिच्छ लोक नाहींत. अर्थात देश जितका जास्त गरीब, तितके त्यांत गलिच्छ लोक जास्त, परंतु गरीब लोकांसही स्वच्छता म्हणजे काय हें समजल्यास ते हल्लींपेक्षां स्वच्छ राहूं शकतील. पुष्कळ रोगांचा फैलाव गलिच्छ कपड्यांमुळें होतो. मळलेले कपडे कोठेंतरी कोंपऱ्यांत टाकूं नये, एखाद्या पिशवींत किंवा पेटींत जमा करून नंतर धोब्याकडे द्यावे. क्षयाचे व इतर जंतु कपड्यांतून पसरूं शकतात व त्यापासून कुटुंबांतील प्रत्येक मनुष्यास व धुणाऱ्या धोब्यासही धोका असतो. संसर्गजन्य रोग्यांचे कपडे साबणाच्या पाण्यांत भिजवून धोब्याकडे पाठवलेले बरें.

## खऱ्या गोष्टी

१. साधूंच्या आशीर्वादांचा मूल होण्याचे कामीं कसा उपयोग होतो हें खालील उदाहरणावरून दिसेल. रूपानें व अकलेनें चिंगूताईसारखी मुलगी हजारांत एक मिळायची नाहीं. तिच्या बापानें तिचें लग्न एका श्रीमंत परंतु मठ्ठ, लठ्ठ व कुरूप नवऱ्याशीं लावून दिलें होतें. हो, कोणीकडून मुलगी सुखांत पडल्याशीं कारण. हिंदु बायकांचें नवऱ्यावर नेहमींच प्रेम असतें, तेव्हां चिंगूताईचेंही होतें असें आपण धरून चालूं. लग्नाला पुष्कळ वर्षें झालीं तरी त्यांना मूल होईना व इस्टेटीला वारस तर पाहिजे होता व चिंगूताईला मूलही पाहिजे होतें. नवसांचा कांहीं उपयोग होईना, शेवटीं दाक्तराकडून तपासून घेतलें. तेव्हां नवऱ्याच्या वीर्यांतील जंतु जिवंत नसल्यामुळें मूल होणें शक्य नाहीं असें दाक्तरानें सांगितलें. कांहीं दिवसांनीं नवऱ्याला कांहीं कामाकरतां बाहेरगांवीं जावें लागलें, तेव्हां बायकोची करमणूक करण्यास आपल्या मित्रमंडळीस सांगून तो निघून गेला. चिंगूताईनेंही मन मोकळें करून आठ दिवस यथेच्छ चैन करून घेतली. येथपर्यंत ठीक झालें, परंतु नवरा परत आल्यावर पहिलीच पाळी चुकण्याचा रंग दिसूं लागला व आपली चैन बाहेर पडते कीं काय अशी चिंगूताईस भीति पडली. पण ती हुशार असल्यामुळें तिला ताबडतोब युक्ति सुचली. चांगला नजराणा घेऊन ती एका प्रसिद्ध साधूच्या भेटीला गेली. साधू महाराजांच्या शिरस्त्याप्रमाणें त्यांनीं नजराणा घेण्याचें साफ नाकारलें, परंतु त्यांच्या शिष्यांनीं तो ठेवून घेतला, व महाराजांनीं भेटीचा उद्देश विचारून, तुला याच महिन्यांत गर्भ राहून मुलगा होईल असा अशीर्वाद दिला. पुढें चिंगूताईला मुलगी होऊन आंशीर्वाद खोटा ठरला, हा भाग वेगळा, परंतु तिला आशीर्वादाचा चांगलाच उपयोग झाला. साधूंचाही कधीं कधीं उपयोग असतो, तो असा !

२. अशाच प्रकारची एक गोष्ट डॉ. रॉबिनसन् यांनीं दिली आहे. तुला मूल होणें शक्य नाहीं व हा दोष कोणत्याही उपायानें जाणार नाहीं, असें त्यांनीं एका रोग्यास सांगितलें होतें. तोच मनुष्य कांहीं वर्षांनीं बायकोला व दोन मुलांना घेऊन त्यांस भेटण्यास आला, व ' पहा मला मुलें झालींच की नाहीं ?' म्हणून प्रौढी मिरवूं

लागला. तीं मुलें त्याचीं नव्हेत अशी डॉ. रॉबिनसन यांची खात्री होती, परंतु नवराबायकोंत वितुष्ट पडूं नये म्हणून आपली चूक नसतांही कबूल करणें त्यांस भाग पडलें.

३. अशा बाबतींत डाक्तरांस फार काळजी घ्यावी लागते. दोन वर्षें लढाई-वर जाऊन नुकतेच परत आलेले एक गृहस्थ बायकोला डॉक्टरकडे घेऊन गेले. त्यानें तिला तपासून, कांहीं महिने गेले आहेत असें सांगितले ! ते गृहस्थ खूप संतापले तेव्हां तो प्रकार डॉक्तराच्या लक्षांत आला, पण मग काय उपयोग !

---

## फांकलेलें प्रेम ( फ्रेंचवरून )

यूरोपांतील एकपत्नीत्वाचे कायद्यामुळें व तेथें स्त्रियांची संख्या पुरुषांपेक्षां जास्त असल्यामुळें सर्व पुरुषांनीं लग्न केलें तरीही पुष्कळ स्त्रियांस जुलमानें अविवाहित रहावें लागेल. परंतु स्त्रिया हळुहळू आपले हक्क ओळखूं लागल्या आहेत, व संभो-गाचा व मातृत्वाचा हक्क सर्व स्त्रियांस असला पाहिजे हें उघड आहे. या हक्कांसंबंधीं दहा एक वर्षांत बायकांचें बंड होईल व याचा विचार करणें भाग पडेल.

एक स्त्री व दोन पुरुष किंवा एक पुरुष व दोन स्त्रिया असा त्रिकोणी प्रश्न प्रेमाच्या दृष्टीनें प्रत्येक मनुष्यास जन्मांत एकदां तरी पडतोच. अर्थातच लोक हें कबूल करीत नाहींत, व शक्य असल्यास सर्व सुरळीत आहे असें ढोंग करतात. या कारणानें कधीं कधीं खूनही पडतात, परंतु प्रथमपासून प्रेमसंबंधांत सत्याची कांस धरल्यास खून पडण्याचें कारण नाहीं.

' **जॉर्ज सँड्** ' नामधारी फ्रेंच लेखिका व **आलफ्रे द म्युसे** नांवाचा फ्रेंच कवि, यांचें उघड प्रेम व शरीरसंबंध होता. **म्युसे** व्हेनिस् शहरीं अस्वस्थ असतां **जॉर्ज सँडने पॅजेलो** नांवाच्या मनुष्यास प्रेमपत्रिका लिहिली व कांहीं दिवसांनीं त्यांचा एकांतही झाला. पॅजेलो हा म्युसेचा डॉक्टर व मित्रही होता व त्यास हा सर्व प्रकार माहीत होता. त्यानें तिला लिहिलें, ' पॅजेलो मला लिहीत कां नाहीं ? माझी मैत्री कायम आहे असें त्याला कळव. तो फारच उत्तम मनुष्य

आहे व त्यापासून तुला सुखच होईल.' त्याचें सँडवरही प्रेम कायम राहिलें. अर्थात एकाच वेळीं दोन तीन स्त्रियांवर खरें प्रेम ठेवणारे पुरुष असतात हें सांगावयास नकोच. अगदीं अलीकडील एका फ्रेंच कादंबरींत नायकाचें सात स्त्रियांवर प्रेम दाखवलें आहे. यांपैकीं एकींत नसलेले गुण दुसरींत सांपडल्यामुळें सर्वांवर एकदम प्रेम करणें शक्य होतें.

या बाबतींत विशेष सोंवळेपणा दाखवणाऱ्या इंग्रज लोकांतील प्रसिद्ध अॅडमिरल नेलसन् यांचें उदाहरण इतिहासप्रसिद्ध आहे. यांचें व लेडी हॅमिल्टन् यांचें प्रेम तिच्या नवऱ्यास पसंत होतें व हें त्रिकूट पुष्कळ वेळां एकत्र रहात असे.

---

## पतिपत्नींचा परस्पर संबंध

( लिहून आलेला मजकूर )

ववाहिक स्थितींतील स्त्रीपुरुषांच्या परस्पर संबंधापेक्षां फारच थोडे प्रश्न अधिक महत्वाचे असूं शकतील. स्त्रीची व पुरुषाची कामवासना किंवा ती तृप्त करण्याची शक्ति जर समान नसतील तर दोघांना किंवा निदान एकाला तरी शारीरिक व मानसिक त्रास झाल्याखेरीज राहणार नाहीं. आपल्या देशांत निदान पांढरपेशा जातींत तरी, घटस्फोटाची चाल नसल्यामुळें, स्त्रीला त्रास होत असेल तर त्यांतून मुक्त होणें तिला शक्यच नसतें. पुरुषाला मात्र एकाहून अधिक स्त्रिया करण्याची किंवा असलेली स्त्री टाकून देण्याची कायद्यानें व रूढीनें परवानगी दिलेली असल्यामुळें त्याला सहज मोकळें होतां येतें. बऱ्याचशा विवाहित जोडप्यांचें आयुष्य वरून दिसतें तितकें सुखी नाहीं असें सूक्ष्म दृष्टीनें पाहणाऱ्या मनुष्यास दिसून येईल व युरोप अमेरिकेंतील शेंकडा ९०–९५ घटस्फोटांच्या मुळाशीं पतिपत्नींच्या कामवासनेंतील अंतर हेंच असतें असें तेथील मानसशास्त्रवेत्ते व डॉक्टर यांचें मत आहे.

सामाजिक किंवा धार्मिक कोणत्याच प्रश्नाचा केवळ बुद्धिदृष्ट्या विचार करण्याची आपल्याला संवय नाहीं. आपल्याला प्रागतिक समजणारे देखील बरेच लोक खरोखर तसे नसतात. उदाहरणार्थ बालविवाहाचाच प्रश्न घ्या. १०, १२, १४

वर्षाच्या मुलींचीं लग्नें करणें, व अर्थातच त्यानंतर लवकरच त्यांना मुलें होणें, ही गोष्ट अतिशय वाईट असून तीमुळें केवळ व्यक्तीचेंच नव्हे तर सबंध राष्ट्राचें अत्यंत नुकसान होत आहे हें कोणताही विचारी माणूस कबूल करील, कारण कोणत्याही अपरिपक्व व्यक्तीनें मातृपद किंवा पितृपद स्वीकारावें ही गोष्ट भावी पिढीच्या दृष्टीनें अत्यंत त्याज्य आहे. पण अजून देखील असे कित्येक लोक सांपडतात कीं "बालविवाहाची चाल रूढीनेंच आणलेली असून श्रुतींत किंवा स्मृतींत कन्येचें वय लग्नांत १४ असावें असेंच लिहिलेलें आहे," अशा प्रकारचे पुरावे देण्यांत ते रकानेच्या रकाने भरून काढीत असतात. ( उदा. 'रत्नाकर' मासिकाच्या ऑगस्ट १९२८ च्या अंकांतील 'सुखाचा संसार' हा लेख पहा. ) आमच्या मतें पितृपद व मातृपद प्रौढ व्यक्तींनीं व तें देखील जाणूनबुजूनच स्वीकारणें योग्य असल्यामुळें श्रुतिकार व स्मृतिकार या बाबतींत काय म्हणतात हा प्रश्नच उरत नाहीं. आजच्या परिस्थितींत व शास्त्रीय ज्ञानाच्या इतक्या प्रगतीनंतर हजारों वर्षांपूर्वींच्या माणसांचीं मतें प्रचलित प्रश्नांवर घेणे अगदीं मूर्खपणाचें आहे.

स्त्रीपुरुषांच्या वैवाहिक संबंधाचा प्रश्नही अशाच प्रकारचा आहे. स्त्रीला कामवासना असते, किंवा शरीराच्या इतर गरजांप्रमाणें ती तृप्त करून घेणें हा तिचा जन्मसिद्ध हक्क आहे, ही गोष्टच आजपर्यंत आपल्या समाजानें मान्य केलेली नाहीं. तशी ती केलेली असती तर मग पुनर्विवाहास प्रतिबंध करणें, घटस्फोटाला थारा न देणें, इत्यादि गोष्टी घडून आल्या नसत्या. प्रत्येक व्यक्तीला कामेच्छा तृप्त करून घेण्याचा अधिकार आहे असें जेव्हां आम्ही म्हणतों, तेव्हां अर्थात एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवली पाहिजे. कामतृप्तीमध्यें दोन व्यक्तींचा संबंध येत असल्यामुळें ती त्या दोन्ही व्यक्तींच्या संमतीनेंच व्हावयास पाहिजे, त्यांत कोणावरही बळजबरी होतां कामा नये. अर्थात एवढा अपवाद लक्षांत ठेवून कामेच्छा तृप्त करून घेण्याचा प्रत्येक व्यक्तीचा हक्क जो विचारी माणूस मान्य करील, तो अर्थात हेंही मान्य करील कीं ज्या विवाहामध्यें ( एका अगर दोन्ही भागीदारांची ) ती तृप्ति होत नाहीं तो विवाह मोडून टाकला पाहिजे, किंवा दोघांपैकीं एक भागीदार मयत झाल्यास दुसऱ्याला पुन्हा विवाह करण्याची मोकळीक असली पाहिजे. हें तर्कशास्त्र अगदीं सरळ—

आहे व तें ज्याला मान्य नसेल तो पारंपरिक विचारांच्या तावडींतून अजून सुटला नाहीं असें खुशाल समजावें.

कामवासनेची तृप्ति हा विवाहाचा मुख्य उद्देश असून देखील वैवाहिक स्थितींत शिरूं इच्छिणाऱ्या व प्रत्यक्ष शिरणाऱ्या किती व्यक्तींना त्या वासनेविषयीं व तिची तृप्ति कशी होते या संबंधाची माहिती असते? तरुण मुलांमुलींना ही माहिती करून देणें लांबच राहिलें, पण प्रौढ स्त्रीपुरुषांना या विषयासंबंधीं आपापसांत देखील मोकळपणानें बोलणें शक्य नाहीं अशी आपल्या समाजाची स्थिति आहे. मनुष्याच्या शारीरिक व्यापारांची सर्व प्रकारची माहिती प्रत्येक मुलाला व मुलीला करून देणें हें त्यांच्या पालकांचें काम आहे व ते तें सध्या मुळींच करीत नाहींत असें आमचें स्पष्ट मत आहे. योग्य मार्गांनीं व सरळ प्रश्न विचारून ही माहिती मिळत नाहींसें पाहिल्यावर किंवा वाटल्यावर अन्य मार्गांनीं ती मिळवण्याचा प्रयत्न मुलें व मुली करतात व त्याचा परिणाम बहुधा असा होतो कीं त्यांना जी माहिती मिळते ती बहुधा विकृत व कधींकधीं अगदीं चुकीची मिळते, व त्याचे परिणाम त्यांना पुढें कित्येक वर्षें भोगावे लागतात.

आज आपल्या समाजांत अशा कित्येक मुलींचीं लग्नें होत असलीं पाहिजेत कीं ज्यांना स्त्रीपुरुषसंयोग म्हणजे काय याची मुळीं देखील कल्पना असत नाहीं. आणि अशा मुलींची ज्यावेळीं कांहीं दिवसांनीं पतीशीं गांठ पडते, त्यावेळीं प्रथमसंभोगाच्या प्रसंगींच त्यांच्या मज्जातंतूंना इतका जबरदस्त धक्का बसतो, व कित्येकांना तर शारीरिक त्रासही इतका होतो, कीं त्यानंतर संभोगाच्या नुसत्या कल्पनेनें देखील त्यांना धडकी भरते व अखेरपर्यंत ती क्रिया केवळ नाइलाज म्हणून एकाद्या यंत्राप्रमाणें त्या करीत राहतात. पुरुषांच्या पाशवी वृत्तीचाच हा परिणाम आहे असें आमचें म्हणणें नाहीं. या प्रकाराला मुख्य कारण या विषयाचें गाढ अज्ञान हें आहे. स्त्रीपुरुषांची शारीरिक रचना, त्यांच्या अवयवांची ठेवण व कार्यें, कामवासनेचें महत्त्व व दोन्ही व्यक्तींना त्यापासून होणारा अवर्णनीय आनंद, कामवासना प्रथम उद्दीप्त करण्याची जरूरी, प्रथम संभोगाचे वेळीं कुमारिकेच्या इंद्रियरचने-



७

मुळें येणारी अडचण व तीं शक्य तितक्या सावकाशीनें व काळजीनें दूर करण्याची आवश्यकता, संभोगाची पूर्तता स्त्री व पुरुष या दोघांमध्येंही एकदम होण्यामुळें त्यांना होणारे शारीरिक व मानसिक फायदे, कामवासना प्रथम उद्दीप्त होऊन नंतर अतृप्त राहिल्यामुळें शरीरावर होणारे दुष्परिणाम इत्यादि गोष्टींसंबंधाचें संपूर्ण ज्ञान विवाहस्थितींत शिरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला मिळालें पाहिजे व त्याखेरीज वैवाहिक स्थितीमुळें दोन व्यक्तींचें जें तादात्म्य व्हावयास पाहिजे तें होणें फार कठिण आहे. वैवाहिक सुखाचा एक अत्यंत महत्त्वाचा मार्ग म्हणजे कामतृप्तीच्या बाबतींत प्रत्येक व्यक्तीनें आपल्या स्वतःच्या तृप्तीचा विचार न करतां प्रेमाच्या प्रथमस्पर्शापासून तों कामपूर्तीपर्यंत प्रत्येक क्षणाला आपल्या भागीदाराला सुख देण्याचा शक्य तितका प्रयत्न दोघांनींही प्रामाणिकपणें केल्यास त्या दोघांनाही अपरिमित आनंद झाल्याखेरीज राहणार नाहीं. पूर्णपणें प्रौढदशा प्राप्त झालेल्या वधूवरांच्या बाबतींत देखील बहुधा असें आढळून येतें कीं स्त्रीची कामेच्छा निदान प्रथम तरी तितकी प्रबल नसते. अशा वेळीं पुरुषानें केवळ आपल्याच तृप्तीचा विचार न करतां स्त्रीच्या संवेदनांचा जर विचार केला व प्रेमळ वागणुकीनें व संभाषणानें तिची कामेच्छा हळुहळू जागृत केली तर त्याला देखील अननुभूत असें नवीन नवीन सुख आढळून येईल. संभोगक्रिया ही दोन व्यक्तींना इतक्या विलक्षण तऱ्हेनें एकमेकांशीं ग्रथित करते कीं अशा रीतीनें एकमेकांना पूर्ण सौख्य व समाधान देणाऱ्या दोन व्यक्तींचा मानसिक, बौद्धिक व इतर क्षेत्रांतही अधिक मिलाफ झाल्याखेरीज राहणार नाहीं. अर्थात सर्वच जोडप्यांच्या बाबतींत हें शक्य होईल असें नाहीं. कांहीं व्यक्तींची कामवासना प्रमाणापेक्षां इतकी वेगळी असते कीं त्यांना घटस्फोट करून दुसरा भागीदार शोधून काढण्याखेरीज गत्यंतरच नसतें. पण शेंकडा ७०–८० जोडप्यांना तरी वर दिलेलें विवेचन लागू पडेल असें वाटतें.

वरील लेखांत वैवाहिक सौख्याचा सर्वसाधारण विचार केलेला नाहीं, फक्त संभोगक्रियेपुरताच केला आहे. सर्व विचार करावयाचा झाल्यास संततिनियमन, गुप्त रोगांचा प्रतिबंध इत्यादि पुष्कळशा इतर विषयांचाही ऊहापोह करावा लागेल.

शिवाय स्त्री व पुरुष या दोघांनींही परस्परांविषयीं कामेच्छातृप्तीचे बाबतींत किती उदारपणा दाखवणें जरूर आहे व एखादे वेळीं तीं पातिव्रत्यापासून किंवा एकपत्नी-व्रतापासून ढळल्यास देखील त्याकडे कानाडोळा करणें कसें जरूर आहे इत्यादि गोष्टींचा खल करावा लागेल. पण तो पुन्हां एखाद्या लेखांत करण्याचें आश्वासन देऊन आज येथेंच थांबूं.

---

## घटस्फोट

( लिहून आलेला मजकूर )

हिंदू समाजांतील विवाहसंस्थेंत ज्या कित्येक महत्त्वाच्या सुधारणा घडवून आणण्याची आवश्यकता आज सर्व विचारी लोकांस वाटत आहे, त्यांपैकीं घटस्फोट ही एक आहे. हल्लीं हिंदुसमाजाची स्थिति अशी आहे कीं पुरुषाला वाटेल तितक्या स्त्रियांशीं एकाच वेळीं लग्न करतां येतें, पण एक नवरा जिवंत असतांना स्त्रीला दुसरें लग्न करतां येत नाहीं एवढेंच नव्हे तर त्या जिवंत नवऱ्याजवळ राहण्याची तिची इच्छा नसेल तरी तिला घटस्फोटाची परवानगी नसते. एवढेंच नव्हे तर कायद्यानें वैवाहिक संबंध ठेवण्यास बायकोला भाग पाडतां येतें. कायद्याची व रूढीची ही सध्यांची स्थिती असमाधानकारक आहे एवढेंच नव्हे तर स्त्री व पुरुष यांची नीति निरनिराळ्या मापांनीं मोजण्याचें जें एक तत्त्व त्यांत ग्रथित केलेलें आहे, तें अत्यंत वाईट आहे.

कोणत्याही मनुष्याला कोणत्याच वेळीं असें छातीठोक सांगतां येणार नाहीं कीं यापुढें माझीं मतें आतां केव्हांही बदलणार नाहींत. जोंपर्यंत विचार करण्याची शक्ति मनुष्याच्या अंगांत आहे तोंपर्यंत त्याच्या ज्ञानांत भर ही पडणारच व त्याबरो-बरच तो निरनिराळ्या विषयांवरील आपलीं मतेंही बदलणारच. असें असूनही लग्नाच्या बाबतींत मात्र अमूक एक मनुष्य मला आजन्म आवडेल असें प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रीतीनें एखाद्या व्यक्तीकडून कबूल करून घेणें अगदीं अयोग्य आहे. शिवाय सध्यां हिंदूंच्या उच्च जातींत लग्नें वधूवरांच्या संमतीशिवायच होतात असें

म्हणावें लागतें. अर्थात तीं त्यांच्या मताविरुद्ध होतात असा ह्या म्हणण्याचा अर्थ नाहीं; फक्त तीं वधूवरांच्या पसंतीनें न होतां पालकांच्या पसंतीनें होतात एवढेंच काय तें. म्हणजे 'मी जिला फक्त २—३ दां पाहिलें आहे, पण जिच्या स्वभावाबद्दल मला जवळजवळ कांहींच ठाऊक नाहीं अशा एका व्यक्तीवर मी मरेपर्यंत प्रेम करीन व ती मला नेहमी आवडेल,' असेंच ह्यांच्या विवाहसंस्कारांत कबूल करून घेतात असें म्हटल्यास फारसें वावगें होणार नाहीं. ही कबुली स्त्रीला मात्र अक्षरशः पाळावी लागते व पुरुषाला तींतून सहज मोकळें होतां येतें. विवाहित स्त्रीपुरुषांचा संबंध अतिशय निकट व प्रेमाचा असा आहे. नुसतें त्यांना एकाच घरांत, एकमेकांच्या सहवासांत कित्येक वर्षे रहावयाचें असतें एवढेंच नव्हे तर त्यांचा शारीरिक संबंधही अत्यंत निकट असा येतो. अशा स्थितींत किती बारीक सारीक गोष्टींवर एकमेकांविषयींचें प्रेम अवलंबून असतें याची कल्पना सहज होण्यासारखी आहे. व्यक्तिविषयक स्वच्छता, स्वभाव इत्यादि गोष्टींवर तर तें अवलंबून राहीलच पण तें प्रेम टिकाऊ असें होण्यास आणखीही एका महत्त्वाच्या गोष्टीची जरूरी आहे व ती गोष्ट म्हणजे नवरा आणि बायको यांच्या कामेच्छेची प्रबलता कामवासना ही एक साहजिक वासना असून तिची तृप्ति होणें शारीरिक व मानसिक आरोग्यास अत्यंत जरूर आहे हें जरी खरें, तरी प्रत्येक मनुष्याचा आहार ज्याप्रमाणें निराळा असतो त्याचप्रमाणें प्रत्येक व्यक्तीची कामवासनाही वेगवेगळी असते. पतिपत्नींच्या कामवासनेंत जर अतिशय फरक असेल व प्रयत्न करूनही त्यांच्यांत सारखेपणा आणणें शक्य होत नसेल तर एकाची कामवासन अतृप्त राहण्यापेक्षां अथवा एकाच्या तृप्तीकरतां दुसऱ्यावर जुलूम होण्यापेक्षां त्या दोघांना घटस्फोटाची परवानगी ठेवणें हें शहाणपणाचें होणार नाहीं काय ? अर्थात घटस्फोटाची परवानगी दिली म्हणजे घटस्फोट करणाऱ्या व्यक्तींना पुनः विवाह करण्याची परवानगी देणें ओघानेंच येतें, व तीही चाल विधवाविवाहाप्रमाणेंच समाजांत रूढ झाली पाहिजे. असें नसेल तर विशेषतः घटस्फोट करणाऱ्या स्त्रीला आगींतून निघून फुफाट्यांत पडल्यासारखें होणार आहे.

पाश्चात्य देशांत घटस्फोट करून घेतां येतो खरा, पण रशियाखेरीज इतर सर्व-

४३५५

देशांत घटस्फोट करूं इच्छिणाऱ्या व्यक्तीला कोर्टांत आपल्या इच्छेचीं कारणें द्यावीं लागतात, इतकेंच नव्हे तर कांहीं देशांत आपला भागीदार कुमार्गी आहे असें सिद्ध करावें लागतें. अर्थात असें करतांना कोर्टांत कित्येक वेळां इतके गलिच्छ प्रकार घडतात कीं न्यायाधिशाला साक्षीपुरावे खासगी रीतीनें घेण्याची पाळी येते !

आमच्या मतें दोघांपैकीं एकाला जरी विवाह मोडण्याची इच्छा झाली व त्यानें ती योग्य अधिकाऱ्याला कळवली कीं तेंच कारण पुरेसें समजून त्याला घटस्फोट मिळाला पाहिजे. आपल्या सध्यांच्या भागीदारावरोवर न राहण्याची इच्छा हेंच कारण घटस्फोटास पुरेसें समजलें गेलें पाहिजे. अमूक एका कारणाकरतांच ( उ. बदफैली ) फक्त घटस्फोट दिला जाईल असें म्हणणें म्हणजे वैवाहिक संस्थेचा अर्थ न कळण्यासारखें आहे. समजा एकादा नवरा अगर बायको चोर, दरवडेखोर किंवा व्यसनी असेल अथवा कामवासना तृप्त करण्यास असमर्थ असेल तरी भागीदाराला जवळ राहण्यास भाग पाडलें पाहिजे कीं काय ? कोणतें कारण आपला विवाह मोडण्यास पुरेसें आहे हा विचार समाजानें प्रत्येक व्यक्तीवरच सोंपवला पाहिजे. लग्न मोडणें ही क्षुल्लक गोष्ट नाहीं व ती करण्यास नुसतें फट् झालें कीं प्रत्येक व्यक्ती तयार होईल अशी भीती वाटण्याचें कांहींच कारण नाहीं.

घटस्फोटाच्या नुसत्या नांवाचा उच्चार केल्यावरोबरच तळपायाची तिडीक मस्तकाला जाणारे बरेचसे बुरशी आलेले लोक आपल्या समाजांत आहेत. " पुनर्विवाहाला कायदेशीर समजूं लागलांत तर पटापट आपल्या नवऱ्यांचे खून करून बायका पुन्हां लग्नें करतील कीं ! " असें म्हणणारे दीडशहाणे अर्थातच " अहो घटस्फोटाची परवानगी दिली कीं मग आमचें कौटुंबिक सौख्य, हिंदुसंस्कृती आमचा धर्म, सर्वच रसातळाला गेलीं म्हणायचीं ! " असें ओरडतात हें उघड आहे. पण या निरर्थक आक्षेपांना उत्तरें देत वसणें म्हणजे वाऱ्याशीं भांडणेंच आहे. केवळ घटस्फोटाची परवानगी मिळाल्यावरोबर प्रत्येक विवाह मोडून जाईल असें म्हणणें म्हणजे आज प्रत्येक विवाहांतील पतिपत्नी केवळ जुलमानें ( घटस्फोटाची शक्यता नसल्यामुळेंच ) एकमेकांजवळ रहात आहेत असें म्हणण्यासारखेंच आहे, व हें जर खरें असेल तरमग असे विवाह आतांच्या आतां मोडून

टाकणेंच इष्ट आहे. हल्लींची विवाहसंस्था निर्दोष असून पतिपत्नींना पूर्ण सौख्य देणारी आहे, तींत कोणत्याही प्रकारची सुधारणा करण्याची जरूरी नाहीं असें ज्यांना प्रामाणिकपणे वाटत असेल त्यांना घटस्फोटाची मुळींच भीति वाटण्याचें कारण नाहीं ! खरी स्थिती अशी आहे कीं घटस्फोटाला विरोध करणारे लोक एकतर केवळ पुराणमताभिमानी व दुराग्रही असतात व त्यांच्याकडून प्रत्येक नव्या गोष्टीला विरोध होतो, किंवा त्यांच्या विरोधाच्या मुळाशीं कांहीतरी दुसरा हेतु असतो. यांपैकीं पहिल्या प्रकारच्या विरोध-कांशीं वाद करीत बसण्यांत कांहींच अर्थ नाहीं, कारण केवळ एखादी गोष्ट वेदांत किंवा स्मृतींत नाहीं असें म्हणणाऱ्या मनुष्यानें आपला मेंदू गहाण ठेवलेला असतो. दुसऱ्या प्रकारच्या लोकांत निरनिराळे वर्ग असतात. कांहींना स्त्रियांना अधिक स्वातंत्र्य मिळाल्यामुळें पुरुषांचें स्वातंत्र्य कमी होईल कीं काय अशी भीति वाटते, तर इतर कांहींना स्त्रियांशीं अधिक प्रेमानें व सहानुभूतीनें वागावें लागेल याचें वाईट वाटतें. अर्थात गुलामांचा व्यापार, अस्पृश्यता, जातिभेद इत्यादि कोणतीही गोष्ट मोडतांना असल्या आपमतलबी लोकांचा विरोध होणारच, पण त्याला भिण्याचें कारण नाहीं.

---

नाट्यसंमेलनाच्या अध्यक्ष सौ. गिरिजाबाई केळकर या नाटकांतून शृंगाररस काढून टाकावा असें सांगतात, तर महाराष्ट्रसंगीतपरिषदेंत श्री. सभाध्यक्ष केळकर त्यांचीच री ओढून हा रस संगीतांतून काढून टाकावा असा उपदेश करतात. त्यांचे मतें हिंदी चिजा शृंगारमय असतात, त्या सोडून कोणत्याही श्रोत्यांसमोर म्हणता येतील अशा मराठी चिजा ( उदाहरणार्थ, ' ग्यानबा तुकाराम ' या धर्तीवर ) स्वतः गायकांनीं रचाव्या. या केळकर लोकांनीं शृंगाराविरुद्ध कितीही ओरड केली तरी लोकांची शृंगारविषयक आवड यत्किंचितही कमी होईलसें दिसत नाहीं. हिंदी चिजा पुष्कळांना कळत नाहींत, परंतु शृंगारमय नाटकांना स्त्रियांच्या झुंडीच्या झुंडी जात असतात हें या लोकांनीं पाहिलें नाहीं काय ? स्त्रियांस शृंगार आवडूं नये अशी त्यांची कदाचित इच्छा असेल, परंतु तो आवडतो ही वस्तुस्थिति आहे, तेव्हां हिंदी चिजा त्यांचे समोर म्हणूं नये म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

## ' असे पति देवचि ललनांना '

( लिहून आलेला मजकूर )

पुरुषांकडून काय किंवा स्त्रियांकडून काय, हिंदु स्त्रियांपुढें जर कोणतें तत्त्व एकमतानें मांडलें जात असेल तर प्रस्तुत लेखाच्या मथळ्यांत दिलेलें तत्त्व हेंच होय, 'पति कसाही असला तरी त्याला पत्नीनें केवळ देव समजून अनन्यभावानें त्याची सेवा-चाकरी केली पाहिजे व तो मेल्यावर देखील व्रतें वैकल्यें इत्यादींनीं त्याच्या आत्म्याला शांति मिळेल अशी व्यवस्था केली पाहिजे ' हा उपदेश हिंदु, विशेषतः पांढरपेशा वर्गांतील, मुलीला समजूं लागल्यापासून दिला जातो ! वर दिलेलें पद नाटकांत म्हटलें जात असतांना स्त्रीपुरुषप्रेक्षकांकडून होणारा टाळ्यांचा प्रचंड कडकडाट ऐकला म्हणजे या तत्त्वावर अजूनही जवळ जवळ सर्व लोकांचा विश्वास आहे असें वाटूं लागतें व ही एकंदर भानगड आहे तरी काय, असा विचार मनांत येतो.

"हिंदुस्थानचा व इंग्लंडचा संबंध हिंदुस्थानच्या हिताकरतांच ईश्वरी इच्छेनें घडून आलेला आहे; इंग्रज शिपाई, इंग्रज सिव्हिलियन, इंग्रज अधिकारी, इंग्रज व्यापारी इत्यादिखेरीज हिंदुस्थानाचें चालावयाचें नाहीं; इंग्लंडच्या राज्यकर्त्यांवर अढळ विश्वास ठेवून हिंदी प्रजेनें रहावें; राज्यकारभारांत इंग्रज अधिकाऱ्यांचें प्राबल्य असलेंच पाहिजे, व त्याखेरीज हिंदुस्थानांतील लोकांना निःपक्षपाती न्याय मिळणेंच शक्य नाहीं" इत्यादि गोष्टी प्रत्यक्ष इंग्रज लोकच जेव्हां म्हणतात व लिहितात तेव्हां आपण त्यांना हंसतों, एवढेंच नव्हे तर त्यांच्या अहंपणाचें आपल्याला आश्चर्य वाटतें, तरी पण एकादा पुरुष जेव्हां 'पति हेंच स्त्रीचें दैवत आहे; त्याची सेवा चाकरी करणें व त्याच्या दोषांकडे न बघतां फक्त गुणांकडेच बघणें हें पत्नीचें कर्तव्य आहे" असें स्त्रियांना सांगूं लागतो तेव्हां मात्र आपल्याला त्याचें हसूं येत नाहीं ही मौज नव्हे काय ? दोन्हीही ठिकाणीं स्वार्थ पूर्णपणें भरलेला आहे व अहंपणा आणि दुसऱ्याच्या डोळ्यांत धूळ टाकण्याची इच्छाही दोन्ही बाबतींत सारखीच आहे. एकादा मनुष्य व्यक्तीशः स्वतःची स्तुति करूं लागला तर त्याला आपण पढतमूर्ख म्हणतों, पण तो जर आपल्या शहरांतील, प्रांतांतील अथवा देशांतील सर्व लोकांची

स्तुती करूं लागला तर त्याला आपण देशभक्त असा किताब देतों ! असाच प्रकार 'आम्ही सर्व पुरुष आपापल्या बायकांना देवाच्या ठिकाणीं आहों' असें सांगणाऱ्या पुरुषांचा आहे ! यांतील हास्यास्पद विनोद आपल्याला कळला मात्र पाहिजे.

'पति हा आमचा देव आहे' असें सांगणाऱ्या स्त्रियांची स्थिति, चालतां येत नव्हतें तेव्हां पांगुळगाडा वापल्यानंतर, चालतां येऊं लागल्यावरही पांगुळगाडा वापरणाऱ्या मुलांप्रमाणें आहे. गुलामांना स्वातंत्र्य देण्याकरतां अमेरिकेंतील संयुक्तसंस्थानांत लढाई झाली खरी, पण 'आम्हांला स्वातंत्र्य नको, आम्ही मोकळे होऊन काय करणार ?' असें म्हणणारे गुलाम तेथेंही होतेच ! त्याचप्रमाणें इंग्रजसरकार हें आमचे मायबाप असून ब्रिटिश साम्राज्यांत राहणें हेंच आमचें अंतिम ध्येय आहे असें म्हणणारे राजनिष्ठ लोक साम्राज्यदिनाच्या दिवशीं अभिमानानें (!) सभा भरवतांना दिसतातच.

आमच्या मतें कोणतीही व्यक्ती दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीला देव असणें शक्य नाहीं ! अगदीं महात्मा गांधी किंवा शिवाजी यांना देखील देव समजणें चुकीचें व अपमानास्पद होईल. ती थोर कर्तृत्ववान मनुष्यें असल्याबद्दल फारसें दुमत होणार नाहीं, पण म्हणून ते म्हणतील त्याप्रमाणें विचार न करतां वागावें, किंवा त्यांची पूजा करावी, असें म्हणणें मूर्खपणाचें होईल. ही झाली अशा लोकोत्तर व्यक्तींची गोष्ट; मग सामान्य जनांपैकीं प्रत्येक नवऱ्याला त्याच्या बायकोनें देव समजावें असें म्हणणाराला वेड्यांच्या इस्पितळांतच पाठवावा लागेल असें आम्हांला वाटतें.

पतिपत्नींचा सबंध हा प्रेमाचा, मैत्रीचा, जिव्हाळ्याचा असा आहे. त्यांत देव–भक्त किंवा स्वामी–सेवक असा संबंध येत नाहीं व आल्यास तें अस्वाभाविक आहे. एकाच घरांत राहून, एकमेकांच्या गुणदोषांचें परीक्षण करून व कित्येक वेळां दोषांकडे दुर्लक्ष करून ज्या दोन व्यक्ती एकमेकांवर प्रेम करतात, एकमेकांच्या सुखदुःखाच्या वांटेकरी होतात व भावी पिढीला जन्म देतात, त्यांपैकीं एकीला दुसरीबद्दल कांहींही वाटलें तरी देवाप्रमाणें तिची पूजा करावी असें खास वाटणार नाहीं. अर्थात् स्त्रीला पतीनें देव समजावें असें म्हणणारांना, एकाद्या बायकोनें नवऱ्याला नांवानें, विशेषतः एकेरी नांवानें, हांक मारणें म्हणजे कांहीं तरी भयंकर प्रकार आहे

असें वाटल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. नवऱ्याबद्दल प्रेमाऐवजीं जेथें भक्ती, व जिव्हाळ्याऐवजीं जेथें नुसती पूज्यबुद्धि वाटते, तेथें हृदयाची एकेरी हांक कशी यावी ?

' एकच प्याल्यां'तील सिंधूनें भूतकाळांतील प्रेमाच्या आठवणीनें व मैत्रीखातर दारुड्या नवऱ्याकरतां हालअपेष्टा सोसणें व काबाडकष्ट करणें हें इतकें आश्चर्यकारक नाहीं. पण हें सगळें करीत असतांना देखील ' असे पति देवचि ललनांना ' असें म्हणणें हें अस्वाभाविक व ढोंगीपणाचें किंवा मानसिक गुलामगिरीचें चिन्ह आहे. सिंधूपेक्षां कितितरी अधिक स्वाभाविक व स्वतंत्र विचाराची तळीरामाची बायको तरी पत्करली असें कांहीं वेळानें वाटूं लागतें. नवरा बायको हीं दोघेंही मनुष्यें असून दोघांनाही गुणदोष आहेत, दोघांनाही प्रेमाची जरूर आहे व त्यांपैकीं कोणीच देव नाहीं, ही साधी गोष्ट आपल्या समाजाला केव्हां कळणार कोण जाणे ?

---

## ' विषादप्यमृतं ग्राह्यम् '

( लिहून आलेल्या मजकुराचा संक्षेप )

कांहीं दिवसांपूर्वी कऱ्हाडच्या ' मुसलमान ' पत्रानें मालिनीबाईवर व डॉ. मुंजे यांवर तोंडसुख घेऊन पर्यायानें हिंदु संस्कृतीवर शिंतोंडे उडवण्याचा केलेला खोडसाळ प्रयत्न वर्तमानपत्रवाचकांस माहीत असेलच परंतु आठवणीसाठीं थोडक्यांत देतों. ' डॉ. मुंजांनीं मर्द बनण्याकरतां ब्राह्मणांस मांसाशनाचा उपदेश करण्यापेक्षां त्यांस ते जर सुंता करण्याचा उपदेश करतील तर बरें. कारण सुंतायुक्त पुरुषाची लज्जत कशी काय असते ती एका ब्राह्मण स्त्रीस विचारा. ' हा खोडसाळ प्रयत्न तर खरा, आपण त्यापासून कांहींतरी धडा घेतला पाहिजे.

सुंता म्हणजे काय ? सुंता करणें म्हणजे फाजील शिस्नाग्रत्वचा कापून काढणें. मुसलमान व यहुदी लोक हा एक धार्मिक विधी म्हणून करतात. ही चाल फार प्राचीन काळापासून प्रचारांत आहेसें दिसतें. ( पहा, जुना करार, जेनेसिस १७ ) त्वचेनें वास्तविक शिस्नाग्राचें रक्षण व्हावयाचें असतें, परंतु आज मानवी प्राणी निसर्गाचें काम कपड्यानें करीत असल्यामुळें त्या कातडीच्या उपयुक्ततेस गौणत्व

आलें आहे, व ती काढून टाकल्यानें विविध फायदे होत असल्यामुळें तसें करण्याची रीत अंमलांत आली.

सुंता जरी मुसलमान वगैरे जातींत धार्मिक विधी म्हणून करीत असले तरी त्याचा आरोग्याशीं फार संबंध असल्यामुळें ती चाल परधर्मीय असली तरी हिंदूंनीही स्वीकारण्यास हरकत नाहीं. या चालीस धार्मिक महत्व देण्याची जरूरी नाहीं.

सुंता कधीं करावी ? लहानपणींच करणें बरें, कारण त्यावेळीं कातडी कापण्यास त्रास होत नाहीं व जखम लवकर भरून निघते. नंतर शिस्नाग्र उघडें पडल्यामुळें त्यावरील नाजूक त्वचा कठिण व चिवट होते. कां करावी ?—शिस्नाग्राच्या बुडाशीं असणाऱ्या लहान पिंडांतून एक प्रकारचा स्राव होत असतो, तो जमला म्हणजे त्या ठिकाणीं कंड सुटून त्यामुळें कधीं कधीं मुष्टिमैथुनाची संवय लागते. सुंता केल्यास इंद्रिय स्वच्छ ठेवणें सोपें होतें. त्वचा कठिण झाल्यामुळें इन्द्रियाची चेतनाशक्ति मंद होऊन, त्यामुळें शीघ्रपतनाचा दोष नाहींसा होऊन उभयपक्षांस अधिक सुखावह होतें. शीघ्रपतनाचा दोष हल्लीं बऱ्याच प्रमाणांत आहे, त्यावर हा उपाय नेहमींच लागू पडेल असें नाहीं, कारण त्याचीं कारणें अनेक असूं शकतील. त्वचा कठिण व कोरडी झाल्यामुळें रोगजंतूंचा शिरकाव लवकर होत नाहीं, यामुळें गुप्त रोग होण्याचा संभव कमी होतो. कधीं कधीं या त्वचेचें तोंड फार बारीक असल्यामुळें ती मागें न सरकल्यानें अनेक प्रकारचा त्रास होतो, किंवा ती जोरानें मागें सरकवल्यास तेथेंच अडकून बसून इंद्रिय सुजतें. अशा वेळीं त्वचा कापून काढणें हाच मार्ग श्रेयस्कर असतो. अर्थात् त्वचा नेहमीं डॉक्टरच्या सल्ल्यानेंच कापावी. सुंता न करतां ज्यांस सुंता केल्याचें श्रेय पाहिजे असेल त्यांनीं शिस्नाग्रत्वचा शक्य तितका वेळ मागें ओढून ठेऊन मणि उघडा टाकावा. प्रथम कदाचित् हें फार वेळ सहन होणार नाहीं, पण संवयीनें सोपें होईल.

---

फ्रान्समध्यें एक ६ महिन्यांची गरोदर स्त्री डॉक्टराकडे गेली असतां तिच्या योनिमार्गाचे तोंडापासून सुमारें दीड इंच आंत जाड पडदा आढळला. त्यानें योनि-

मार्ग बंद झालेला असून त्यास कोठेंही छिद्र दिसेना. ९ महिने झाल्यावर पोट कापून मूल काढावें लागलें व नंतर तपासणी करतां त्या पडद्यांत एक बारीक छिद्र दिसून आलें. तें मोठें करून नंतर पडदा कापून काढला. या स्त्रीचें वय २६ असून तिला गर्भावस्थेपूर्वी मासिक स्राव नियमानें होत असे. पडद्याची जाडी सुमारें एक दशांश इंच होती. हिची गर्भधारणा कशी झाली असें कोणास गूढ पडेल, परंतु शुक्रजंतु योनिमार्गाचे तोंडाशीं पडून तेथून पडद्यांतील बारीक छिद्रांतून गर्भाशयांत पोंचला असला पाहिजे असें दिसतें. हा पडदा जाड असल्यामुळें समागमाचे वेळीं फाटला नाहीं.

---

## पावित्र्य

( लिहून आलेला मजकूर )

पावित्र्य आणि शुद्धता अथवा निर्मळपणा ह्या दोन अगदीं निरनिराळ्या कल्पना आहेत. एखादी वस्तू व्यावहारिकदृष्ट्या किंवा आरोग्यदृष्ट्या शुद्ध असली तरीही ती पवित्र आहे असें बऱ्याच लोकांना वाटत नाहीं. उदाहरणार्थ महाराचें मूल कितीही स्वच्छ असलें तरी पारंपरिक मताचे ब्राह्मण किंवा मराठे त्याला शिवणार नाहींत किंवा त्याच्या सावलीचा देखील विटाळ मानतील. त्याचप्रमाणें ज्या दोन व्यक्तींचें लग्न झालेलें नाहीं त्यांच्या मुलांवर हा अपवित्रतेचा छाप 'बाबावाक्यं प्रमाणम्' मानणारे लोक नेहमीं मारीत असतात.

वैवाहिक गोष्टींत ही पावित्र्याची कल्पना सर्वांच्या अगदीं हाडींमाशीं खिळून गेल्यासारखी दिसते व इतर गोष्टींत बऱ्याच समंजसपणें विचार करणारे लोक देखील या बाबतींत स्वतंत्र विचार करण्याचें टाळतात. एखाद्या भटानें आपल्याला न समजणारी चार अक्षरें वडबडून चार जमलेल्या लोकांनीं बधूवरांच्या डोक्यावर तांदूळ टाकले, म्हणजे मग त्यांचा संबंध पवित्र समजला जातो. मग त्यांचा शारीरिक संबंध होऊन सृष्टिनियमाप्रमाणें त्यांना मुलें होणें यांत कोणाला आश्चर्य वाटत नाहीं. पण तेंच हा विधी न होतां जर एका स्त्रीचा व पुरुषाचा संबंध झाल्याचें उघडकीस आलें तर समाज त्यांचा संबंध

'अपवित्र' मानतो एवढेंच नव्हे तर त्यांच्या संततीवरही त्या अपवित्रतेचा शिंतोडा उडाल्याखेरीज रहात नाहीं. ज्या दोन स्त्रीपुरुषांचा शारीरिक संबंध विवाहापूर्वी होतो, त्यांनीं नंतर जरी विवाह केला तरी देखील त्यांतील अपवित्रता नाहींशी होत नाहीं हें विशेष आहे ! खरें पाहिलें असतां लग्न झाल्यानंतरच नवऱ्याला बायकोवर बळजबरी करण्याचा कायदेशीर हक्क प्राप्त होत असल्यामुळें तो संबंध एकांगी अतएव अनिष्ट होण्याची शक्यता असते. पण तरी देखील समाजाच्या दृष्टीनें तो पवित्रच समजला जातो. जेव्हां एक स्त्री व एक पुरुष, रूढींची आपल्या संबंधाला परवानगी नाहीं हें ठाऊक असून सुद्धां एकत्र येतात तेव्हां त्यांत बळजबरीचा भाग तर नसतोच, पण त्या दोघांना एकमेकांचा सहवास अतिशय प्रिय असतो असेंच सिद्ध होतें. अर्थात दोन शरीरांच्या संयोगाशीं किंवा त्यामुळें घडून येणाऱ्या इंद्रियविषयक फेरफारांशीं मनुष्याच्या सामाजिक व इतर कृत्रिम कल्पनांचा कांहींच संबंध नसतो हें उघड आहे.

अशाच प्रकारची आणखी एक अपवित्रतेची कल्पना आपल्याकडे रूढ आहे. कौमार्य ही एक विशेष पवित्र गोष्ट आहे अशी आपल्या समाजांत सर्वसाधारण कल्पना आहे. एखाद्या स्त्रीचें कौमार्य ज्या पुरुषामुळें नाहींसें झालें त्या पुरुषाशींच तिचें लग्न झालें पाहिजे असा समज पाश्चात्य देशांत देखील आहे. पुष्कळ वेळां वस्तुस्थिति अशी असते कीं तारुण्याच्या पहिल्या भरांत आपल्या विचारांची व विकारांची खरी कल्पना न येतां एकाद्या मुलीनें एकाद्या पुरुषाला आपलें कौमार्य अर्पण केलें ( किंवा थोडेंबहुत इच्छेविरुद्ध कां होईना, हरण करूं दिलें ) म्हणजे तिनें त्याच्याशीं लग्न केलेंच पाहिजे असें सर्व लोक म्हणूं लागतात, पण बहुतेक वेळां प्रत्यक्ष ती मुलगीच त्याच्याशीं लग्न करण्यास तयार नसते असें आढळून येतें, व त्याचें कारणही समजण्यास फारसें कठिण नसतें. इंद्रियसुखाची कल्पना नसतांना त्यापासून होणाऱ्या आनंदाबद्दल व तें सुख ज्यापासून मिळेल असें वाटतें त्या व्यक्तीबद्दल ज्या कल्पना असतात त्या संभोगानंतर पुष्कळ वेळां रहात नाहींत, व पूर्वी वाटत असलेलें प्रेम नंतर वाटेनासें होतें.

# पावित्र्य

पांढरपेशा समाजांत अशा कल्पना फार खोल गेलेल्या आहेत. मात्र येथें येवढें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं स्त्रीसंभोगानें पुरुषाला अपवित्रता येते असें कोणीही समजत नाहीं. स्त्रियांनीं पुनर्विवाह मुळींच करूं नये, निदान ज्यांचा नवरा १४ व्या वर्षानंतर वारला किंवा ज्यांना मुलें आहेत त्यांनीं तरी करूं नये अशीं जीं मतें आपण नेहमीं ऐकतों त्यांच्या मुळाशीं 'एकदां एका पुरुषाशीं जिचा संयोग झाला ती स्त्री इतर पुरुषांना ( तो मेल्यानंतर देखील ) अपवित्र असते' ही वेडगळ कल्पनाच आहे ! 'मूल असलेल्या पुरुषानें पुनः लग्न करूं नये' असें कोणीच कधीं म्हणतांना आढळत नाहीं. चाळीस वर्षांच्या स्त्रीला देखील इंद्रियसुख भोगण्याचा पूर्ण हक्क आहे व केवळ तिचें लग्न झालेलें होतें किंवा तिला मुलें आहेत यामुळें तो नष्ट होत नाहीं, ही गोष्ट प्रत्येक विचारी व्यक्तीला पटण्यासारखी आहे. घटस्फोटाला विरोध करणारांची विचारसरणीही याप्रमाणेंच असते. ज्याबरोबर एकदां लग्न लागलें त्याच्याशींच स्त्रीनें जन्मभर संबंध ठेवला पाहिजे असा सर्वसाधारण समज असतो. मग तो गुन्हेगार, दारुड्या, रोगी, नपुंसक, कसाही असला तरी चालेल. अशा नवऱ्याशीं इच्छेविरुद्ध ठेवलेला संबंध देखील समाजाच्या दृष्टीनें पवित्रच असतो. ज्याच्यावर तिचें प्रेम आहे अशा माणसाजवळ जर अशी एकादी स्त्री राहील तर तिची पवित्रता तावडतोब नष्ट होईल !

या बाबतींत आपलें तर्कशास्त्र इतकें चमत्कारिक आहे कीं त्याबद्दल हंसावें कीं रडावें हें देखील कळत नाहीं. एकाद्या स्त्रीचे इच्छेविरुद्ध कोणी बळजबरी केली व तिचें 'पावित्र्य' हिरावून घेतलें तर मग ती अविवाहित असेल तर तिचें लग्न होणार नाहीं व विवाहित असेल तर नवरा तिला घरांत घेणार नाहीं ! कोणताही दुष्ट पुरुष एकाद्या स्त्रीवर बळजबरीचा प्रयत्न करीत असतांना कादंबऱ्यांतून व नाटकांतून जरी तिची सुटका हमखास होते, तरी प्रत्यक्ष जगांत तसें घडतेंच असें नाहीं. शिवाय पुष्कळ वेळां त्या स्त्रीलाच आरडाओरड करण्याची भीति वाटते, कारण तिच्यावर बळजबरी करण्याचा प्रयत्न केला एवढी जरी बातमी बाहेर फुटली तरी देखील तिच्यावर एकदम अपवित्रतेचा शिक्का बसलाच. तेंच तिनें आरडाओरड न करतां अत्यंत गलिच्छ असा जुलूम सहन केला तरच त्या गोष्टीचा बभ्रा न होतां तिचें

'पावित्र्य' कायम राहण्याची आशा ! समाजाच्या वेडगळ कल्पनांमुळें असले विचित्र प्रकार घडून येतात व तरीदेखील पारंपरिक लोक त्या सोडून देण्यास तयार नसातत !

लग्न करणारा प्रत्येक मनुष्य आपली बायको कुमारिकाच असली पाहिजे अशी अपेक्षा करतो एवढेंच नाहीं तर ती तशी नाहीं असें आढळून आल्यास तिचें नांव टाकण्याचीही त्याची तयारी असते. आमचे मतें कौमार्याला दिलेली ही फाजील किंमत वेडगळपणाची आहे. ज्यावेळीं स्त्रीपुरुषांचा संयोग होतो त्यावेळीं त्या दोघांची त्याला पूर्ण संमति असली व त्यांत आरोग्यविषयक सर्व नियम पाळले गेले म्हणजे त्या संबंधाला 'पवित्र' संबंध ( म्हणजेच इष्ट संबंध ) असें म्हणतां येईल. मग तीं दोघें आपल्या पूर्व आयुष्यांत काय करीत होतीं व त्यांचें कोणावर प्रेम होतें वगैरेचा त्यांत संबंध येत नाहीं.

---

## हवा

मनुष्याच्या जीवनास जरूर असणाऱ्या सर्व पदार्थांत हवा ही जास्त महत्त्वाची आहे. हवा बिलकूल नसल्यास मनुष्य कांहीं मिनिटांत मरेल. शिवाय हवेची घटना विशिष्ट प्रकारची असेल तरच ती प्राण्यांच्या उपयोगीं पडते. म्हणजे त्यांत अजमासें शेंकडा २० भाग 'ऑक्सिजन' वायु असावा लागतो. हवेंत केर व रोगजंतु जितके कमी असतील तितके बरे व एकंदरींत उष्ण हवेपेक्षां थंड हवा बरी. यामुळें शहरांतील हवेपेक्षां बाहेरची हवा चांगली. व घरांत हवा जितकी खेळेल तितकी चांगली. दमट हवेपेक्षां कोरडी हवा प्रकृतीस बरी असते.

आपल्या श्वासाबरोबर आंत जाणारी हवा व उच्छ्वासाबरोबर बाहेर पडणारी हवा सारखी नसते. आंत जाणाऱ्या हवेंत 'ऑक्सिजन' असतो, त्याचे जागीं बाहेर पडणाऱ्या हवेंत 'कारबॉनिक ॲसिड' वायु असतो. यामुळें 'ऑक्सिजन'चें प्रमाण कमी होतें. लाकूड, कोळसा वगैरे जळतांना हाच प्रकार होतो, यामुळें हवा खराब होते. शिवाय जुन्या पद्धतीच्या संडासांमुळें हवा खराब होते, ती वेगळी. अशा

हवेंत राहणारीं माणसें अशक्त व निस्तेज होतात. खराब झालेली हवा झाडांमुळे पुनः स्वच्छ होते, याकरतां घरांतील हवा बाहेर जाण्यास व बाहेरील आंत येण्यास प्रत्येक खोलीस पुष्कळ खिडक्या असून त्या वेगवेगळ्या उंचीवर असणें इष्ट आहे.

हवा दमट असल्यास क्षयासारख्या रोगांस संधि सांपडते. दमट हवेंत काम करणाऱ्या माणसांस क्षय होण्याचा संभव जास्त असतो. अशा हवेंत त्वचेचें व फुप्फुसांचे काम बरोबर न झाल्यामुळें शरीरांतील निरुपयोगी अवशेष बाहेर जावा तसा जात नाहीं, अन्न बरोबर पचत नाहीं व शरीरास त्याचा उपयोग होत नाहीं. अर्थात् कोठून तरी क्षयाचे जंतु शरीरांत गेल्याशिवाय क्षय होत नाहीं, परंतु शरिराची सुस्थिति नसल्यास जंतूस जास्त अवसर सांपडतो. दमट हवेंत लोकांस संधिवातही होण्याचा संभव असतो. विशेषतः शहरांतील हवा अनेक प्रकारांनीं दूषित होत असते. ती स्वच्छ करण्याकरतां मधून मधून बरीच जागा मोकळी ठेवून तेथें झाडें किंवा गवत लावलें पाहिजे. शहरांत हवा व सूर्याचा उजेड जितक्या जास्त प्रमाणांत प्रत्येकाच्या वांट्यास येईल तितकें शहराचें आरोग्य वाढेल. सूर्याचे उजेडानें रोगजंतूंचा जलद नाश होतो.

शहरांतील घरांत प्रत्येकास पुरेशी हवा मिळावयास पाहिजे असेल तर घरांतील जागेचे प्रमाण माणशीं ६०० घनफूट असलें पाहिजे. उदाहरणार्थ मुंबईत एकाच खोलींत दोन माणसें रहात असल्यास त्या खोलींत जागा १२०० घनफूट असली पाहिजे. म्हणजे ती खोली १५×१०×८ फूट असल्यास चालेल. अर्थात खोलींत सामान जितकें जास्त, तितकी हवेला जागा कमी होते. घरांतील सर्वांत हवाशीर खोली असेल ती निजण्याकरतां ठेवावी, परंतु हें फारच थोडे लोक करतात. अर्थात् घरेंही या दृष्टीनें बांधलेलीं नसतात.

घर स्वच्छ करण्याकरतां केर शोषून घेणारीं यंत्रें मिळतात, परंतु तीं अजून सर्वांस वापरण्यासारखीं स्वस्त झालीं नाहींत, तेव्हां बहुतेकांस केरसुण्या व फडक्यांवरच भिस्त ठेवावी लागते. घरांतील जमीन किंवा शहरांतील रस्ते कोरडे असतां झाडणें म्हणजे धूळ उडविणें आहे. पुष्कळ शहरांत अशा रीतीनें धूळ उडविण्याकरतां

पगारी माणसें नेमलेलीं असतात, परंतु यानें फायद्यापेक्षां तोटाच होण्याचा संभव अधिक. जमिनीवर पाणी शिंपून नंतर झाडावी, व फरशी वगैरे असल्यास दमट फडक्यानें पुसून घ्यावी.

वास्तविक पाहतां संडास एका विशिष्ट उपयोगाकरतां बांधलेले असतात, परंतु घाण करण्याचे सर्व प्रकार तेथें एकवटलेच पाहिजेत अशी कल्पना रूढ आहे व तंबाखू खाऊन थुंकणें, खाकारे, शेंबूड वगैरे सर्व प्रकारांनीं संडासाच्या ( व कधीं इतरही ) भिंती बहुधा शृंगारलेल्या दिसतात. वास्तविक जेथें घाण होण्याचा संभव अधिक, तेथें स्वच्छतेस विशेष जपलें पाहिजे. जेथें आधुनिक पद्धतीचे म्हणजे सांखळी ओढल्यावर पाण्याचे झोतानें मल वाहून जाण्याची व्यवस्था केलेले—शौच-कूप नाहींत, तेथें फिनाइलसारखे दुर्गंधिनाशक पदार्थ वारंवार टाकल्यास, जमीन फरशीची करून ती वारंवार धुतल्यास, व मुद्दाम शक्य तितकी घाण करण्याचा प्रयत्न न केल्यास, संडास स्वच्छ ठेवणें ही कोणाच्याही हातची गोष्ट आहे.

संडासांतही हवेची जरूरी असते ही गोष्ट बांधणाराच्या लक्षांत असली पाहिजे व संडासांतील हवा दुसऱ्या खोलींत जातां कामा नये इकडेही लक्ष दिलें पाहिजे. याकरतां संडासास दोन खिडक्या असाव्या व त्यांतील एकही दुसऱ्या खोलींत उघडूं नये.

---

## डॉक्टरांचा अधाशीपणा

रोग्याला जगवणें किंवा बरा करणें हें डॉक्टरांच्या फारसें हातात नसलेंच, परंतु रोग्याला मारणें मात्र डॉक्टरांच्या बरेंच हातांत असतें व या शक्तीचा ते फारसा उपयोग करीत नाहींत ही समाधानाची गोष्ट आहे. रोगी दुर्बल स्थितींत डाक्तराच्या हातांत सांपडतो, व तो कदाचित् बरा झालाच तर डॉक्तर मागतील ती फी देऊन सुद्धां त्याचे आपणावर महदुपकार झाले अशी त्याची निष्कारण समजूत होते. कांहीं थोडे डॉक्टर कधीं कधीं फुकट उपचार करतात त्यांची गोष्ट निराळी, परंतु डॉक्टर सामान्यतः पैसे मिळवण्याकरतां धंदा करतात हें विसरतां कामा नये.

# डॉक्टरांचा अधाशीपणा

रोग्यांकडून हा फुकटचा मान व कृतज्ञता मिळवून सुद्धां कित्येक डॉक्तरांचें समाधान होत नाहीं. स्वतःमध्यें कांहीं विशिष्ट गुण आहेत व ते इतर लोकांत नाहींत असें सर्वांसच वाटतें, तसें प्रत्येक धंद्यांतील लोकांसही वाटत असतें. डॉक्टर डॉक्टरीची परीक्षा सर्वांत अवघड समजतात, वकील वकिलीची समजतात, हा मनुष्यस्वभाव आहे, अतएव क्षम्य आहे. वास्तवीक यांत कांहीं वावगेंही नाहीं, परंतु ही अहंमन्यता शक्य तितकी झांकून ठेवण्यांतच शहाणपणा आहे, नाहींतर ती हास्यास्पद होते. डॉक्टरांची सुशिक्षितांत गणना होते यांत कांहीं चूक नाहीं. परंतु नीति म्हणजे काय व नैतिक बाबतींत लोकांनीं कसें वागावें हें ठरवण्याचा अधिकार त्यांस कोणीही दिलेला नाहीं, व या विषयांत इतर सुशिक्षितांच्या शब्दापेक्षां डॉक्टरांच्या शब्दास विशेष मान देण्याचें बिलकुल कारण नाहीं.

राष्ट्रीय मेडिकल कॉलेजच्या षाण्मासिकांत गेल्या अंकांत तेथील प्रोफेसर डॉ. अजिंक्य यांनीं संततिनियमनावर कांहीं तारे तोडले आहेत, त्यावरून हे विचार सुचले. या विषयाचे बाबतींत डॉक्टरांपेक्षां इतरांनींच अधिक काम केलेलें आहे. लोकमताचे भीतीनें म्हणा, किंवा मेडिकल कौन्सिलनें ठरवलेल्या शिष्टाचारामुळें म्हणा, किंवा मिळकत कमी होईल म्हणून म्हणा, डॉक्टर या विषयांत मागसलेले आहेत व आतां इतर लोकांनीं हा विषय उजेडांत आणल्यावर नाइलाज म्हणून डॉक्टर यांत पडत आहेत अशी सामान्य स्थिती आहे. आतां इतर लोकांप्रमाणें डॉक्टरही प्रामाणिकपणें संततिनियमनाचे विरुद्ध असूं शकतील, परंतु इतरांचे मता-इतकीच त्यांचे मतास किंमत दिली पाहिजे, वर सांगितलेल्या फाजील कृतज्ञतेमुळें जास्त किंमत देतां कामा नये.

एखाद्या स्त्रीला किती मुलें असावीं, हें त्या स्त्रीनें ठरवावयाचें आहे. हें ठरवण्याचा अधिकार डॉक्टरांस बिलकुल पोंचत नाहीं. रोगी स्त्रियांस मुलें होऊं नयेत, अशाबद्दलची खबरदारी समाजास घेतां येईल, व मूल झाल्यानें प्रकृतीस इजा होईल कीं काय, हें सामान्य लोकांपेक्षां डॉक्टरांस जास्त समजेल. परंतु स्त्री सुदृढ प्रकृतीची असूनही जर तिला मूल नको असेल, तर तिला तें झालें पाहिजे असें म्हणण्याचा अधिकार कोणाच्या बापालाही पोंचत नाहीं.

## समाजस्वास्थ्य

डॉ. अजिंक्य आपल्या लेखांत म्हणतात, 'संततिनियमन हा खरें म्हटलें म्हणजे डॉक्टरांचा प्रश्न आहे. एखाद्या पुरुषाच्या किंवा स्त्रीच्या प्रकृतीच्या दृष्टीनें प्रजोत्पादन बंद करावयाचें कीं नाहीं हें डॉक्टरांनीं ठरवून रोग्यांस उपदेश करावयाचा असतो, इतरांनीं निःसंशय नाहीं. अलीकडे रासायनिक किंवा यांत्रिक मार्गांनीं संतति-नियमनाचा प्रसार करण्याकरतां संस्था निघून सुधारलेल्या देशांत याचा इतका प्रचार झाला आहे कीं पुढें मागें या राष्ट्रांचा शारीरिक व मानसिक ऱ्हास होईल अशी भीति वाटते.' ही डॉ. साहेबांची भीति अगदीं निराधार आहे. हॉलंड देशांत आज ५० वर्षे संततिनियमनाचा प्रचार आहे व त्यांची सारखी उन्नतीच होत आहे.

संततिनियमनाच्या उपायांपासून प्रकृतीस इजा होते, वांझपणा येतो वगैरे विधानें ठोकून देऊन डॉ. नीं आपल्या अज्ञानाचें प्रदर्शन केलें आहे. आधुनिक शास्त्रीय उपायांनीं कोणत्याही प्रकारची इजा होत नाहीं, हें लंडन येथें भरलेल्या परिषदेंत जमलेल्या १६४ दाक्तरांच्या सभेंत १६१ मतांनीं ठरलें आहे. आधुनिक उपाय डॉ. अजिंक्यांस माहीत नसावे असें दिसतें. डॉ. म्हणतात. 'हे उपाय मुळचे कुंटणखाण्यांत शोधून काढलेले आहेत.' असतील कदाचित, असेंहि धरून चाललें तरी त्यामुळें हे उपाय हानिकारक कसे ठरतात ? डॉ. च्या लेखांत युक्तिवादाचा अंश फारसा नाहीं. त्यांच्या सर्व आक्षेपांस उत्तरें आम्ही 'संतति-नियमन' मधें दिलींच आहेत. येथें सांगायचें म्हणजे इतकेंच कीं आपणांस मुलें किती असावींत हें ठरवण्याचा हक्क प्रत्येक स्त्रीचा आहे, व त्यावर जर दाक्तर लोक दरवडा घालूं पाहतील, तर त्यांस योग्य उत्तर म्हणजे, दाक्तर झक मारतात ! हेंच होय.

---

## बाहेरख्यालीचे दुष्परिणाम (सारांश)

(लेखक: गुरुकिल्ली)

शृंगारिक काव्यें करून मनुष्य तीं गाऊं लागला, मातीच्या प्रतिमा बनवून अगर तीच कल्पना कागदावर रंगवून मनुष्य आपली हौस पुरवून घेऊं लागला व अनेक प्रकारचीं कामोद्दीपक औषधें घेऊन मनुष्य विषयांत दंग होऊन गेला. या

# बाहेरख्यालीचे दुष्परिणाम

बावतींत अतिक्रमण करणाराला नानाप्रकारच्या व्याधि भोगाव्या लागून पुढें होणाऱ्या संततीला आपल्या प्रारब्धाचें फळ म्हणून यमयातना भोगाव्या लागल्या. ( गर्मी, परमा वगैरे रोग संभोगातिरेकानें, स्वैरसंभोगानें किंवा वेश्यांमुळें उत्पन्न होत नसून विशिष्ट जंतूमुळें उत्पन्न होतात. अनेक निरोगी माणसांत कितीही अतिरेक किंवा स्वैर विहार झाला तरी त्यांत गर्मी किंवा इतर जंतुजन्य रोग होणें शक्य नाहीं. या बावतींत पुष्कळ लोक पशूंची स्तुति करतात व लगेच ' पशुवृत्ति ' हा शब्द शिवी म्हणून वापरतात ! ' लामा ' नांवाचा उंटाच्या जातीचा, पण त्यापेक्षां लहान प्राणी अमेरिकेंत आहे, त्यापासून गर्मीचा रोग मनुष्यास लागला व तेथून तो कोलंबसाबरोबरच्या लोकांनीं यूरोपांत आणला व नंतर सर्वत्र पसरला असें तज्ज्ञांचें म्हणणें आहे. तेव्हां मनुष्यानें अतिक्रमण केल्यामुळें हा रोग झाला व पशूंस होत नाहीं हें खोटें आहे. सं. ) हें सर्व ओळखून पूर्वींच्या काळीं समाजस्वास्थ्याकरतां धर्म-संस्थापकांना स्त्रीपुरुषांच्या संबंधाला विवाहविधीचें स्वरूप द्यावें लागलें,...( विवाहाच्या विधीनें रोगांचा प्रश्न सुटत नाहीं. प्रजोत्पादन हेंही त्याच धर्मसंस्थापकांनीं प्रत्येक जोड-प्याचें कर्तव्य बनवलें, व गर्मीसारख्या आनुवंशिक रोगांच्या प्रसारास मदतच केली. सं. ). .हौशा व हौशी या नांवाच्या निरोगी जोडप्यानें एकमेकांना सोडून दुसऱ्या कोणत्याही स्त्रीपुरुषांबरोबर मैथुनव्यवहार केला नाहीं तर त्यांना बाहेरख्यालीचे दुष्परिणाम ( चट्टा, परमा, उपदंश ) कधींही भोगावे लागणार नाहींत ( या रोगांस बाहेरख्यालीचे दुष्परिणाम म्हणणें चूक आहे. गर्मी कांहींस जन्मतः असते, बाहेर-ख्याली न करणारांसही होऊं शकते, व करणाऱ्या सर्वांस होते असें नाहीं. सं. ) वरीलप्रमाणें स्त्रीपुरुषांच्या अनियंत्रित व्यवहाराला ' बाहेरख्याली ' व , अनीति ' असे सामान्य शब्द आम्ही वापरले. कारण असें कीं असलें विषयसुख बाजारांत विकत मिळालें अथवा विशेष सलगीमुळें खासगी रीत्या परंतु चोरून जरी तें कोणाला लाभलें तरी सामाजिक दृष्ट्या ती हानीच म्हणावी लागेल. ( ह्याला म्हणतात पूर्वग्रह. विवाहबाह्य संभोग म्हणजेच सामाजिक हानि अशी लेखकाची कल्पना आहे, व याचें कारण दिलेलें नाहीं. सं. ) याशिवाय विवाहानंतर उत्पन्न होणाऱ्या संततीचा प्रश्न जसा आपोआप सुटतो...( चूक. फाजील मुलें झाल्यास

त्यांस इतर लोकांनीं पोसावें लागतें, किंवा त्यांचे हाल होतात. सं. ) जोंपर्यंत सुधारलेलीं मनुष्यें नागवींच न रहातां आपलीं शरीरें झांकतात हें खरें आहे तोंपर्यंत केवळ विषयवासनेला प्राधान्य देऊन आपल्या उघड्या शरीला दुसऱ्या उघड्या माणसाकडून स्पर्श होऊं देणें हें पशुवृत्तींत नको असेल तर निदान अनीतीच्या सदराखालीं येतें. ( सुधारलेल्या माणसांत नागवें राहण्याची चाल नाहीं हें खरें, तथापि नागवें रहाण्यांत फायदा आहे असें कांहीं लोक म्हणूं लागले आहेत. परंतु यांत नीतीचा संबंध काय ? एका उघड्या शरीराला दुसरें उघडें शरीर लागलें तर तिसऱ्याचें काय बिघडलें ? जोंपर्यंत त्यांत तिसऱ्याचें नुकसान नाहीं तोंपर्यंत अनीति नाहीं. सं. ) धार्मिकदृष्ट्या पुरुषांना एकपत्नीव्रत व स्त्रियांना पातिव्रत्य या प्राचीन कल्पनामध्यें वैयक्तिक व सामाजिक स्वास्थ्याचा शुद्ध झरा फार खोलपर्यंत गेलेला होता असें दिसतें. आजकाल धर्माला ओहटी लागलेली असून जिकडे तिकडे विचारस्वातंत्र्य...( पुरुषांस एकपत्नीव्रताचें बंधन धार्मिक दृष्ट्या कधींही नव्हतें. स्त्रियांस मात्र पातिव्रत्याचें होतें व आहे, तरी द्रौपदीसारखीं उदाहरणें प्राचीन ग्रंथांतच आहेत. या व्रतांनीं वैयक्तिक स्वास्थ्य मिळत नाहीं हें उघड आहे, एरवीं बाहेरख्यालीचें कारणच नव्हतें. सं. ) सध्यांच्या राहणींत एका बाजूनें धर्माला फांटा तर दुसऱ्या बाजूनें चित्ताकर्षक विदेशी छानछोकी बळावूं पहात आहे. त्यांतच स्त्रीपुरुषांच्या संबंधांत साहेबांच्या उदाहरणावरून नीतिचा प्रश्न वितळत चालला आहे. ( हल्लींच्या पिढ्यांची नीति मागील पिढ्यांपेक्षां कमी असा लेखकाचा समज दिसतो. हें साफ खोटें आहे. ‘ हल्लींच्या लोकांत कांहीं दमच नाहीं, आमच्या बरोबरीचे लोक पहा, नुसत्या बायकोवर भागायचें नाहीं, एखादें तरी अंगवस्त्र असायचेंच ! ’ अशी बढाई मारणारे म्हातारे आम्हांस भेटले आहेत. हें साहेबांचें अनुकरण नव्हे, हें मुळांतच आहे. सं. ) या सर्व गोष्टी विचारांत घेतां आणखी थोड्या वर्षांनीं व्यभिचार हा शब्दच येथून मावळून जाईल कीं काय अशी भीति वाटते. याचें कारण येथील शिकलेल्या अनेक विवाहित लोकांना संततिनियंत्रणापेक्षां विषयव्याधिसंरक्षणाचीच अधिक आवश्यकता भासत आहे. ( साफ खोटें, ‘ राइट एजन्सी ’ नें हीं दोन्हीं प्रकारचीं साधनें विक्रीस ठेवलीं आहेत, परंतु पहिल्या

साधनांचें मानानें दुसऱ्यांची चौकशी फारच थोडे लोक करतात. यावर कोणी असें म्हणेल कीं दुसरीं साधनें मागायला लोक अधिक लाजतात. परंतु खरी टोपीप्रमाणें यांत आकाराचा प्रश्न नसल्यामुळें नोकर पाठवून सुद्धां हीं मागवतां येतात व कांहीं लोक तशीं मागवतातही. असें केल्यास तीं कोण वापरणार हें कळवण्याचें कारण नसतें. शिवाय एका मित्रास पाहिजेत असें सांगण्याची सोपी युक्ति असतेच. एकंदरींत हल्लींच्या पिढीला व साहेबांना देखील विनाकारण शिव्या देण्यांत आम्हांस अर्थ दिसत नाहीं. 'ते दिवस गेले आतां, नाहींतर आमच्या वेळेला...!' असें म्हणण्याची कांहीं लोकांना संवय असते, इतकेंच. सं. )

---

## प्रचलित विवाह

( फ्रेंचचे आधारें )

'काय हो, उत्तम लग्न कोणतें?' 'जेथें दोघाचें प्रेम असेल, तें लग्न उत्तम.'—'विद्वान आहांत झालं!'—'तर मग सद्‌गुणी व्यक्तीशीं लग्न केलें तर चांगलें...'—'समजलें, बस करा. आतां मी सांगतों हें लक्षांत ठेवा. श्रीमंत मुलीशीं लग्न करणें पुरुषाच्या दृष्टीनें चांगलें आणि भरपूर पगारदार नवरा स्त्रीच्या दृष्टीनें चांगला. चांगलें स्थळ याचा अर्थच मुळीं हा आहे!'

एखाद्या तिऱ्हाइत व्यक्तीबरोबर पैशाच्या लालचीनें जन्म घालवण्याचा करार करणें, हें उत्तम लग्न. लग्नाचा ठराव म्हणजे निवळ व्यापारी सवदा आहे. त्यांत किती फायदा होईल, त्यावर जन्माचें सुख अवलंबणार. प्रेम वगैरे लग्न झाल्यावर आपोआप येईल, त्याची काळजी नाहीं. रक्कम बोला.

आईबाप आपल्या सवडीप्रमाणें मुलीचें लग्न करतात. ती लग्न करीत नाहीं, तिचें लग्न होतें. गलितावयव वृद्ध पतीची तरुण पत्नी ह्मणजे रस्त्यांतल्या वेश्येपेक्षांही हीन आहे. काय घेणार, असें वेश्येला विचारलें तर ती, किती वेळ? असें विचारते, व वेळाचे मानानें पैसे घेते. पण पत्नीला जन्मभर ठेवण्याची व पोसण्याची कबुली द्यावी तेव्हां ती मिळते. वेश्या दुसरा धंदा करूं शकेल, पण पत्नी जन्माची विकलेली असते. वेश्यांस थोडीबहुत लाज असते, पत्नीस लजेचें कारणच नसतें. ती उघडपणें मिरवते.

हुंड्याकरतां घासघीस करणारा नवरा त्याहीपेक्षां हलक्या प्रतीचा ठरेल. वेश्यांच्या मिळकतीवर उपजीविका करणारास कायद्यानें शिक्षा होते. बायकोंच्या हुंड्यावर उपजीविका करणाऱ्या नवऱ्याची किंमत त्याहीपेक्षां कमी आहे.

पत्नी म्हणजे कायदेशीर रखेली असल्यास विवाह म्हणजे व्यभिचाराचा पायाच होतो व घटस्फोटांची संख्या वाढते. दोन आत्म्यांचें मीलन तर राहोच, पण विवाह म्हणजे दोन शरीरांचा देखील नव्हे तर दोन थैल्यांचा समागम होतो. जेथें दोघांचें प्रेम नसेल, तेथें पतीला किंवा पत्नीला वेश्या समजलें पाहिजे, कारण त्यांपैकीं एकानें पैशाच्या किंवा इतर कारणानें आपलें शरीर विकलें असाच त्याचा अर्थ होतो. पैसा म्हणजे सुख नव्हे हें लोकांस पटेल तरच यांत सुधारणा होईल.

---

## पचन कसे होतें ?

अन्नामुळें शरीराचें पोषण होतें हें सर्वांस माहीत असतें, परंतु हें पोषण होण्याकरतां प्रथम अन्नाचें पचन होऊन तें रक्तांत मिसळावें लागतें. हें पचन कसें होतें याची बऱ्याच लोकांस चांगलीशी कल्पना नसते. पुढील प्रयोग करून पाहिल्यास तें समजण्यास मदत होईल.

दिव्याची कांचेची चिमणी घेऊन तिच्या एका टोंकावर सुतळीनें चर्मपत्र बांधावें. नंतर पाण्यानें भरलेलें एक मोठें भांडें घेऊन त्यांत तें बांधलेलें टोंक बुडवावें. नंतर चिमणींत मीठ घातलेलें पाणी ओतावें. म्हणजे खालच्या भांड्यांत चर्मपत्रापासून खालपर्यंत प्रवाह सुरू झालेले दिसतील. हे प्रवाह पाण्याचे नव्हे, कारण चिमणींतील पाणी कमी होत नाहीं. हे प्रवाह मिठाचे होत, व जोंपर्यंत खालच्या पाण्यांत वरच्यापेक्षां कमी मीठ आहे तोंपर्यंत ते चालू राहतील. खालीं खारें व वर गोडें पाणी घातल्यास याचे उलट प्रवाह सुरू होतील. मिठाऐवजीं साखर घातल्यांसही असेंच होतें, परंतु खाऱ्या पाण्याऐवजीं अंड्याचा बलक घातला तर प्रवाह दिसत नाहींत. याच प्रमाणें आपल्या अन्नांत दोन प्रकारचे पदार्थ असतात. कांहीं मिठासारखे चर्मपत्रांतून पार जाणारे व कांहीं न जाणारे.

# पचन कसें होतें ?

आपल्या अन्ननलिकेच्या बाजू चर्मपत्रासारख्या असतात. पोटांत गेलेलें अन्न त्यांतून पार जाऊन रक्तांत मिसळेल तरच त्याचा शरीरास उपयोग आहे, परंतु अन्नांतील कांहीं पदार्थ तर पार जाऊं शकत नाहींत. तेव्हां त्यांचें रूपांतर होऊन ते पहिल्या प्रकारच्या पदार्थांच्या सदरांत येतील तरच त्यांचा उपयोग. हें रूपांतर पचनानें होतें, यावरून पचनक्रियेचें महत्व लक्षांत येईल.

ही क्रिया अन्ननलिकेंत होते. या नळीचें एक टोंक म्हणजे तोंड, व व दुसरें टोंक गुदद्वार. तोंडांतील लाळ, जठरांतील जठररस, वगैरेंची रासायनिक क्रिया अन्नावर झाल्यामुळें पचन होतें. अन्न घशांतून जठरांत उतरतें, तेथें तें कांहीं वेळ राहून, त्यांचें थोडेंबहुत रूपांतर होऊन तें लहान आंतड्यांत उतरतें. त्यांतील उपयोगी भाग आंतड्यांच्या बाजूंतून रक्तांत मिसळतो व बाकीचा भाग मोठ्या आंतड्यांत ढकलला जाऊन गुदद्वारावाटे बाहेर पडतो.

या त्याच्या मार्गांत निरनिराळ्या पेशी असून त्यांतून वेगवेगळे पाचक रस बाहेर पडून पचनास मदत होते. जठराच्या व आंतड्याच्या भिंतींतच पेशी असतात, परंतु लालोत्पादक पिंड, पित्ताशय व स्वादुपिंड हे अन्ननलिकेच्या बाहेर असून त्यांचा रस मात्र अन्ननलिकेंत उतरतो. गालांच्या आंत व जिभेच्या खालीं पिंड असतात. त्यांतून लाळ उत्पन्न होत. जठराचे बाजूस पित्ताशयांत पित्त उत्पन्न होऊन तें लहान आंतड्याच्या प्रथम भागांत येतें, व स्वादुपिंडांतील रसही तेथेंच येतो. या सर्व रसांच्या संयुक्त क्रियेनें अन्नांतील वेगवेगळ्या पदार्थांचें पचन होतें.

पोळी किंवा भाकरी चावून गिळण्याऐवजीं तशीच तोंडांत पांच दहा मिनिटें ठेवल्यास ती गोड लागूं लागते. म्हणजे लाळेच्या रासायनिक क्रियेनें पिठाच्या कांहीं भागाची साखर बनते, म्हणजे पचनाला तोंडांतच सुरवात होते. लाळ हा एक पाचक रस आहे, व ती अन्नाशीं नीट मिसळावी म्हणून अन्न चांगलें चावून नंतर गिळल्यास पचन अधिक चांगलें होतें.

जठररसांत हायड्रोक्लोरिक् ॲसिद् नांवाचा एक आम्ल पदार्थ असून शिवाय दोन पाचक रस असतात. यांपैकीं एकानें दूध दह्यांसारखें घट्ट होतें. कांहीं प्राण्याच्या

पोटांतून हा पदार्थ काढून त्याचा उपयोग ‘ चीझ् ’ करण्याकडे करतात. दुसऱ्या पाचक ( पेपसीन ) रसानें अंड्याच्या बलकाच्या जातीच्या पदार्थांचें रूपांतर होऊन पेप्टोन् बनतें. पित्ताशयांतून पित्त येऊन त्याचें चरबीच्या जातीच्या पदार्थांशीं ( तेल, तूप ) मिश्रण होतें व रूपांतरास मदत होते. स्वादुपिंडाच्या स्रावांत तीन पाचक रस असतात. एकानें लाळेप्रमाणेंच पिठाची साखर बनते. दुसऱ्यानें बलकासारख्या पदार्थांचें पेपटोन् होऊन पेपटोन्चें आणखी रूपांतर होतें. तिसऱ्यानें वर सांगितलेल्या चरबीसारख्या पदार्थांच्या मिश्रणाचें रूपांतर व पृथक्करण होऊन एके बाजूस आम्ल व दुसरे बाजूस ‘ ग्लिसरीन ’ नांवाचा गोड पदार्थ बनतो. आंतड्यांतूनही एक स्राव होत असतो व त्यांत अनेक पाचक रस असतात, साखरेचे प्रकार अनेक असतात, त्यांपैकीं फळांतील व मधांतील‘ ग्लूकोज ’ नांवाच्या प्रकाराचाच शरीला उपयोग असतो. याकरतां इतर प्रकारांचें या प्रकारांत रूपांतर आंतड्यांतील पाचक रसांनीं बनतें.

पाव, लोणी व मांसाचा एक तुकडा एकदम तोंडांत घातलीं अशी कल्पना करूं. तो घांस चांगला चावल्यास त्याचे अत्यंत बारीक तुकडे होऊन त्यांत लाळ मिसळून त्यांतील पावाच्या तुकड्याची साखर बनूं लागते, पण इतक्यांत तो घांस गिळल्यामुळें तो जठरांत जातो. जठरांतील आम्ल व पेपसीन यांच्या संयुक्त क्रियेनें मांसाचें अंशतः रूपांतर होऊन पेपटोन बनतें; व लाळेनें पावाची साखर बनण्याचें काम चालू राहतें. हें अन्न जठरांत दोन तास राहतें पण अजून लोणी जसेंच्या तसेंच असतें. नंतर तें अर्धवट पचलेलें अन्न जठरांतून लहान आंतड्यांत जातें. पावाच्या राहिलेल्या भागाची येथें साखर होते, मांसाच्या राहिलेल्या भागाचें पेपटोन होऊन त्याचें आणखी रूपांतर व पृथक्करण होतें, लोण्याशीं पित्त मिसळून त्यापासून आम्ल व ग्लिसरीन होतात. याप्रमाणें सर्व भागांचें रूपांतर होऊन मांसांत व पावांत असलेलें मीठ मात्र वेगळें होतें. हे पदार्थ जसजसे तयार होतात तसतसे आंतड्यांच्या बाजूंतून पार जाऊन रक्तप्रवाहांत मिसळतात व सर्व शरीरभर फिरून त्याच्या डागडुजीस लागणारें साहित्य व हालचालीस लागणारी शक्ति पुरवतात.

## पचन कसें होतें ?

हे पाचकरस केव्हां व कसे उत्पन्न होतात, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. आपल्या आवडीचे पदार्थ दृष्टीस पडल्यास, किंवा त्यांच्या वासानें किंवा कल्पनेनेंही तोंडास पाणी सुटतें. म्हणजे प्रत्यक्ष शारीरिक किंवा मानसिक कारणांनीही लाळ उत्पन्न होते. जठररसाचीही अशीच गोष्ट आहे, यामुळेंच आवडीचे पदार्थ, अतिरेक न केल्यास, सहज पचतात. इतर पाचक रसांची उत्पत्ति थोडी भागनडीची आहे. थोडासा जठररस प्रथम लहान आंतड्यांत जातो व त्याच्या स्पर्शानें तेथें 'सेक्रेतीन' नांवाचा पदार्थ उत्पन्न होऊन रक्ताबरोबर पित्ताशयांत व स्वादुपिंडांत गेल्याबरोबर या दोन पिंडांतून स्राव होऊं लागतो, जगूं काय सेक्रेतीननें अन्न जवळ आल्याची बातमी त्यांस दिली. याच रीतीनें आंतड्यांतूनही पाचक स्राव होऊं लागतो. यामुळें अन्न येण्यापूर्वींच हे सर्वरस पचन करण्यास सज्ज होऊन बसतात.

केवळ पचलेलें अन्न गाळून रक्तांत सोडण्याचेंच काम लहान आंतड्याकडे असतें असें नाहीं. समजा आपण लोणी किंवा तुपाच्या रूपानें गाईची किंवा म्हशीची चरबी खाल्ली तर ती जशीच्या तशीच मनुष्याच्या शरीरांत चरबी म्हणून राहूं शकत नाहीं. तिचें रूपांतर व पृथक्करण होऊन त्या घटकांपासून मानवी चरबी बनते, व हें काम लहान आंतड्याकडे असतें. मांसापासून मांस बनतें खरें, परंतु इतर मांसापासून मानवी मांस बनतें, यामुळेंच बकऱ्याचें मांस खाल्ल्यानें स्वभाव बकऱ्यासारखा होत नाहीं व वाघाचें खाल्ल्यानें वाघासारखाही होत नाहीं.

स्नायूंस केवळ साखरेचाच उपयोग असतो. शरीराच्या प्रत्येक हालचालीचे वेळीं थोड्याशा साखरेचा नाश होतो. आपण खाल्लेली साखर किंवा खाल्लेल्या पिठाची बनलेली साखर ग्लूकोजच्या रूपांत पित्ताशयांत येते व किंचित रूपांतर होऊन तेथें राहते व ती जरूर तसतशी ग्लूकोजच्या रूपांत स्नायूंना पुरवण्याचें काम पित्ताशयाकडे आहे. स्नायूंमध्येंही थोडासा ग्लूकोजचा संचय होऊं शकतो. त्याच प्रमाणें चरबीचाही संचय त्वचेच्या खालीं होऊन तेथें थर जमतात व या चरबीचा जरूर तसा उपयोग होतो. परंतु अन्नांत पीठ व साखर भरपूर असल्यास या चरबीचा उपयोग तर होत नाहींच, पण अन्नांतील चरबीमुळें हे थर वाढत जातात. याकरतां लठ्ठ माणसांनीं चरबी, पीठ व साखर बेतानें खावीं.

## समाजस्वास्थ्य

मांस, अंड्याचा बलक वगैरेंचा उपयोग शरीराची झीज भरून काढण्याकडे असतो व हे सांचून राहूं शकत नाहींत. तेव्हां मांस बेतानें खाणें बरें, नाहीं तर अस्वास्थ्य उत्पन्न होतें. बऱ्याच लोकांत यासंबंधीं अशी एक विचित्र कल्पना आहे कीं मांस पचण्यास जड असल्यामुळें तें खाल्ल्यास दारू प्यावी लागते. वास्तवीक मांसाहार पचण्यास सुलभ असल्यामुळें आजारी माणसासही देतात. त्याला दारू पिण्याची बिलकुल जरूर नसते.

---

## आपली विवाहसंस्था

( लिहून आलेला मजकूर )

आपल्या विवाहसंस्थेंत एक महत्वाची सुधारणा करणें जरूर आहे आणि ती म्हणजे तिची समूळ उचलबांगडी करणें हो होय. हल्लीच्या विवाहांची स्थिति फारच चमत्कारिक आहे. पुरुषाला एकदम वाटेल तितकीं व वाटेल तितके वेळां लग्नें करण्याची परवानगी, पण बायकांना मात्र एकच लग्न ! नवरा मेला तरी दुसरें लग्न करण्याची सोय नाहीं ! हे व दुसरे हास्यास्पद प्रकार काढून टाकण्यास एकच सोपा उपाय आहे, तो म्हणजे विवाहसंस्थेची हकालपट्टी हाच होय.

वयांत आलेल्या स्त्रीपुरुषांचें एकमेकांवर प्रेम असेल, म्हणजे त्यांना एकमेकांच्या सांनिध्याची जरूर भासत असेल तर तीं सहजच एकमेकांजवळ राहूं लागतील. त्यांचें प्रेम पुढें नष्ट झालें तर तीं एकमेकांपासून दूर होतील. दोन व्यक्ति एकत्र राहतात कीं दूर राहतात हें कळण्याची समाजाला जरूर आहे असें आम्हांस वाटत नाही. विवाहसंस्था नाहींशी केली म्हणजे स्त्रीपुरुषसंबंधाची जाहिरात ताशे, वाजंत्रीं, निमंत्रणें अथवा वर्तमानपत्रांतील नोटिसा यांच्या द्वारें देण्याचें कारण उरणार नाहीं. बरें एकाद्या जोडप्याचें प्रेम आजन्म टिकलें तर त्यांना तुम्ही एकमेकांजवळ राहूं नका असेंही कोणी सांगत नाहीं. एकमेकांच्या स्वभावाची पूर्ण ओळख होण्यापूर्वींच 'मी जन्मभर तुझ्याजवळ राहण्यास तयार आहें' असें एका व्यक्तीनें दुसरीला सांगणें म्हणजे पशुतुल्य वर्तन करणें आहे. मनुष्याच्या संस्कृ-

तीचा अथवा दर्जाचा त्यांत कोठें मागमूसही लागत नाहीं. आमच्या मतें पति-पत्नींच्या नात्यानें एकमेकांजवळ राहूं इच्छिणाऱ्या प्रत्येक जोडप्यानें " आपण आज एकमेकांना आवडतों व एकमेकांवर प्रेम असेतोंपर्यंत आपण एकत्र राहूं असा आज निश्चय करूं या. आपल्यापैकीं एकाचेंही प्रेम नाहींसें झालें तर आपण केलेली ही व्यवस्था आपोआपच नाहींशी होईल, " अशा तऱ्हेचा करार केला पाहिजे.

'प्रेम कोणाचाच हुकूम ऐकत नाहीं; प्रेमाला बांधून ठेवणें शक्य नाहीं; प्रेम आंधळें असतें' वगैरे ओरड कित्येक कवींनीं आजपर्यंत केलेली आहे व त्यांपैकीं बहुतेक गोष्टी आपण खऱ्या धरूनही चालतों. पण एकदां लग्न झाल्यावर मात्र प्रत्येक नवऱ्याचें बायकोवर व बायकोचें नवऱ्यावर प्रेम आजन्म राहिलेंच पाहिजे असा आपण आग्रह धरतों! लग्न झाल्यानंतरच्या निकट सहवासामुळेंच कित्येकदां प्रथमच्या प्रेमाचा नाश होतो आणि जबरीनें अशा पतिपत्नींना एकत्र बांधून ठेवणें हा क्रूरपणा आहे. आमचें तर असें मत आहे कीं बाहेरची कोणत्याही प्रकारची जबरी नसूनही आपण एकमेकांजवळ केवळ स्वखुषीनें व प्रेमाखातर रहात आहों अशा भावनेनेंच पतिपत्नीं अधिक सलोख्यानें एकत्र राहतील. बाह्य बंधनें असलीं कीं तीं तोडून टाकण्याची इच्छा होतेच.

विवाहबंधनांचा जुलूम नाहींसा होण्यास स्त्रीपुरुषांना सांपत्तिक स्वातंत्र्य मिळणें जरूर आहे. पोटाकरतां लग्न करणें जोंपर्यंत स्त्रियांना जरूर पडत आहे, तोंपर्यंत त्यांची गुलामगिरी संपणें शक्य नाहीं. जीं कामें कोणत्याही परक्या स्त्रीनें केलीं तर तिला आपण पैसे देऊं, तींच कामें लग्नाच्या बायकोनें केलीं तर तिला अन्नवस्त्रापलीकडे कांहीं मिळत नाहीं. खरें पाहिलें तर नवरा ज्याप्रमाणें बाहेर काम करतो त्याप्रमाणें बायको घरांत काम करते. अर्थात कुटुंबाचा एकंदर खर्च वजा जातां जी शिल्लक राहील त्यापैकीं निम्म्यावर बायकोचा हक्क असावयास पाहिजे. असें झालें म्हणजे मग जरी घटस्फोटाचा प्रश्न आला तरी स्त्री आर्थिक दृष्ट्या पुरुषावर अवलंबून राहणार नाहीं.

आतां राहतां राहिला प्रश्न मुलांचा. घटस्फोट न होतां जीं नवराबायको एकत्र राहतील त्यांची मुलें अर्थातच त्यांच्याजवळ राहतील, पण ज्या पतिपत्नींना मुलें असून देखील एकत्र राहणें अशक्य होईल, त्यांच्या मुलांची सोय शक्य तर आईजवळ व शक्य नाहींच तर सरकारी शिशुगृहांतून झाली पाहिजे. रशियांत हल्लीं अशीच व्यवस्था असून कित्येक आईबाप खुषीनें देखील सरकारी शिशुगृहांत आपलीं मुलें आणून ठेवतात.

विवाहसंस्था नाहींशी झाली पाहिजे, हें मत ऐकतांच घाबरून जाऊन ' कुटुंबसंस्थेचा नाश ! ' इत्यादि आरडाओरड करणाऱ्या लोकांना आम्हांला एवढेंच सांगावयाचें आहे कीं पतिपत्नींची एकत्र राहण्याची इच्छा असल्यास त्यांस बाह्य बंधनांची जरूर नाहीं व विवाहसंस्था नाहींशी झाली तरी त्यांना खुशाल एकत्र राहतां येईल. त्यांची तशी इच्छा नसल्यास त्यांना एकत्र जखडून ठेवणें नुसतें अन्यायाचेंच नव्हे तर विवाहसंस्थेच्या दृष्टीनें देखील मूर्खपणाचें आहे. एकमेकांशीं भांडणारें जोडपें एकत्र राहण्यांत समाजाचा कोणताच फायदा नाहीं. त्यांना वेगळें राहूं देणें हेंच इष्ट आहे. म्हणजे, विवाहसंस्था नाहींशी झाल्यास प्रेमी जोडप्यांस हल्लींप्रमाणें एकत्र राहतां येईल, पण ज्यांचें पटत नाहीं त्यांना मात्र आपलें आयुष्य अधिक सुखी करण्याची संधि मिळेल. मग यामुळें फायदा कीं तोटा ?

हल्लींच्या विवाहसंस्थेच्या मुळाशीं स्त्रीच्या शरीरावरचा पुरुषाचा जो अमर्याद हक्क आहे तोही नाहींसा होणे जरूर आहे. एकाद्या माणसाच्या बायकोशीं व्यभिचार करणें हा गुन्हा होतो, पण एकाद्या बाईच्या नवऱ्यांशीं व्यभिचार करणारी बाई गुन्हेगार ठरत नाहीं. विवाहसंस्थाच नाहींशी झाली म्हणजे हे रानटी प्रकारही नाहींसे होतील. कोणत्याही पुरुषाला आपल्या बायकोच्या शरिरावर हक्क चालवतां येणार नाहीं व इतर स्त्रियांवर बळजबरी केल्याबद्दल जशी शिक्षा करतां येते तशीच बायकोवर ( म्हणजे त्या नात्यानें राहणाऱ्या स्त्रीवर ) केल्यासही शिक्षा होईल.

एखाद्या गोष्टीचा नुसता बाऊ करून त्याबद्दल विचारच करावयाचा नाहीं असा ज्यांचा निश्चय असतो त्यांना नवीन विचार मान्य होणें शक्य नाहीं. पण बाकीच्यांनी तरी या गोष्टींचा विचार निःपक्षपाती मनानें करण्याची आतां वेळ आली आहे.

## आगगाडींत ऐकलेला संवाद

१. ( ++ स्टेशन आल्यावर ) कायहो, इथले ते जहागिरदार कसे काय आहेत हल्लीं ? आपले बापूसाहेब ?

२. अहो ते तर वारले !

१. असं का ? फार वाईट झालं. असा मनुष्य लाखांत मिळायचा नाहीं. फार सज्जन मनुष्य.

३. त्यांनीं असें काय केलें होतें बोवा ?

१. सज्जन असायला कांहीं करावें लागतें वाटतें ? तुम्ही तसे आपले हेच दिसतां !

३. मग तुम्ही त्यांना सज्जन कशावरून म्हणतां ?

१ आपला बाळबोध मनुष्य होता. वडिलांनीं घालून दिलेला कित्ता गिरवायचा.

२. स्वतः विचार करायचा नाहीं, अक्कल गहाण टाकायची !

३. जसा घाण्याचा बैल, एक पाऊल वांकडें पडावयाचें नाहीं.

२. वडिलांनीं अंगवस्त्र ठेवलें होतें, यांनीं ठेवलें होतें !

३. वाहवा ! चांगलाच सज्जन होता !

१. पण यांत त्यांनीं कोणाचें काय वाईट केलें ? गरीब बिचारी विधवा होती, बिनवारशी माल, तिचेंही कल्याण झालं. कोणाचेंच नुकसान झालें नाहीं. एवींतेवीं काम करूनच पोट भरावयाचें कीं नाहीं ?

२. पण त्यांची बायको जिवंत होती नां ? तिची काय वाट ?

१. तिला कांहीं त्यांनीं कमी पडूं दिलें नाहीं. तिलाही मुलें होत होतीं, हिलाही होत होतीं; पैशाची दथात नव्हती, मग कोणाचें काय बिघडलें ? कांहीं लोक दोन बायका नाहींका करीत ?

२. यांनीं एक केली आणि एक ठेवली, इतकेंच.

३. असें कां ? तिच्याशींही लग्न कां नाहीं केलें ?

२. अहो ती विधवा होती !

१. इतकेंच नव्हे तर इतर जातीची होती.

२. हें मला माहीत नव्हतें.

१. जुन्या मताचा मनुष्य,...

२. अगदीं प्रत्येक मतावर दाट बुरशी चढलेली !

३. पण जुन्या मताच्या लोकांना इतर जातीचें अंगवस्त्र चालतें म्हणावयाचें ?

१. चालतेंच मुळीं ! पण त्यांची शिस्त अतिशय कडक असे. तिच्या घरीं त्यांनीं कधीं पाणी नाहीं घेतलें. ती इतके वेळां आग्रह करीत असे, कीं माझ्या हातचें एकदां तरी जेवा, पण छे ! पाणी घेतलं नाहीं, मग जेवणाचें नांवच नको.

२. पण तो तर तिच्या मांडीवर डोकें ठेवून मेला म्हणे.

१. तेंच तर मी सांगत होतों तुम्हांला, मरतांना सुद्धां त्यांनीं तिच्या हातचें पाणी नाहीं घेतलें. ते नाहींच म्हणाले, तेव्हां तिनें शेवटीं पळींभर दूध तोंडांत घातलें इतका धार्मिक मनुष्य, शेवटपर्यंत जात मोडूं दिली नाहीं.

३. असें असें ! जात तोंडाकडून मोडते ! पण कायहो, हे जाहागिरदार कधीं आगगाडींत बसले होते का ?

१. वाः ! आगगाडींत कां नाहीं बसणार ?

३. अहो वडिलांचा कित्ता गिरवणार, आणि वडिलांच्या वेळीं आगगाडी नव्हती !

१ इतके कांहीं ते खुळचट नव्हते !

३. म्हणजे जुन्या रीतीला सोडून तुम्हीं जितके जातां, तितकेंच इतर लोकांनीं गेलें पाहिजे. कमी गेला तर तो खुळचट; जास्त गेला तर धर्मलंड ! वाहवा !

१ तें आपलं तुम्हीं कांहीं ह्मणा. तुमच्यासारख्या कांहीं लोकांनीं त्यांना नांवें ठेवलीं; पण तो आपला सरळ मनुष्य स्पष्ट सांगत असे कीं; आपलें कांहीं एका बायकोनें भागत नाहीं बोवा. आह्मीं अंगवस्त्र ठेवलें तर लोकांचें काय जातें ? ज्याच्या अंगांत ताकत असेल तो ठेवील. माझे पैसे आणि

माझेंच शरीर ! बरें बायकोचें कोणत्याही बाजूनें कमीं पडूं देत नाहीं; तेव्हां तिची तक्रार असायचें कारण नाहीं.

३. असें समजा, बायको त्यांना ह्मणाली असती कीं माझें कांही एका पुरुषावर भागत नाहीं बाई; मी आपला दुसरा पुरुष ठेवणार. तुमचें कांही कमी पडलें नाहीं ह्मणजे झालें; बाकी माझ्या शरीराचा मी पाहिजे तसा उपयोग करीन; तुमच्या अंगवस्त्राला पैसे तरी लागतात; मी पुरुष ठेवला तर तो पैसेही मागणार नाहीं. तेव्हां तुमची मुळींच तक्रार असूं नये.

१. शांतं पापं ! अहो जुन्या मताच्या बायका असें ह्मणत नाहींत !

३ नसतील म्हणत. पण असें म्हणणाऱ्या बाईला सज्जन म्हणायला काय हरकत आहे ?

१ बरें बरें ! तुम्हीच करा तसल्या बायका !

---

जननेंद्रियाकडे लक्ष जाऊं नये म्हणून तें धुतां कामा नये असा उपदेश ख्रिस्ती धर्मोपदेशक करतात. गाईचें शेण व मूत खाण्यास हिंदु धर्म सांगतो. आंवडा गिळला असतां उपास मोडेल या भीतीनें रमजान महिन्यांत मुसलमान सर्वत्र थुंकून घाण करतात. अशा शेंकडों वेडगळ व घातक समजुती प्रत्येक धर्मांत भरल्या आहेत. ज्यांस थोडीबहुत अक्कल असेल त्यांनीं तरी धर्म अजीबात सोडून द्यावा.

---

## आणखी एक डॉक्टर

'भिषग्विलास' मासिकाच्या संपादक मंडळांतील डॉ. अ. वि. केतकर, एम्. बी. बी. एस्, नासिक, यांनी आपल्या मासिकाच्या दोन अंकांत मिळून संततिनियमनाविरुद्ध एक खोडसाळ लेख लिहिला आहे. डॉक्टरवर्गाशीं आमचें भांडण नाहीं, परंतु इतर मागसलेल्या लोकांविरुद्ध जसें आम्हांस लिहावें लागतें, त्याचप्रमाणें मागसलेल्या डॉक्टरांविरुद्ध, म्हणजे त्यांच्या मागसलेल्या कल्पनांविरुद्ध, लिहिणें

आमचें कर्तव्य आहे. हे डॉक्टर मागसलेले आहेत इतकेंच नव्हे, परंतु यांना मधून मधून खोटीं व निराधार विधानें ठोकून देण्याची संवय आहे. संपादकीय समालोचनेवरून वरील मासिक ईश्वराच्या प्रेरणेनें चाललें आहे असें दिसतें. ईश्वर खोट्या विधानांची प्रेरणा देतो हें नवल आहे.

आमचें तेंवढें चांगलें, दुसऱ्याचें तें वाईट, अक्कल काय ती आमच्या वांट्याला आली आहे, आमचे पूर्वज म्हणजे तर कांहीं विचारूंच नका ( आमचेच पूर्वज ते ! ) त्यांच्याशी कोणाची तुलनाच होणें शक्य नाहीं, अशा अहंमन्यतेचें वारें डॉ. मजकुरांस चांगलेंच बांधलें आहे.

'एकत्र कुटुंबपद्धतीमधें जें एक प्रकारचें गृहसौख्य व मनःशांति लाभते, तें विभक्त कुटुंबपद्धतींत आढळून येत नाहीं. पाश्चिमात्य देशांत एकत्र कुटुंबपद्धति फारशी, किंबहुना मुळींच दिसून येत नाहीं. त्यामुळें खरें कौटुंबिक सुख त्यांना माहीत नाहीं'...आमचे मतें यांत अहंमन्यतेपलीकडे कांहीं नाहीं. एकत्र कुटुंबपद्धति अधिक सुखकर असते असें आमच्या आढळांत नाहीं. याच्या उलटच प्रकार बहुधा दिसून येतो. सासवासुनांचीं, नणदाभावजयांचीं बहुधा नेहमीं भांडणेंच चालू असतात. एकत्र कुटुंबांत सर्व माणसें क्वचितच सुखी असतात.

'लग्न करण्याचा जो उदात्त हेतु "वंश चालवणें" किंवा "प्रजायै गृहमेधी" ही गृहस्थाची व्याख्याच नाहींशी झाली. अर्थात् वैषयिक सुख हें पूर्वीचें गौण कारण आतां लग्नाचा प्रधान उद्देश होऊन बसलें.' काव्यें सोडून व्यवहारदृष्ट्या विचार केल्यास लग्नाच्या उद्देशांत कोणताही फरक झालेला नाहीं. पूर्वींप्रमाणेंच हल्लींही वैषयिक सुख प्रधान हेतु आहे व त्यांत दुसऱ्याचें नुकसान नाहीं तोंपर्यंत कोणाला ओरडण्याचें कारण नाहीं.

संततिनियमनाचा मुख्य हेतु संतति बंद करून चैन करणें हा आहे असें ठरवून त्यावरून तें वाईटच असलें पाहिजे असा निकाल डॉ. साहेब देतात. संततिनियमनाला कांहीं उदात्त हेतु मागून चिकटवण्यांत आले आहेत असाही त्यांनीं एक

शेरा मारला आहे. प्रतिपक्ष्यांचे हेतु नीचच असले पाहिजेत असें गृहीत धरणें यालाच जर युक्तिवाद ह्मणायचें असेल, तर मुलांचें लेंढार कमी झाल्यामुळें बायका-मुलांच्या रोगांतून निघणारें डॉक्टरांचें उत्पन्न कमी होईल, ह्मणूनच कांहीं डॉक्टर संततिनियमनाच्या विरुद्ध असतात, त्यांनी इतर कारणें सांगितलीं तरी तें ढोंग आहे, तीं चिकटवलेलीं कारणें आहेत, असें आम्हीं ह्मटल्यास डॉ. साहेबांचा रोष होऊं नये. शिवाय हें विधान आह्मीं करण्यापूर्वीं प्रसिद्ध डॉक्टरांनींच केलेलें आमच्या वाचनांत आहे, व त्यांत थोडेंबहुत तथ्य आहे यांत शंका नाहीं. शिवाय कांहीं लोक चैनीकरतां संततिनियमन करीत असले तर अशांना संतति होण्यापासून ( डाक्टरां-शिवाय ) कोणाचा फायदा होणार ?

आतां डॉ. साहेब संततिनियमनाच्या 'चिकटवलेल्या' उद्देशांसंबंधीं काय म्हण-तात तें पाहूं. सर्वांत प्रामुख्यानें व नेहमीं पुढें आणण्यांत येणारा मुद्दा म्हणजे जगाची लोकसंख्या सारखी वाढत चालली आहे व अशीच पुढें वाढत राहिल्यास लोकांना राहण्यास सुद्धां जागा पुरणार नाहीं, अर्थात अन्नही पोटभर मिळणार नाहीं. म्हणून आतांपासून लोकसंख्येस आळा घालणें जरूर आहे. परंतु...जीवनार्थ कलह हे नेहमीं चालूच राहणार...या धकाधकींत कोणतीं माणसें जिवंत रहावयाचीं हें आपण ठरवण्यापेक्षां निसर्गानेंच ठरवणें बरें नव्हे काय ? Survival of the fittest हा निसर्गाचा नियम आहे. परंतु आपण जर कोणाच्या किती मुलांनीं जगावें हें ठरवूं लागलों तर तें फार चुकीचें ठरेल.'

वरील इंग्रजी शब्द डॉ. नीं कोठें तरी ऐकले असले पाहिजेत, परंतु त्यांचा अर्थ त्यांस निःसंशय समजला नाहीं असें नाइलाजास्तव म्हणावें लागतें, कारण एरवीं त्यांनीं मुद्दाम लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकण्याचा प्रयत्न केला आहे असें म्हणावें लागेल. 'Fittest' शब्दाचा अर्थ सामान्यतः सर्वांत अधिक इष्टगुणसंपन्न असा भासतो, व 'इष्ट' याचा अर्थ आपण मानवी सामाजिक दृष्टीनें करीत असतों. परंतु वरील नैसर्गिक नियमाचा अर्थ करतांना मानवी दृष्टीचा त्यांत संबंध नसतो. 'जगण्यास सर्वांत अधिक योग्य तो जगतो' असा वरील कायद्याचा अर्थ करतां



९

येईल, परंतु योग्य कोण हें मात्र आगाऊ सांगतां येणार नाहीं. जो जगला तो योग्य होता असें मागाहूनच म्हणावयाचें, व योग्य म्हणजे इष्ट नव्हे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. प्लेगच्या सांथींत पहिलवान मरून अशक्त लोकही जगलेले आहेत यावरून निसर्गाची निवड आपल्यापेक्षां चांगली, हें ह्मणणें निराधार आहे. आणि खरोखरच जर निसर्गाची निवड योग्य असेल व निसर्गावरच या गोष्टी सोंपविणें बरोबर वाटत असेल, तर मग रोगचिकित्सा करून त्यांवर उपचार करण्याची खटपट डॉक्टर कां करतात ? लोकांस रोग झाले तर झाले, निसर्गानें त्यांचें काय व्हावयाचें असेल तें होईल, असें ते कां म्हणत नाहींत ? अर्थात पैशाकरतां ते तत्त्वावर पाणी सोडतात, किंवा हें डॉ० चें खरें मत नाहीं, तें केवळ त्यांनीं आपलें ह्मणणें प्रस्थापित करण्याकरितां वकिली बाण्यानें पुढें मांडलें आहे, हें उघड आहे.

‘ पाश्चिमात्य देशांत काडीमोड करतां येत असल्यामुळें एका जोडप्यास मुलें झालीं नाहींत तर त्यांना काडीमोड करतां येऊन दोघांनाही दुसऱ्या विवाहानंतर मुलें झालेलीं आढळून येतात. ही स्थिति हिंदुस्थानांत नाहीं. त्यामुळें साहजिकच संततिनियमन होतें. ’ यांतील प्रथम भाग **खोटा** आहे. मुलें नाहींत या सबबीवर पाश्चात्य देशांतही काडीमोड मिळत नाहीं. ( दुसरा भाग म्हणजे धूळफेक आहे. युरोपांत पुष्कळ स्त्रिया अविवाहित राहिल्यामुळें त्यांस मुलें होत नाहींत. हिंदुस्थानांत प्रत्येक मुलीचें लग्न झालेंच पाहिजे असा धर्म असल्यामुळें वंध्येशिवाय इतर सर्व स्त्रियांस मुलें होतात. )

‘ हिंदुस्थानांत संततिनियमनाचा प्रसार होत आहे... तो फक्त सुशिक्षित समाजांतच प्रथम होणार...व अशिक्षितांचें मात्र प्रजोत्पादन चालूच राहणार... हा नेहमींचा मुद्दा आहे व खराही आहे, परंतु त्याला एकच उपाय आहे, तो म्हणजे अशिक्षितांत देखील संततिनियमनाचा प्रसार करणें. हें शक्य नाहीं असें डॉ. साहेब म्हणतात. परंतु कांहीं देशांत हें शक्य झालें आहे व येथेंही होईल. स्वतःचा वैयक्तिक फायदा कशांत आहे हें अशिक्षितांसही कळणें कठिण नसतें. वैयक्तिक फायद्याचा मुद्दा डॉ० स क्षुल्लक वाटतो, परंतु तो सर्वांत जास्त महत्त्वाचा आहे.

# आणखी एक डॉक्टर

'एक कारण असें सांगण्यांत येतें कीं, एका दंपत्यास जास्त मुलें झालीं तर त्यांना शिक्षण वगैरे योग्य तऱ्हेनें देण्याकरतां त्यांजजवळ पैसा असत नाहीं व त्यांच्या पोटास पुरेसें अन्नही त्यांना घालतां येत नाहीं. यांतील पहिला भाग जरा विचार करण्यासारखा आहे; पण दुसऱ्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण सुदृढ शरीर हें केवळ पौष्टिक व श्रीमंती अन्नावरच होऊं शकतें असें नाहीं. ह्याच्या उलट नुसत्या चटणीभाकरीवर राहणारे लोकच जास्त काटक व निरोगी असतात, हें दिसून येतें. शिक्षणाच्या बाबतींतही असेंच म्हणतां येईल. कारण शिक्षण हें शाळा व कॉलेजें यांतच शिकल्यानें व अधिक खर्च केल्यानें मिळतें असें नाहीं. ...श्रीमंतांचीं मुलें शिक्षणाकडे योग्य तितकें लक्ष देत नाहींत आणि गरीब मुलांत हुशार विद्यार्थी आढळतात!'

हा डोळ्यांत धूळ टाकण्याचा आणखी एक प्रयत्न आहे. श्रीमंत लोक जर काटक व निरोगी नसतील तर तो त्यांच्या श्रीमंतीचा दोष नाहीं, योग्य व्यायाम केल्यास असें होणार नाहीं. चटणीभाकर देखील फुकट मिळत नाहीं व अन्न पुरेसें मिळाल्याशिवाय मनुष्य काटक व निरोगी होणें शक्य नाहीं. पौष्टिक अन्न शरीरास वाईट म्हणणें दाक्तरांस शोभत नाहीं. शिक्षणाचीही ज्यांना किंमत कळत नाहीं त्यांची कींव येते, व त्यांना यापेक्षां जास्त उत्तर देऊन समजणारही नाहीं. एकंदरींत डॉ. चें म्हणणें, प्रत्येकानें शक्य तितकें गरीब होण्याचा प्रयत्न करावा, असें दिसतें. आमचा तीव्र मतभेद आहे. गरीबांचींच मुलें हुशार असतात व श्रीमंतांचीं नसतात, हें खरें नाहीं, कांहीं मुलें गरीबीमुळें जास्त प्रयत्न करतात व पुढें येतात, त्यामुळें तीं लोकांच्या नजरेस येतात इतकेंच. हुशार मुलांचें प्रमाण गरीबांत जास्त नसतें, श्रीमंतांच्या मुलांनीं लक्ष दिलें नाहीं तर ती आईबापांची चूक आहे. हे गरीबीचे अध्वर्यु स्वतः चटणीभाकर खाऊन कां रहात नाहींत?

'असा नेहमींचा अनुभव आहे—व अमेरिकेंत आंकड्यांनीं सिद्ध केलें आहे—कीं एका कुटुंबांत पुष्कळ मुलें असलीं कीं तीं हुशार, आनंदी व बहुश्रुत अशीं होतात....विशेषतः पुष्कळ भावंडांमधें धाकटीं भावंडें जास्त सशक्त, बहुश्रुत व

हुशार असतात.' हें विधान **खोटें** आहे, व आंकड्यांनीं किंवा इतर रीतींनीं, अमेरिकेत किंवा अन्यत्र सिद्ध केलेलें नाहीं. हें खोटें विधान इतरांनीं पूर्वी केलेलें आहे, पण त्याला कोणताही पुरावा नाहीं. धाकट्या भावंडांबद्दलचें विधान तर अत्यंत धाष्टर्याचें आहे. पुष्कळ मुलें झाल्यास शेवटचीं बहिरीं मुकीं झाल्याचीं उदाहरणें आह्मी दाखवतों. शिवाय पुष्कळ ह्मणजे किती ? प्रत्येकास एकच मूल असावें असें कोणीं कधीं ह्मटलेलें नाहीं, मुलांस एकमेकांच्या संगतीचे फायदे मिळत असले तर ते दोन तीन मुलांतही मिळूं शकतात; व समजा एकच मूल असलें तरीही इतर लोकांचीं मुलें शेजारीं असतातच. अरण्यांत राहणारांची गोष्ट वेगळी.

'सर्वसाधारणपणें संततिनियमनाचा अवलंब केल्यास परिणामीं कशी अवस्था होते याचें उत्कृष्ट उदाहरण हल्लीं फ्रान्स देश आहे. फ्रान्स देशांत लोकसंख्येचें प्रमाण जसें इतर राष्ट्रांत वाढत आहे तितकें तर वाढत नाहींच, परंतु देशाच्या सुस्थितीच्या व स्थैर्याच्या दृष्टीनें तें कमीच आहे. आणि आतां लढाईत बरीच लोकसंख्या कमी झाल्यामुळें ती भरून कशी निघणार ही काळजी वाटल्यानंतर तेथील जनता डोळे उघडांत आहे व सरकारही संतति वाढवण्यास प्रोत्साहन देत आहे'...फ्रान्स देशाचें उदाहरण उत्कृष्ट आहे खरें, परंतु तें आमचे बाजूनें आहे. देशाची सुस्थिती कशावरून ओळखायची हा मुख्य प्रश्न आहे. वाढती लोकसंख्या ह्मणजेच सुस्थिति, हें खोटें आहे. देश सुखी आहे कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे. हें पाहण्याकरतां अर्थात तेथील गरीब ह्मणजे मजूर वर्गाची स्थिती पाहणें जरूर आहे. बेकारीचे आंकडे पाहिले असतां असें दिसतें कीं इंग्लंड किंवा जर्मनीपेक्षां फ्रान्समध्यें बेकारी कमी आहे. ( गेल्या फेब्रुआरीचे आंकडे फ्रान्स १२९८८, इंग्लंड १४३००००, जर्मनी ३०१८६२४. ) फ्रान्स व इंग्लंडची लोकसंख्या जवळजवळ सारखी आहे. हा संततिनियमनाचा परिणाम आहे असें विरुद्धपक्ष देखील कबूल करतो. फ्रान्समध्यें मजुरांस पगारही चांगला मिळतो ह्मणून इतर देशांतील मजूर तेथें जाण्यास टपलेले असतात. सरकार संतति वाढवण्यास उत्तेजन देतें हें खरें, परंतु मुत्सद्दी व सेनानायक यांचा लढाईमुळें बडेजाव व्हावयाचा असतो व त्यांना लढाईत मरण्यास माणसें पाहिजे असतात, हें त्यांचें खरें कारण, व हें अत्यंत निंद्य आहे. सुदैवानें ज्याला संततिनियमनाचे फायदे

कळले तो त्यांना मुळींच भीक घालीत नाहीं, व हें जगाच्या शांततेच्या दृष्टीनें हिताःवह आहे.

'आपणापेक्षां निसर्गाचे उपाय जास्त खात्रीचे व प्रगतीस साहाय्यकारक असे आहेत. अर्थात संततिनियमनाचें कार्य आपल्या हातांत न घेतां निसर्गाकडे सोंपवणेंच बरें. नाहींतर आपणही संततिनियमन करून संततीला आळा घालावा आणि निसर्गानेंही सांथीचे रोग आणि लढाया (ह्या डॉक्टरांना व संततिनियमनवाल्यांना थांबवतां येणें शक्य नाहीं) ह्यांच्या द्वारें लोकसंख्या आणखी कमी करावी! सांथीच्या रोगांत अशक्त माणसेंच मरणार आणि लढाईतही जगांत टिकण्यासारखें राष्ट्रच जिंकतें'...सांथींच्या रोगांत अशक्त माणसेंच मरतात हें विधान खरें नाहीं व फाजील दाट वस्तीमुळें सांथींस मदत होते, हें डाक्तरांस सुद्धां कळूं नये काय? लढायांत तर सशक्तच माणसें मरतात, कारण अशक्तांस घरींच बसावें लागतें. फ्रान्समधील उंच उंच माणसें नेपोलिअनच्या लढयांत मरून गेल्यामुळें फ्रान्समधील लोकांची सरासरी उंची कमी झाली आहे. ही प्रगति असल्यास नकळे! डाक्तरांना सांथी व लढाया थांबवतां येणार नाहींत, परंतु संततिनियमनवाल्यांना निःसंशय येतील. वाढती लोकसंख्या व त्यामुळें भासणारी विस्ताराची अवश्यकता हें लढाईचें कारण आहे, ही गोष्ट सर्वमान्य आहे व संततिनियमनानें गर्दी कमी होऊन प्रत्येकास जास्त जागा मिळेल व अधिक स्वच्छता राखतां येईल.

ज्यांना संततिनियमनापेक्षां दुष्काळ, रोग व लढायाच बऱ्या वाटत असतील त्यांच्या अकलेलाच कांहीं तरी रोग असला पाहिजे. स्वतः चैनींत राहून इतरांना पाहिजे तर रोगांनीं किंवा दुष्काळांत किंवा लढायांत मरावें पण संततिनियमन करूं नये असें म्हणणें म्हणजे माणुसकीचा अभाव आणि बेअकलीपणाचें, रानटीपणाचें व अनीतीचें प्रदर्शन आहे. समाजाचे शत्रु कोणी असतील तर असें म्हणणारे लोकच होत व समाजानें या लोकांस चांगलें ओळखूं लागलें पाहिजे, नाहींतर घात होईल. एकंदरींत ज्यांना खोट्या विधानांची मदत लागते त्यांच्या म्हणण्यांत फारसें तथ्य असेल अशी अपेक्षाच चुकीची होईल. तथापि डॉ. केनकर दुसऱ्या भागांत काय म्हणतात तें पाहूं.

या भागांत, क्षयरोग व इतर कांहीं विशिष्ट रोग स्त्रीला असल्यास संततिनियमन करावें, हें ते कबूल करतात. हेंही आश्चर्यच आहे, कारण निसर्गाचे मार्ग चांगले असें त्यांनींच म्हटलें आहे, तेव्हां रोगी स्त्रिया मेल्या तर मरूं द्याव्या असेंच त्यांनीं म्हणावयास पाहिजे होतें. यावरून त्यांना पूर्वापर संगतीची कितीशी परवा आहे हें उत्तम दिसतें.

'संततिनियमन ह्या शब्दाचा अर्थ आपणांस वाटतो तितका सरळ नाहीं. नुसता शब्दाचा अर्थ पाहिला तर त्यापासून त्याचा पूर्णपणें बोध होत नाहीं. असले अनैसर्गिक विचार पूर्वीं हिंदुस्थानांत नव्हते म्हणून तसे शब्दहि मराठी भाषेंत नाहींत, उदाहरणार्थ—Contraception हा शब्द घेतला तर त्याला मराठींत संततिनियमन हा शब्द मुळींच योग्य नाहीं....'

संततिनियमन हा शब्द आम्हींच प्रथम वापरला, तेव्हां याची जबाबदारी आमचेकडे येते. डॉ. केतकरांस पूर्ण बोध होत नाहीं ही आमची चूक नाहीं. **संतति** व **नियमन** हे दोन्ही शब्द कोशांत सांपडतील. नियमन याचा अर्थ मर्यादित करणें असा आहे. आमचे मतें हा अर्थ स्पष्ट आहे. आम्हीं कोणत्याही इंग्रजी शब्दांचे भाषांतर म्हणून हा शब्द तयार केलेला नाहीं. परंतु, भाषांतरच केलें पाहिजे असें डॉ. चें मत दिसतें ! हा मतभेद आहे.

नेहमींप्रमाणें अज्ञानाच्या जोरावर त्यांनीं **एक खोटें विधान** ठोकलेंच आहे. हिंदुस्थानांत पूर्वीं हे विचार होते, व आमच्या '**संततिनियमन**' पुस्तकाच्या दुसऱ्या व तिसऱ्या आवृत्तींत दिलेल्या संस्कृत उताऱ्यांत संततिनियमनाचेच काय पण गर्भपाताचे ही उपाय दिलेले आहेत. डॉ. नीं या विचारांस अनैसर्गिक म्हणून जातां जातां एक शिवी दिली आहे, परंतु अनैसर्गिक गोष्टी जर वाईट असतील, तर त्यांनीं प्रथम कपडे वापरणें सोडून द्यावें.

**आणखी एक खोटें विधान.** 'Practitioner' नांवाच्या एका वैद्यकीय त्रैमासिकानें चार वर्षांपूर्वीं स्पेशल अंक (Contraception Number) काढला होता आणि ह्या अंकांतील सर्व लेख फक्त याच विषयावर लिहिलेले होते...

## आणखी एक डॉक्टर

या अंकांत सर्व तऱ्हेच्या लेखकांचे लेख होते आणि त्यांत मौज अशी की **डॉक्टर लेखकांनीं लिहिलेले सर्व लेख संततिनियमनाच्या विरुद्ध होते,** म्हणजे तज्ज्ञांचीं मतें विरुद्ध व इतरेजनांचीं अनुकूल, अशी स्थिति झालेली आहे.'

एकतर डॉ. मजकुरांनीं वरील अंक पाहिलेला नाहीं व अजमासानें हें विधान ठोकून दिलें आहे, किंवा तो पाहिला असल्यास ते समजून उमजून खोटें बोलतात. आम्हीं तो अंक पाहिलेला आहे व त्यांत डॉ. नॉर्मन् हेअर यांचा संततिनियमनास अत्यंत अनुकूल असा लेख होता. इतकें येथें सांगणें जरूर आहे कीं उघडपणें संतति-नियमनासंबंधी काम करणारे डॉक्टर इंग्लंडांत फारसे नाहींत, किंबहुना डॉ. नॉर्मन् हेअर हे एकटेच आहेत म्हटलें तर फारशी चूक होणार नाहीं. यामुळें इतर डॉक्टरांचे मताला वैद्यकीय दृष्टीनें किंमत नाहीं. त्यांनीं पाहिजे तर नैतिक मत द्यावें, परंतु नैतिक मत डॉक्टरांचें असलें तरी त्याला इतरेजनांपेक्षां जास्त किंमत नाहीं. शिवाय या बाबतींत सरसकट डॉक्टरांस तज्ज्ञ म्हणणेंच चूक आहे. जे डॉक्टर यांत विशेष लक्ष घालून माहिती मिळवीत नाहींत ते तज्ज्ञ नसतात, कारण हा विषय परीक्षेला नसतो. डॉ. केतकरांचें या बाबतींतील अज्ञान पुढें दिसेलच. इंग्लंड, अमेरिकेंतही पुष्कळ डॉक्टरांस ही माहिती इतरेजनांकडूनच मिळवावी लागते व येथेंही अनेक डॉक्टर आमचेकडून माहिती मिळवून गेले आहेत.

' संततिनियमनाचा मुख्य शास्त्रीय व सर्वसंमत उपाय म्हणजे ब्रह्मचर्य, याबद्दल वादच नाहीं. परंतु त्यांत वैषयिक सुख मिळत नाहीं, म्हणून वैषयिक सुख मिळवून संततिनियमन करण्याचे आसुरी उपाय लोक शोधून काढीत असतात.'

ब्रह्मचर्य शास्त्रीयही नाहीं, व सर्वसंमत असतें तर सर्वच पंचाईत मिटली असती. शिवाय तें अत्यंत अनैसर्गिक आहे हें या डॉक्टरांना कसें समजत नाहीं ? वैषयिक सुख मिळत असल्यास तें मिळवण्यांत बिलकूल कमीपणा नाहीं. डॉ. केतकरांसारखे लोक आसुरी शिव्या देतील. देवोत बिचारे.

पुरुषांनी वापरण्याच्या रबरी पिशव्या सर्व दृष्टींनीं वाईट असें ते म्हणतात व येथें आमचा मतभेद नाहीं. परंतु **या डॉक्टरांना संततिनियमनाचे अनिष्ट**

**प्रकार तेवढेच माहीत असावे हें आश्चर्य आहे.** 'स्त्रियांच्या तर्फे करतां येण्यासारखे उपाय म्हणजे गर्भाशयाच्या भोंवतालीं एक रबराचें कडें बसवावयाचें व त्याची गळेचेप करावयाची, किंवा गर्भाशयाच्या मुखांत एक खिळ्यासारखी पाचर घालून ठेवावयाची...' वा डॉक्टर ! बहार केलीत ! ही गळेचेपीची युक्ति आपल्याच डोक्यांतली असली पाहिजे, निदान आम्हीं तरी पूर्वी कोठें पाहिलेली नाहीं. ही युक्ति खात्रीची नाहीं व ही किंवा पाचर बसवणेंही हानिकारक आहे याबद्दल मतभेद नाहीं.

**आधुनिक शास्त्रीय उपायांचें डॉ. केतकरांस ज्ञानच नाहीं, किंवा असुन ते मुद्दाम वेड पांघरतात?** गर्भाशयावर बसवण्याचा किंवा त्याच्यापुढें योनिमार्गांत बसवण्याची रबरी टोपी असते, व तिचा उद्देश गळेचेपी करण्याचा नसून गर्भाशयापर्यंतच्या सरळ वाटेंत एक पडदा ठेवायचा असतो, याची यांस खबरही नाहीं !

'ह्या उपायांचा तिसरा प्रकार ह्मणजे रासायनिक द्रव्यांनीं पुंबीजाचा व स्त्रीबिजाचा नाश करणें हा होय. कोणी म्हणतात कीं मैथुनाच्या आधीं व त्यानंतर अपत्यमार्ग क्विनिन किंवा असेच दुसरे जंतुघ्न पदार्थ घातलेल्या पाण्यानें धुऊन काढावा. कांहीं लोक म्हणतात कीं,...कायमचाच एकादा जंतुघ्न पदार्थ मलमासारखा तयार करून आंत बसवून द्यावा ह्मणजे पुंबीजें खात्रीनें मरतील. परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं. येवढ्याही अडचणींतून पार पडून पुंबीजें गर्भोत्पादन करूं शकतात ! याचें कारण असें आहे कीं अपत्यमार्गाची अंतस्त्वचा फार नाजूक आहे, ह्मणून तीव्र जंतुघ्न औषधें वापरतां येत नाहींत...बरें सौम्य औषधें वापरावींत तर तीं अगदींच मवाळ ठरून पुंबीजांना त्यांच्यापासून कांहींसुद्धां बाधा होत नाहीं...' **हें डॉ. केतकरांचें अज्ञान आहे.** अंतस्त्वचेला इजा न करतां पुंबीजास मात्र मारतील अशीं द्रव्यें उपलब्ध आहेत. मात्र समागमाचे वेळींच पुंबीजें गर्भाशयांत जाऊं नयेत ह्मणून वर सांगितलेला रबरी पडदा वापरावा लागतो. ऋतुकाल वर्ज करून समागम करणें हा उपाय खात्रीचा नाहीं, हें डॉ. चें ह्मणणें खरें आहे, परंतु त्यांनीं अज्ञानानें सर्वच उपाय अनिश्चित ठरविले आहेत, व नंतर त्यांनीं संततिनिय-

मनानें त्यांचे मतें होणारे वाईट परिणाम सांगितले आहेत, तेही काल्पनिक किंवा खोटे आहेत. ' प्रदराच्या सर्व रोग्यांत, निदान शेंकडा नव्वद रोग्यांत, अतिव्यवाय हें मूळ कारण असतें. संततिनियमनानें अतिव्यवायास प्रोत्साहन मिळतें, किंवहुना अतिव्यवाय करण्याकरतांच संततिनियमन केलें जातें...'

**यांपैकीं पहिलें विधान खोटें, दुसरें खोटें व तिसरेंही खोटें आहे.** पहिलें डॉ. केतकरांचें वैयक्तिक मत आहे, पण तसें सांगण्याऐवजीं ते खुशाल सर्वमान्य सिद्धांत म्हणून ठोकून देतात. दुसरें व तिसरें, केवळ कुत्सित बुद्धीनें केलेलीं बेजबाबदार विधानें आहेत, व धडधडीत खोटीं आहेत. कृत्रिम संततिनियमनास थोड्याशा पूर्व तयारीची जरूर लागत असल्यामुळें त्याचा परिणाम डॉ. म्हणतात त्याच्या बरोबर उलट होतो. शेवटचें विधान हास्यास्पद आहे. वर्षांतून एकदां समागम करणारांसही दरवर्षी एक किंवा अधिक मुलें होणें शक्य आहे, याला डॉ. केतकर अतिव्यवाय म्हणतात काय? दरवर्षी एक मूल ज्याला नको असेल त्याला संततिनियमनाची जरूर आहे. डॉ. मेरी स्टोपस् यांनीं एका गृहस्थाचें उदाहरण दिलें आहे, त्याला दोन वर्षांतून एकदां समागम झाला म्हणजे पुरे, यापेक्षां जास्त म्हणजे अतिरेक, असें वाटत असे. डॉ. केतकर कदाचित या सदरांत येत असतील, परंतु नपुंसक वजा केल्यास असा मनुष्य शेंकडा एकही सांपडणार नाहीं, हें निदान ' तज्ज्ञ ' म्हणवणाऱ्या दाक्तरांस माहीत असावें. अर्थात कितीही मितव्यवायी मनुष्य असला तरी त्याला संततिनियमनाचा प्रसंग येणें शक्य आहे, व त्याला डॉ. केतकर अतिव्यवायी म्हणणार. प्रतिपक्ष्यांना शिव्या देणें म्हणजेच युक्तिवाद अशी डॉ. ची कल्पना दिसते.

' पाश्चिमात्य देशांत अशा तऱ्हेचीं उदाहरणें आढळून येतात कीं तारुण्यांत अविचारानें संततिनियमन व अतिव्यवाय करून पुढें वय झाल्यावर मुलें होण्याची इच्छा प्रबळ झालेली, पण अतिव्यवायामुळें वंध्यात्व आलेलें, अशा वेळीं कित्येक स्त्रियांना मानसिक दौर्बल्य प्राप्त होऊन, वेडहि लागलेलें आहे ! ह्यासारख्याच कांहीं दंपत्यांनीं जरा शहाणपणा दाखवून एकदोन अपत्यें झाल्यावर संततिनियमन

केले, पण तेथेंहि त्यांना निसर्गापुढें मान वांकवावी लागली. कारण राक्षसी उपायांनीं संततिनियमन केल्यामुळें पुढें मुलें होण्याची अशा खुंटली आणि पहिल्या एकदोन मुलांपैकीं कोणी रोगांस बळी पडलीं, कोणी अपघातांनीं मरण पावलीं आणि कित्येक एकुलते एक मुलगे लढाईंत कामास आले. फ्रान्समध्यें अशीं फार उदाहरणें दिसून आलीं...'

डॉ. नी अशा विषयावर लिहिण्याऐवजीं एखादी कादंबरी लिहिल्यास बरें, कारण त्यांत काल्पनिक गोष्टी चालतात. फ्रान्स व पाश्चात्य देश बरेच लांब असल्यामुळें त्यांबद्दल पाहिजे तें लिहावें! परंतु इतरांस थोडीबहुत माहिती असते हें डॉ. विसरतात. आधुनिक शास्त्रीय उपायांनीं वंध्यात्व तर येत नाहींच परंतु कोणत्याही प्रकारची इजा होत नाहीं असें आधुनिक डॉक्टरांचें मत लंडन येथें भरलेल्या परिषदेंतील डॉक्टरांच्या विभागांत प्रस्थापित झालें आहे, व हिंदुस्थानांतहि आमचा अनुभव तसाच आहे. बरींच वर्षे संतति बंद ठेवल्यानंतर इच्छा झाल्याबरोबर गर्भधारणा झाल्याचीं उदाहरणें आमच्या पाहण्यांत आहेत.

'वरील सर्व विवेचनावरून दिसून येईल कीं संततिनियमन हें तरुणांनीं मुळींच अंमलांत आणूं नये...संततिनियमन फक्त वय झालेल्या स्त्रीपुरुषांनीं करावें व अशा वेळीं त्यांच्या दृष्टीनें सोपा, क्रमप्राप्त आणि अगदीं खात्रीचा उपाय म्हणजे ब्रह्मचर्य होय. आपल्या शास्त्रांत दहा मुलें झाल्यावर, स्त्री मातेसमान मानावी असें सांगितलें आहे.'

डॉ, केतकरांनीं दाखवलेला बागुलबोवा किती निर्जीव आहे हें आतां वाचकांस समजलेंच आहे. हें तरुणांनीं विशेष लक्षांत ठेवून आरंभापासूनच सावध राहून आपल्या ऐपतीप्रमाणें व इच्छेप्रमाणें संततिनियमन करावें, तरच ते सुखी होतील. ब्रह्मचर्यापासून होणारें नुकसान पुढें स्वतंत्र लेखांत पाहूं. नपुंसकांस मात्र तें सहज साध्य असतें, बाकीच्यांची नुसती तोंडची बडबडच असते. कांहीं थोडे लोक हा कष्टसाध्य मूर्खपणा करतात व स्वतःचें नुकसान करून घेतातही. वरील प्रकारच्या वेडगळ शास्त्रवचनांमुळेंच त्या शास्त्रांस किंमत नाहींशी झाली आहे. तीस वयापर्यंतही

दहा मुलें होतील व ब्रह्मचर्याचा प्रसंग येईल, व झालेली दहा मुलें पोसण्याची जबाबदारी डॉ. केतकर घेणार नाहींत हें लक्षांत ठेवून प्रत्येकानें वागलें पाहिजे.

'हें ब्रह्मचर्य नैष्ठिक ब्रह्मचर्य असलें पाहिजे म्हणजे मनांत सुद्धां अब्रह्मचर्याचा विचार न आला पाहिजे...नैष्ठिक ब्रह्मचर्य कितीही वर्षे पाळलें तरीही त्यापासून तोटा होणार नाहीं. पुढें केव्हांही संतति हवी असल्यास मिळूं शकेल.' नैष्ठिक ब्रह्मचर्यही नुकसानकारक आहे व त्यापासून नपुंसकत्व आल्याचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. अर्थात अशा लोकांनीं नैष्ठिकब्रह्मचर्य पाळलें नाहीं हें सोपें उत्तर डॉ. केतकर देणार हें आम्ही जाणून आहों, परंतु याला दुसरा पुरावा नाहीं.

एकंदरींत दाक्तरी सर्वज्ञतेच्या घमेंडीवर न जातां डॉ. केतकरांनीं थोडी माहिती मिळवण्याची तसदी घेतली, किंवा माहीत नसलेल्या विषयांवर कादंबरी-वजा लेख बाजारगप्पांचें आधारें न लिहिले तर बरें. डॉ. केतकरांस केवळ आसुरी उपायच माहीत आहेत. मानवी शास्त्रीय उपायांची माहिती पाहिजे असेल त्यांस ती आमचे 'संततिनियमन' पुस्तकांत मिळेल.

अमेरिकेंत डॉ. रॉबिनसन, इंग्लंडांत डॉ. नॉर्मन हेअर, जर्मनींत डॉ. माग्नुस हिर्शफेल्ड, फ्रान्समधील असंख्य डॉक्टर संततिनियमनाचा पुरस्कार करतात. हे डॉक्टर जगद्विख्यात आहेत. डॉ केतकरांसारख्या अज्ञ डॉक्टरांच्या रडकथेकडे लक्ष देण्याचें कारण नाहीं.

---

समागमाचा पहिला धडा तरुणास अनुभवी स्त्रीकडून व तरुणीस अनुभवी पुरुषाकडून मिळण्यांत दोघांचाही फायदा आहे, असें हॅवलॉक एलिस म्हणतात. हें तत्त्व नवीन नाहीं. निदान मुलीचें कौमार्य लग्नापूर्वी किंवा नंतर नवऱ्याव्यतिरिक्त कोणास तरी अर्पण करण्याची चाल पुष्कळ जुनी आहे,व अजूनही कोठें कोठें दिसते. तरुणतरुणींचें प्रथम प्रेम अनुभवी माणसांवरच बसतें असा सामान्य अनुभव आहे.

---

सासरच्या जाचामुळें कांहीं मुली जीव देतात. याच कारणामुळें वेश्या झालेली एक बंगाली स्त्री आम्ही पाहिली आहे, ती बराच पैसा कमावून थोडाबहुत परोपकारही करते. जीव देण्यापेक्षां हें निःसंशय बरें.

---

# पडसें

हा बहुतेक सर्वांस होणारा रोग आहे व तो जरी क्षुल्लक वाटला तरी त्यानें बरेंच नुकसान होतें. त्यावर एका फ्रेंच डाक्टरानें दिलेले आधुनिक उपाय पुढें दिले आहेत.

**आरंभ.** हुंगण्याच्या कोणत्याही औषधानें पडसें न थांबतां त्रास मात्र होतो, वापरूं नये. शिंका येऊं लागल्याबरोबर ' सोडिअम् सॅलिसिलेट् ' हें औषध दिवसांतून तीनदां, जेवण्यापूर्वीं, प्रत्येक वेळीं ८ ग्रेन प्रमाणें पाण्यांत विरवून घ्यावें. दोन दिवसांत पडसें न थांबल्यास पुढें घेण्याचा उपयोग नाहीं.

**वरील औषधानें पडसें न थांबल्यास** पुढील औषध नाकांत पिचकारीनें उडवावें. यानें दोन तीन तासपर्यंत नाक मोकळें व कोरडें राहतें. नाक पुनः शिंवशिंवूं लागल्यास पुनः वापरावें. ( १ ) कोकेन् हायड्रोक्लोरेट, ९ ग्रेन, ( २ ) अॅड्रेनॅलीन् हायड्रोक्लोरेटचें शेंकडा एक या प्रमाणें पाण्यांत मिश्रण, ५० मिनिम, (३) हजारीं ७॥ या प्रमाणांत मिठाचें पाणी, १½ औंस, हीं एकत्र करावीं. इतकें औषध ४ दिवस पुरेल. यांतील पहिल्या औषधाबद्दल कायदा असल्यामुळें हें डॉक्टराच्या सहीशिवाय मिळणार नाहीं.

नाकपुड्यांस व ओठांस ' झिंक् ऑक्साइड् 'चें मलम लावावें. दिवसा घरींच रहावयाचें असल्यास, प्रत्येक वेळीं ८ ग्रेनप्रमाणें दिवसांतून दोन किंवा तीन वेळां अॅस्पिरीन् घ्यावें, परंतु बाहेर जावयाचें असल्यास अॅस्पिरीन् न घेतां पुढील औषध घ्यावें. ( १ ) सॅलिपिरीन् ८ ग्रेन, ( २ ) किनीन् हायड्रोक्लोरेट् २ ग्रेन व ( ३ ) कॅफीन् सिट्रेट १ ग्रेन, एकत्र करून एका वेळीं घेणें. याप्रमाणें सकाळीं व दुपारीं खाण्यापूर्वीं घ्यावें. रात्रीं घेऊं नये, घेतल्यास लौकर झोंप येणार नाहीं. रात्रीं झोंप येणें अत्यंत महत्त्वाचें आहे, कारण त्यानें पडसें बरें होण्यास मदत होते. याकरतां निजण्यापूर्वीं अर्धातास ' व्हिरोनल सोडिअम् ' ५ पासून १० ग्रेन थोड्या गरम पाण्यांत घ्यावें. बहुधा ५ ग्रेन बस होतें.

## स्त्रियांचे लेख

सकाळीं, सोडिअम् सल्फेट ४ भाग व सोडिअम् पोटॅशिअम् टार्ट्रेट १ भाग वजन घेऊन एकत्र करावें व यांपैकीं चहाचे दोन चमचे भरून अर्धा ग्लास थंड पाण्यांत विरवून घ्यावें. यानें मुरडा न होतां १ तासांत शौचास साफ होऊन डोकें हलकें होतें.

**इतर सूचना.** अन्न हलकें; दारू, विशेषतः तंबाकू वर्ज; मीठ बिलकूल खाऊं नये, मिठानें नाक जास्त वाहतें. पेयें कमी करावीं. तोंड धुण्यास गरम पाणी वापरावें. नाक शिंकरणें झाल्यास प्रत्येक नाकपुडी वेगळी शिंकरावी. शिंका शक्य तितक्या टाळाव्या. शिंक येऊं लागल्यास डोळे बंद करून श्वास तोंडानें घ्यावा.

---

## स्त्रियांचे लेख

अलीकडे बऱ्याच मासिकांत स्त्रियांचे लेख प्रसिद्ध करण्याचा प्रघात पडला आहे ही आनंदाची गोष्ट आहे. परंतु त्यांतील विचार पाहतां पुष्कळ सुशिक्षित म्हणवणाऱ्या स्त्रियांस अजून स्वतंत्र विचाराची शक्ति आलेली नाहीं हें स्पष्ट दिसतें. पुरुषांचे सर्वच लेख स्वतंत्र विचाराचे नसतात हें निर्विवाद आहे व स्त्रियांच्या लेखांतही कांहीं अपवाद सांपडतात. परंतु एकंदरींत स्त्रियांच्या लेखांत स्वतंत्र विचारांचें प्रमाण कमी दिसतें यांत शंका नाहीं. कांहीं लेखांसंबंधीं अशीही शंका येते कीं ते पुरुषांनीं लिहून सही मात्र स्त्रीची घेतली असली पाहिजे, किंवा ती सुद्धां स्वतःच केली असली पाहिजे. एरवीं सौ. XXबाई XXX अशा पत्तेवजा सह्या दिसल्या असत्या काय ? किंवा पारंपारिक विचारांनीं ग्रासल्यामुळें, स्त्रियांची इतिकर्तव्यताच विवाह, तेव्हां आपण कु. आहों कीं सौ. आहों हें सहीवरून सुद्धां जरूर जाहीर झालें पाहिजे अशी स्त्रियांचीच कल्पना असते ? असें असल्यास विधवांनींसुद्धां, त्या विवाहेच्छु असतील किंवा नसतील हें दर्शवण्यास सहीचे आणखी दोन प्रकार शोधून काढले पाहिजेत ! शिवाय 'बाई' हा प्रत्यय बहुमानार्थी आहे, तो इतरांनीं लावल्यास त्याची शोभा आहे, स्वतः लावणें म्हणजे अहंमन्यता आहे, इतकाही विचार स्त्रियांस सुचूं नये काय ?

स्त्रियांचे बरेच लेख चाळून पाहतां त्यांत बऱ्याच ठिकाणीं 'यत्र नार्यस्तु पूज्यंते रमंते तत्र देवताः' हें किंवा अशाच प्रकारचीं दुसरीं गौरवात्मक वाक्यें जाड टाइपांत छापलेलीं दिसतात, व त्यांस अनुसरून, 'आह्मी देवता आहोंत, आह्मांला देव्हाऱ्यांतच बसवा,' अशा प्रकारचे विचार या लेखिका बिनदिक्कत लिहीत असतात! हीं गौरवात्मक वाक्यें पुरुषांनीं लिहिण्यांत शोभा आहे, तेव्हां ते लेख पुरुषांनीं लिहिले आहेत, अशी शंका येणार नाहीं? 'मासिक मनोरंजन'चें संपादकत्व कै. मित्रांच्या कन्येकडे गेलें तरीही मुखपृष्ठावरचें वरील वाक्य बदललेलें नाही. तें कदाचित् नजरचुकीनें राहिलें असेल, परंतु हा हास्यास्पद प्रकार संपादकानें जरूर बदलावा अशी आमची त्यांस सूचना आहे. अर्थात् ज्या 'मासिक मनोरंजन'च्या छापखान्यालासुद्धां आमच्या पुस्तकांचा विटाळ खपत नाहीं, त्यानें आमची सूचना मान्य करणें जवळ जवळ अशक्यच आहे, पण ती करणें आमचें कर्तव्य आहे.

लेखाखालीं स्त्रीची सही असली कीं तो प्रसिद्ध करण्यालायक झालाच अशी संपादकांची कल्पना दिसते. यामुळें बऱ्याच लोकांची मजल 'पति हा देव आहे, त्याला चहा देण्यापेक्षां सभेला जाणें हें काम जास्त महत्त्वाचें नाहीं, उत्तम माता व गृहिणी होणें हेंच स्त्रियांचें काम आहे,'...वगैरे पुरुषी छापाच्या विचारांपलीकडे गेलेली दिसत नाहीं. याला अपवाद आहेत हें आह्मीं वर सांगितलेंच, परंतु लेख स्त्रियांच्या नांवावर छापणें ही मासिक खपवण्याची एक सोपी युक्ति झाली आहे, कारण मराठी मासिकांच्या वाचकांत स्त्रियांचीच संख्या फार असते. वरील प्रकारचे विचार कोणता सुज्ञ पुरुष वाचील?

---

**संततिनियमनाचा नवीन उपाय.** जिवंत किंवा मेलेले रोगजंतु, किंवा रोगजंतूंपासून वेगवेगळ्या रीतींनीं तयार केलेले द्रव शरीरांत टोंचून घातल्यानें बऱ्याच रोगांचा प्रतिबंध करतां येतो, उदाहरणार्थ देवी, प्लेग, टायफॉइड् इत्यादि. शुक्रजंतूंनीं स्त्रीच्या शरीरांत शिरून तेथें नऊ महिने घर करून राहणें व रोगजंतूंचा शरीरावर हल्ला यांत बरेंच साम्य असतें यावरून संततिनियमनाची एक नवीन क्लृप्ति

निघाली आहे व ती बरीच यशस्वी होईल असा रंग दिसतो. रोगजंतु रक्तांत टोंचल्यानें त्यांचा नाश करण्याची शक्ति शरीरास प्राप्त होते, त्याचप्रमाणें शुक्रजंतु स्त्रीच्या रक्तांत टोंचल्यास त्यांचा नाश करण्याची शक्ति तिच्या शरीरास प्राप्त होते असें प्रयोगांनीं सिद्ध झालें आहे. हे प्रयोग ससांवर करून मादी कांहीं दिवसपर्यंत वंध्या होते असें अनुभवांतीं ठरलें आहे. मनुष्यावर प्रयोग करून हें नक्की ठरल्यास, एकदां टोंचून घेतल्यावर तीन चार वर्षें फिकीर करण्याचें कारण राहणार नाहीं व हल्लींच्या कोणत्याही मार्गापेक्षां हा मार्ग सोपा होईल.

---

## एक वैवाहिक आयुष्य

### ( लिहून आलेला मजकूर, जर्मनवरून )

माझं लग्न माझ्या १४ व्या वर्षीं झालं. माझे पती त्यावेळीं कॉलेजांत होते. त्याच्या पुढच्याच वर्षीं मला नहाण आलं आणि त्यानंतरच्या एका सुटींत माझी व त्यांची प्रथम गांठ पडली. त्यावेळीं मला बरंच कळूं लागलं होतं व नवराबायकोचा संबंध काय असतो त्याची जरी मला स्पष्ट कल्पना नव्हती, तरी पण तो बराच निकट असावा यावद्दल माझी खात्री होत चालली होती. आमच्या शेजारच्या ग्रनुताईचं लग्न होऊन तिला दोन महिन्यांपूर्वीं एक मुलगाही झाला होता. ती माझ्यापेक्षां ५ वर्षांनीं मोठी असली तरी लहानपणासून तिचीनी माझी गट्टी असे. मागच्या वेळीं जेव्हां ती मला भेटली तेव्हां मी तिच्याकडून बरीच माहिती मिळवली होती.

तिकडच्या व माझ्या या भेटीतच आमची प्रथम ओळख झाली म्हटलं तरी चालेल. त्यापूर्वीं त्यांचं माझं प्रत्यक्ष संभाषण झालेलं नव्हतं. त्यांचं वय त्यावेळीं २१-२२ वर्षांचं असेल. माझ्या सासरीं फक्त मामंजी, सासूबाई आणि धाकटे भावजी इतकीच मंडळी; आणि घरची स्थिति साधारण बरी असल्यामुळें तिकडे एक स्वतंत्र खोली असे. मी माजघरांतच निजत असें, पण एखादे वेळीं सासूबाई मला तिकडच्या खोलींत निजावयास पाठवीत.

पहिल्या भेटींतच मला ते बरेंच आवडले. मोठ्या पुरुषानें त्यावेळपर्यंत माझे लाड कधींच केलेले नव्हते. त्यांनीं मला जवळ घेतली, माझ्या पाठीवर हात फिरवला नी हनुवटी वर करून माझा एक मुका पण घेतला. प्रथम मला खूपच भीति वाटली व माझं हृदय एकसारखं धडपडत होतं, पण जरा वेळांत मला तितकी भीति वाटेनाशी झाली व एकंदरींत मला आनंदच झाला.

त्याच्यानंतर ३–४ दिवसांनींच रात्रीं त्यांच्या खोलींत निजण्याचा प्रसंग माझ्यावर आला. आपल्यावर कांहींतरी प्रसंग ओढवणार अशी कांहींशी अस्पष्ट भीती मला वाटतच होती, पण कसातरी धीर चेपून पाण्याचा तांब्या घेऊन मी आंत गेलें. आमच्या भेटींतला आनंद मात्र यावेळीं फार वेळ टिकला नाहीं. प्रथमसंभोगाचे वेळींच मला त्यांची एक प्रकारची दहशत बसली. प्रत्यक्ष शारीरिक त्रासही मला बराच झाला, कारण आपले स्नायू शक्य तितके सैल सोडावे हें मला त्यावेळीं ठाऊक नव्हतें. त्याचप्रमाणें तेल किंवा इतर स्निग्ध पदार्थांचा उपयोग करण्याचेंही त्यांना सुचलें नाहीं. एकंदरींत ह्या पहिल्या रात्रीं मला बराच त्रास झाला. दुसऱ्या दिवशीं अंग वगैरे बरेंच दुखत होतें.

पुढें बहुधा दर ७–८ दिवसांनी मी त्यांच्याकडे जाई. पण प्रथम प्रथम बरेच महिने संभोगापासून मला समाधान होत नसे. त्यांची तृप्ति सुरवात केल्यापासून अगदीं लवकर होई व माझं समाधान मात्र त्यावेळीं झालेलं नसे. एकदां दोनदां त्यांच्याजवळ त्यासंबंधीं बोलण्याचा धीर करावा कीं काय असें मनांत येई, पण बोलायच्या वेळीं मात्र कसंसंच वाटे. संभोगापूर्वीं त्यांनीं माझे लाड करावे, एकमेकांनीं एकमेकांशीं बोलावं असं मला वाटे, पण त्यांना तें आवडत नसावं असें दिसलं. कित्येकदां फार घाई केल्यामुळं तर मला त्रासही बराच होई.

माझ्या १६ व्या वर्षीं मला पहिलं मूल झालं व सुमारें सहा महिन्यांनींच तें विचारं गेलं. मला अतिशय वाईट वाटलं, पण त्यांना त्याचं फारसं कांहीं वाटलेलं दिसलं नाहीं. त्यानंतर तिकडे नोकरी लागली व आम्ही दोघंच नोकरीच्या गांवी बिऱ्हाड करून राहूं लागलों. आतां मला संभोगांत थोडथोडा आनंद होऊं लागला

होता, पण त्यांच्या घाईचा मात्र मला राग येई. मीं एकदां धीर धरून त्यांच्याजवळ बोललें देखील, पण माझ्यावर रागवायचं मात्र झालं. शिवाय रोज किंवा एक दिवसा-आड इतका संभोग मला सोसत नसे. सकाळीं उठतांना अंग दुखे किंवा डोकें जड होई. पण माझें कांहींच चालत नसे. आणखी एका गोष्टीबद्दल मला त्यांची भारी चीड येत असे. त्यांच्या तोंडाला सदैव मनस्वी घाण येत असे आणि मला अगदीं नुसती आठवण झाली तरी शहारे येत अंगावर. पण करणार काय ? त्यांना स्वतःला त्याचा त्रास होत नसल्यामुळें, मीं एकदां हळूच म्हणालें तर त्यावर त्यांचा विश्वास देखील बसला नाहीं. मग उपाय करणें बाजूलाच.

नंतरच्या ६ वर्षांत मला ३ मुलें झालीं. बाळंतपणाच्या अगोदर व नंतर १–१॥ महिना संभोग बंद असे. बाकी जवळ जवळ रोज चाले. मला समाधान असें क्वचितच होई. सुख होण्यास जरा सुरवात व्हावी तों त्यांचें पूर्ण समाधान होऊन त्यांना झोंपसुद्धां लागे. मी मात्र मग किती तरी वेळ तशीच तळमळत राहीं. मीं एक दोनदां म्हटलं देखील कीं संभोग जर दोनतीन दिवसांनीं एकदां केला तर कदाचित दोघांनाही समाधान होऊन प्रकृति चांगली राहील, पण तिकडे लक्ष देतो कोण ?

आज माझें वय ३८ वर्षांचें आहे, मला एकंदर १२ मुलं झालीं व त्यांतलीं ६ आज हयात आहेत. गरीब बिचारीं ! एकंदरच जर ६ झालीं असतीं तर त्यांतलीं ४–५ तरी जगलीं असतीं व मलाही अधिक सुख लागलं असतं. संभोगापासून मला आतां सुख जरी थोडें फार होतं, तरी पूर्ण समाधान क्वचितच होतं. जन्मभर असंच कां चालणार ?

---

## ग्रंथपरीक्षण

'स्त्रीजीवनावर प्रकाश,' प्रो. गो. म. चिपळूणकर, एम्. ए.

हें चोवीसपानी चोपडें आज बरेच दिवस अभिप्रायार्थ येऊन पडलें आहे, परंतु विषयाच्या महत्त्वामुळें त्यावर थोडक्यांत अभिप्राय देऊन निकालांत काढणें इष्ट

वाटलें नाहीं. या लेखकानें आपलीं निमसुधारकी मतें बऱ्याच ठिकाणीं प्रसिद्ध केलीं आहेत व आमचे मतें या मतांचा प्रसार स्त्रीशिक्षणास धोक्याचा आहे.

इंग्रज सरकारनें ज्या दृष्टीनें हिंदीलोकांस पाश्चात्य शिक्षण देण्यास सुरवात केली, त्याच प्रकारची दृष्टी स्त्रीशिक्षणाचे बाबतींत प्रो. चिपळूणकरांची दिसते. इंग्लंडांतून जरूर तितके कारकून आणणें खर्चाच्या दृष्टीनें अशक्य होतें, तेव्हां ते कारकून येथेंच तयार करण्याचा त्यांनीं बेत केला, व तेवढ्यापुरतेंच शिक्षण सरकारच्या दृष्टीनें इष्ट असतें. अजूनही उच्च शिक्षणास सरकारकडून शक्य तितका विरोध होतो, याचें कारण हेंच. त्याचप्रमाणें प्रो. चिपळूणकरांस व त्यांच्या अनुयायांस, स्वयंपाकांत व इतर गृहकृत्यांत तरबेज असे उच्च प्रतीचे नोकर पाहिजे असतात, व नोकर ठेवणें खर्चाचें काम असल्यामुळें कामशांतीबरोबरच हींही कामें स्त्रियांकडूनच उत्तम रीतीनें व्हावीं, इतक्यापुरतेंच शिक्षण ते स्त्रियांस देऊं इच्छितात. आतां ज्याप्रमाणें कांहीं बावळट पुरुष शिक्षणाचे बाबतींत सरकारला सामील असतात, तद्वतच कांहीं स्त्रिया चिपळूणकरप्रभृति लोकांना सामील आहेत. उदाहरणार्थ एका मासिकांतील बक्षिस दिलेल्या लेखांत एक लेखिका म्हणते:—'स्वयंपाक, नेहमींचा, सणाचा, व फराळाचे जिन्नस; शिवणकाम, विणकाम, सेवाशुश्रूषा; वाचन, धार्मिक, नीतिविषयक, समाज, इतिहाससंबंधीं, सोप्या वैद्यकीचें ज्ञान इ., स्त्रीजीवनउन्नतिपर वाङ्मय; लेखन, वरील विषयानुरोधानें सुचलेल्या...विचारांचें टांचण करणें, खर्चवेंच मांडून हिशोब ठेवणें.' तिनेंच स्त्रियांचे अत्यवश्यक गुण दिले आहेत ते असे:—'कष्टप्रियता, सहनशीलता, शांत मन, दया, क्षमा, माया, प्रीतियुक्त शुद्ध अंतर्याम, समाधानी समंजसपणा, आनंदी भाषण, गोड स्वभाव, नीटनेटकेपणा व स्वच्छता, आहार सात्विक आणि मोजका, उत्तेजक पेय पदार्थ न घेणें.'

सारांश पतीला सर्व प्रकारें उपयोग होऊन कोणत्याही प्रकारचा त्रास होऊं नये असें या लोकांचें म्हणणें. अर्थात ते तसें कबूल करीत नाहींत. आपण उच्च शिक्षणाच्या विरुद्ध नाहीं असें ते म्हणतात व आपलीं मतें शास्त्रीय आहेत असें दाखवण्याकरतां वरील लेखानें कांहीं विद्वानांचीं मतेंही दिलीं आहेत. तथापि हीं

सर्व मतें वस्तुतः शास्त्रीय नसून प्रचलित पुरुषी अंमलाचा परिणाम आहे असें सिद्ध करण्याचा आमचा विचार आहे.

या लोकांचा पहिला मुद्दा असा कीं शारीरिक व मानसिक मेहनतीच्या कामांपासून स्त्रियांच्या नाजुक प्रकृतीला जास्त त्रास होतो. हा निव्वळ पुरुषी भ्रम आहे. दळणकांडण, धुणें, विहिरींतून पाणी काढणें, पाण्याच्या घागरी व मुलें कमरेवरून नेणें, वगैरे कामें करणारी स्त्री खरडेघाशा कारकुनापेक्षां खात्रीनें जास्त मेहनत करते. वस्तुतः कांहीं कामें कमी दर्जाचीं समजलीं जातात, व तीं श्रीमंत लोक नोकरांवर व गरीब लोक बायकांवर सोंपवतात. प्राचीन काळीं अनेक देशांत स्त्रियांचें वर्चस्व होतें, तेथें बरोबर याचे उलट प्रकार होता. पुढील उताऱ्यांवरून हें स्पष्ट होईल (The Dominant Sex). 'ईजिप्तमध्यें लग्नांत पुरुष हुंडा देत असत, मिळकतीवर मालकी व वारसा स्त्रियांचा असे व पुरुषांस पोसण्याची जबाबदारी त्यांचेवर असे. स्त्री मेल्यास तिची मिळकत नवऱ्यास न मिळतां मुलीस मिळत असे. कामश्चाटकामध्यें पुरुषांचा तंबाखू वगैरे बारीकसारीक खर्चसुद्धां स्त्रियांच्या मर्जीवर असे व ते तक्रार करीत नसत... इजिप्तमध्यें व्यापारधंदा स्त्रिया करीत असत, पुरुष घरकाम करीत असत, लढण्याचें काम स्त्रियांचें असे.' हिरोडोटस ह्मणतो—" इजिप्शिअन् लोकांचें सगळेंच उलटें! त्यांच्यांत स्त्रिया उभ्यांनीं मूत्रविसर्जन करतात व पुरुष बसून करतात !" दाया पुरुष असत, व मुलें उपजल्यापासून पुरुषांच्या ताब्यांत असत. हल्लीं यूरोपांत शिवणकाम, रफूकाम, फार काय, एखादें बटन लावणें सुद्धां पुरुषांस कमीपणाचें वाटतें. कामश्चाटकामध्यें बरोबर उलट स्थिति होती. हीं कामें पुरुष करीत असत, व युरोपीय प्रवाशांनीं हीं कामें तेथील स्त्रियांस सांगितल्यास तीं त्या एकाच अटीवर कबूल करीत. ती अट ह्मणजे कामशांति. पुरुषी अंमलांत पुरुष कामशांतीकरतां स्त्रियांचें म्हणणें ऐकतात किंवा पैसे देतात व यापासून वेश्यावृत्ति उत्पन्न होते. स्त्रीराज्यांत याचे उलट प्रकार होता. ज्यांना यांतील इंगित माहीत नाहीं असे प्रवासी आपल्या वर्णनांत पुरुषांस आळशी म्हणतात. अर्थात हल्लीं ज्याप्रमाणें श्रीमंतांच्या बायकांना कांहीं काम नसतें, तसेंच स्त्रीराज्यांत श्रीमंत स्त्रियांच्या नवऱ्यांना काम नसे. परंतु गरिबांच्या पुरुषांना घरकाम असे. हल्लींच्या स्त्रियांस शारीरिक शक्ति कमी असते,

त्याचप्रमाणें स्त्रीराज्यांत पुरुषांची शक्ति कमी असते. घरकामामुळें शक्ति कमी होते व वर्चस्वाच्या भावनेचाही प्रकृतीवर परिणाम होतो. चुलीशीं बसणें शरिरास हितकर नाहीं. हल्लींची स्त्रियांची शारीरिक स्थिती हें हल्लींच्या श्रमविभागाचें कारण नव्हे, त्याचा परिणाम आहे.'

श्री. चिपळूणकर म्हणतात—' मुलींचे विवाह २० वर्षांचे पुढें लांबणीवर पडूं नये, कारण पुढें बाळंतपणें कष्टाचीं होतात, मुलें कमी होतात व झाल्यास त्यांस दूध पुरेसें मिळत नाहीं.' डॉ. व्हॅन् ड व्हेल्ड, एम्. डी. म्हणतात ' विवाहाचे वेळीं पुरुषाचें वय ३० व स्त्रियांचें २३ पासून २५ असणें इष्ट आहे. यापासून अनेक फायदे आहेत. उशीरां बाळंतपणांत थोडा बहुत धोका असतो परंतु हल्लींच्या वैद्यकीय ज्ञानाच्या प्रगतीमुळें तो नष्टप्राय होतो.

स्त्रियांच्या रजोवस्थेमुळें त्यांचे वर्षांतून ५० दिवस आजारीपणांत जातात, हाही पुरुषी अंमलाचाच परिणाम आहे. समान हक्क असल्यास त्यांची प्रकृती सुधारून त्यांस या ५० दिवसांतही आजारीपणा भासत नाहींसा होतो. अर्थात् ' स्त्रिया नाजूक असतात व त्यांना काम झेंपणार नाहीं ' हें ढोंग नेहमीं चालवल्यास त्या आहेत तशाच राहतील.

नीति व शील यांबद्दलच्या चिपळूणकरी, म्हणजे हल्लींच्या प्रचलित, कल्पना पुरुषी अंमलांतील आहेत. पुढील उतारे पहा:—' प्रियाराधन हल्लीं पुरुषांस योग्य समजतात, परंतु ईजिप्तमध्यें स्त्रिया पुरुषांची आराधना करीत असत. अशा लोकांत पुरुषानें स्त्रीची आराधना केल्यास त्याच्या निर्लज्जपणाबद्दल त्याला शिक्षा होत असे. अशा देशांत लग्नाचे वेळीं पुरुषास स्त्रीचे आज्ञेंत राहण्याची शपथ घ्यावी लागते... इतकेंच नव्हे तर आज्ञा न पाळल्यास थप्पड देण्याचीही शक्ती स्त्रियांत असते. स्त्रीराज्यांत पाहिजे तेव्हां नवऱ्यास टाकण्याचा हक्क लग्नाच्या करारांत लिहिलेला असतो, पण नवऱ्यास मात्र तसा हक्क नसतो. पुरुषांनीं सती जाण्याची चालही कांहीं लोकांत असे.

स्पार्टा येथें पुरुष मात्र पत्नीव्रत असत, स्त्रिया कधींच पतिव्रता नसत. जो सर्वांत देखणा पुरुष दिसेल, मग तो स्वदेशी किंवा परदेशीही असो, त्याकडून संतति

करून घेण्याचा स्पार्टन् स्त्रियांचा हक्कच असे. पुरुषी अंमलांत स्त्रियांच्या पावित्र्याला महत्त्व येतें, स्त्रीराज्यांत तें पुरुषांस लागू होतें. पुरुषांना मुलींशीं बोलण्याची परवानगी नसते. स्पार्टामधील मुलगे अत्यंत पवित्र व विनयशील असत !

शिद्दी राण्यांचे मर्दानखाने असत व त्यांतील पुरुषांस इतर स्त्रींचें दर्शन होत नसे. ते बाहेर जातांना पहारा असे व रस्त्यांतील स्त्रियांस हांकून देत.

स्त्रीराज्यांत, पुरुषांचें लग्न लवकर झालें पाहिजे, नाहींतर ते बिघडतात, अशी समजूत असते. स्पार्टामध्यें पुरुषांचें लग्न झालेंच पाहिजे असा निर्बंध असे व कोणी पुरुष अविवाहित राहिल्यास त्याला हिंवाळ्यांत बाजारांतून नग्न हिंडावयास लावीत.

स्त्रियांची अनीति गर्भपातानें लपवतां येते म्हणूनच पुरुषी अंमलांत तो भयंकर गुन्हा झाला आहे. परंतु स्त्रीराज्यांत त्यांची अनीति होतच नाहीं, तेव्हां गर्भपातास पूर्ण मुभा असते. पुरुषांस वेश्यावृत्ति शक्यच नसते, पण स्त्रीराज्यांत त्यांस समागमाबद्दल मोबदला मिळतो.

वरील गोष्टींचा विचार केल्यास, प्रो. चिपळूणकर व त्यांचे आधारभूत ग्रंथकार कितीही विद्वान असले तरी त्यांनीं पुरुषी अंमलाच्या चष्म्यांतून सर्व गोष्टी पाहिल्यामुळें त्यांना त्या तशा दिसतात, हें उघड आहे. त्यांतील कांहीं स्त्रिया असल्या तरी त्यांचेवरही पुरुषी अंमलाचा परिणाम होतोच. स्त्रीराज्यांतील पुरुष देखील अत्यंत नम्रपणानें व विनयानें आपला नीतीचा बोजा व स्त्रियांचें पूर्ण स्वातंत्र्य कबूल करीत असत.

सध्यां पुरुषी अंमल थोडासा कमी होऊन स्त्रियांचा दर्जा वाढत आहे व समान हक्कांबद्दल सार्वत्रिक चळवळ होत आहे हें सर्व ठीकच आहे. परंतु हें पारडें उलट फिरूं न देतां तें समान हक्कांपर्यंतच जाऊं देऊन तेथें थांबवून धरण्यांत दोघांचेंही हित आहे व हें समजून या दिशेनें दोघांनी प्रयत्न करणें जरूर आहे. इतिहासज्ञानाचा जर कांहीं फायदा असेल तर तो हा आहे.

प्रो. चिपळूणकर एका विलायती कमिटीचें मत देतातः ' मुलींना त्यांच्या मॅट्रिक परीक्षेकरतां गायन, ड्राईंग, शिवण व गृहोपयोगी शास्त्रें हे विषय वैकल्पिक

म्हणून मुलांच्या इतर विषयांऐवजीं घेण्याची परवानगी असावी.' अमुक विषय मुलांचे व अमुक मुलींचे, ही दृष्टीच मूर्खपणाची आहे. पुरुष उत्तम गवई, चित्रकार, शिंपी व स्वयंपाकी होऊं शकतात हें सर्व जगास माहीत आहे. हे विषय शिक्षणक्रमांत ठेवावे व दोघांसही ते घेण्याची पूर्ण मुभा असावी हेंच रास्त आहे. कोणते विषय शिकावे याबद्दल फाजील नियम करण्यांत कोणाचाच फायदा नाहीं. या बाबतींत स्त्रियांसच काय पण पुरुषांसही अधिक स्वातंत्र्याची जरूर आहे.

प्रो. चिपळूणकरांच्या पुस्तकाच्या शेवटीं एका विलायती डॉक्टराचा लेख छापला आहे. हा लेखच २५ वर्षांपूर्वीचा आहे व त्यांतील मतें त्याहूनही जुनीं आहेत. या लोकांना एक मोठी भीति वाटते ती अशी कीं स्त्रियांस पुरुषांइतकें शिक्षण दिल्यास त्या डोईजड होतील व सामान्य पुरुषांशीं लग्न करणार नाहींत. बायको आपल्यापेक्षां कमीच शिकलेली बरी असें अजून बहुतेक पुरुषांस वाटतें, व नवरा आपल्यापेक्षां अधिक शिकलेला असावा असें स्त्रियांसही वाटतें. मॅट्रिक झालेल्या पुरुषास मॅट्रिक बायको झेंपणार नाहीं असें वाटतें, व मॅट्रिक मुलगीही मॅट्रिक मुलाशीं लग्न करणें अशक्य मानील.

परंतु स्त्रीशिक्षणाचा प्रसार होईल तसतशी ही स्थिती बदलेल. समानशिक्षित पुरुषाशीं लग्न करावें किंवा मुळींच करूं नये अशी स्थिति होईल व असें झाल्यास त्यांनीं कां लग्न करूं नये ? समान हक्क देण्याची पुरुषांची व घेण्याची स्त्रियांचीही तयारी नाहीं, हीच अडचण आहे, परंतु ती शिक्षणानेंच दूर होईल.

---

## सुखाचा संसार

( लिहून आलेला मजकूर, जर्मनवरून )

संसार सुखाचा होण्यास चार गोष्टींची आवश्यकता असते. १. योग्य वधूवरांची निवड; २ वधूवरांचें एकमेकांविषयीं प्रेम व त्याच्या विकासास अनुकूल परिस्थिति; ३. पतिपत्नींच्या मनाप्रमाणें संततिनियमन; ४. पतिपत्नींमधील समाधानकारक व उत्तरोत्तर विकास पावणारा शरीरसंबंध.

# सुखाचा संसार

वधूवरांची निवड योग्य झाली पाहिजे यावद्दल कोणाचाच मतभेद नसतो. योग्य या शब्दाच्या अर्थाबद्दल मात्र वरीच निरनिराळीं मतें ऐकूं येतात. जुन्या लोकांच्या मताप्रमाणें वधूवरांच्या पालकांनीं कुलशील, संपत्ति इत्यादींचा विचार करून केलेली जी निवड तीच योग्य निवड होय. आमच्या मताप्रमाणें वधूवरांच्या निवडींत त्यांचें स्वतःचें मतच कायतें महत्त्वाचें समजलें पाहिजे. या मतावर अर्थात कुलाचें, संपत्तीचें किंवा इतर बाह्य गोष्टींचें दडपण फारसें राहणार नाहीं हें खरें, पण त्यामुळें काडीइतकें नुकसान होणार नाहीं. जातीजातींत, धर्माधर्मांत, किंवा भिन्नदेशीयांत जरी विवाह झाले तरी त्यांत मानवजातीचे दृष्टीनें फायदाच असतो. वधूवरांना परस्परांची निवड करतां यावी अशा प्रकारची सामाजिक परिस्थिति मात्र आपल्या इकडे उत्पन्न होणें जरूर आहे. लग्नांत वधूवरांची निवड हीच कसोटी ठरल्यानंतर वधूवरांची वयोमर्यादा साहजिकच वाढून वधूच्या बाबतींत १८-२० व वराच्या बाबतींत २४-२७ होईल हें ओघानेंच येतें. त्याचप्रमाणें वधूवरांच्या निवडींत कधीं कधीं चुका ह्या होणारच (वडील माणसांच्या निवडींतही चुका होतातच; घटस्फोटाची चाल नसल्यामुळें व नवरा हा देव आहे ह्या खोट्या समजुतीमुळें त्यांतील बऱ्याचशा उघडकीस येत नाहींत एवढेंच.) पण घटस्फोटाची सोय केल्यावर त्या चुकांचा परिणाम जन्मभर भोगीत बसावें लागणार नाहीं.

वधूवरांनींच परस्परांची निवड केल्यावर त्यांचें परस्परांवर प्रेम असेल हें सांगावयास नकोच. फक्त त्या प्रेमाचा विकास होण्यास कोणत्या प्रकारची बाह्य परिस्थिति पाहिजे हें पाहिलें पाहिजे. यांत मुख्यत्वेंकरून सांपत्तिक परिस्थितीचा संबंध येतो. गरीबीचा संसार, सुखाची मीठभाकरी वगैरेबद्दल कवींनी कितीही (रड) गाणीं म्हटलीं तरी एखाद्या जोडप्याची आर्थिक परिस्थिति त्याच्या संस्कृतीच्या व लायकीच्या मानानें फार कमी झाली तर त्याचा संसार सुखाचा होणें अशक्य होईल. सारा दिवसरात्र पैशाची टंचाई व खाण्यापिण्याची आबाळ यांत गेल्यावर प्रेमाला व त्याच्या विकासाला फारशी जागा राहणार नाहीं. ही झाली बाह्य परिस्थितीची गोष्ट. पण एकमेकांच्या दोषांकडे कानाडोळा करून

एकमेकांना दुःख शक्य तितकें कमी होईल अशा रीतीनें वागण्याची पतिपत्नींची तयारी पाहिजे. लग्नापूर्वीच्या काळांत जरी दोघेंही स्वर्गीय प्रेमांत गटंगळ्या खात असलीं तरी लग्नानंतर एकत्र सहवास होऊं लागल्यावर बारीकसारीक मतभेद न होणें किंवा कधीं कधीं भांडण देखील न होणें अशक्य नसलें तरी असंभाव्य आहे. तरी अशा क्षुल्लक गोष्टींकडे दुर्लक्ष करून आपला संसार शक्य तितका आनंददायक करण्याकडे दोघांचेंही जर लक्ष असेल तर फारशी अडचण येणार नाहीं.

संततिनियमनाच्या अवश्यकतेबद्दल निदान या मासिकाच्या वाचकांना तरी अधिक कांहीं सांगण्याची जरूरी नाहीं. पतिपत्नींच्या मताप्रमाणें त्यांना हवीं तितकींच व हवीं तेव्हांच मुलें झालीं तरच संसार सुखाचा होणें शक्य आहे. हा प्रश्न सुखाच्या संसारालाच काय पण सबंध मानवजातीच्या सुखाला व शांतीला इतका महत्त्वाचा आहे कीं एका लहानशा लेखांत त्याचा विचार करणें अशक्य आहे. जिज्ञासूंनीं या विषयावरच लिहिलेले ग्रंथ वाचावे हें बरें.

आतां चौथ्या मुद्दयाकडे वळूं. ‘स्त्रीपुरुषांचा संबंध फक्त प्रजोत्पादनाकरतांच आहे, शक्य तितक्या स्त्रीपुरुषांनीं समाजसेवेकरतां ब्रह्मचर्यव्रत पाळावें व ज्यांना तें शक्य नाहीं त्यांनीं विवाह करून प्रजोत्पादन करावें’ अशा प्रकारच्या वेडगळ समजुती जोंपर्यंत समंजस माणसांच्या सुद्धां डोक्यांत होत्या, तोंपर्यंत स्त्रीपुरुषसंबंधाचा वैवाहिक सुखाशीं व आरोग्याशीं कांहीं संबंध असेल हेंही कोणाच्या डोक्यांत येत नव्हतें. परंतु इंद्रियसुख हा विवाहांतील एक महत्त्वाचा—बहुधा सर्वांत महत्त्वाचा—भाग आहे, ब्रह्मचर्य पाळल्यानें निरोगी व वयांत आलेल्या स्त्रीपुरुषांच्या प्रकृतीस अपाय होतो, संततिनियमन करण्याचा मार्ग ब्रह्मचर्य नव्हे, व सुखाच्या संसाराला योग्य प्रमाणांत व योग्य प्रकारच्या इंद्रियसुखाची अत्यंत जरूर आहे या गोष्टी आतां हळूहळू बहुजनसमाजाला पटूं लागल्या आहेत. या प्रश्नाचा आपण येथें जरा अधिक विचार करूं.

लग्नानंतर ( दोघेंही प्रौढ आहेत असें धरून चालूं ) लागलीच, पतिपत्नींचें कितीही प्रेम असलें तरी, संभोगेच्छा पुरुषामधेंच प्रबळ व स्पष्ट असते. स्त्रीचें प्रेम प्रारंभीं तरी जास्त मानसिक असतें. अशा वेळीं तिच्या मनाला, तिच्या साहजिक

विनयवृत्तीला, शक्य तितकें कमी दुखवणें व संभोगापासून एकमेकांना किती आनंद होणें शक्य आहे याची तिला हळूहळू कल्पना आणून देणें हें काम वराला करावें लागतें. अर्थात लग्नानंतरच्या पहिल्या कांहीं महिन्यांत त्याला अतिशय धीमेपणानें व प्रेमळपणानें वागावें लागतें.

मानसिक अथवा शारीरिक संवेदनेमुळें स्त्रीपुरुषांच्या जननेंद्रियांत फेरफार होऊन तीं संभोगास योग्य स्थितींत येतात. पुरुषाचें इंद्रियाचे रक्तवाहिन्यांतील रक्ताचा पुरवठा वाढतो व तें फुगून ताठ होतें. त्याच वेळीं स्त्रीच्या इंद्रियाजवळील निरनिराळ्या ग्रंथींतून एक चिकट, बुळबुळीत द्रवाचा स्राव होतो व त्यामुळें तें संभोगयोग्य होतें.

अशा प्रकारच्या संवेदना न मिळाल्यामुळें स्त्रीचें इंद्रिय कोरडें राहून देखील जर संयोग करण्याचा प्रयत्न पुरुष करील तर स्त्रीला अतिशय त्रास भोगावा लागतो व इजा देखील होते. अर्थात संभोगापूर्वी दोघांचीही कामवासना उद्दीप्त व्हावी लागते व ती करण्याचें काम बहुतेक वेळां पुरुषाकडेच येतें. हें करतांना स्पर्श, दृष्टि, संभाषण, चुंबन या सर्वांचा उपयोग करावा लागतो. असें करण्यांत केवळ परार्थ नसून स्वार्थही आहे. स्त्रीपुरुषसंगाचे एकंदर तीन भाग करतां येतील. कामवासना उद्दीप्त करण्याकरतां केलेली प्रेमक्रीडा, प्रत्यक्ष इंद्रियसंयोग व संभोगानंतरची लीला. त्या तीनही गोष्टींत जेव्हां पतिपत्नी पूर्ण कुशल होतील तेव्हांच त्यांचा संबंध चिरसौख्यदायी होईल.

---

**मूत्राचें पावित्र्य**. हिंदु लोकांत गोमूत्र पवित्र समजून पिण्याची व इकडे तिकडे शिंपडण्याची चाल आहे. अशाच प्रकारच्या इतर लोकांतही कांही चाली आहेत. आत्मा मूत्राशयांत असतो असा एस्किमो लोकांचा समज आहे. हॉटेंटॉट् लोकांत विवाहप्रसंगीं पुरोहितानें वधूवरांवर लघ्वी करावी असें शास्त्र असे. **मंगो पार्क** हा एकदां आफ्रिकेंत शिद्दी लोकांच्या लग्नाला जाऊन परत आला तों एक बाई मूत्रानें भरलेलें भांडें घेऊन तेथें आली व तिनें तें त्याच्या तोंडावर फेंकलें. प्रथम तो खूप संतापला, पण त्या बाईनें सांगितलें कीं तें शुद्ध वधूचें

मूत्र असून तिनें त्याचा सन्मान करण्याकरतां तें पाठवलें, तेव्हां त्यानें तोंड पुसून तिचे आभार मानले. पॅप्युअन् गल्फमधील कांहीं लोकांत तरुणास दीक्षा देऊन योद्धा बनवतांना त्याच्या तोंडांत राजानें लघ्वी करावी लागते. १५ व्या शतकांतील एक ख्रिस्ती जोगी वृद्ध पुरुषांस कामोद्दीपक म्हणून तरुण कुमारिकांचें मूत्र पाजीत असे. त्यांत फॉस्फरस असल्यामुळें कदाचित उपयोग होईल, पण बहुतेक परिणाम मानसिकच असला पाहिजे, असें एक फ्रेंच डॉक्टर म्हणतो. मनुष्याची थोडीबहुत सुधारणा झाल्यावर मूत्राबद्दल किळस उत्पन्न होऊन त्याची जागा तीर्थानें घेतली, परंतु सनातन हिंदुधर्मांत मूत्राचें पावित्र्य अजून शिल्लक आहेच.

---

## संमतिवयाची कमिटी

सर मोरोपंत जोशी यांच्या कमिटीनें ज्या सूचना केल्या आहेत त्यांतील मुख्य म्हणजे १३ वर्षांचे आंतील मुलींचे विवाह होऊं नयेत ही होय, व यासंबंधीं बुरसलेल्या पारंपरिक लोकांशिवाय कोणाचा मतभेद होणार नाहीं. किंबहुना ही वयो-मर्यादा फारच कमी झाली असेंही पुढारलेले लोक म्हणतील.

परंतु त्यांच्या इतर सूचना मात्र आधुनिक मनास धरून नाहींत. अर्थात् कायद्यांत फरक करण्याकरतां ज्या सूचना करावयाच्या त्यांस बहुमत न मिळाल्यास त्या निरुपयोगी होतात व म्हणून पारंपरिक मतासही थोडेंबहुत महत्त्व द्यावें लागतें. परंतु आमचा कायदेमंडळाशीं कांहीं संबंध नसल्यामुळें आम्हांस त्याचा तात्त्विक दृष्ट्या विचार करणेंच योग्य दिसतें.

संमतीचें वय नवऱ्यापुरतें १५ व इतरांस १८ असावें अशी कमिटीची सूचना आहे. याचा अर्थ असा कीं लग्नाच्या स्त्रीशीं देखील व तिची संमति असतांही, तिला १५ वर्षें पुरीं झालीं नसल्यास समागम करतां कामा नये, व केल्यास तो बलात्काराचे सदरांत येऊन नवऱ्यास योग्य ती शिक्षा होईल. त्याचप्रमाणें इतर कोणत्याही स्त्रीशीं समागम करणें झाल्यास तिचें वय निदान १८ असलें पाहिजे, नसल्यास तिची संमति असली तरी तो बलात्कार समजला जाईल.

## संपूर्ण जीवन

पारंपरिक मूर्खपणा बाजूला ठेवला तर, स्त्रीची संमति असतांही समागमास बलात्कार समजण्याचें एकच कारण असूं शकतें. तें हें कीं, स्त्रीच्या शरीराची योग्य वाढ झालेली नसल्यास समागमानें तिला शारीरिक इजा होण्याचा बराच संभव असतो. या बाबतींत जगन्मान्य डाक्तरांच्या मतासच विशेष महत्त्व दिलें पाहिजे. हें मत असें पडतें कीं स्त्री व पुरुष वयांत आल्यावर समागमापासून शारीरिक नुकसान होत नाहीं. स्त्री वयांत आल्याचें उघड चिन्ह म्हणजे ऋतुप्राप्ति व पुरुषाचे बाबतींत आवाज फुटणें, कांखेंत व जननेंद्रियाचे वरचे बाजूस केश उगवणें, हीं चिन्हें आहेत.

हिंदुस्थानांत १५ व्या वर्षाचे पुढें ऋतुकाल क्वचितच लांबतो, परंतु ऋतुप्राप्तिपूर्वी समागम होतांच कामा नये अशी व्यवस्था करायची असल्यास संमतीचें वय १७ वर्षें (पुरीं) ठरवलें पाहिजे. शिवाय संमति असल्यावर इतरांशीं समागम केल्यास मात्र इजा होते व नवऱ्याशीं केल्यानें मात्र होत नाहीं, असें शक्य नाहीं, तेव्हां संमतीच्या दृष्टीनें जें वय इतरांस तेंच नवऱ्यासही लागू केलें पाहिजे. संमतीच्या मर्यादेनंतर नवऱ्याला संमतीशिवायही समागमाचा म्हणजे बलात्काराचा हक्क प्राप्त होतो हें लक्षांत घेतल्यास या मुद्द्यास अधिकच महत्त्व येतें.

वेश्यांशींही त्यांच्या मर्जीविरुद्ध समागम केल्यास तो बलात्काराचा गुन्हा होतो. परंतु संमतिवयानंतर लग्नाच्या स्त्रीवर बलात्कार केल्यास गुन्हा होत नाहीं. हा कायदा रानटी आहे. कायद्याचा आणखी एक रानटीपणा म्हणजे, कोणाही पुरुषास समागमाकरतां कोणतीही स्त्री—मग ती स्वतःची मुलगी असली तरी ती—तिच्या संमतीनें देखील मिळवून देणाऱ्या मध्यस्थास कायद्यानें शिक्षा होते, परंतु स्वतःची मुलगी तिच्या संमतीविरुद्धही एखाद्या इसमास समागमाकरतां देणाऱ्या बापास शिक्षा होत नाहीं—अशा संबंधास लग्न म्हटलें म्हणजे झालें.

---

### 'संपूर्ण जीवन'

नग्नतेचा प्रचार करण्याकरतां वरील नांवाची एक संस्था पॅरिस येथें स्थापन झाली आहे. या बाबतींत जर्मनीनें पुढाकार घेऊन अशा जातीची पहिली संस्था तेथें निघाली. हल्लीं या विषयावर व्याख्यानें चालू आहेत व प्रकृतीवर याचे परिणाम

निःसंशय चांगले होतील असा या चळवळीला मोठमोठया डॉक्टरांनीं आशीर्वाद दिला आहे.

काहीं धार्मिक लोक विरुद्ध ओरड करीत आहेत पण काहीं सभासदही झाले आहेत. एका ख्रिस्ती साधूनें म्हटलें आहे, शरीराचे जे भाग उत्पन्न करायला ईश्वराला लाज वाटली नाहीं, त्यांची मला कां लाज वाटावी ? एका व्याख्यात्यानें सांगितलें कीं लग्नापूर्वी वधूवरांनीं एकमेकांस नग्न पाहिलें असल्यास पुढें तक्रारीला जागा राहणार नाहीं. हिंदुस्थानांत तर बायको लंगडी असली तरी कधीं कधीं नवऱ्याच्या लक्षांत लग्नापूर्वी येत नाहीं, मग शरीराचें सौंदर्य बाजूलाच राहिलें.

या संस्थेचे संस्थापक मॉंजो व हल्लींचे अध्यक्ष डॉ. व्हिआर यांचें एकमत नाहीं. अध्यक्ष म्हणतात नग्न राहणें चांगलें, पण स्त्रीपुरुषांनीं एकत्र असतां नग्न असू नये, कारण तसें केल्यास दुष्ट लोक भलत्याच उद्देशानें संस्थेंत येण्याचा संभव आहे. नग्नतेचा प्रचार झाल्यास त्याचे नैतिक परिणाम अनिष्ट होतील असें कित्येक म्हणतात, परंतु असें होण्याचें बिलकुल कारण दिसत नाहीं. युरोपांत ज्या देशांत नग्नतेचा प्रचार थोडाबहुत झाला आहे तेथील अनुभव तसा नाहीं. ज्या लोकांची वाईट विचारांकडे प्रवृत्ति असते त्यांची व ज्यांस अज्ञानामुळें फाजील जिज्ञासा असते त्यांची ती प्रवृत्ति किंवा जिज्ञासा संबधीनें लौकरच नाहींशी होते, तथापि पारंपरिक लोक कोणत्याही नव्या प्रकाराला विघ्न करणारच.

---

**ग्रंथपरीक्षण:**—'विधवावपनशास्त्रार्थासंबंधीं अखेर निर्णय, परमहंस प्रज्ञानेश्वर यति.

यांतील मुद्दयाचे बाबतींत जरी आमचें ग्रंथकाराशीं एकमत आहे, तरी ग्रंथांतील कांहीं आक्षेपार्ह विधानें नमूद करणें भाग आहे. ग्रंथकर्त्याप्रमाणें आमचें मत स्मृतींवर अवलंबून नाहीं. सर्व स्मृतिकारांनीं एक मतानें विधवांचें वपन करावें असेंच सांगितलें आहे, असें जरी वादांतीं ठरलें, तरी तें करूं नये असेंच आम्ही म्हणणार. सामाजिक उन्नतीच्या दृष्टीनें स्मृतिकार निःसंशय मागसलेले

होते; हा त्यांची चूक नाहीं, परिस्थितीच तशी होती. त्यांची वचनें आज कुचकामाची आहेत असें आम्हीच म्हणतों असें नाहीं, सामान्य जनता तरी आज त्यांना कोठें विचारते आहे? शास्त्रार्थापेक्षां रूढीचेंच प्राबल्य जास्त असतें.

आमचे मतें वपनाच्या अगर इतर कोणत्याही बाबतींत कोणावरही निष्कारण जुलूम होतां कामा नये. वपनाचे बाबतींत विधवांप्रमाणेंच लहान मुलांवरही जुलूम होत असतो, ही गोष्ट विधवांच्या एकाही कैवाऱ्याच्या लक्षांत आलेली दिसत नाहीं. मुलांस यापासून अतिशय त्रास होतो हें आम्ही स्वानुभवावरून सांगतों. पण विधवेच्या अश्रूंनीं हृदयाला पाझर फुटतो. लहान मुलें रडायचींच, त्यांच्याकडे कोण लक्ष देतो? शास्त्रार्थच ज्यांना पाहिजे असेल, त्यांस यतींच्या पुस्तकाचा उपयोग होईल.

---

## प्रणयी पत्र

(श्री. भारतविहारी यांजकडून)

सन्मान्य संपादक 'समाजस्वास्थ्य' यांसी न. वि. वि. खालील पत्र मला संगपूरच्या एका नदीकिनाऱ्यावर धूळ खात पडलेलें आढळलें, सहज मीं तें उचलून त्यांतील मजकुरावर दृष्टि फिरवली. पत्रांतील मतितार्थावरून पाहतां तें जरी प्रणयी पत्र असलें, तरी त्यापासून समाजानें भरपूर बोध घेण्यासारखा वाटल्यामुळें ते आपल्या मासिकांत प्रसिद्ध करण्यास्तव पाठवीत आहें. योग्य वाटल्यास प्रसिद्ध करण्याची मेहेरबानी कराल अशी आहे.—भारतविहारी.

ता.XX मे १९२९. मत् प्रिय XXX यांस

माझ्या सासऱ्याच्या निमंत्रणावरून आपण दोन तीन खेपा आमच्या येथें जेवणखाणास राहिले, परंतु परवांच्या खेपेस माझा तुमचा जो निकट परिचय झाला त्यामुळें आपणाला पुनः पुनः पाहण्याची मला इच्छा उत्पन्न होते. माझी मनस्थिति आपणास कळली आहेच व आपलेंही माझ्याकडे अत्यंत प्रेमानें पाहणें माझ्या हृदयांत आहेच. पण माझी आरंभींची हकीगत मात्र आपणास तितकीशी कळली नसावी.

## समाजस्वास्थ्य

माझ्या बाबांनीं माझें लग्न माझ्या दहाव्या वर्षी केलें. नवराही नशिबानें चांगला सुशिक्षित मिळाला होता परंतु मला न्हाण येण्यापूर्वीच त्यांना काळानें माझ्यापासून ओढून नेलें! त्यावेळीं त्याबद्दल मला विशेषसा खेद वाटला नाहीं. परंतु जसजसें माझें वय वाढत गेलें, तसतसें मला माझें भवितव्य कळूं लागलें. चार चौघांत बसण्यास, घराबाहेर फिरण्यास, मंगल कृत्यांचे वेळीं उघड रीतीनें हालचाल करण्यास मला भयंकर बंदी झाली. पुढें कांहीं काळ मी बापाच्याच घरीं राहिलें. १४ व्या वर्षी मला तरुण दशा प्राप्त झाली व घरांतील बंधुभावजयींच्या हालचाली पाहून तरुणपणींची व्यथा माझ्यांत जागृत झाली. पुढें पुढें ती इतकी प्रज्वलित होत चालली कीं, ती मला सहनच होईनाशी झाली. अशा सुमारास मला सासऱ्यांनीं घरीं नेलें, घरांत आम्हां दोघांवांचून तिसरें कोणीच नव्हतें. असे दोन तीन आठवडे गेले. पुढें आमच्या घरीं तुमची ये जा सुरू झाली. त्यापुढील माझी सर्व मनोव्यथा आपणास माहीत आहेच. समाजाच्या दृष्टीनें मी भयंकर कृत्य आचरीत आहे याची मला पूर्ण जाणीव असूनही आपणापाशीं मी प्रेमयाचना केली व आपणही मजवर कृपा केली, परंतु आपण नेहमींच माझ्याकडे असावें असें मला वाटत आहे. तेव्हां आपण अगत्यानें मला शक्य तितक्या लवकर भेटण्याची कृपा करावी व येतांना गर्भसंभव न होण्याचा खात्रीचा उपाय चांगल्या तज्ज्ञांकडून समजून घेऊन इकडे यावें. कळावें.

आपल्या भेटीची आतुरतेनें वाट पाहणारी * * *

---

**फ्रान्सच्या राज्यक्रांतीची कारणें.** शिस्नाग्रावरील कातडीचें तोंड लहान असल्यास ती मागें सरकूं शकत नाहीं, यामुळें समागम अशक्य होतो इतकेंच नव्हे तर कातडीचे आंत मळ सांचून राहिल्यामुळें रोग होण्याचा संभव असतो. अशा वेळीं ती कातडी कापून घ्यावी लागते. ही शस्त्रक्रिया फारशी त्रासाची नसते; तरी ती करून घेण्यास कित्येक लोक भितात. फ्रान्सच्या पहिल्या राज्यक्रांतीच्या वेळचा राजा सोळावा लुई याची अशी स्थिति होती, परंतु तो कापून घेण्यास कबूल

होईना. अर्थात् त्याला कामवासना असती तर तो कबूल झाला असता. त्याच्या राणीनें जर आपली सोय इतरत्र पाहिली नसती, तर ती जन्मभर कुमारीच राहिली असती. हें जरी क्षम्य होतें, तरी यामुळें व ती मूळची ऑस्ट्रिआमधील असल्यामुळें, लोकांस आवडेनाशी झाली. तिच्या अमर्याद उधळपट्टीमुळें लोक अधिकच खवळले, व राज्यक्रांतीस हें एक कारण झालें.

आणखी एक कारण म्हणजे रूसो व व्हाल्टेर या प्रसिद्ध लेखकांचे ग्रंथ. पैकीं रूसो हा स्वसंभोगाच्या संवयीमुळें नपुंसक होऊन विरक्त झाला व समाजसुधारणेच्या मार्गाला लागला. तेव्हां रूसो व सोळावा लुई या दोघांचें नपुंसकत्व वेगवेगळ्या रीतीनें फ्रेंच राज्यक्रांतीचें कारण झाले असें म्हणावें लागतें. अर्थात् अशा कारणांकडे इतिहासकार दुर्लक्ष करतात, परंतु त्यांचें महत्त्व कमी नसतें. कामवासना ही जबर शक्ति आहे व तिचे परिणाम कोठवर पोंचतील हें सांगणें कठिण आहे.

---

**मांसाहार.** स्टीफनसन् यांनीं उत्तरध्रुवाकडील एस्किमो लोकांत सात वर्षे केवलमांसाहारावर काढलीं व या अवधींत त्यांची प्रकृति उत्तम राहिली हें प्रसिद्ध झाल्यावर पुष्कळ लोकांस आश्चर्य वाटून ते म्हणू लागले कीं थंडीमुळें किंवा व्यायामामुळेंच त्यांस हा आहार मानवला, एरवीं मानवणार नाहीं. परंतु तेथें नेहमींच थंडी नसे व कांहीं महिने व्यायामही नसे.

या शंकांचें समाधान करून शास्त्रीय ज्ञानार्जनास मदत करण्याचे हेतूनें, स्टीफनसन व त्यांचे एक मित्र अँडरसन यांनीं न्यूयॉर्क येथें एक वर्षभर केवळ मांसाहारावर काढण्याचें ठरवलें. स्टीफनसन हे पहिले दोन महिने इस्पितळांत राहून त्यांचेवर मांसाहाराचे काय परिणाम होतात याचें बारकाइनें निरीक्षण झालें, व नंतरही ते वारंवार इस्पितळांत जात असत. अँडरसन हे पहिले तीन आठवडे व शेवटचे तीन आठवडे इस्पितळांत राहिले.

या अवधींत दोघेही जास्त लाल दिसूं लागले, व जरी ते व्यायाम करीत नसत तरी त्यांची शक्ति बिलकूल कमी झाली नाहीं. नाडी, शरीराची उष्णता

व झोप यांत फरक पडला नाहीं. स्टीफनसनचें ५ पौंड व अँडरसनचें ६ पौंड वजन कमी झालें. अँडरसन यांस उन्हाळ्यांत उष्णतेपासून नेहमींपेक्षां कमी त्रास झाला व मांसाहार सुरू केल्यापासून थोड्याच दिवसांत त्यांचे केंस गळून पडण्याचें बंद झालें. या दोघांसही पायोरिआ ( दांतांत पू ) नव्हता, परंतु स्टीफनसनच्या दांतांवर कीट जास्त वाढलें. मांसाहाराचा त्यांस कंटाळा आला नाहीं. ते कधीं कधीं अंडींही खात असत, परंतु अँडरसन फक्त मांसच खात असत. मांसांतील चरबीचें प्रमाण महत्त्वाचें असतें; स्टीफनसन यांस प्रयोगाचे आरंभीं दोन दिवस चरबीशिवाय मांस दिलें तेव्हां ते आजारी झाले, परंतु त्यांच्या चवीप्रमाणें त्यांस चरबी खाऊं दिल्यावर ते दोन दिवसांत बरे झाले. दोघांसही प्रयोगाच्या यशाबद्दल खात्री होती, याचाही परिणाम झाला असला पाहिजे. मांसाहारापासून अनेक चांगले परिणाम होतात व त्याविरुद्ध ओरड शास्त्रीय नसून धार्मिक व पारंपरिक आहे.

---

**अमेरिकन् मूर्खपणा.** क्षयरोगाविरुद्ध उपाय म्हणून ईश्वराची प्रार्थना करण्याकरितां अमेरिकेंत एक संघ निघाला आहे. त्याच्या घटकांनीं दिवसांतून एकदां तरी ( जुळल्यास सकाळीं ११ वाजतां ) या दृष्टीनें प्रार्थना केली पाहिजे असा नियम आहे. या बाबतींत काय करावें हें ईश्वराला कदाचित् कळणार नाहीं म्हणून, शास्त्रीय शोधास त्यानें मदत करावी असें सुचवण्याचाही या संस्थेचा उद्देश आहे.

---

सुंता करतेवेळीं शिस्नाग्रास झालेली जखम चोखून रक्त बंद करण्याची धार्मिक चाल ज्यू लोकांत आहे. हा प्रयोग करणाऱ्या धर्मगुरूस गर्मी असल्यास त्यापासून हा रोग त्या जखमेच्या द्वारें लहान मुलांस लागतो. याच रीतीनें एका मुलास क्षय-रोग लागून, सुंता केल्यापासून एक महिन्यांत तेथें व्रण दिसूं लागला, हा व्रण कापला तरीही तो मुलगा चार महिन्यांत क्षयानें मेला ( युगोस्लाव्हिआ ).

---

## नग्नतेचा प्रचार

नग्नतेचा प्रचार करणाऱ्या एका पाक्षिकानें वाचकांचीं मतें मागवतां त्यास पुढील उत्तरें मिळालीं. १. कापड्यांच्या अतिरेकाविरुद्ध व नैसर्गिक जीवनाच्या तर्फेचे

आपले प्रयत्न उत्तेजनार्ह आहेत. ( पांच मुलांचा बाप ). २. मी व माझे पति दोघेंही आपल्या संघांत आहों. नग्नतेचे परिणाम अत्यंत चांगले आहेत अशी आमची खात्री आहे व दररोज कांहीं वेळ नग्न राहण्याची सोय सर्वत्र झाली पाहिजे असें आमचें मत आहे. मोकळ्या हवेंत नग्न पडून राहण्याचें सुख एकदां मिळालें म्हणजे पुनः हवेंसेंच वाटतें. गेल्या उन्हाळ्यांत मी व माझी अडीच वर्षांची मुलगी, अशा दोघांना हें सुख समुद्रकांठीं एक महिना मिळालें. शरीराची व मनाची स्थिति यामुळें तत्काळ सुधारते. माझ्या मुलीचा मलावरोध नाहींसा झाला व मीं हिंवाळ्यांत लोंकरीचे कपडे सोडून दिले तरी मला एकदांही सर्दी झाली नाहीं. ३. मी व माझी पत्नी गेल्या तीन महिन्यांपासून घरीं नग्नच राहतों, व आम्हांस त्यापासून अत्यंत बरें वाटतें. आपल्या बाजूला आणखी लोक मिळवण्याचा मी प्रयत्न करतों. ४. नग्नतेचे परिणाम उत्तम आहेत, परंतु स्वतःचें बंद आवार असल्याशिवाय घरीं सुद्धां नग्न राहतां येत नाहीं. तेव्हां संघ निर्माण करून कोठेंतरी अशी व्यवस्था करणें एवढाच मार्ग आहे. ५. स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या शरीराच्या कोणत्याही भागाची लाज वांटण्याचें बिलकूल कारण नाहीं.

---

**पोहण्याचे सार्वजनिक तलाव.** पुष्कळ माणसें एकत्र पोहल्यास आंतड्यांच्या, डोळ्यांच्या, कानांच्या व त्वचेच्या रोगांचा प्रसार होण्याचा बराच संभव असतो, तसाच गर्मी किंवा परम्याचाही प्रसार होणें शक्य असतें. तलावांत एकसारखें ताजें पाणी येत असून खराब झालेलें पाणी वाहून जाण्याची व्यवस्था असेल तर हा संभव कमी होतो. स्वीडनमध्यें अशा तलावांत जाण्यापूर्वी प्रत्येकास साबण लावून गरम पाण्याचें स्नान घालण्याकरतां एक मनुष्य ठेवलेला असतो. हीच पद्धत जपानांतही आहे. कांहीं लोक तलावांतच मूत्रविसर्जन करतात व कांहींना आंत थुंकण्यांत गंमत वाटते. परंतु सर्व लोक स्वच्छ असले तरीही पाणी खराब होतें. याकरतां सारखें वाहतें पाणी ठेवणें शक्य नसल्यास तलावांतील पाणी जंतुरहित करून तें तलावांत सोडण्याची व्यवस्था केली पाहिजे, नाहींतर पोहण्यांत धोका आहे. याकरतां पुष्कळ ठिकाणीं पाणी गाळून त्यांत क्लोरीन् वायु मिसळून तें पुनः तलावांत

सोडतात. १०००००० भाग पाण्यांत १ भाग वायूचा मिसळल्यास काम होतें. हें ज्या ठिकाणीं केलेलें नसेल अशा तलावांत पोहल्यास नंतर साबण लावून गरम पाण्यानें स्नान करणें अत्यवश्य आहे. न केल्यास कोणते रोग होतील याचा नियम नाहीं.

---

नाशिकचे डॉ. केतकर म्हणतात कीं गरीबीची भाकर खाल्ल्यानें हुशारी येते. अमेरिकेंतील आंकड्यांवरून असें दिसतें कीं मिशनऱ्यांचे मुलगे सर्वांत हुशार, त्याच्या खालोखाल प्रोफेसरांचे मुलगे, व सर्वांत शेवटीं शेतकऱ्यांचे व हरकाम्या मजुरांचे मुलगे असतात. चटणीभाकर खाणारे गरीब लोक या शेवटच्या वर्गांत येतात. कॅलिफोर्निआमधील १००० हुशार मुलें घेऊन त्यांचे आईबाप कोण याचा तपास करतां असें आढळलें कीं उच्च धंद्यांतील लोकांचीं मुलें, व कारागिरांचीं किंवा मजुरांची मुलें, यांत हुशार मुलांच्या प्रमाणांत ३० पटींचा फरक पडतो. हुशार मुलांचे नातेवाईकही बऱ्याच वेळां हुशारीमुळें वर चढलेले असतात. सारांश हुशारी हा आनुवंशिक गुण आहे. तो मूळचा नसल्यास चटणीभाकर खाऊन येणार नाहीं.

---

## ग्रंथपरीक्षण.

१. 'भगवान् श्रीकृष्ण,' लेखक रा. रा. देशपांडे.

श्रीकृष्णासंबंधीं अद्भुत कथा सर्वांच्या माहितीच्या आहेत. त्या सर्व खऱ्या आहेत अशी लेखकाची कल्पना दिसते. मग 'आरबी भाषेंतील सुरस गोष्टी' खऱ्या कां समजूं नये ? अंध श्रद्धेनेंच हिंदुस्थानाचें वाटोळें केलें आहे.

२. 'गोपालन', प्रकाशक गो. वि. बरवे, स्वयं० मुंबई गोवर्धन संस्था, मार्मुगांव हार्बर.

नांवावरून पुस्तकांत काय आहे हें समजेलच. गोरक्षणाचा धार्मिक दृष्टीनें पुरस्कार व गोमांसभक्षकांस व त्याबरोबरच: एकंदर मांसभक्षकांसही चार शिव्या, व त्यास जरूर पडतील तीं खरीं खोटीं विधानें अशा पुस्तकांत असायचींच. पैकीं मुख्य मुद्दा घेऊं. दुधाच्या दृष्टीनें गाईपेक्षां म्हैस कितीतरी श्रेष्ठ आहे हें लोक आचरणानें कबूल करतात. परंतु गोमूत्र देण्यास म्हैस असमर्थ असल्यामुळेंच गाईला महत्व

आलेलें आहे. हा धार्मिक गलिच्छपणा सोडून दिल्यासच गोरक्षणाचा व्यावहारिक दृष्ट्या विचार करतां येईल. तो केल्यास असें स्पष्ट दिसतें कीं मरतुकड्या गाई जगवण्यांत पैशाचा अपव्यय झाल्यामुळें चांगल्या गाईंचे हाल होतात. जेथें गोवध सर्रास चालू आहे अशा युरोपांत गोमांस चांगलें मिळतें इतकेंच नव्हे तर गाईचें दूधही चांगलें मिळतें व सर्व लोक तेंच वापरतात, कारण तेथें म्हशी नाहींत ! हिंदुस्थानांतील गाईंची अत्यंत निकृष्ट दशा गोरक्षणाच्या खुळामुळेंच झाली आहे हें क्षणभर विचार केल्यास समजतें. गाय हें उपयोगी जनावर आहे व गाई पाळून दूध विकल्यास व्यापारी दृष्टीनें फायदा झालाच पाहिजे, मग गोरक्षणवाल्यांस भीक मागावी लागते कां ? याचें कारण हें कीं व्यावहारिक दृष्टीनें गोरक्षणापासून फायदा नाहीं, हा धार्मिक वेडगळपणा आहे, व बैराग्यांना जसा भीक मागण्याचा पिढीजाद हक्क आहे, तद्वतच गोरक्षणाच्या चळवळीनें स्वतःच्या नांवावर स्वर्गीय रजिस्टरांत पुण्य जमा करूं पाहणाऱ्या गोरक्षकांची स्थिती झाली आहे. गोमांस नको असेल त्यांनीं खाऊं नये, परंतु ज्यांना गाईचें दूध चांगलें मिळावें अशी इच्छा असेल त्यांनीं गोरक्षणास एक पैचीही मदत करूं नये. आमचे मतें गोमांसांत व इतर मांसांत तात्त्विक दृष्ट्या फरक नाहीं. गाईप्रमाणेंच म्हशीही मारल्या जातात, परंतु कोणी म्हैसरक्षण करीत नाहीं, कारण पंचगव्यास तिचा उपयोग नाहीं !

---

गर्भाशयांत एक चांदीचें वळें घालून ठेवल्यास त्यामुळें गर्भधारणेस प्रतिबंध होतो असा शोध नुकताच लागला आहे. हें दरवर्षी डाक्तराकडून बदलून घ्यावें लागतें.

---

**धोक्याची सूचना.** स्वामी शिव्यानंदांशीं वाचकांचा परिचय आहेच. या जाड्या विद्वानांनीं आपल्या एका ग्रंथांत लिहिलें आहे कीं दोन्ही वृषण बांधून समागम केल्यास गर्भधारणा होणें शक्य नाहीं, तेव्हां संततिनियमनाच्या इतर साधनांची काय जरूर आहे ? यावर विश्वास ठेवणारे लोक सपशेल तोंडघशीं पडतील,

असा इशारा देणें आम्हांस जरूर वाटतें. स्वामी होणें सोपें आहे, पण स्वामी या पदवीनें अज्ञानाचा खड्डा कसा भरून निघणार?

---

## पतिता कीं पतिव्रता?

( लिहून आलेला मजकूर )

ताई, आज कोणत्या तोंडानें तुला पत्र लिहूं? लहानपणापासून आईसारखं मला वाढवलंस, बरंवाईट सांगितलंस नी आज असला भयंकर प्रश्न तुला विचारण्याचा प्रसंग माझ्यावर यावा ना? मी पतिता कीं पतिव्रता, पतीच्या उत्कट प्रेमानें वेडी झालेली, कीं प्रेमाचा संसार करण्यास आतां सर्वस्वी नालायक ठरलेली हेंच मला कळेनासं झालें आहे. आतां तूंच मला वाट दाखव बरं ताई, माझं डोकंच विचार करीनासं झालं आहे.

ताई, तुझ्याखेरीज कुणाजवळ बरं मी आपलं मन उघडं करून दाखवणार? ऐक तरमग माझी कहाणी एकदां...शिकलेल्या मुलींच्या नेहमींच्या पद्धतीस सोडून जेव्हां माझं लग्न बरंचसं माझ्या स्वतःच्याच पसंतीप्रमाणें झालं व विशेषतः बाबांचं मन वळवण्याचं जें काम तूं केलंस त्यामुळं मी सुखसागरांत इतक्या गटांगळ्या खाऊं लागलें कीं तें नवीनच लग्न झालेल्या प्रणयी तरुणीखेरीज इतरांना कळणें शक्य नाहीं. त्यांतच तिकडे कुडण्यास मामलेदारीच्या उमेदवारींत नोकरी लागतांच मला अस्मान ठेंगणें होऊन गेलं. स्वर्गसुख भोगायला दुसऱ्या कुठें जायलाच नको अशी माझी पक्की खात्री होऊन चुकली. नुकतंच लग्न झालेलं जोडपं, त्यांत स्वतंत्र रहायला मिळालेलं. राजा नी राणी, मग दुःख, हाल, असमाधान हे शब्द देखील मी विसरलें तर नवल कसलं?

पण ताई देवाला हें सुख फार वेळ बघवलं नाहीं. आज पंधरा दिवस झाले त्या गोष्टीला. एके दिवशीं दुपारींच कचेरींतून परत आले नी ताप आल्यासारखं वाटतं म्हणून निजले. मी जरा कपाळाला लावीत बसलें असेल, लागलीच म्हणाले पोटांत दुखतं म्हणून. प्रथम मला वाटलं अजीर्ण असेल, म्हणून मी पोटाला पण

तेल लावूं लागलें. पण लावण्याच्या वेळीं अधिकच दुखतं असें जेव्हां ते म्हणाले, तेव्हां मात्र मला चिन्ह ठीक दिसेना. बरं काळजी वाटून तरी मी काय करणार होतें ? भिकारडं खेडं कुडणं म्हणजे ! सरकारी दवाखाना देखील तीन मैल लांब. अखेरीस रात्रीं देखील जेव्हां ताप नी पोट दुखणं कमी होण्याचं चिन्ह दिसेना, तेव्हां मीं लागलाच शिपायाला रातोरात सरकारी दवाखान्यांत पाठवला. कर्मधर्म-संयोगानें डॉक्टर घरींच होते व सकाळ होते तों तेही पण आलेच.

ताई, तिकडे बरे करील म्हणून ज्याची मी देवदूतासारखी वाट पहात होतें, तो हा डॉक्टर यमदूत ठरेल असं मला स्वप्न तरी पडलं होतं का ? पण ताई, आतां किती रडलें म्हणून झालेली गोष्ट नाहींशी कशी होणार ? डॉक्टर आंत आले, त्यांनीं बराच वेळ परीक्षा केली नी गंभीर तोंड करून मला म्हणाले, " मामलेदारीण बाई, जरा बाहेर या, मी औषध काय तें सांगतो. " तिकडे तापामुळें जवळजवळ शुद्ध नव्हतीच, पण पुढें कांहीं वर्षांनीं जी मी मामलेदारीण होणार नी पदवी डॉक्टरांनीं मला आजच दिलेली ऐकून त्यावेळीं देखील मला जरासं बरं वाटलं ! त्या नराधमाच्या मनांतला विचार मला तेव्हांच कळता तर तें वाटलं असतं का ? ताई यापुढची हकीकत लिहितांना देखील लाजेनं माझें तोंड काळं ठिक्कर पडलं आहे. पण काय करूं? एकटी हें सगळं मनांत सांठवूं तरी कुठवर? एकदां ओकतेंच तुझ्याजवळ.

पलीकडच्या खोलींत नेऊन डॉक्टरांनीं कोणत्या शद्बांत आपली नीच सूचना माझ्यापुढं मांडली, हें मनांत आणलं तरी सांगणं मला शक्य नाहीं. तिकडचा आजार फार भयंकर आहे, अपेंडिसाईटिस कीं असंच कांहीं म्हणाले ते, एक दोन तासांच्या आंत औषध न मिळाल्यास ते वांचणें शक्य नाहीं आणि फी आगाऊ मिळाल्याखेरीज आपण तर औषध द्यायला कबूल नाहीं असें डॉक्टरांनीं मला सांगितलें तेव्हां मात्र माझ्या काळजांत चर्र झालं. पण त्यांची फी म्हणजे....ताई लिहूं तरी कसं तुला तें !...म्हणजे माझं पातिव्रत्य, हें जेव्हां मीं ऐकलं तेव्हां माझी अवस्था काय झाली असेल याची तूंच कल्पना कर. अपेंडिसाईटिस नुसत्या औषधानं बरा होणं शक्य नाहीं, डॉक्टर आपल्या विषयेच्छेकरतां मला भिवबीत

असतील, दोन तासांचा वेळ खरोखरच असेल तर कदाचित् घोड्यावरून शिपायाला पाठवून दुसरा डॉक्टर आणवतां येईल वगैरे कांहीं एक विचार माझ्या मनांत त्यावेळीं येऊं शकला नाहीं. मी नुसती बधिर होऊन गेलें. दर क्षणाला माझ्या लाडक्या पतीचे प्राण माझ्यापासून दूर जात आहेत, नी ते माझ्याजवळ आणण्याचा एकच उपाय, आणि तो म्हणजे माझ्या या देहाचें दान...!

ताई, पतिप्रेम म्हणजे काय हें तुला ठाऊक आहे, आपलं सर्वस्व त्याच्याशी कसं ऐकजीव होऊन जातं याचाही तुला अनुभव आहे. मी तो तुला जास्त काय सांगणार ? पतिविरहित अन्य पुरुषाला आपला देह अर्पण करण्याची नुसती कल्पना देखील किती किळसवाणी नी ओंगळ वाटते हें मी तुला सांगायला नको आहे... ताई, त्या भयंकर प्रसंगीं मी कशी वागलें, काय बोललें, कांहीं, कांहीं मला आठवत नाहीं...पण नाहीं कसं ? एक भयंकर गोष्ट एकसारखी डोळ्यांपुढें आहे तिची वाट काय ? ताई, काय लिहूं मी आणखी तुला ? कुणाला सांगेन म्हटलं तर तीही सोय नव्हती. तोंडांतून चकार शब्द काढतांच मरणाच्या दारांत पडलेल्या माझ्या पतीला टाकून ताबडतोब आल्या वाटेनें चालता होण्याची त्या मेल्याची धमकी !...अखेरीस पतिप्रेमाला मी बळी पडलें आणि त्या नराधमानें माझं पातिव्रत्य हिराऊन घेतलं ! ती बळजबरी नव्हती वरं, ताई, कारण बळजबरी असती तर मी ओरडलें असतें, त्याचा प्रतिकार केला असता, चार शेजारी पाजारी गोळा केले असते. पण तसें करतांच माझ्या पतीचे प्राण मीं वाऱ्यावर सोडले असते हा विचार एकसारखा माझ्या मनांत जळत होता. मुकाट्यानं शरिराची जी काय विटंबना होईल ती सोसली नी ओठ चावून त्यांना वांचवण्याबद्दल त्या नीचाची करुणा भाकली.

त्या नराधमाच्या औषधानें म्हण की माझ्या देहदानाच्या पुण्याईनें म्हण, त्यांना तीन चार दिवसांतच उतारा पडला नी आतां ते हिंडूंफिरूंही लागले आहेत. पण ताई, माझ्या हृदयांत जो भडका उडाला आहे, तो मी कसा शांत करूं ? त्यांचा जीव वांचवायला—निदान माझ्या मताप्रमाणें तरी—मीं माझ्या देहाची जी विटंबना केली ती माझ्या संसारसुखाची कायमची माती करणार का ? मी आतां खरोखरच

## पतिता कीं पतिव्रता

अपवित्र झालें का ? मनांत काडीचा विकार नसतांना केवळ नाइलाज म्हणून जी गोष्ट केली तिनें मी पतिता ठरलें का ? ताई, आतां तूंच मला मार्ग दाखव या भयंकर अंधारांतून. एकदां वाटतं, तिकडचे पाय घट्ट धरावे नी एकदां काय तें ओकून टाकावं. पण पुढच्याच क्षणाला मनात येतं कीं जर मी पतिता म्हणून त्यांनीं मला दूर लोटलं तर मग ज्या भावी सुखाच्या आशेवर मीं हें भयंकर कृत्य केलं ती फुकटच न ? मग पतिता म्हणूनच सारा जन्म काढायचा ना ? ताई, अखेरीस तुझ्याकडे धांव घ्यायचं ठरवलं. तूं तरी मला आतां सांगशील काय करूं तें ?

तुझी वेणू.

## पतिव्रताच–पतिता खास नव्हे

वेणू. तुझं हृदयस्पर्शी पत्र मिळालं. विचारांच्या भडक्यामुळें जीव गुदमरून जायला लागल्यावर तूं प्रथम मला पत्र पाठवलंस हें पाहून मला जितका आनंद वाटला तितकाच अभिमान पण वाटला. वेणू, आपलं खरं नातं निसर्गानें दिलेलं बहिणींचें पण नव्हे, नी दुर्दैवानें दिलेलं मायलेकीचं पण नव्हे, आपलं खरं नातं मैत्रिणीचं, नी तूं त्याच नात्यानं मला आपलं हृदय उघडं करून दाखवलंस, तेव्हां मींही पण त्याच नात्यानं तुला हें पत्र लिहीत आहें.

अग वेडे आपल्या प्रियपतीचा जीव वांचवण्याकरतां आपल्या शरीराचं दान करण्याचं भाग्य तुला लाभलं, त्याबद्दल आनंद वाटण्याचं सोडून रडत काय बसलसि ? अग इतकं शिकलीस नी पुस्तकं वाचलींस त्याचा हाच का उपयोग ? कल्पना कर, पावित्र्याच्या खुळचट कल्पनेला बळी पडून तूं शरीरानें शुद्ध राहिली असतीस नी फुकट नवऱ्याचा प्राण मात्र गेला असता, तर तुला काय बरं मिळालं असतं ? त्या डॉक्टरानं तुला फसवलं कीं तो खरं बोलला, हा त्यांत प्रश्नच उरत नाहीं. कारण तुझी प्रामाणिक समजूत जर अशी होती कीं नवऱ्याला वांचवायला देहदान हा एकच उपाय आहे, तर तुला दुसरा मार्गच मोकळा नव्हता.

पोरी, मुख्य ध्येय काय आणि तें मिळवण्याचा मार्ग काय यांचा तुझ्या मनांत घोटाळा झालेला मला दिसतो आहे. समाजव्यवस्था सुरळीत चालावी, पतिपत्नींचे संसार सुरळीत चालावे, थोडक्यांत, सुख मिळावें म्हणून ना नीतीचे नियम केलेले ?

त्यांना स्वतःला का निराळी कांहीं किंमत आहे? ताप बरा होण्यास क्योनेल घेणें हें ठीक, पण त्याव्यतिरिक्त का कोयनेलाला महत्त्व आहे? झालं तर मग. पातिव्रत्याचेंही असेंच. त्याला स्वतःला अशी काय वेगळी महती आहे? त्याच्यामुळें दांपत्यसुखांत भर पडण्याचा संभव अधिक, एवढेंच काय तें त्याचें महत्त्व. तें गमावल्यामुळेंच जर दांपत्यसुख वाढेल, एवढेंच काय पण तें कायम ठेवण्याच्या भरीस पडल्यास संसारालाच मुळीं अजीबात पूर्णविराम मिळेल असें जेव्हां दिसूं लागेल, तेव्हां तें जाऊं देणें यांतच शहाणपणा नाहीं का?

वेणू, केवळ शरीराच्या पावित्र्यापेक्षां मी मनाच्या पावित्र्याला खचित अधिक किंमत देतें. तुझ्या दुर्दैवी शरीराचा ताबा जेव्हां कांहीं क्षण त्या नीचानं घेतला, तेव्हां तूं मनानं आपल्या पतीलाच देह अर्पण करीत नव्हतीस का? हाताला घाण लागली तर काय आपण तो तोडून टाकतों? मग शरीराच्या याच विशिष्ट व्यापाराला निराळे नियम कां लावायचे? शरीर पूर्ण 'पवित्र' ठेऊन जर मनानं तूं व्याभिचार केला असतास, विकारपूर्ण नजरेनें जर तूं परपुरुषाकडे पाहिलें असतंस, तरच मी तुला पतिता समजलें असतें. पण मन निर्दोष एवढेंच नव्हे तर पतीच्या ठिकाणीं पूर्ण रमवून केवळ त्याच्या सेवेकरतांच जर तूं शरीर 'अपवित्र' केलेलं आहेस, तर तुला पतिता म्हणण्याची ब्रह्मदेवाची देखील प्राज्ञा नाहीं. हल्लींचे कांहीं लेखक तर असेंही म्हणतात कीं क्षणिक विकाराच्या भरांत, सळसळणाऱ्या रक्ताच्या जोरानं एकाद्या तरुणानं किंवा तरुणीनें वाईट वर्तन केलं तरी तेंही क्षम्य समजलें पाहिजे व तेवढ्याच कारणामुळें एखाद्या जोडप्याचा संसार मोडतां कामा नये. पण मी स्वतः इतकी पुढं गेलेली नाहीं. एवढं मात्र मी तुला सांगतें, कीं माझ्यावर जर तुझ्यासारखा प्रसंग आला असता तर मी अक्षरशः अशी वागलें असतें नी मला आपल्या पातिव्रत्याबद्दल काडीचीही शंका आली नसती.

आतां राहतां राहिला प्रश्न नारायणरावांना सांगण्याचा. त्यांत मात्र मी तुला फारसं कांहीं सांगूं शकेनसं वाटत नाहीं. नारायणरावांच्या स्वभावाची नी मतांची मला तितकीशी माहिती नाहीं. त्यांच्याशीं जें काय माझं थोडंबहुत बोलणं झालं आहे,

त्यावरून ते बऱ्याच पुढारलेल्या मतांचे आहेत असा माझा समज झालेला आहे, पण या बाबतींत पक्की खात्री असल्याशिवाय तोंडांतून शब्द काढणें अतिशय धोक्याचें आहे व त्यामुळं व्यर्थ आपल्या संसाराची माती मात्र करून घेशील. आपल्याला जी गोष्ट ठाऊक नाहीं तिच्यापासून मनस्ताप पण होणें शक्य नाहीं. शिवाय अत्यंत तर्कवादी समजल्या जाणाऱ्या लोकांचे विचार सुद्धां स्त्रीपुरुषसंबंधांत भयंकर मागसलेले असतात व त्यांत आणखी आपला स्वतःचाच संबंध असल्यावर मग तर बोलायलाच नको. ह्मणून ह्मणतें, उगीच व्यर्थ विषाची परीक्षा पाहूं नकोस. त्यांच्याबद्दल तुला पूर्ण खात्री असती नी तूं मोकळेपणानं त्यांच्याजवळ हृदय उघडं करून दाखवलं असतंस तर दुधांत साखर पडली असती. पण बायको ह्मणजे आपल्या मालकीची वस्तू, दुसऱ्याचा हात लागतांच ती 'दूषित' होते, पति हा देव आहे वगैरे पुरुषांनीं शोधून काढलेल्या विलक्षण कल्पनांचा पगडा वरवर दूर झालासा वाटला तरी आंतून तो तसा झालेला नसतो हें मात्र लक्षांत ठेव.

वेणू, आणखी काय लिहूं? मनांत कांहीं एक किंतु न आणतां असंच आपलं सुखदुःख मला सांगत जा एवढंच तुला सांगतें.

तुझी ताई.

---

प्राचीन काळीं ॲरिस्टॉटलनें लिहिलें आहे कीं नपुंसकांस कधीं टक्कल पडत नाहीं. आधुनिक फ्रेंच तज्ज्ञ डॉ. सॅबुरो हेही तेंच म्हणतात.

---

## नग्न कां रहावें ?

### ( फ्रेंचवरून )

रोगनिवारणाच्या दृष्टीनें नग्नतेस आज प्रमुख स्थान मिळालें आहे इतकेंच नव्हे तर निरोगी मनुष्यास नग्न राहण्याची स्वाभाविक इच्छा असते. आपल्या कृत्रिमतेमुळें शरिराचे इतके हाल होतात कीं शरिराला हवेची नैसर्गिक गरज असते हें आतां आपणास समजूं लागलें आहे व नग्नता प्रचारांत कशी आणतां येईल इकडे पुष्कळ लोकांचें लक्ष लागलें आहे. अर्थात बहुजनसमाज पारंपरिक असल्या-

मुळें कितीही इच्छा तरी ती लोकलज्जेमुळें दाबून टाकण्याची संवय बहुतेकांस झालेली असते व कोणत्याही नवीन विचारांचा बराच प्रसार होईपर्यंत तसें वागण्यास फारच थोडे लोक तयार असतात. याकरतां ज्यांस थोडेंबहुत धैर्य असेल त्यांनीं या बाबतींत उदाहरण घालून दिलें पाहिजे. यांतील मुख्य अडचण म्हणजे जेथें जेथें जननेंद्रियांचा संबंध येतो तेथें लोकांच्या वेडगळ समजुती सयुक्तिक विचाराच्या नेहमीं आड येत असतात. कामशास्त्राच्या योग्य शिक्षणाशिवाय ही अडचण दूर होणार नाहीं, परंतु ही लांबची गोष्ट आहे. सध्यां नग्नतेपुरताच विचार करूं.

सूर्यप्रकाशापासून होणारे फायदे आतां कोणीही समंजस मनुष्य नाकबूल करीत नाहीं. त्यानें रोगजंतूंचा नाश होतो व सर्व जीवनक्रियांस उत्तेजन मिळतें. ताप येत असेल किंवा फुप्फुसांचा क्षयरोग असेल तर मात्र उन्हापासून फायदा होत नाहीं. एरवीं इतर कोणताही रोग बरा होण्यास त्यानें मदत खास होते.

यावर मुख्य आक्षेप असे आहेत कीं (१) डॉक्टराच्या सल्ल्याशिवाय उन्हांत बसणें योग्य नाहीं, (२) जननेंद्रियांस उन्हाची जरूर नसते, (३) सामुदायिक नग्नता म्हणजे अनीती आहे.

(१). रोगांवर उपचार म्हणून जेथें उन्हाचा उपयोग करावयाचा, तेथें डॉक्टराची जरूर निःसंशय आहे. परंतु आरोग्याचें साधन या दृष्टीनें प्रत्येकानें त्याचा उपयोग करण्यास हरकत नाहीं. स्नान करण्याकरतां ज्याप्रमाणे आपण डॉक्टराचा सल्ला घेत नाहीं, तशीच ही गोष्ट आहे. याकरतां जें थोडेंबहुत ज्ञान लागतें तें अनुभवानें मिळतें. आजारी मनुष्य जसा गार पाण्याचें स्नान करणार नाहीं, त्याचप्रमाणें तापकऱ्यानें डॉक्टराच्या सल्ल्याशिवाय उन्हांत किंवा उघड्या हवेंत नग्न बसूं नये. निरोगी मनुष्यानें सुद्धां उन्हाची संवय हळुहळूच केली पाहिजे. पोहण्यास शिकतांना आपण अनुभवी लोकांचें अनुकरण करतों, तसेंच या बाबतींनही केलें पाहिजे.

(२). याचा विचार करतांना अंतःस्रावपेशींचें महत्त्व लक्षांत घेतलें पाहिजे. डॉ. पोरो म्हणतातः—या पेशींस नैसर्गिक सूर्यकिरणांनीं

किंवा तदभावीं कृत्रिम सूर्यकिरणांनीं ( म्हणजे एका विशिष्ट प्रकारच्या विजेच्या दिव्याच्या किरणांनीं—अल्ट्राव्हायोलेट् किरणांनीं ) अतिशय फायदा होतो. बीजकोशांवर यांचा प्रयोग केल्यास इतर पेशींवरही त्याचा परिणाम होतो व सर्वांची क्रिया नीट चालूं लागते. डॉ. द लातूर ह्मणतातः—अंतःस्रावपेशींपासून केलेल्या गोळ्या घेण्यापेक्षां सूर्यकिरणांचा परिणाम फारच जोरदार व नैसर्गिक रीतीचा असतो. याचा पुरावा अत्यंत सोपा आहे. एका मनुष्याला पूर्ण नग्न होऊन १५ दिवस नियमित वेळ उन्हांत बसण्यास लावावें, व नंतर १५ दिवस चड्डी नेसून बसवावें. या सर्व मुदतींत त्याचें वजन पहात राहिल्यास दुसऱ्या पद्धतीनें होणारें नुकसान तेव्हांच दिसून येतें. ( हें युरोपांत लिहिलेलें आहे. तेथील ऊन सौम्य असतें. व येथें हे प्रयोग करणें झाल्यास सकाळच्या किंवा सायंकाळच्या सौम्य उन्हांतच करणें इष्ट आहे. सं. )

३ शहरांतील कृत्रिम जीवनपद्धतीमुळें शुद्ध हवा व पुरेशी विश्रांति मिळत नाहीं व यामुळें बहुतेकांचें शरीर सुस्थितींत रहात नाहीं. याकरतां हवेची व उन्हाची अधिक जरूर असते. याला अडचण एकच, ती ही कीं स्वतःच्या नग्न शरीराची सुद्धां लोकांना लाज वाटते. हें अत्यंत हास्यास्पद आहे व याविरुद्ध शक्य तितकी चळवळ केली पाहिजे. या लाजेमुळें पुष्कळ लोक जननेंद्रियाच्या आसपासचा भाग कधीं धूत नाहींत व तें इंद्रियसुद्धां धुणें जरूर असतें हें त्यांस माहीतच नसतें. लहान मुलांस हे भाग धुण्यास शिकवण्याऐवजीं त्यांस हात लावूं नये असेंच बहुतेक लोक शिकवतात. या घाणेरडेपणाची लोकांस संवय झाल्यामुळें जननेंद्रिय म्हणजेच घाण अशी कल्पना रूढ होते व अशा लोकांस नग्नता घाणेरडी वाटल्यास नवल नाहीं. व्यायामाचे ठिकाणीं सार्वजनिक नग्नता अंमलांत आल्यास सर्व शरीर स्वच्छ ठेवण्याकडे लोकांची प्रवृत्ति आपोआप होईल, हा आरोग्याचे दृष्टीनें मोठा फायदा आहे.

अर्थात् घरीं देखील नग्न राहण्याची शक्य तितकी संवय केली पाहिजे. सकाळीं व्यायाम व स्नान आटपेपर्यंत व सायंकाळीं पुनः बाहेर जायचें नसल्यास निजेपर्यंत सर्वांस नग्न रहाण्यास हरकत असूं नये. मात्र सरदी होईल इतका वेळ नग्न राहूं नये. असें करून पाहिल्यास यापासून किती बरें वाटतें हें कोणासही समजेल. यामुळें

हवेची संवय होते व किंचित वारा लागल्याबरोबर सरदी होणें अशक्य होतें. (पुढील भाग पुढील एका अंकांतून घेतला आहे. सं.)

**सामुदायिक नग्नता**—ज्या ज्या निःपक्षपाती लोकांनीं फ्रान्स किंवा जर्मनींतील नग्नसंघ प्रत्यक्ष पाहिले आहेत, त्या सर्वांचा अनुभव असा आहे कीं सामुदायिक नग्नता उद्दीपक तर नाहींच परंतु त्याच्या उलट आहे. अर्थात विषयासक्त लोकांनीं जर हे संघ काढले असते, तर त्यांनीं अर्धनग्नताच अधिक पसंत केली असती, कारण त्यानें उद्दीपनही होतें व त्याला कायद्याचीही परवानगी आहे. तेव्हां याच्या मुळाशीं विषयासक्ति नाहीं हें उघड आहे.

**फायदे**—कोणत्याहि प्रकारचा शारीरिक व्यायाम एकट्यानें करणें किती कंटाळवाणें होतें याचा सर्वांस अनुभव आहे. तोच पुष्कळांनीं मिळून केल्यास अधिक उत्साह वाटतो व चढाओढीचाही उपयोग होतो. नवशिक्यांस लोकांच्या अनुभवाचा फायदा मिळतो व उन्हांत बसणें असेल तर याची जरूर असते. अज्ञानमूलक फाजील जिज्ञासा सामुदायिक नग्नतेनें नष्ट होते. या जिज्ञासेची पूर्ण तृप्ति झाल्यामुळें शरीराच्या विशिष्ट भागांकडे लक्षही जात नाहींसें होतें. यामुळें कामवासना नष्ट होते असें नाहीं, परंतु तिची फाजील वाढ न होतां ती नैसर्गिक स्थितींत राहते. ही फाजील वाढ आच्छादनामुळें उत्पन्न होते व प्रकृतीच्या दृष्टीनें अनिष्ट असते. नग्न समुदायांत लहान मुलें असल्यास त्यांचा विशेष उपयोग असतो. तीं तेथें आहेत एवढ्यानेंच इतरांच्या अनिष्ट प्रवृत्तींस आळा बसतो. अशा स्थितींत लहान मुलें किती आनंदानें व नैसर्गिक रीतीनें वागतात तें पाहून इतरांची वागणूकही साधी व सरळ होते. कामवासनेचा लहान मुलांस मागमूस नसतो, परंतु शारीरिक सौंदर्याची मात्र त्यांस आवड असते. शरीराकडे त्यांचें लक्ष गेल्यास तें सौंदर्यापुरतेंच, व त्यांत नुकसान नसतें.

**कायदे**. कांहीं लोक म्हणतील कीं अगोदर कायदे बदलले पाहिजेत, परंतु ही चूक आहे. चालीरीति नेहमीं अगोदर बदलतात व नंतर कायदे बदलतात किंवा नामशेष होतात. त्याला इलाज नाहीं. नग्नसंघाची जागा सर्व बाजूंनीं बंद असल्यास व संघाची व्यवस्था योग्य ठेवल्यास कायदा कांहीं करूं शकत नाहीं. अशी जागा मिळवणें हा पैशाचा प्रश्न आहे.

## धुरकटणें

फ्रान्समध्यें सुशिक्षित व श्रीमंत लोक या बाबतींत मार्गदर्शक झाले आहेत. ज्यांना स्वतःच्या घरीं किंवा बागेंत मित्रमंडळीसह नग्न राहतां येईल, त्यांचेंही तेवढ्यानें समाधान होत नाहीं व अशानें बहुजनसमाजाचा कांहींच फायदा होणार नाहीं. आपल्या पैशानें अशा प्रकारचे संघ काढण्यास मदत करणें हें श्रीमंत लोकांचें काम आहे. एकंदर समाजाचें आरोग्य सुधारणें यांत सर्वांचाच फायदा आहे. याला पुष्कळ लोकांकडून विरोध येणार हें उघड आहे व म्हणूनच जास्त नेटानें प्रयत्न केला पाहिजे.

---

## धुरकटणें

तंबाकू, गांजा वगैरे पदार्थांस आग लावून त्यांच्या साहाय्यानें तोंडांतून धूर काढणें, याला आम्ही वरील नांव दिलें आहे. लोक कशाकरतां धुरकटतात याचें अनुमान न धुरकटणाऱ्यांस चांगलेंसें करतां येत नाहीं. कोणी म्हणतात लहान मुलांस आगगाडी पाहण्यांत जशी गंमत वाटते, त्याचप्रमाणें धुराचे लोट पाहण्यांतच त्यांना आनंद वाटत असला पाहिजे, कारण अंधारांत कधींच कोणी धुरकटतांना दिसत नाहीं (अंधारांत कांहींच दिसत नाहीं हा भाग वेगळा). कोणी म्हणतात न धुरकटणाऱ्या लोकांना त्रास देण्यांतच त्यांना मौज वाटते, व बहुधा हाच त्यांचा मुख्य उद्देश असावा. कारण जेथें बराच जमाव असून हवा कोंडलेली असेल तेथेंच धुरकट लोकांस जास्त हुकी येते, व तेथेंच त्रास होण्याचा संभव जास्त. विशेषतः जेथें न धुरकटणाऱ्या लोकांच्या संरक्षणार्थ धुरकटण्याची मनाई असते तेथें तर धुरकटलेंच पाहिजे अशी या लोकांची कल्पना असते. मनाईची पाटी असली तरीही अशा लोकांस खरोखर मनाई करण्याची कोणाची छाती होत नाहीं. कोणाची अशी कल्पना होईल कीं बिचारे व्यसनाधीन असतात, त्यांना मनःसंयमन होत नाहीं, तर ती चुकीची आहे, कारण आपणांस दिवसांतून १५–२० मिनिटेंसुद्धां मनःसंयमन होत नाहीं असें धुरकट लोक कधीं कबूल करणार नाहींत. अर्थात् ट्रॅमगाडींत दहाच मिनिटें बसावयाचें असलें तरीही हे लोक मुद्दाम पुढच्या बांकांवर बसून मागील सर्व लोकांस घाण येईल अशा रीतीनें

हार गुप्त राखण्याचें अभिवचन देतांच, तरी मला थोडासा गुप्तपणा राखल्यावांचून गत्यंतर नाहीं. मी माझें नांव मात्र आपणांस कळवतें, पण आडनांव वगैरे न कळवलेलेंच बरें. येथील पोष्टमन माझ्या अगदीं ओळखीचा आहे व त्याला मी माझ्या नांवचा पत्रव्यवहार मजकडे गुप्तपणें आणून देण्यास सांगितलें आहे. तरी मीं खालीं दिलेल्या पत्त्यावर माझी वरील सर्व हकीकत लक्षांत आणून योग्य योजना करून औषध गोळ्या अगर पेय अथवा इतर साधनें जें कांहीं या बाबतींत उपलब्ध असेल तें व्हीपीनें पाठविल्यास मज दीन अबलेवर आपले अनंत उपकार जन्मोजन्मीं न फिटतील असे होतील यांत बिलकूल शंका नाहीं. कदाचित् आपण ह्या बाबतींत कसें कळवावें म्हणून कचराल तर मज गरीब दीन अबलेचा घात कराल. तरी कोणत्याही तऱ्हेची शंका कुशंका न काढतां जरूर शक्य तितकें लवकर योग्य औषध पाठविणेची तजवीज मेहेरबानीनें करावी. सुज्ञास विशेष लिहिणें नलगे. आपला पत्रव्यवहार मी अगदीं गुप्त राखीन. आपण मला केवळ देवाप्रमाणें दिसतां. तेव्हां आपल्या उत्तराची मी चातकाप्रमाणें वाट पहात आहें. महाराज आपण लिहितां कीं फ्रान्स देशांतील पुष्कळ बायकांस गेल्या जर्मन महायुद्धांत मर्जीविरुद्ध जुलमानें भ्रष्ट करण्यांत आल्यानंतर त्यांना गर्भ राहिला. तेव्हां बायकांनीं तिकडील सरकाराकडे अर्ज करून गर्भपात करविण्याची विनंति केली, तशीच विनंति आपल्या देशांतील आपल्या जातीची एक दीन अबला करीत आहे. तरी तिचा आपण अव्हेर करणार नाहीं अशी आशा आहे. हें पत्र मी एका मुलाकडून लिहवलें आहे. उत्तर जरूर यावें. कळावें ही विनंती. आपली दीन गरीब सौ. × × बाई.

उ. अशीं पत्रें आमचेकडे वारंवार येतात, परंतु गर्भपात हा कायद्याच्या दृष्टीनें गुन्हा आहे व त्यासंबंधाची माहिती देणें म्हणजे गुन्ह्यास मदत केल्यासारखी होते. हा कायदा बदलणें जरूर आहे असें जरी आमचें मत आहे तरी कायदा मोडण्याची आमची तयारी नाहीं. सर्व वाचकांच्या माहितीकरतां आम्ही येथें इतकेंच सांगूं शकतों कीं औषधें घेऊन गर्भपात करणें धोक्याचें आहे. गर्भपाताचा सर्वांत सुरक्षित मार्ग म्हणजे शस्त्रक्रिया. परंतु गर्भावस्था तडीस जाऊं दिल्यास स्त्रीच्या

जिवास धोका आहे असें डॉक्टरास वाटल्यासच गर्भपात करण्याची कायद्याची त्यांस परवानगी आहे. पंजाबमधील एका वकिलानेंही या कायद्यावर थोडीशी वकिली लढवून आमच्याकडून अशी माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला होता, परंतु त्यांसही आम्हांस हेंच उत्तर द्यावें लागलें. ज्यांस संततिनियमनाचे उपाय माहीतच नसतात त्यांची अशा वेळीं दया येते, परंतु उपाय माहीत असूनही ते वापरण्यांत हयगय केल्यामुळें स्त्रीस गर्भ राहिल्यावर किंवा राहिला अशी शंका वाटतांच कांहीं नवरे गर्भपाताचे उपाय विचारावयास येतात, त्यांची दयाही येत नाहीं. कांहीं लोक खर्चामुळें हयगय करतात, परंतु एक मूल वाढवण्यासही नियमनापेक्षां जास्त खर्च लागतो, हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं. शिकवून अक्कल किती येणार ? सं. )

२ पुणें, २–१२–२७.

सा. न. वि. वि. आपण गुप्त रोगांसंबंधीं आणि आजपर्यंत सर्वांनींच टाळलेल्या विषयांसंबंधीं जो ऊहापोह चालवला आहे तो समाजांत अत्यंत उपयुक्त असून, बऱ्याच अंशीं स्वास्थ्य देणारा आहे, यांत शंका नाहीं. तथापि गुप्तरोग, अगर वैवाहिक अवस्थेंतील पुढच्या जबाबदाऱ्या ज्यांच्या अंगावर अद्याप पडलेल्या नाहींत, अशा तरुणांचें मनःस्वास्थ्य पुष्कळदां त्यांत होणाऱ्या एका प्रकारानें नाहींसें होत असतें. तो प्रकार म्हणजे स्वप्नावस्था. यासंबंधानें अनेकांच्या अनेक कल्पना असून त्यामुळें पुष्कळांचें मनःस्वास्थ्य बिघडलेलें मी पाहिलेलें आहे. नपुंसकत्व अगर क्षय यामध्यें याचें पर्यवसान होणार, अशीही कित्येकांनीं धास्ती घेतलेली असते. अशीच मंडळी जाहिरातींवर विश्वास ठेवून फसतात, आणि औषध खपावें या हेतूनें जास्त भडक केलेलें त्यांतील वर्णन वाचून घाबरतातही, तरी यासंबंधीं आपण चर्चा केल्यास पुष्कळांस उपयुक्त होईल.

मी यासंबंधीं वाङ्मय अगर शास्त्रीय माहिती वाचलेली नाहीं. तथापि कोणत्याही तरुणास १०।१५ दिवसांनीं—अर्थात स्त्रीसंग घडत नसेल तर—स्वप्नावस्था होणें अपरिहार्य आहे असें मला वाटतें. तरी ती याहून लवकर होत असेल तर त्यापासून अपाय होतो किंवा काय, होत असल्यास तो कोणता, आणि त्यावर प्रतिबंध काय ?

तसेंच पुष्कळ मंडळीस असें वाटतें कीं अशा तऱ्हेनें वीर्यनाश होण्यापेक्षां तावडतोब स्त्रीसंग केलेला काय वाईट ? या समजुतींत तथ्य किती आहे ? जर २४।२५ वर्षेपर्यंत पुरुषानें अविवाहित रहावें हें आरोग्यदृष्ट्या योग्य आहे, तर त्याचें वीर्यरक्षणही नीट झालें पाहिजे हें उघड आहे. १४।१५ व्या वर्षी कित्येक गुप्त इच्छा मनांत उद्भवून २०।२१ च्या मुमारास त्या अनिवारही होण्याचा संभव आहे. याच सुमारास मुष्टिमैथुनादि कित्येक संवयी जडतात आणि अगोदरच अपराधी झालेलें मन स्वप्नावस्थेमुळें जास्त भडकतें. तरी वरील प्रश्नाप्रमाणेंच वीर्य म्हणजे काय ? त्याचें रक्षण आणि संवर्धन कसें करावें इ. त्याच्याशीं निगडित असलेल्या प्रश्नांबद्दल आपण चर्चा करावी, अशी विनंति आहे कळावें, आपला **अपरिचित जिज्ञासु**.

**उ. स्वप्नावस्था.** याबद्दल डॉ. निष्ट्रॉम् म्हणतातः—पंधरापासून सतरा वर्षें वयाचे सुमारास पुरुष वयांत येतो व यावेळीं अंडयुग्मांत शुक्रजंतु उत्पन्न होऊं लागतात, व ते इतर कांहीं मांसग्रंथींत उत्पन्न होणाऱ्या रसांशीं मिश्र होऊन जननेंद्रियांतून बाहेर पडतात, व या स्रावासच **वीर्य** म्हणतात. हें सामान्यतः महिन्यांतून दोनदां झोपेंत स्त्रीसंबंधीं स्वप्न पडून घडतें. परंतु स्वप्नामुळें स्राव होतो ही कल्पना चुकीची आहे. उलट रेताशयांत शुक्रजंतूंचा संचय झाल्यामुळें दाब उत्पन्न होऊन इंद्रियांस चेतना झाल्यामुळें त्याशीं जुळेल असें स्वप्न पडतें, ही वस्तुस्थिति आहे. (स्त्रियांसही असा स्राव कधींकधीं होतो व असा उल्लेख 'मालतीमाधव' नाटकांत आहे. अर्थात् त्यांत शुक्रजंतूंच्या जातीचें कांहींही नसतें, व हें सर्वच स्त्रियांस होतें असें नाहीं.—सं.) याचा अतिरेक न झाल्यास, स्त्रीसंगाचे अभावीं, अशा रीतीनें रेताचा दाब कमी झाल्यामुळें आरामच वाटतो, व इतर कामांकडे जास्त लक्ष देतां येतें. या संबंधांत स्वाभाविक काय व अतिरेक केव्हां म्हणावें हें ज्याचे त्याचे प्रकृतीवर राहील; तरीही स्वप्नावस्था ८ दिवसांत एकदां होऊन विशेषतः त्यामुळें थकवा येऊन मानसिक श्रमांत अडचण होईल, तर तो रोगच समजला पाहिजे व त्या पुरुषास ब्रह्मचर्य मानवत नाहीं, किंवा फाजील कामोद्दीपन होतें असें समजलें पाहिजे. स्वप्नावस्था कधीं कधीं यापेक्षांही लवकर म्हणजे १।२ दिवसांनीं, किंवा एका रात्रींत अनेक वेळां होणें शक्य आहे. अशा मनुष्यास अतिशय थकवा येऊन शेवटीं जीव नकोसा होतो. याचीं कारणें अनेक असूं शकतील. संध्या-

काळीं फार जेवणें, दारू पिणें, फाजील ऊबदार बिछाना, उताणें निजणें, सदैव स्त्रियांविषयीं विचार करणें, मुष्टिमैथुनाची संवय, जननेंद्रियाच्या पुढचे कातडीचा कांहीं विकार, मूळव्याध, जंत वगैरेमुळें स्वप्नावस्था वाढते. यांपैकीं एकंही कारण न दिसल्यास तो ब्रह्मचर्याचाच परिणाम समजला पाहिजे, व हें कारण चालू आहे तोंपर्यंत रोग बरा होणें शक्य नाहीं. कांहीं दिवस तसेंच चालल्यास जागेपणींही क्षुल्लक कारणावरून स्राव होऊं लागतो. कधीं कधीं अशा रीतीनें उद्दीपनाचा अतिरेक झाल्यावर तें कमी होत जाऊन शेवटीं नपुंसकत्व येतें. ”

२. कामवासना उत्पन्न झाल्याबरोबर स्त्रीसंग करण्यांत कोणतेंही नुकसान नाहीं असें पुष्कळ तज्ज्ञांचें मत आहे. अर्थात अशा वयांत संतति होणें इष्ट नसतें. २४।२५ वर्षांपर्यंत अविवाहित राहणें सांपत्तिक दृष्ट्या इष्ट असूं शकेल, आरोग्य दृष्ट्या नाहीं. स्वसंभोग ( मुष्टिमैथुन वगैरे ) निःसंशय हानिकारक आहे व मैथुन त्यापेक्षां केव्हांही बरें, व यांत अतिरेकाचा संभव फारच कमी.

३. वीर्य कशास म्हणतात हें वर सांगितलें. त्याचें रक्षण करणें, याचा अर्थ शुक्रजंतु बनल्यानंतर ते शक्य तितका वेळ शरीराचे बाहेर पडूं न देणें. यानें कोणताही इष्ट हेतु साधत नाहीं, कारण त्यांचा संचय जास्त होऊन ते बाहेर न पडल्यास डोकें दुखणें किंवा इतर वाईट परिणाम होतात. मग त्यांचें रक्षण कशाकरतां करायचें. ? वीर्य बनतेवेळीं शुक्रजंतूंशीं जे इतर स्राव मिश्र होतात ( हें मिश्रण आगाऊ तयार नसतें, बाहेर पडतेवेळीं होतें. यामुळें वीर्य खरोखर शरीरांत तयारच नसतें, व त्याचें रक्षणही होणार नाहीं ), त्यांचा उपयोग शुक्रजंतूंचा मार्ग समागमाचे वेळीं शिस्नांतून योनिमार्गांत, गर्भाशयांत व रजोगोलाची गांठ पडेपर्यंत गोलवाहक नलिकांत, सुलभ व्हावा हा असतो. या रसांमुळें वीर्य बुळबुळीत होतें व यामुळें अडचणीच्या मार्गांतूनही निसटून जातें. वीर्य बाहेर न पडल्यास रक्तांत मिसळून प्रकृतीस त्याचा उपयोग होतो, हेंच खोटें आहे व या पायावर रचलेली ब्रह्मचर्याची इमारतही ह्यामुळेंच डांसळून पडली आहे. सं.

३. ३०–११–२७

कृ. सा. न. वि. वि. प्रोफेसर साहेब—माझा मित्र एक कॉलेजचा पदवीधर

असून सध्या नोकरी करीत आहे. त्याचें लग्न झालेलें नाहीं व तें त्यानें स्वतःची प्रकृति चांगली व शरीर बळकट झाल्याखेरीज करूं नये असें मला वाटतें. त्यास मुष्टिमैथुनाची घाणेरडी संवय आहे,...तर त्याची ही संवय घालवण्यास व गेलेली शक्ति परत आणण्यास काय उपाय योजावेत हें आपणास माहीत असल्यास मला लिहून कळवावें म्हणजे मी ते उपाय योजून पाहीन. यशस्वी झाले तर आपल्या एका बांधवास जीवदान दिल्यासारखें होईल. आत्मसंयमन हा मुख्य उपाय आहे हें तर उघडच आहे, पण तो कठिण आहे हें आपण जाणतच आहां. त्याचें लग्न करून द्यावें हा दुसरा उपाय आहे, परंतु ज्याचें शुक्र अगोदरच कमी झालेलें आहे व त्यामुळें शरीर क्षीण झालेलें आहे अशा मनुष्यानें लग्न करून अगोदर क्षीण झालेली धातु आणखी घालवून स्वतःचें व त्याबरोबर दुसऱ्या माणसांचें जन्माचें नुकसान करावें हें बरोबर नाहीं. त्यापेक्षां तो एकटाच जगांतून नाहींसा झालेला बरा. सबब माझी आपणांस नम्र विनंती आहे कीं, जर त्याची वाईट संवय घालवण्यास व त्याची क्षीण झालेली धातु पुन्हां प्रबळ करण्याचे उपाय माहीत असले तर जरूर कळवावेत. तो फार कामासक्त आहे, तर त्याची कामवासना कमी करण्यास काय करावें, त्यास चेतना उत्पन्न होऊं नये म्हणून काय करावें ?

आणखी एक गोष्ट आपणांस विचारावयाची राहिली, ती ही कीं संतति-नियमनाकरतां जे आपण उपाय सुचवले आहेत, ते केवळ संततिनियमनाकरतांच. त्यांच्या अवलंबनानें संभोगामुळें होणारा धातूचा क्षय व शरीरहानि हीं थांबत नाहींत. तरी संभोगेच्छा तृप्त होऊन धातुक्षय व शरीरहानि होणार नाहीं अशा तऱ्हेचे उपाय आपणांस माहीत असल्यास कळवावे. कळावें.

उ. १. **स्वसंभोग** ( दुसऱ्याचे मदतीशिवाय रेतस्खलन करण्याचे सर्व प्रकार यांत येत असल्यामुळें हा शब्द ‘ मुष्टिमैथुन ’ पेक्षां जास्त व्यापक आहे. ) ही संवय घातक आहे ही गोष्ट खरी, परंतु या संवयीच्या वाईट परिणामांबद्दल पुष्कळ लोकांनीं फाजील बाऊ केलेला आहे, हेंही तितकेंच खरें आहे. आधुनिक तज्ज्ञांचे मतें अतिरेक न झाल्यास फारसे वाईट परिणाम होत नाहीत. परंतु अतिरेक होणें

अतिशय सुलभ असतें, हाच या संवयीमध्यें मुख्य धोका आहे. ही संवय मोडण्याइतकें आत्मसंयमन नसल्यास वेळींच एखाद्या तज्ज्ञ डॉक्टराचा सल्ला घेणें बरें. यावर नेहमीं देण्यांत येणारीं 'ब्रोमाइड्स्' नामक औषधें आहेत व त्यांनीं एकंदर प्रकृतीवर चांगला परिणाम होत नाहीं, परंतु केवळ उद्दीपन कमी करण्याकरतां कधीं कधीं तीं घ्यावीं लागतात. त्यांतल्या त्यांत 'सोडियम् ब्रोमाइड्' हें 'लॅक्टोपेपटीन' सारख्या पाचक औषधाबरोबर दिल्यास नुकसान होण्याचा संभव कमी. 'ॲड्रेनल' 'थायरॉइड्', 'ॲट्रोपीन' वगैरेंचा बराच उपयोग होतो, परंतु डॉक्टराचे सल्ल्याशिवाय औषधें घेण्याचे भानगडींत न पडणें बरें. २. थंड पाण्याचें स्नान सोसेल तर करणें बरें. याचा अर्थ स्नान करून अंग पुसतांच आपोआप अंगांत उष्णता आली पाहिजे. असें न होईल तर करूं नये, परंतु निदान फार गरम पाण्यानें स्नान करूं नये, कारण गरम पाणी उद्दीपक असतें. ३. अशा मनुष्यानें लग्न करावें कीं नाहीं हें ठरवणें कठिण आहे. पुष्कळ वेळां स्वसंभोगी पुरुषाची किंवा स्त्रीची नैसर्गिक समागमाची इच्छाच नाहींशी होते इतकेंच नाहीं तर त्याचा तिटकारा येतो. अशी स्थिति असेल तर लग्न करणें मूर्खपणा आहे. अशा लोकांनीं लग्न केल्यानंतरही संवय मोडत नाहीं. ज्याला कांहीं दिवस तरी आत्मसंयमन करून ( औषधांच्या साहाय्यानें कां होईना ) आपली संवय दाबून ठेवतां येते, व ज्याची नैसर्गिक समागमाची इच्छा अजीबात गेली नाहीं, त्याची संवय लग्न केल्यानें मोडणें शक्य आहे. परंतु त्याची नैसर्गिक समागमाची शक्ति मात्र कायम असली पाहिजे. नैसर्गिक समागम शक्य आहे कीं नाहीं हें समजण्यास एकच मार्ग आहे, तो म्हणजे ती शक्ति अजमावून पाहणें. डॉ. रॉबिनसन हे अशा वेळीं रोग्यांस वेश्येकडे जाण्यास सांगतात, व वेश्यांचा हा एक नैतिक दृष्टीनेंही मोठाच उपयोग आहे असें त्यांचें म्हणणें आहे. अशा रीतीनें समागमशक्तीची खात्री पटल्याशिवाय लग्न केल्यास बायकोचें जन्माचें नुकसान होण्याचा संभव असतो, परंतु वेश्येकडे जाऊन नैसर्गिक उपभोगानें आपलें समाधान होतें अशी खात्री झाल्यास लग्न करण्यास हरकत नाहीं. केवळ मुष्टिमैथुनाची संवय आहे म्हणून लग्न करतां कामा नये असें नाहीं. प्रसिद्ध तज्ज्ञ हॅवलॉक एलिस यांनीं यासं-

बंधीं असें लिहिलें आहे कीं शेंकडा ९० लोक केव्हांतरी स्वसंभोग केल्याचें कबूल करतात व बाकीचे १० खोटें बोलतात, तेव्हां त्याबद्दल विशेष घाबरण्याचें कारण नाहीं. ४. नियमित नैसर्गिक समागमापासून कोणतीही शरीरहानि होत नाहीं, फायदाच होतो. वरील पत्रास उत्तर पहा. सं.

४.

सा. न. वि. वि. ऋतुकालीं एखादें औषध दिल्यानें गर्भधारणा बंद होणें शक्य असल्यास त्याची किंमत कळवावी. एकदां औषध घेतल्यानें जन्मभर गर्भधारणा बंद होत असल्यास त्याहूनही उत्तम. कळावें.

उ:—अशा प्रकारचीं औषधें अजून सांपडलेलीं नाहींत. सं.

५.

कृ. सा. न. वि. वि. आपलें संततिनियमन हें पुस्तक मीं नुकतेंच वाचलें. डच पेसरीचा तपास XX आणि कंपनीकडे केला होता, परंतु पेसरी चांगल्या स्थितींत मिळेल अशी त्यांनी खात्री दिली नाहीं. दुसरा उपाय करून पाहिला परंतु उपयोग झाला नाहीं. लागोपाठ चार मुलें दीड दोन वर्षांचे अंतरानें झाल्यामुळें पत्नीची प्रकृति अतिशय अशक्त झाली आहे व यामुळें आम्ही दोघेंही फार फिकरीस आलों आहों. आपण खात्रीचा उपाय सुचवावा व त्याप्रमाणें आपणाकडे रासायनिक पिल्स व पेसरी मिळत असल्यास मेहेरबानी करून व्ही. पी. नें माझेकडे पाठवून द्याव्या. आपणाकडे मिळत नसल्यास कोणाकडे मिळतील तें कळवल्यास मी मागवून घेईन...हल्लीं संततीच्या त्रासामुळें जवळजवळ संभोग बंद ठेवला आहे, परंतु त्यामुळेंही दोघांस फार त्रास होतो. तसदीची माफी असावी. कळावें.

उ. १. राइट् एजन्सी, गिरगांव, मुंबई, या पत्त्यावर लिहिलें असतां संपूर्ण माहिती व कॅटलाग फुकट मिळेल व योग्य साधनें व्ही. पी. नें पाठविण्याची तजवीज होईल. ( ही एजन्सी आमचे स्वतःचे मालकीची आहे, तथापि पत्ता वरील प्रमाणेंच लिहावा. आमचें नांव लिहाल्यास व आम्ही बाहेरगांवीं असल्यास उशीर लागण्याचा संभव आहे. सं. ) २. संभोग जवळजवळ बंद ठेवल्याचा तिळमात्र

उपयोग नाहीं. इतकेंच नव्हे तर या युक्तीनें गर्भधारणेचा संभव वाढतो. धार्मिक लोकांस महिन्यांतून पुष्कळ दिवस संभोग वर्ज असतो व ही अधिक संतति उत्पन्न करण्याची धार्मिक युक्ति आहे. संभोग अजीबात बंद ठेवला तरच गर्भधारणा होणार नाहीं. सं.

६.

सा. न. वि. वि. 'समाजस्वास्थ्य' मासिक काढून आपण समाजाला ऋणी केलें आहे. माझे मतें प्रत्येक कौटुंबिकानें वर्गणीदार होऊन स्वतःची उन्नति करून घेतली पाहिजे. मासिकांत मला खालील सुधारणा इष्ट वाटतात व लोकाश्रय पुरेसा असल्यास आपण त्या कराल अशी आशा वाटते. आपले वर्गणीदार किती आहेत हें माहीत नाहीं, परंतु आतांपर्यंत ५००० वर्गणीदार झाले असले पाहिजेत. आपल्या मासिकांत इतरांच्या जाहिराती दिसत नाहींत हें कसें? लोक जाहिराती देण्यास तयार नाहींत, कीं मासिकाबद्दल लोकांस फारशी माहिति नाहीं? जाहिरातींनीं आपणास मासिक सुधारण्यास पुष्कळ मदत होईल असें वाटतें.

माझे मतें धंदेवाल्या लोकांच्या जाहिराती न मिळाल्यास 'वर पाहिजे' 'वधू पाहिजे,' 'पुनर्विवाहास तयार' वगैरे प्रकारच्या छोट्या जाहिराती माफक दरानें घेण्यास सुरवात करावी. शिवाय पुष्कळ स्त्रीपुरुषांस कांहीं कारणांमुळें लग्न कर्तव्य नसतें, परंतु त्यांस ब्रह्मचर्यानें राहणेंही शक्य नसतें, म्हणून त्यांस कोणाची तरी आजन्म मैत्री पाहिजे असते. संततिनियमनाची माहिती नसल्यामुळें विधवांस पुष्कळ वेळां आत्मघात करून घेण्याची वेळ येते हें आपणास माहीतच आहे, तेव्हां अशा स्त्रीपुरुषांस गुप्तपणें जाहिराती देण्याची सोय आपणास करतां येण्यासारखी आहे व त्यामुळें कित्येक स्त्रीपुरुषांची आजन्म मैत्री जडण्याचा संभव आहे. कोणासही वेश्यांकडे जाण्यास सांगावें असें मला वाटत नाहीं, कारण हल्लीं चांगली स्त्री सांपडणें शक्य नसतें, व गुप्तरोगांचा प्रतिबंध नेहमींच करणें शक्य होणार नाहीं, व एकदां मनुष्यास रोग झाला म्हणजे तो बरा होत नाहीं. आपल्या फेब्रुआरीचे अंकांत पान १३ वर आपण लोकांस वेश्यांकडे जाण्याचा उपदेश करतां! मी याचे विरुद्ध आहें, कारण त्याला रोगप्रतिबंधाची

माहिती नसेल व एकदां तो रोगांत सांपडला कीं त्याची स्थिति हल्लींहूनहीं वाईट होईल. त्या ऐवजीं त्यानें ' जन्माची मैत्रीण पाहिजे ' अशी जाहिरात द्यावी, म्हणजे त्याची प्रकृतीही सुधारेल व ती त्याची नेहमीं काळजी घेईल. आतां आपण म्हणतां त्याप्रमाणें तो तिला संतुष्ट करूं शकणार नाहीं, ही शंका राहिली. परंतु अशा जाहिरातीला उत्तर देणारी स्त्रीही भुकेलीच असणार, तेव्हां ती मिळेल तेवढाच तुकडा घेऊन त्यांतच समाधान मानील व ती त्याच्या प्रकृतीची अधिकच काळजी घेईल, कारण त्यांत तिचाच झाला तर फायदा होण्याचा संभव. माझे मतें वेश्येकडे जाण्यापेक्षां हें बरें. आपण अशा रीतीचे लेख लिहून लोकांचे डोळे उघडावे अशी माझी विनंति आहे व मेहेरबानी करून वेश्यांकडे जाण्याचा उपदेश करूं नये. माझे कित्येक मित्र वेश्यांचे पायीं धुळीस मिळाले आहेत. माझें म्हणणें आपणास कबूल असल्यास पुढील अंकांत लिहावें. तसदीची माफी असावी. कळावें...

उ. १. जाहिराती घ्यायच्या नाहींत असा आमचा नियम नाहीं, परंतु त्या मिळण्यासंबंधीं आम्ही विशेष खटपट केलेली नाहीं, हें खरें. २. कोणती जाहिरात घ्यायची व कोणती न घ्यायची, हें जाहिरातींतील मजकूर पाहून ठरवावें लागेल. जाहिरात आमचे मतें फसवणुकीची नसल्यास व कायद्याची अडचण नसल्यास आमची घेण्याची तयारी आहे. ३. ' आजन्म मैत्री ' व लग्न यांत आम्हांस नैतिक दृष्ट्या फरक दिसत नाहीं. ४. रोगांचा प्रतिबंध करणें सोपें आहे, वेश्यांकडे जाण्यास एवढीच अडचण असल्यास ती आतां दूर झालेली आहे. ५. फेब्रुआरीचे अंकांत पान १२ वर डॉ. रॉबिनसन् यांचें मत दिलें आहे, व अशा वेळीं वेश्येकडे जाणें हाच मार्ग आम्हांस श्रेयस्कर वाटतो. नपुंसकानें लग्न करणें म्हणजे स्त्रीला फसवणें आहे, म्हणजे अनीती आहे, परंतु वेश्येकडे गेल्यास सर्व कारभार सरळ प्रामाणिकपणानें होतो. रोगांसंबंधीं काळजी घेतल्यास कोणाचेंहि नुकसान होत नाहीं. ६. जाहिरातीस उत्तर देणाऱ्या स्त्रीस तरी अशा रीतीनें काय म्हणून फसवावें ? ७ कुलीन विधवेला किंवा कुमारिकेला खड्ड्यांत टाकण्यापेक्षां वेश्यांकडे जाणें शतपट बरें. अर्थात् स्वैरसंभोगास समाजाची आडकाठी नाहींशी झाल्यावर वेश्यांची जरूर राहणार नाहीं इतकेंच नव्हे तर धंदा न चाल-

त्यामुळें त्या आपोआपच नाहींशा होतील. ८. वेश्यांचे पायीं लोक धुळीस मिळत असतील, पण ते मूर्ख लोक. त्यांचा पैसा वेश्यांनीं नाहीं लुबाडला तर दुसरा कोणीतरी लुबाडणार. नाटक ज्याप्रमाणें खोटें असें माहीत असूनही आपण पहावयास जातों, तशीच वृत्ति वेश्यांकडे जाणारांनीं ठेवली पाहिजे. वेश्यांचें कोणावरच खरें प्रेम असणें शक्य नसतें असें नाहीं, परंतु तें पैसे देणारावर असणें कठिण. गिऱ्हाइकाशीं नाटकच करावयाचें असतें, व तें त्यांनींही ओळखलें पाहिजे. सं.

७.

सा. न. वि. वि. कांहीं स्त्रिया आत्मसंभोगाकरतां अनेक वस्तूंचा उपयोग करतात. याकरतां विशेष प्रकारचीं कृत्रिम साधनें मिळतात कीं काय? व मिळत असल्यास त्यांस किंमत काय पडते? इत्यादी गोष्टींचा खुलासा उत्तरीं करावा.

आपला * * *

उ. ही चौकशी पुष्कळ लोक करीत असतात. रबराचीं कृत्रिम इंद्रियें युरोपांत व जपानांत मिळतात, परंतु तीं उघडपणें विकण्याची परवानगी कोठेंही नाहीं. तिकडून तीं मागवण्याचा कोणी प्रयत्न केल्यास तीं कस्टम खात्याकडून जप्त होऊन शिवाय त्याबद्दल शिक्षा होण्याचा संभव आहे. त्यांतून कोणी चोरून मागवून विकीत असल्यास आमचे ऐकिवांत नाहीं. असे पदार्थ वापरणें प्रकृतीस हितावह नाहीं व त्यापेक्षां नैसर्गिक संभोगच बरा. जरूर पडल्यास संततिनियमनाचीं साधनें वापरावीं म्हणजे झालें. सं.

८.

कृ. सा. न. वि. वि. आपण संततिनियमन व एकंदर स्त्रीपुरुषसंबंधाचा शास्त्रीय व बौद्धिक दृष्ट्या विचार करीत असल्यामुळें आपणांस खालील माहिती विचारीत आहें.

संततिनियमनास आत्मसंयमन हा उपाय सुचवण्यांत येत असतो, पण तो आपल्या मतें नेहमीं शक्य व इष्टही नाहीं...आतां नवराबायको एकमेकांपासून दूर असतांना एकास संभोगेच्छा झाली किंवा जवळ असून एकास इच्छा झाली असतांना ती तृप्त करण्याजोगी दुसऱ्याची मानसिक किंवा शारीरिक स्थिती नसेल तर आपण

कोणते कृत्रिम उपाय सुचवूं शकतां ? अशा वेळीं अन्य स्त्रीसंबंध अथवा अन्य पुरुष-संबंध करावा असें कदाचित् आपण सांगूं शकाल. या उपायाच्या इष्टानिष्टतेचा विचार बाजूस सारला तरी विवाहविषयक मतांत इतकी क्रांति घडून येईपर्यंत तरी वरील विचार शक्य नाहीं. अर्थात ज्यांची खात्री होऊन क्रांति घडवून आणणें हेंच ज्यांनीं कर्तव्य ठरवलें त्यांचेबद्दल प्रश्नच नाहीं. पण ज्यांना वरील उपायाचें नैतिक व बौद्धिक दृष्ट्या ग्रहण करतां येत नाहीं त्यांचेकरतां कृत्रिम उपायांची आवश्यकता आहे. तरी ज्यांचे योगानें शरीरावर अपाय होणार नाहीं पण अतृप्तीमुळें होणारे परिणाम टळतील असे उपाय असल्यास कळवावे. आपला + +

उ.—वरील पत्रास उत्तर पहा. निसर्गास नीतीची पर्वा नसते, आमचा नाइलाज आहे. सं.

९.

सा. न. वि. वि...आपल्या एप्रिल १९२८ च्या अंकांतील पत्रांत (पत्र ६ पहा) केलेल्या सूचना अमलांत आणल्यास समाजावर आपले फार उपकार होतील. माझ्या एका विधुर मित्रास आजन्म मित्राची फार जरूरी आहे. कांहीं कौटुंबिक कारणा-मुळें त्याला द्वितीय विवाह कर्तव्य नाहीं. त्याची सांपत्तिक परिस्थिति चांगली आहे. याकरतां कोणांही गरजू व्यक्तीनें नैतिक धर्मानें ' आजन्म मित्र ' राहण्याचें कबूल केल्यास, तो तिच्या कर्तव्याची सवाई फेड तिला देण्यास तयार आहे. ज्यांना हा सौदा पटत असेल त्यांनीं समाजस्वास्थ्याच्या संपादकामार्फत पत्रव्यवहार करावा. हा ' आजन्म मित्र ' नैतिक, मांसाहारी व सुशिक्षित असून संततिरहित असावा.

आपला...

१०

प्रिय महाशय, गर्भावस्थेंत संभोगानें स्त्रीस इजा होते कीं काय, व होत असल्यास किती महिन्यांनंतर होते ? गर्भावस्थेंत संभोग अजीबात वर्ज करावा व न केल्यास स्त्रीस व भावी अपत्यास इजा होते अशी लोकांची कल्पना असते— आपला...

उ. हें बऱ्याच अंशीं स्त्रीचे प्रकृतीवर अवलंबेल. कांहीं स्त्रियांस क्षुल्लक कारणानें सुद्धां गर्भपात होण्याची संवय असते. अशांस संततीची इच्छा असल्यास त्यांस गर्भावस्थेंत संभोग वर्ज करावा लगेल इतकेंच नाहीं तर शरिराची हालचाल शक्य तितकी कमी करावी लागेल. वारंवार गर्भपातामुळें निपुत्रिक राहिलेल्या स्त्रियांस गर्भधारणेपासून आजाऱ्याप्रमाणें शक्य तितका वेळ अंथरुणांत ठेवल्यास मूल होतें, असा पुष्कळांचा अनुभव आहे. मात्र गर्भपाताचें कारण जेव्हां गर्मी असतें, तेव्हां हा उपाय लागू पडणार नाहीं.

सामान्यतः सुदृढ स्त्रियांस शेवटचा महिना दीड महिना संभोग वर्ज केल्यास बस होतें, परंतु संभोगाचे वेळीं गर्भाशयावर भार पडणार नाहीं अशी खबरदारी घेतली पाहिजे. अशी तजवीज केल्यास स्त्रीस किंवा गर्भास इजा होण्याचा संभव नाहीं. सं.

११.

सा. न. वि. वि...संततिनियमनाकरतां वड्या पाहिजे त्याला उघडपणें विकणें मला पसंत नाहीं. त्यांचा उपयोग डॉक्टराचे सल्ल्यानेंच झाला पाहिजे. त्या सरसकट सर्वांस विकणें ह्मणजे कुमारिकांस व विधवांस मोह पाडणें आहे व यानें त्यांची कामवासना मोकळी सुटेल. कुमारिकांचें कौमार्य नष्ट झाल्यावर सुद्धां त्या कुमारिका ह्मणून समाजांत वावरतील. नीतिविरुद्ध समागमास गर्भधारणेची भीति ही मोठी अडचण असते. केवळ विवाहित स्त्रियांसच यांची विक्री व्हावी, व ती सुद्धां त्या गरीब किंवा रोगी असल्या तरच. तरी पण गर्भपातापेक्षां वड्या वापरणें बरें. परंतु या वड्यांमुळें जीवनद्रवाचा अपव्यय होतो. आपण मासिकांत ह्मणतां त्याप्रमाणें वीर्य शरीरांत राहणें सर्वांस हानिकारक नसतें. जेव्हां तें फाजील उत्पन्न होतें, किंवा शरीरास त्याची जरूर नसते तेव्हां तें आपोआप ( स्वप्नावस्थेंत ) बाहेर पडतें व त्यामुळें धोका नाहींसा होतो......

आपला......

उ. १. कोणाला किती मुलें व्हावी, हें डॉक्टर कोण ठरवणार ? हें ज्याचें त्यांस ठरवतां आलें पाहिजे. २. गर्भधारणेला भिऊन ज्या कुमारिका किंवा विधवा

नीतिमान रहात असतील, त्यांची डळमळीत नीति केव्हांतरी ढांसळणारच व त्या एकतर गर्भपात करणार, किंवा त्यांच्यामुळें सर्व आप्त इष्टांची बदनामी होणार. त्यापेक्षां संततिनियमन निःसंशय चांगलें. ३. आपण डॉक्टर आहांत, परंतु यासंबंधीं विचार केलेला दिसत नाहीं. ( पत्र २ चें उत्तर पहा. ) स्वप्नावस्थेनें धोका नाहींसा होतो असें म्हणतां यावरून धोका आहे हें कबूलच करतां, परंतु नैसर्गिक संभोगापेक्षां स्वप्नावस्था बरी समजण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. संभोगच बरा. सं.

१२.

वि. वि. 'संततिनियमन' या पुस्तकाची दुसरी आवृत्ति मीं फार काळजीपूर्वक दोन दोन तीन तीन वेळां वाचली व त्यांतील विचारसरणीही मला पसंत पडली...मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें कीं आपल्याकडील हिंदुसमाज, विशेषतः स्त्रीसमाज यांपैकीं एकही गोष्ट करण्यास तयार नाहीं. अपवाद असेल तो भाग निराळा. रेतवाहक नलिकांच्या छेदासंबंधीं असा प्रश्न विचारावयाचा आहे कीं, छेद केला म्हणजे मग पुरुषाचें वीर्यच बाहेर पडणार नाहीं, अर्थात् वीर्याचा जो एक तऱ्हेचा फायदा स्त्रीचे शरीरास मिळावयाचा आहे तो मिळणार नाहीं असें होईल...यासंबंधीं आपला अनुभव कळवावा...

आपला + + +

उ. १. ज्या स्त्रीस फाजील संततीपासून त्रास होतो ती व इतरही कांहीं स्त्रिया हे उपाय वापरण्यास तयार होतात असा आमचा अनुभव आहे. याप्रमाणें पुष्कळ स्त्रिया आमचेकडून माहिती व सामग्री घेऊन गेलेल्या आहेत. कित्येक पुरुषांसच या विषयाची इतकी लाज वाटते कीं ते स्वतःच्या बायकोजवळसुद्धां यासंबंधीं बोलावयास लाजतात, व ही स्त्रियांची चूक नव्हे. त्रास होऊं लागला म्हणजे मनाची तयारी तेव्हांच होते. २. वीर्य हें अनेक द्रवांचें मिश्रण असतें, रेतनलिकांचा छेद केल्यानें शुक्रजंतूंचा मार्ग खुंटतो व कांहीं दिवसांनीं त्यांची उत्पत्तीच बंद होते, परंतु वीर्यांतील इतर रस कायम असल्यामुळें रेतस्खलन नेहमी प्रमाणेंच होतें, त्यांत फरक भासत नाहीं. सं. )

१३.

सा. न. वि. वि. आमची एक दूरची नातेवाईक विधवा असून मास्तरीण

आहे, ती सच्छील आहे. परंतु तरुण असल्यामुळें तिला कामवासना आवरत नाहीं. तरी पुरुषाच्या मदतीशिवाय ती तृप्त करण्यासारखें कांहीं यंत्र असल्यास कळवावें.
आपला...उ. पत्र ७ चें उत्तर पहा. सं.

१४. पुणें, २१-३-२८..

स. न. वि. वि. आपलें 'समाजस्वास्थ्य' मासिक गेलें वर्षभर मी वाचीत आहें. संततिनियमनाबद्दल प्रचार आणि त्याच्या साधनांची माहिती आणि चर्चा आपलें मासिकांतून येणार ही बऱ्याच लोकांस आगाउ कल्पना होती. परंतु सामान्यतः असणाऱ्या या अपेक्षेबाहेर कांहीं विषय आपल्या लिहिण्यांतून सूचित केले जातात. तथापि त्यांची चर्चा जास्त मोकळेपणानें होत नसल्याने थोडा घोटाळा होण्याचा संभव आहे. तरी खालील प्रश्नांसंबंधीं जास्त स्पष्टीकरण आपल्या मासिकाच्या येत्या अंकांत कराल तर बरें होईल.

१. संभोग ही शारीरिक जरूर असून ती प्रत्येकानें आपल्या इच्छेस येईल त्याप्रमाणें भागवावी काय? नवरा असूनही स्त्रीची कामेच्छा प्रबल असल्यास तिनें परपुरुषाकडे जावें, अगर पुरुषानें बायकोस सोडून 'शारीरिक जरूरी' पुरती परस्त्रीजवळ मैत्री करावी असें आपलें मत आहे काय? २. 'ओनीडा' समाजाप्रमाणें आपल्या समाजांतही स्त्रीपुरुष दोन तऱ्हेचा समागम, म्ह. एक प्रजोत्पादनाकरतां व एक प्रेमाकरतां मानूं लागले तर बरें होईल काय? आपण सामाजिक प्रयोगांच्या हकीकती देतां त्या सर्व आपणांस मान्य असतील असें मी म्हणत नाहीं, परंतु आपलें मत स्पष्टतेनें कळावें म्हणून लिहिलें आहे. ३. कुमारिकांनीही संततिनियमनाचीं साधनें वापरून एक किंवा अधिक पुरुषांकडूनही सुखप्राप्ति करून घ्यावी काय? त्यामुळें बालहत्या, भ्रूणहत्या टळतील आणि त्याच्या ऐवजी वरील प्रचार सुरू झालें तरी हरकत नाहीं, असें आपलें म्हणणें आहे का? ४. आहे या स्थितीमध्यें आपण वेश्यांची तरफदारी करतां याचा एक वेळ अर्थ समजतो. पण ती वृत्ति केव्हांतरी नष्ट व्हावी असें आपणांस वाटते कीं नाहीं? आपण, रोगांच्या प्रसारापेक्षां अनीति बरी. निरनिराळे अनाचार होतात त्यापेक्षा संततिनियमन बरें, असें तुलनेनें लेखांतून लिहितां. या दृष्टीनेच आपण

वेश्यांच्या अस्तित्वाकडे पाहतां किंवा ही एक मोठी सामाजिक संस्था आहे आणि आपण त्याकरतां कृतज्ञ असलें पाहिजे असें आपलें मत आहे ? किंवा दोन व्यक्तींच्या जरूरीप्रमाणें आणि संमतीप्रमाणें होणारे संभोग सुरू झाले, कुमारिकांची ही सोडवणूक झाली म्हणजे हा प्रश्न सुटेल आणि वेश्यावर्ग आपोआपच नाहींसा होईल ? अथवा याहून कांहीं भिन्न स्पष्टीकरण आहे ? वरील शंका शुद्ध हेतूनें विचारल्या आहेत. त्यांत कुत्सितपणाचा भाग नाहीं, तेव्हां त्यांतील कांही भाग अयोग्य अगर अस्थानीं विचारला गेला असल्यास त्याबद्दल माफी असावी कळावें,...

उ. १ समागम दोन व्यक्तींचा होतो तेव्हां ही गोष्ट दोन व्यक्तींच्या इच्छेवर राहील. मुलांची व मुलींची शारीरिक वाढ झाल्यावर म्हणजे मुलांचे बाबतींत अजमासें १६ वर्षांपुढें व मुलींच्या ऋतुप्राप्तीनंतर नैसर्गिक संभोगापासून कोणताही शारीरिक तोटा नाहीं. आपल्या प्रश्नाचें उत्तर सामाजिक परिस्थितीवर अवलंबेल. मनसोक्त वागल्यास बाप घरांतून घालवून देईल किंवा नवरा खून करील कीं काय, हे प्रश्न आम्ही सोडवूं शकत नाहीं. याचा विचार ज्याचा त्यानें केला पाहिजे. स्त्रीकडून पतीची कामेच्छा तृप्त न झाल्यामुळें अंगवस्त्र ठेवण्याची परवानगी तिनें दिल्याचीं उदाहरणें आम्हांस माहीत आहेत. याच्या उलट प्रकार असल्यास व बभ्रा न होणें शक्य असल्यास नवरेही कधीं कधीं बायकांच्या वागणुकीकडे कानाडोळा करतात. कारण नवरा सुज्ञ असल्यास तो स्त्रीची स्थिति जाणतो, परंतु सुज्ञ नसला तरीही बभ्रा केल्यास आपलीच फजीति होईल असें त्यास वाटतें. अशी परस्परांची परवानगी नसल्यास दोघांचेही हाल होतील व भांडणें होतील. विवाहपद्धतींत परस्पर मालकीची कल्पना आहे, व ही कल्पना किंवा ही पद्धतच नाहींशी होईल तेव्हांच हा प्रश्न सुटेल. पुरुषांस तरी निदान या बाबतींत फेरपालट करण्याची विशेष जरूर भासते व बायकांनीं तिकडे कानाडोळा करावा असें डॉ. रॉबिनसन यांचेंही मत आहे. बायकांस त्याची फारशी जरूर भासत नाही अशी सामान्य कल्पना असते. तें सर्वैथैव खरें नाहीं परंतु त्यांत बरेंच तथ्य आहे असें दिसतें. २. सुप्रजाजननाकरतां समागमाची कल्पनाच अजून कोठें रूढ झालेली नाहीं. 'ओनीडा' समाजाप्रमाणें प्राचीन काळीं ग्रीस देशांत ही कल्पना रूढ होती, व तेथील नवरे इतर सुदृढ व निरोगी पुरुषांस

आपले घरीं बोलावून सुप्रजाजननाकरतां त्यांस आपल्या बायकांकडे पाठवीत असत. पुरुष व स्त्री दोन्ही सुदृढ असतील तरच सुप्रजा निर्माण होईल. हल्लीं नवराबायको दोघेंही दैववशात सुदृढ असल्यास चुकून कधीं कधीं सुप्रजा निर्माण होते इतकेंच. यापेक्षां जास्त सद्यःस्थितींत शक्य दिसत नाहीं. आतां सुप्रजा बाजूला ठेवून प्रजाजननाकरतां समागमाचा प्रश्न घेतला तरी तोही बहुधा कधींच होत नाहीं असेंच म्हणावें लागतें. ज्यांस अपत्याची उत्कट इच्छा असते, अशांचा समागम सुद्धां कालस्थल अनुकूल असतील तरच शक्य होतो. आतां ज्यांस संतति नको असेल त्यांसही प्रेमाकरतां समागम शक्य व्हावा हाच संततिनियमनाचा उद्देश आहे. आमचे मतें परस्पर प्रेमाशिवाय (कामवासनेशिवाय) कधींही समागम होतां कामा नये. परंतु हल्लींच्या दोषी सामाजिक स्थितीमुळें विवाहित स्त्रियांस बऱ्याच वेळां व वेश्यांस बहुधा प्रेमाशिवाय समागम सोसावा लागतो, हाही वैवाहिक बंधनाचाच दोष आहे. ३. सामान्यतः स्त्रियांची प्रवृत्ति अनेक पुरुषांकडून सुखप्राप्ती करून घेण्याची नसते. तरी पण कोणत्याही दोन सज्ञान व्यक्तींची परस्पर इच्छा असल्यास त्यांचा समागम होण्यास कोणत्याही प्रकारची हरकत नाहीं; मात्र त्यामुळें अनिष्ट संतति किंवा रोगांचा प्रसार होतां कामा नये. याकरतां लागणारीं साधनें वापरल्यास कोणाचेंच नुकसान नाहीं, म्हणजे अनीती नाहीं. ४. वेश्यांची आम्ही तरफदारी करतों ती अशीः— वेश्यांस उपजीविकेकरतां आपलें शरीर भाड्यानें द्यावें लागतें, म्हणून त्यांची दया यावी परंतु त्यांस तुच्छ मानण्याचें कारण नाहीं. यांत त्या कोणाचेंही नुकसान करीत नाहींत. प्रतिस्पर्धी या नात्यानें विवाहित स्त्रिया त्यांचा द्वेष करतात हें साहजिक आहे, परंतु वेश्या नसल्यास पुरुष एकपत्नीत्व पाळतील हा समज चुकीचा आहे. वेश्यांचे अभावीं पुरुष इतर स्त्रियांकडे वळतात असा अनुभव आहे. कांहीं अत्यंत कुरूप पुरुषांस वेश्यांचे अभावीं समागमच कदाचित अशक्य होईल, त्यांनीं वेश्यांबद्दल कृतज्ञ असलें पाहिजे. स्वैर संभोगास दोन व्यक्तींच्या संमतीशिवाय कोणतीही आडकाठी राहिली नाहीं म्हणजे वेश्यांचें गिऱ्हाईक कमी होईल व वेश्याही कमी होतील, तथापि प्रवाशांस त्यांचा उपयोग होईलच. सं.

१५. ४-७-२८.

श्री देवी प्रसन्न.

वि. वि. आपल्या मासिकांत 'स्त्रियांस गर्भधारणा न होण्याविषयीं औषध कोणतें आहे ? असे प्रश्न केलेलीं बरींच पत्रें वरचेवर छापण्यांत येत असून त्यावर औषध अजून सांपडलेलें नाहीं, असें लिहिलेलें असतें. आमच्याकडे यांच्यावर औषध आहे व तें आम्ही १०।१२ स्त्रियांस दिलें असून तितक्यांसही औषध घेतल्यानंतर गर्भधारणा झाली नाहीं. औषध तीनच महिने विटाळ झाल्यावर घ्यावें लागतें, पथ्यपाणी कांहीं नाहीं. तीनही महिन्याच्या औषधास किंमत १० रु. पडतील. कोणासही त्यासंबंधीं अनुभव पहावयाचा असल्यास तें देऊं परंतु आमच्या मुख्यतः खालील अटी आहेत. १. औषधाची मागणी आपल्या मार्फत झाली पाहिजे, कारण आमचें नांव प्रसिद्ध न व्हावें अशी इच्छा आहे. २. ज्या स्त्रिया गर्भधारणेमुळें मृत्युमुखीं पडण्याचा संभव आहे किंवा ज्यांना लागोपाठ दीडदोन वर्षांच्या अंतरानें मुलें झाल्यामुळें त्यांची व मुलांची प्रकृति फार अशक्त होते व त्यामुळें त्यांची योग्य शुश्रुषा करणें अशक्य होतें किंवा ज्या गरीब स्त्रियांस पुष्कळ मुलांचें पोषण व संगोपन द्रव्याभावामुळें करणें शक्य होत नाहीं, अशांनाच हें औषध दिलें जाईल. यासंबंधीं खातरजमा देण्याकरतां व ती कुमारिका, विधवा किंवा वेश्या नाहीं असें लिहिलेलें पत्र एखादा डाक्टर किंवा वैद्य किंवा दोन सभ्य गृहस्थांच्या सहीनिशीं प्रतिज्ञापत्रक आपल्या मार्फत आमच्याकडे आलेलें असावें म्हणजे तें औषध आम्ही आपल्याकडे किंमत आल्यानंतर परस्पर पाठवून देऊं. ३. कुमारिका, विधवा किंवा वेश्या यांस औषध न देण्याविषयीं ज्यांनीं तें आम्हांस सांगितलें त्यांच्याकडे शपथ वाहिली आहे. ४. औषध आपल्यामार्फत पाठवण्याचा विचार असल्यामुळें त्यासंबंधीं जो आपल्या वेळेचा व पत्रव्यवहाराकरतां खर्च येईल त्यासंबंधींच्या कमिशनचा ठराव तुमच्या व आमच्या विचारानें ठरवूं. मात्र आमचें नांव, गांव व पत्ता प्रसिद्ध न होण्याविषयीं आपण सक्तीचा प्रयत्न करावा अशी विनंती आहे. पत्राचें उत्तर पाठवावें. कळावें,...

उ. वरील प्रकारचें उत्तर आमच्या मासिकांत कधींही दिलेलें नाहीं. ( पत्र

६ चें उत्तर पहा. ) आपण म्हणतां आपलें औषध १०।१२ स्त्रियांस दिलें. या स्त्रियांबद्दल जास्त माहिती मिळाल्याशिवाय, म्हणजे अगोदर त्यांस किती अंतरानें मुलें झालीं व नंतर किती वर्षांत झालीं नाहींत; त्यांचें वय, प्रकृतिमान वगैरे कळल्या-शिवाय कांहींच ठरत नाहीं. आपलें औषध अजब दिसतें, परंतु त्याच्या गुणावर विश्वास बसणें हल्लींच्या शास्त्रीय प्रगतीच्या काळांत कठिण आहे. आपल्या अटीं-विषयीं म्हटल्यास ( १ ) आम्हांस यांत पडण्याचें कारण दिसत नाहीं, ( २ ) आम्ही संततिनियमनाचे उपाय कोणासही सांगतों, तेव्हां प्रतिज्ञापत्रकाच्या भानगडींत कोण पडणार ? ( ३ ) कुमारिकांस, विधवांस व वेश्यांस संतति झाल्यानें आपला किंवा आपणास औषध सांगणाराचा कोणता हेतु साधतो ? कुमारिकांची किंवा विधवांची अब्रू गेल्यानें आपणांस समाधान वाटतें काय ? असेल कदाचित्. परंतु वेश्यांची अब्रूहि जात नाहीं, मग त्यांना कां सांगूं नये ? सं.

१६. १६—७—२८

सा. न. वि वि. मी गेल्या वर्षी कलकत्त्यास गेलों असतां + + संस्थेंत रहात होतों. तेथें मला असें समजलें कीं तेथील उच्च अभ्यास करणारे विद्यार्थी नियमानें वेश्यागृहांत जातात, व त्यांस रोगप्रतिबंधाची माहिती नसते. प्रतिबंधाचीं साधनें आपणाकडे अल्प किंमतींत मिळतात असें मीं सांगितलें तेव्हां त्यांस मोठेंच आश्चर्य वाटलें. पुष्कळ धार्मिक हिंदु व ख्रिस्ती विद्यार्थी वेश्यागृहांस आश्रय देतात व त्यांस बचावाचीं साधनें माहीत नसल्यानें कित्येकांस गर्मीकरतां ६०६ हें औषध टोंचून घ्यावें लागलें आहे. एका विद्यार्थ्याचा मी पत्ता पाठवीत आहें, त्यास माहिती जरूर पाठवावी.

आपला...

उ. सर्व मोठ्या शहरांत हीच स्थिति आहे. माहिती पाठवली आहे. सं.

१७. २—८—२८

सा. न. वि. वि. 'गुरुकिल्ली' यांचे लेख 'समाजस्वास्थ्यां'त येतात असें समजल्यावरून मी आपल्या मासिकाची वर्गणी भरली परंतु या वर्षाचा पहिला अंक आला तो मला पसंत नाहीं. मलपृष्ठावरील चित्र सुद्धां माझ्या मतें आक्षेपार्ह आहे,

तेव्हां मीं तें वाचणें किंवा तें इतर लोकांस माझ्या घरांत दिसणें मला योग्य वाटत नाहीं. आपलें मन दुखविण्याची माझी इच्छा नाहीं, तथापि माझें नांव वर्गणीदारांचे यादींतून काढून टाकून वर्गणीचा आपणास योग्य वाटेल तसा उपयोग करावा अशी विनंति आहे. यामुळें माझ्या मनांत आपणाविषयीं किंवा आपल्या कार्याविषयीं कांहीं अनादर आहे असें समजूं नये. आपला...

उ. वरील गृहस्थ एम्. बी. बी. एस्. डॉक्टर आहेत, परंतु ते फक्त नेत्रांच्या व दांतांच्या रोगांचें काम करीत असतात. यामुळें शरीराच्या अश्लील भागांशीं डॉक्टर-मजकुरांचा संबंध येत नाहीं, कारण पडदानशीन स्त्रियांखेरीज इतरांचे चेहरे अश्लील नसतात. तरीही मेडिकल कॉलेजांत असतांना त्यांनीं वरींच नग्न शरीरें पाहिलीं असलीं पाहिजेत, तेव्हां त्यांना अर्धनग्न चित्रामुळें विथरण्याचें कारण नव्हतें. लहान मुलांस नग्न शरीरासंबंधीं फाजील जिज्ञासा राहूं नये म्हणून, त्यांचे आईबाप स्नान किंवा पोषाख करीत असतां त्यांस तेथें जाण्याची मनाई नसावी, असें मत एका आधुनिक युरोपीय आईनें नुकतेंच प्रसिद्ध केलें व तें ती अमलांतही आणीत असे. नग्न शरीर अश्लील आहे, ही कल्पना हास्यास्पद आहे इतकेंच नव्हे तर अनर्थ-कारक आहे. असो, वरील डॉक्टरांस आम्ही वर्गणीची रक्कम परत देऊं केली असतांही त्यांनीं घेतली नाहीं याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहों. सं.

१८. ५-८-२८

क्र. सा. न. वि. वि....शर्कराच्छादित गोळ्याच लोकांना फार आवडतात. क्रांतिकारक विचार जरी इष्ट असले तरी सर्वांना लवकर पटत नाहींत. चालू सालीं तशा नमुन्याचे लेख जास्त येतील किंवा कसें हें पत्रोत्तरीं कळविल्यास मी फार आभारी होईन...... आपला......

उ. लोकांची मर्जी संभाळून लेख प्रसिद्ध करणारीं पुष्कळ मासिकें व वृत्तपत्रें आहेत, व या मासिकांतही 'शर्कराच्छादित गोळ्यां'स स्थळ मिळणार नाहीं असें नाहीं. परंतु अशा प्रकारचे कोणते लेख पसंत करायचे व त्यांचें प्रमाण काय ठेवायचें हें आमच्या मर्जीवर राहील; व आमच्या स्वतःच्या लेखांत खरें बोलण्यालाच जास्त

महत्त्व दिलें जाईल. आमचे विचार क्रांतिकारक आहेत खरे, व अशा विचारांस इतर मासिकें स्थळ देत नाहींत असें दिसल्यामुळेंच आम्हांस हें मासिक काढावें लागलें. तरी सुद्धां वेगळ्या धर्तीच्या लेखांसच काय, परंतु आमच्या प्रतिपक्ष्यांसही स्थळ देण्याची आमची तयारी आहे. सं. )

१९ × ×पूर, ६-११-२८

सा. न. वि. वि. आपल्या पुस्तकांवरून आपण गर्भपातासंबंधीं माहिती देऊं शकाल असें दिसतें; तो कसा करावा ही माहिती आपण दिल्यास आपण सांगाल ती रक्कम मी फी म्हणून देण्यास तयार आहें...निदान हें काम गुप्तपणें करणारा एखादा डॉक्टर तरी पाहून द्या, मात्र तो या कामांत निष्णात असला पाहिजे.

आपला...

उ. पत्र १ यास उत्तर पहा. अशा डॉक्टरांची यादी आमचेकडे नाहीं. सं.

२०. २७-१०-२८

न. वि. 'समाजस्वास्थ्य' मासिक चालवण्याचा आपला उद्देश व आपले विचार स्तुत्य आहेत; तथापि विवाहबंधनाच्या विरुद्ध आपलें मत व विचार आपल्या म्हणजे हिंदुसमाजाला सर्वस्वी घातक आहेत, असें युरोपिअन राष्ट्रांतील या बाबतींतील प्रकार पाहून म्हणावें लागतें. मी परदेशीं कुटुंब व मुलगी (त्रिवर्ग) ६ वर्षें होतों. निरनिराळ्या राष्ट्रांतील सर्व प्रकार लक्षपूर्वक स्वतः पाहिले, त्यावरूनच माझें वरील मत आपणांस कळविलें आहे. विवाहबंधन ठेवून मुबलक परस्पर स्वतंत्रता परस्परांच्या इच्छेनुरूप अवश्य असावी एवढें मात्र खरें. परस्परांचे अशा तऱ्हेनें विचारविनिमय होण्यास 'कोर्टिंग' चा प्रघात आपल्या हिंदु समाजांत पडणें अत्यावश्यक आहे. नुसते प्रौढविवाह होऊन विरुद्ध मताचीं जोडपीं कित्येक आम्ही बघितलीं आहेत व बघत आहोंत...आपला, देव.

उ. यूरोपांतही विवाहबंधन आहे व जरी तेथें घटस्फोट होऊं शकतो, तरी तो दोघांच्या खुषीनेंही मिळत नाहीं...कोणत्याही स्त्रीस तिच्या इच्छेविरुद्ध एखाद्या मनुष्याशीं—तो नवरा कां असेना—समागम करावयास लावणें म्हणजे तिला वेश्येपेक्षांही हीन लेखणें होय, कारण वेश्यांस या बाबतींत स्वातंत्र्य असतें. सं.

२१. भाद्रपद शु. ४, १८५०.

सा. न. वि. वि. ( १ ) आपणास आपल्या मासिकाचें मुखपृष्ठ कशावरून सुचलें व त्या चित्राचा उद्देश काय आहे ? ( २ ) बापाच्या नांवास महत्त्व द्यावें काय ? देणें असल्यास तें कां द्यावें ? समागमस्वातंत्र्य असल्यावर बापाच्या नांवाची काय मातबरी ? नांवानंतर बापाचें नांव लिहिणें अवश्यकतेचें समजतां काय ? ( ३ ) समागमाची इच्छा तहानभुकेइतकीच महत्त्वाची व निरपराधी आहे काय ? समागमाची इच्छा आपण कृत्रिम रीतीनें फारच वाढविली आहे व ती पुष्कळांमध्यें बरीच कमी करतां येईल; शृंगारिक वाचन, स्त्रियांचा एकांतीं सहवास यानें कामेच्छा वाढते, ह्या दोन्ही टाळल्यास मनुष्यास ब्रह्मचर्यव्रत बराच काळपर्यंत टिकवतां येईल. ( पशुपक्षांचे संभोगही बघूं नयेत व मुलांमुलींच्या दृष्टीस पडणार नाहींत अशी खबरदारी घ्यावी. ) ( ४ ) आईबापांनीं मुलें वाढीस आल्यावर प्रजोत्पादनाचा क्रम बंद करावा. ( ५ ) संततिनियमनाच्या उपायांमुळें कामातुर स्त्रीपुरुषांस कामातिरेकास अवसर सांपडेल व नियमितपणें संभोग करणार कामातुर होतील. कामातुर होणें म्हणजे नीतीच्या ऱ्हासाची पायरी नव्हे काय ? नीतिशास्त्र कामवासना संयमन करावी असें सांगतें तर संततिनियमनाचे उपाय कामातुर करण्यास उत्तेजित करतात, दोहींत कोणतें पसंत करावें ? मी स्वतः × × वापरण्यापूर्वी नियमित असें पण त्यानंतर अतिरेक करावासा वाटतो. ( ६ ) समागमस्वातंत्र्याचे आपण कट्टे पुरस्कर्ते आहांत काय ? याच्या दुष्परिणामाची आपणास कल्पना आहे काय ? ‘ कामातुराणां न भयं न लज्जा ’. एके काळीं समाजास समागमस्वातंत्र्य होतें. व त्यामुळें समाजानें आपणावर विवाह बंधनासारखे ( किंवा एकपत्नी अगर पतिव्रता-सारखे ) कडक शिस्तीचे नियम लादून घेतले. समाज अशा परिस्थितींतून निघाला असतांना पुनः त्याच परिस्थितीमध्यें समागमस्वातंत्र्याच्या नांवाखालीं शिरण्यांत काय हंशील आहे ? ‘ स्वेच्छाचार ’ यास ‘ स्वातंत्र्य ’ नांव देऊन समाजाची हानि होणार नाहीं काय ? समाजाच्या कल्याणास कडक शिस्तीची अवश्यकता असते व ती शिस्त कायद्याच्या कडक नियमाखालीं जिवंत ठेवावी लागते. ( ७ ) संततिनियमनाच्या उपायांविषयीं कांहींतरी निर्बंध असला पाहिजे. मागच्या

पत्रांत मीं ह्मटल्याप्रमाणें फक्त गरीब विवाहितांस, रोग्यांस व वेश्यांस नियमनाचे उपाय अवश्य योजावेच. कुमारिकेनें व ( अविवाहित ) विधवेनें कृत्रिम नियमन केल्यास कायद्यानें याचा कडक विरोध केला पाहिजे व समाजानें अशांवर बहिष्कार घातला पाहिजे. ( ८ ) बहुपत्नी किंवा बहुपतिव्रताची घोषणा करणें ह्मणजे ( जसें आपण करीत आहां ) समाजास पशुतुल्य बनवणें नव्हे काय ? या योगानें समाजावर कोण-कोणत्या आपत्ति येतील याची आपल्याला कल्पना किंवा इतिहासानें माहीत असेलच. (९) विधवेनें + + रहात नसल्यास पुरुषांप्रमाणें पुनर्विवाह करावा. मी संततिनिय-मनाचा पुरस्कर्ताच आहें, पण त्यामुळें समाजांतली पशुतुल्यवृत्ति वाढणार नाहीं याची फार काळजी घेतली पाहिजे. एका पोरीमागें १०।१२ प्रेमयाचक ( संभोगयाचक ) असणें हें दृश्य आपल्यानें पहावेल काय ? (१०) प्रेम आणि संभोगेच्छा एकच आहेत काय ? किंवा प्रेम संभोगेच्छेपेक्षां कांहीं पवित्र आणि कठिण आहे काय ? संभोगेच्छा क्षणभंगूर आहे व त्याचा उगम तात्कालिक आहे. आपण बायकोवर संभोगेच्छेमुळें प्रेम करतों. आईवर, बापावर, देशावर देखील प्रेम करतों. पण हें प्रेम बायकोच्या प्रेमापेक्षां निराळें आहे, मानसशास्त्रज्ञ याच्यापेक्षां चांगल्या तऱ्हेनें हेंच उमगून सांगूं शकेल. ( ११ ) कुमारिकेनें संभोग केल्यास ती कडक शिक्षेस पात्र झाली पाहिजे. कुमारिकेस आपण संततिनियमन शिकवण्यापेक्षां कामवासनेचें नियमन जर शिकवलें तर समाज आपला फार उपकृत राहील. आपला...

**उ.** १. या चित्रामुळें मासिकास शोभा आली असें कांहीं वाचकांचें व आमचें मत आहे. इतकें कारण पुरे आहे. २. आई कोण, याबद्दल जशी खात्री असूं शकते, तशी बाप कोण याबद्दल असणें शक्य नाहीं. मुलाचा बाप कोण याबद्दल आईची खात्री असूं शकेल, परंतु इतरांची असणार नाहीं. बापाचें नांव आपल्यापुढें लिहिण्याची रूढि हिंदुस्थानच्या कांहीं भागांत आहे, हेंच त्याचें महत्त्व. ही चाल जेथें नाहीं, तेथें त्यापासून कांहीं भयंकर नुकसान झालेलें दिसत नाहीं. लोकांस ओळखतां यावें हाच नांवाचा उपयोग असतो; व कायदेशीर बापाचें (म्हणजे आईच्या नवऱ्याचें) नांव लावल्यानें कधीं कधीं खोटें बोलल्यासारखें होतें. नांव लावणेंच असेल तर आईचें लावणेंच सरळ आहे. ३. समागमाची इच्छा अत्यंत महत्त्वाची आहे व जोंपर्यंत

## समाजस्वास्थ्य

तीपासून कोणास त्रास झाला नाहीं तोंपर्यंत ती तहानभुकेइतकीच निरपराधी आहे. शृंगारिक वाचनानें ही इच्छा वाढते हें खरें. स्त्रियांचा एकांतीं सहवास शहरांत तरी दुर्लभ असतो. हीं दोन्ही टाळलीं म्हणजे कामेच्छाच होणार नाहीं असें नाहीं. अन्न मिळालें नाहीं किंवा दिसलेंही नाहीं तरी भूक लागायचीच. ब्रह्मचर्यव्रत वीस वर्षांचे पुढें टिकण्यांत आरोग्याचे दृष्टीनें धोका आहे असें तज्ज्ञांचें मत आहे. पशुपक्ष्यांचे समागम बघूं नयेत व लहान मुलांस दिसणार नाहींत अशी खबरदारी घ्यावी असें आपण म्हणतां, परंतु या गोष्टी कोणी सिनेमाप्रमाणें वेळ ठरवून पहात नसतो. तेव्हां एकतर स्वतः व मुलें एका खोलींत खिडक्या, दरवाजे बंद करून, बसलें पाहिजे, किंवा सर्व पशुपक्ष्यांस चड्डया नेसवल्या पाहिजेत. हें जमणार कसें? ४. समागम बंद करावा असें आपलें म्हणणें असेल तर तें कोणी कबूल करणार नाहीं व कां करावें तें समजत नाहीं. प्रजोत्पादन बंद करावें हें आम्हांस कबूल आहे. ५. संततिनियमनाचे उपाय वापरण्यास थोडी-बहुत तरी पूर्वतयारी लागते यामुळें अतिरेकाचा संभव उलट कमी होतो. न वापरणारांस कांहींच आडकाठी नसते. संततीच्या भीतीनें समागम बंद ठेवण्यास स्त्रिया तयार होतात, पुरुष होत नाहींत, व स्त्रियांची विशेष हरकत दिसल्यास त्यांतील समंजस असतील ते बाहेरख्याली होतात, नसतील ते बायकांवर जुलूम करतात. उपाय न वापरणारांस गरोदरपणांत, म्हणजे जवळजवळ वर्षांतून आठ महिने बिलकूल भीति नसते. तेव्हां या उपायांनीं लोक कामातुर होतात म्हणण्यांत कांहींच तथ्य दिसत नाहीं. नीतिशास्त्र आपण कोठें शिकलांत? किंवा आपणांस वाटेल तीच नीति? जोंपर्यंत दुसऱ्यास इजा होत नाहीं तोंपर्यंत यांत नीतिशास्त्राचा संबंध पोंचत नाहीं. कोणीं किती जेवावें, हें ज्याचें त्यानें ठरवायचें कीं यावरही तुम्ही नीतिशास्त्राचे काल्पनिक सिद्धांत ठोकणार? मग कामवासनेंतच तुमची ढवळाढवळ कां? ६. मी समागमस्वातंत्र्याचा कट्टा पुरस्कर्ता आहें, मात्र यास दोन माणसांची संमति लागते हें विसरतां कामा नये. एके काळीं समाजास हें स्वातंत्र्य होतें व त्याचे दुष्परिणाम दिसल्यामुळें कडक नियम झाले, हें विधान आपण काय आधारावर ठोकून दिलें आहे? वस्तुतः विवाहादि संस्कार वेडगळ

धार्मिक समजुतींमुळें उत्पन्न झाले आहेत. स्त्रीसमागम हें पाप आहे, परंतु विवाह-मंत्रांमुळें स्त्री पावन होते व मग समागमांत पाप रहात नाहीं, ही कल्पना मुळाशीं आहे. ही कल्पना वेडगळ आहे व तिला आतां महत्त्व देणें ह्मणजेच रानटी स्थितींत पुनः जाऊं पहाणें आहे. स्वातंत्र्याचे जर कांहीं वाईट परिणाम होत असतील, तर त्यांस स्वातंत्र्य हाच उपाय आहे. अंधारकोठडींतून मनुष्य बाहेर आल्यामुळें त्याचे डोळे दिपले, तर त्याला पुनः कोठडींत कोंडायचें काय? नाहीं, त्याला उजेडाची संवय होऊं देणें हाच त्याला उपाय. तद्वतच स्वातंत्र्याची संवय झाली ह्मणजे क्षणिक दुष्परिणाम आपोआप नाहींसे होतात. ७. कुमारिका, विवाहिता व विधवा हे भेद कृत्रिम आहेत, नैसर्गिक नव्हेत. नाहीं ह्मणावयाला कुमारिकांचे योनिमार्गांत एक नैसर्गिक पडदा असतो, परंतु ह्याचा कांहीं उपयोग नसतो इतकेंच नव्हे, तर त्याची विनाकारण अडचण होते. ज्या कुमारिका व विधवा नियमनाचे उपाय वापरतील, त्यांस ओळखण्यास काय मार्ग आहे? त्यांच्या विरुद्ध कायदा करतां येईल, पण तो अंमलांत आणणें असेल तर त्यांच्यावर पहारा ठेवावा लागेल! ८. आम्हीं बहुपत्नीव्रताचा किंवा बहुपतिव्रताचा पुरस्कार केलेला आठवत नाहीं. परंतु सती द्रौपदीला पांच नवरे असूनही सहाव्याची इच्छा झाली, तरी सुद्धां तिची साध्वींत गणना होते, यावरून ही कल्पना अगदींच नवीन आहे असें नाहीं. पुरुषांना तर मुभाच आहे. यानें आपला समाज पशुतुल्य बनला आहे काय? द्रौपदी पशु होती काय? तिच्या नवऱ्यांना आणखी इतर बायका होत्याच, तेही पशु होते असें दिसत नाहीं. त्यांचा बडेजाव आपल्याच समाजानें केला आहे. सामाजिक समजुती म्हणजे नीति नव्हे व त्या बदलल्यानें कोणाचा ऱ्हासही होत नाहीं. ९. विवाहाचे बाबतींत विधवांस कुमारिकांप्रमाणेंच हक्क असणें जरूर आहे. पोरांचे मार्ग प्रेमयाचक जगाचे आरंभापासून होते तसे हल्लींही आहेत. नियमनाचे मार्ग माहीत असल्यास गर्भ राहून जीव देण्याची वेळ येणार नाहीं व सर्व कुटुंबास खालीं मान घालावी लागणार नाहीं, हा निःसंशय फायदा आहे. १०. बायकोवरचें प्रेम क्षणिक असतें असें आपणांस म्हणायचें आहे काय? लोकांचा अनुभव निराळा आहे. ११. कुमारिकेस

संभोग करण्याची समाजाची परवानगीच आहे, मात्र त्यापूर्वी भटांनीं मंत्र पुटपुटले पाहिजेत, किंवा एखाद्या नोंदणीबुकावर तिनें एखाद्या पुरुषाबरोबर सही केली पाहिजे इतकेंच समाज म्हणतो. दोन माणसांच्या खाजगी व्यवहाराची अशा तऱ्हेची अश्लील जाहिरात देण्याचें किंवा दवंडी पिटवण्याचें कांहींच कारण दिसत नाहीं. आम्हांस विवाह, गर्भाधान, मासिक अस्पृश्यता वगैरेमुळें अशा प्रकारच्या जाहिरातींची संवय झाली आहे; परंतु वास्तवीक हे प्रकार अत्यंत अश्लील आहेत. सं.

२२. XX XX १९२८

न. वि. वि. १. संततिनियमनासंबंधीं आर्यवैद्यकांत विचार केला आहे काय? पूर्वी संततिनियमन करीत असत काय? या गोष्टी एवढ्याकरतां प्रसिद्ध करावयाच्या कीं, त्यायोगें जुन्या मताच्या लोकांचें समाधान होतें. ( होय, यासंबंधी अधिक माहिती आमच्या ' संततिनियमन ' पुस्तकाच्या प्रस्तावनेंत व पुरवणींत सांपडेल. सं. )

२. रबर चेक् पेसरींचें माप बरोबर न समजल्यानें त्यांचा व्हावा तसा चांगला उपयोग होत नाहीं त्यामुळें फार अडचण होते. खेडेगांवांत नर्स वगैरे नसल्यानें माप घेण्याची जिकीरी होते व तें नीट समजत नाहीं, याला उपाय काय? ( स्त्रिया आमचेकडे आल्यास आम्ही बरोबर मापाची पेसरी बसवून देतों. कोणत्याही समंजस स्त्रीला ही कशी बसवावी ही माहिती आम्ही देऊं, परंतु त्याला थोडाबहुत अनुभव लागतो, तो येईपर्यंत कांहीं पेसरी फुकट जातील, याला इलाज नाहीं. नर्सला सुद्धां अनुभवाशिवाय ही गोष्ट समजणार नाहीं. खेडेगांवांत अनेक गैरसोई असतात त्यांतलीच ही एक आहे. येथें येऊन एकदां आकार ठरवून घ्यावा. सं. )

३. हल्लीं वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होणाऱ्या धातुपौष्टिक औषधांच्या जाहिरातींविषयीं तुमचें काय मत आहे? औषधानें धातु पुष्ट होऊन जाहिरातींत लिहिल्याप्रमाणें गोष्टी होणें शक्य आहे काय? आमचे मतें ती अगदीं फसवणूक आहे, करितां आपण आपले मासिकांत त्यासंबंधीं खुलासा करावा व जर तशीं औषधें असतील तर त्यांची प्रसिद्धी करावी. ( अशा जाहिरातींवर विश्वास न ठेवणें

बरें. प्रकृति नीट नसेल तर डॉक्टराचा सल्ला घ्यावा. प्रकृती चांगली असूनही नपुंसकत्व असेल, तरीही डॉक्टराचाच सल्ला घ्यावा, कारण कारण समजल्याशिवाय उपचार शक्य नाहीं. पुष्कळ वेळां डॉक्टरांसही कांहीं करणें शक्य नसतें. यावर नेहमीं देण्याचीं औषधें म्हणजे योहिंबीन, स्ट्रिक्नीन्, अर्गट वगैरे आहेत, परंतु हीं सर्व विषारी आहेत व डॉक्टराच्या सल्ल्याशिवाय घेऊं नयेत. सर्वांत अलीकडचा उपाय म्हणजे अंडाचा अर्क. हा इतर प्राण्यांच्या अंडापासून केलेला असतो व बाजारांत याच्या वड्या मिळतात, किंवा हे द्रवरूपांत अंगांतही टोंचतात. सं. )

४. स्त्री बाळंतीण झाल्यानंतर किती दिवसांनीं ती संभोग करण्यास लायक होते? म्हणजे प्रकृतीस त्रास होणार नाहीं? मूल अंगावर पीत असेपर्यंत संभोग करूं नये असें म्हणतात यांत कांहीं अर्थ आहे काय? संभोगापासून दुधावर परिणाम होऊन दूध कमी येतें असें म्हणतात ही गोष्ट खरी आहे काय? ( गर्भाशय पूर्वस्थितीवर येण्यास जवळजवळ एक महिना लागतो, व तेथपर्यंत स्त्रीस शक्य तितकी विश्रांति मिळणें जरूर असतें. नंतरचा विचार तिच्या प्रकृतीवर अवलंबेल. मूल अंगावर पीत आहे म्हणून संभोग वर्ज केला पाहिजे असें नाहीं. त्याचा दुधावर परिणाम होत नाहीं, परंतु पुनः गर्भ राहिल्यास मात्र दूध कमी व कमी प्रतीचें येण्याचा संभव असतो, यास्तव गर्भ राहणार नाहीं अशी खबरदारी घ्यावी, कारण मुलाला १०।१२ महिनेपर्यंत आईचें दूध मिळणें हितावह असतें. बाळंतपणानंतर लवकर गर्भ राहण्याचा संभव नसतो अशी कांहीं डाक्तरांचीही कल्पना असते, पण वस्तुस्थिति मात्र उलट असते.—सं.

५. एखाद्यास मूल होणें ही गोष्ट अवश्य वाटत असल्यास व त्यांस मूल होत नसल्यास आपण त्यास काय उपाय सुचवाल? ( पान ८२ पहा. सं. )

६. आपल्या मासिकांत फक्त संततिनियमनाचा विचार न करतां इतर समाजस्वास्थ्यासंबंधीं ह्मणजे ज्या गोष्टींच्या योगें समाजास स्वास्थ्य येईल अशा इतर गोष्टी, उदाहरणार्थ स्वच्छता, आरोग्य, आहारपद्धति, वेळेचें महत्त्व, कपडे, नाटक, सिनेमा, मिळकत व खर्च, वगैरेसंबंधींही माहिती व लेख प्रसिद्ध करावेत

म्हणजे आपल्या मासिकास वर्गणीदार जास्त मिळतील असें वाटतें. केवळ ' संतति-नियमन ' एवढ्याच विषयाचें मासिक म्हणून लोक तें घेण्यास बिचकतात व आपले नांवावर मागविणें त्यांना लाजिरवाणें वाटतें. तसेंच लायब्ऱ्यांतून मागवीत नाहींत. मी येथील लायब्ररींत सुरू करण्याविषयीं विचारलें पण त्यांना हा विषय अश्लील वाटतो. नाइलाज आहे. बरेच लोकांना हें मासिक वाचावेंसें वाटतें पण उघड वाचणेंची छाती होत नाहीं. अवश्यकता वाटते पण तोंडानें कबूल करीत नाहींत. क. त. मा. अ. ही. वि. आपला नम्र × ×.

उ. हें मासिक केवळ संततिनियमनाकरतां काढलेलें नाहीं व याचा एकही अंक या विषयास वाहिलेला नाहीं. आजपर्यंत यांत अनेक विषय आलेले आहेत व पुढेंही येतील. संततिनियमनाचे कांहीं पुरस्कर्ते यामुळें नाखुषही झालेले आहेत. हें मासिक बऱ्याच लायब्ऱ्यांत आज सुरू आहे, तेव्हां आपले येथील लायब्ररीस लाजण्याचें कारण नाहीं. हें मासिक अश्लील म्हणणाऱ्या लोकांचीं मनेंच अश्लील असतात, त्यांस शारीरशास्त्रावरचें कोणतेंही पुस्तक अश्लील वाटेल. अशा विषयांची लोकांस संवय व्हावी व त्यांत अश्लीलता दिसूं नये, हा या मासिकाचा एक उद्देश आहे. वर्गणी दिल्याशिवाय मासिक वाचावयास मिळावें ही इच्छा स्वाभाविक आहे, परंतु या फुकट्या लोकांनीं हें लक्षांत ठेवावें कीं त्यांचे फुकटेपणामुळेंच लोकाश्रयाचे अभावी मासिक बंद पडण्याचा संभव आहे. गेल्या वर्षाप्रमाणें दरवर्षीं नुकसान सोसण्याची संपादकास शक्ति नाहीं. बऱ्याच लोकांचे अंक टपालांत चोरीस जातात, यामुळेंहि आम्हांस जास्त खर्च येतो, याचें कारणही फुकटे लोकच आहेत. पण त्यांस अक्कल कशी यावी ? सं. )

२३. जानेवारी १९२९

माझें वय ३५ वर्षांचें असून मला आज २० वर्षें स्वसंभोगाची संवय असल्यामुळें माझी प्रकृति अतिशय वाईट झाली आहे. यावर मी पुष्कळ वर्षें निरानराळे उपचार करीत आलों आहें, परंतु फुकट. × × × हे गृहस्थ आपले मित्र आहेत, व आपण कामशास्त्राचा अभ्यास बरोबरच केला आहे असें ते सांगतात, म्हणून मीं त्यांवर विश्वास ठेवून त्यांस बरीच फी देऊन त्यांजकडून फ्रेंच औषधें घेतलीं, परंतु

व्यर्थ. मी विवाहित आहें परंतु संवय विवाहानंतरही कायम राहिली. अशा स्थितींत मी उपचारांनीं साफ बरा होईन असें माझें ह्मणणें नाहीं. तरीपण सहानुभूतिपूर्वक उपचार करणाऱ्या तज्ज्ञाची मला मदत पाहिजे आहे. आपला + +

उ. पत्र ३ चें उत्तर पहा. या संवयीविरुद्ध नियमित व्यायाम, करमणुकीचीं साधनें, जघनस्नान, व हिप्नॉटिझमचा बराच उपयोग होतो. सं.

२४.

सा. न. वि. वि. मला परम्याचा विकार अंशतः स्वकष्टार्जित व अंशतः आनुवंशिक आहे, व त्यापासून मला गेलें सबंध वर्ष बराच त्रास झाला. आपलें गुप्तरोगांवरील पुस्तक मीं वाचलें आहे. त्यांतील सर्व रोगचिन्हें मला झालीं, व त्यांत सांगितल्याबरहुकूम मी वागलों. शिवाय मधून मधून 'सांताल मिदी' नांवाचें फ्रेंच औषध व डॉ. नेपिअर यांचें 'गनोरिआ क्युअर' घेतलें. या वड्या घेतल्या तेव्हां तात्पुरतें बरें वाटलें; परंतु वर्षांतून तीनदां रोग जागृत झाला. मधून मधून 'सल्फार्सेनॉल्' टोंचून घ्यावें असें एक मित्र म्हणतात. याचा उपयोग होईल काय, व दुसरीं चांगलीं औषधें कोणतीं हें कळवल्यास उपकार होतील. हा रोग माझ्या बायकोकडून लागला, व तीन महिनेपर्यंत समजला नाहीं....आपला × ×

उ. १. परम्याचा विकार आनुवंशिक नसतो. 'सांताल मिदी' हें औषध प्रसिद्ध आहे व योग्य रीतीनें दिलें असतां गुणकारी आहे. परंतु मनास वाटेल तेव्हां कोणत्या तरी जाहिरातींतील औषधें कशींतरी घेऊन रोग बरा होणें शक्य नाहीं. २. 'सल्फार्सेनॉल' बहुधा गर्मीवर देतात. ३. स्त्रियांमधें हा रोग स्वयंभू नसतो, त्यांसही तो कोणातरी पुरुषाकडूनच बहुधा लागतो. आपली बायको इतरांशीं संबंध ठेवते असा आपल्या म्हणण्याचा अर्थ होईल. हा आरोप कां? आपल्या हकीकतीवरून आपणांकडूनच तिला लागला असावा असें दिसतें. हा रोग तीन महिने समजल्याशिवाय राहणें शक्य नाहीं. सं.

२५. २१-१-२५

कृ. सा. न. वि. वि. ++ तारखेस माझा विवाह व्हावयाचा आहे. विवाहानंतर मी व माझी पत्नी एकत्रच राहूं. आम्ही दोघेही अद्याप शिक्षण घेत असल्यानें

संततीला आळा घालणें अत्यावश्यक आहे. या बाबतींत आज वर्षभर मी वाचन वगैरे करीत आहें व कांहीं संततिनियमन करणाऱ्या दांपत्यांचा व माझा परिचयही झाला आहे. बऱ्याच स्नेह्यांचा अनुभव असा आहे कीं प्रथमतः या गोष्टीला त्यांच्या पत्नीकडूनच विरोध होतो,—कित्येकांच्या मनावरही अनिष्ट परिणाम झालेला दिसतो. तसेंच अत्यंत खात्रीलायक म्हणून × × × पद्धत बरी असा उपदेश कांहींजण करतात. ही पद्धत वापरणारें एक दांपत्य मला माहीत आहे, दोघांशींही मीं मनमोकळेपणानें याची चर्चा केली आहे. पुरुषास त्याचा कांहींच परिणाम भोंवत नाहीं पण सदर दांपत्यांतील स्त्री अतिशय क्षोभनशील आहे. असुक दिवशीं—नव्हे वेळेला—महाल करावयाचा असें ठरवून प्रत्यक्ष कृतीपूर्वीं पांच सात मिनिटें पिचकारीचा प्रयोग करावयाचा या पद्धतींतील हिशोबीपणा व स्त्रीपुरुषसमागमांतील आगामी सौख्य नष्ट करण्याइतका जागरूकपणा याचा परिणाम स्त्रीवर व माझ्यासारख्या पुरुषांवरही खास होतो. अशा पद्धतीनें सुसंस्कृत तरुणांना याचा किळस मात्र वसणें जास्त संभवनीय...अर्थात् ही पद्धत टाकाऊच समजली पाहिजे. राहिली आपण शिफारस केलेली 'डच् कॅप'. याबद्दलची खालील माहिती मला पाहिजे. १. संततिनियमनाची इष्टानिष्टता स्त्रीपुरुषांच्या प्रकृतीवर आहे का, म्हणजे एखाद्या स्त्रीस पुरुषसमागम मानवेल पण संततिनियमनासह मानवणार नाहीं अशी संभाव्यता आहे का? २. एक टोपी किती दिवस वापरावी लागते? कारण रु. २-८ ची टोपी जर महिन्यांतून दोनतीनदां बदलावी लागली तर मध्यम स्थितींतील माणसांस ५।७ रुपये महिना खर्च कठिण पडणार ३. ही पद्धत अगदीं खात्रीलायक आहे का? कीं यावरही डुश वगैरे घ्यावा लागतोच, वगैरे वगैरे...आपला × × ×

उ. संततिनियमनाची इच्छा दोघांसही असेल तर पत्नीकडून विरोध होऊं नये. हिंदुस्थानांत पुष्कळ वेळां पतिपत्नींची प्रथम गांठ बिछान्यांतच पडते. अशा स्थितींत त्यांस एकमेकांविषयीं असावा तितका विश्वास नसतो. यामुळें अशा गोष्टी मोकळ्या मनानें बोलतां येत नाहींत. इतकेंच नव्हे तर पत्नीच्या सहवासांत कित्येक वर्षे घालवल्यानंतरही यासंबंधानें तिच्याशीं बोलावयास लाजणारे पति आम्हीं पाहिले आहेत! समागमापासून स्त्रियांस समाधान होतें कीं दुःख होतें कीं कांहींच होत नाहीं, हेंही

कित्येकांस माहीत नसतें. कारण, ' वाहवाः ! अशा गोष्टी कोणी विचारीत असतात काय ? ' एक गृहस्थ आम्हांस लिहितातः ' समागमापासून समाधान झालें कीं नाहीं हें उनाड स्त्री बोलून दाखवील, पण सभ्य स्त्रीच्या बाबतींत हें कसें समजावें ? अशा स्थितींत दोघांत रहस्य म्हणजे शारीरिक कृति हेंच. बोलण्याची सोय नाहीं. विश्वास असल्यास विरोध होऊं नये. ' डच् कॅप् ' व जंतुनाशक वडी वापरणें ही सर्व जगांतील प्रसिद्ध तज्ज्ञांनीं उत्तम ठरवलेली पद्धत आहे. अर्थात यांत बिलकूल गैरसोय नाहीं असें आम्ही म्हणत नाहीं, परंतु नैसर्गिक नियम मनुष्याच्या सोयीकरतां केलेले नसल्यामुळें अशा गैरसोई पुष्कळ सोसाव्या लागतात. या पद्धतीनें इजा मात्र बिलकुल होणें शक्य नाहीं. १. कशाही प्रकृतीच्या स्त्रीस ही वापरल्यानें इजा होणार नाहीं. २. एक टोपी बरेच लोक ५।६ महिने किंवा वर्षभरही वापरतात. एका गृहस्थांनीं एक टोपी दीडच वर्ष टिकली अशी तक्रार केली होती. खर्चाच्या दृष्टीनें पाहतां एक मूल वाढवण्यासही महिना पांचसात रुपयांपेक्षां जास्त खर्च येईल. ३. डुश घेणें ( पिचकारीनें योनिमार्ग धुणें ) संततिनियमनाकरतां खात्रीचें नाहीं, परंतु स्वच्छतेकरतां सर्वच स्त्रियांस इष्ट असतें. मात्र तें अमुकच वेळीं केलें पाहिजे असें नाहीं. सं.

२६. २–२–२९

सा. न. वि. वि. आपलें मासिक, विशेषतः त्यांतील पत्रव्यवहार मी उत्सुकतेनें वाचतों. आपण सर्व पत्रांस उत्तरें देतां, परंतु तीं कधीं कधीं समाधानकारक नसतात व त्यामुळें शंकानिवृत्ति होत नाहीं. स्त्रीपुरुषसंबंधाविषयीं आपलीं मतें क्रांतिकारक आहेत, यामुळें पुष्कळ लोक आपलें मासिक उघडपणें वाचण्यास भितात. परंतु तो प्रश्न सध्यां बाजूला ठेवला तरी या प्रश्नासंबंधीं लोकमत अजमावण्यास आजपर्यंत मार्ग नव्हता, तो आपल्या मासिकानें मिळाला. पुष्कळ लोकांस आपले दाबून ठेवलेले मनोभाव या मासिकाच्या द्वारें मोकळेपणानें मांडतां येतात व यासंबंधीं विचारविनिमय करतां येतो, यावरून अशा एखाद्या पत्राची जरूर होती, हें स्पष्ट दिसतें. आपल्या मासिकानें ही उणीव भरून काढली आहे. आपला, डॉ....

उ. आमच्या उत्तरांनीं नेहमींच समाधान होणार नाहीं, हें आम्ही जाणून

आहों, परंतु आमचे मतें त्याचें कारण असें आहे कीं ज्या बाबतींत लोकांचे मनावर पूर्वग्रहांचा पगडा असतो, त्या बाबतींत युक्तिवाद करण्याची त्यांची तयारी नसते. धर्मामुळें होणारें नुकसान प्रत्यक्ष दाखवलें तरी धार्मिक मनुष्याची तिकडे डोळेझांक करण्याची प्रवृत्ति असते. तसेंच शास्त्रीय दृष्ट्या व्यभिचार हा दुर्गुण नाहीं, म्हणजे त्यामुळें कोणतेंहि शारीरिक नुकसान होत नाहीं व मानसिक होत असेल तर तें केवळ तो दुर्गुण मानल्यामुळेंच होतें; कौमार्य ही एक विशेष मौल्यवान चीज समजण्याचें कारण नाहीं; कोणत्याही दोन सज्ञान माणसांचा संभोग ही खाजगी गोष्ट आहे व त्यापासून अनिष्ट संतति किंवा रोगप्रसार होत नसेल तर समाजास मधें पडण्याचें कारण नाहीं. वगैरे सरळ गोष्टी पारंपरिक माणसास पटाव्या कशा ? या बाबतींत पुष्कळ वेळां युक्तिवादांत आपलें चालत नाहीं अशी खात्री झाल्यावर हे लोक म्हणतातः—हें पहा, आह्मी वादांत हरलों तर आह्मांला वाद करतां येत नाहीं इतकेंच सिद्ध होईल, पण म्हणून आह्मी तुमचें म्हणणें कबूल करूं असें नाहीं. यां लोकांस आमचे पाशीं उत्तर नाहीं. सं. )

सा. न. वि. वि. २७. ठाणें, ५–२–२९

अनुकूल प्रतिकूल टीकांचा भडीमार वाचून ' समाजस्वास्थ्य ' मासिक आहे तरी काय ? निवळ या कुतूहलानें प्रेरित होऊन नमुन्याचा अंक मागवून घेतला. वाचून पाहिल्यानंतर लगेच मी वर्गणीदारच झालों व मागील सर्व अंक मागविले. एकंदर सर्व अंक वाचून पाहिल्यानंतर त्यांत इतकी टीका करण्यासारखें काय आहे, हें अजूनही मला समजलें नाहीं तें नाहींच. "पापी धर्मलंड प्रोफेसर्स आणि डॉक्टर्स" कोण याचा मात्र उलगडा झाला नव्हता तो झाला. पापी व धर्मलंड कां ? मासिकास पुरे २०० ही वर्गणीदार नाहींत हें पाहून मात्र अतिशय आश्चर्य वाटलें....हिंदुसमाजाचीं सध्यांचीं मतें पाहतां आपलीं मतें गळीं इतक्या लवकर उतरतील अशी आशाच नको. संततिनियमन सध्यांच्या काळीं जरी अतिशय आवश्यक असलें तरी 'मुलाच्या हातून पिंड मिळाला पाहिजे' ही कल्पना जोंपर्यंत आहे तोंपर्यंत तरी अशा लोकांना त्याची आवश्यकता कळणार नाहीं. ज्यांना संततिनियमनाची आवश्यकता समजली आहे असे लोक निवळ त्याच्याकरतां औषध विकत आणण्यास येण्याकरतां लाजतात

हें मला माहीत आहे. औषधाची जरूरच आहे असें मलाही वाटत नाहीं. वीर्यपतनाचे वेळीं जर 'रेचक' केला ( म्हणजे पोटांतील सर्व हवा काढून टाकून अगदीं रिकामें ) तर गर्भ राहण्याचा क्वचितच संभव आहे. मला औषधाची जरूरी वाटत नाहीं. मासिकांत प्रसिद्ध होणाऱ्या पत्रांत नांवगांव वगैरेचा मुळींच पत्ता लागत नाहीं याचें कारण काय? पुढील प्रश्नांचीं उत्तरें याल अशी आशा आहे. १. मुष्टिमैथुनाची संवय असलेल्या मनुष्याचें लग्न झालेलें असलें तरी नंतर त्याची संवय जात नाहीं असें कां? २. संभोगांत नेहमीं पुरुषच नालायक कां ठरतो? बायकोची कामतृप्ति त्याला मुळींच पुरी करतां येत नाहीं, ही गोष्ट बऱ्याच ठिकाणीं पुष्कळ अंशीं खरी आहे. याचें कारण काय? ३. पुरुष बायकोवर बळजबरी करतो ही गोष्ट खरी आहे त्याचप्रमाणें बायको नवऱ्यावर बळजबरी करते ही गोष्ट शक्य ( पाहिजे तर खरी ) आहे किंवा कसें? कारण? लहानपणीं बायका नवऱ्यास संभोगाविषयीं त्रास देतांना व नवऱ्याची नाखुषी असलेली प्रत्यक्ष पाहिली आहे, व या उदाहरणांपैकीं दोघांस दुसऱ्याकडून मुलें झालेलीं मला माहीत आहेत. आपला, आ. वि. नि. सरनाईक.

उ. आम्हांस शिव्या देऊन किंवा बोटें मोडून ज्यांचें समाधान होत असेल त्यांनीं खुशाल तसें करावें, आमची हरकत नाहीं. मैदानावर येऊन दोन हात करण्याची त्यांची छाती नाहीं इतकाच आम्ही त्याचा अर्थ करतों. 'धर्मलंड' ही आम्ही स्तुतीच समजतों. मुलाच्या हातून पिंड मिळाला पाहिजे अशी इच्छा असली तरीही पांचपंचवीस मुलांची जरूर नसते. संततिनियमनाचा आपण दिलेला मार्ग दुर्बोध आहे, परंतु वीर्याचा कांहीं अंशही योनिमार्गांत गेल्यास त्या उपायाचा उपयोग नाहीं, व वीर्यपतन बाहेर झाल्यास तें प्रकृतीस धोक्याचें आहे. यासंबंधीं पत्रें लिहिणाऱ्या लोकांची नांवगांव प्रसिद्ध करण्याची तयारी बहुधा नसते, तेव्हां त्यांनीं मुद्दाम तसें न कळवल्यास आम्ही तें प्रसिद्ध करीत नाहीं. असें करून तरी खऱ्या गोष्टी लोकांच्या नजरेस येणें इष्ट आहे. आपल्या प्रश्नांस उत्तरें: १. ही संवय बराच काळ राहून नंतर लग्न होऊन स्त्रीसमागम झाल्यास त्यापासून तितकें समाधान होत नाहीं व म्हणून संवय जात नाहीं. २. स्त्रियांचें उद्दीपन होण्यास

पुरुषांपेक्षां जास्त वेळ लागतो व त्यामुळें असें होतें, कामशास्त्राचें थोडेंबहुत अध्ययन केल्यास असें होणार नाहीं. स्त्री निश्चल राहिली तरीही पुरुषाची तृप्ति होऊं शकते, यामुळें स्त्री कधींच नालायक ठरत नाहीं, मात्र तिला योनिमार्ग असला पाहिजे. कधींकधीं योनिमार्ग व गर्भाशय हे दोन्ही नसतात. परंतु अशा स्त्रियांचींही लग्नें होतात व नवऱ्यांची फसगत होते. याकरतां लग्नापूर्वी दोघांनीही डॉक्टराकडून तपासून सर्टिफिकीट दाखवण्याची चाल पाडणें इष्ट आहे.

३. पुरुषास चेतनाच न झाल्यास समागमच अशक्य होईल, यामुळे त्यावर स्त्रियांसारखी बळजबरी होणें शक्य नसतें. परंतु मनांत नसतांही स्त्रीनें गळ घातल्यामुळें पुरुष समागमास उद्युक्त होतात व स्वतःचें नुकसान करून घेतात. यास बळजबरी मात्र म्हणतां येणार नाहीं. कामशास्त्रदृष्ट्या वधूवरें एकमेकांस अनुरूप आहेत कीं नाहीं हें ठरवण्यास प्रत्यक्ष अनुभवाशिवाय मार्ग नसतो. याकरतां घटस्फोटाची जरूर आहे, नाहींतर अशा स्थितींत दोघांचेही जन्मभर हाल होतात. सं.

२८. ७–२–२९

कृ. सा. न. वि. वि. ×× चे ३–२–२९ च्या अंकांत खालील प्रमाणें जाहिरात आहे तरी त्याविषयीं आपलें मत आम्हांस कळवण्याची कृपा करावी. "**संततिनियमनाकरतां रामबाण औषध**. अक्षय गुणकारी, कधींच फसत नाहीं. यानें अशक्त स्त्रियांची प्रकृति सुधारेल, आईचें दूध नासत नाहीं. एक पेटीस रु. १।, पत्ता......"

उ. ही जाहिरात निव्वळ फसवणुकीची दिसते. सं.

२९. १९–२–२९

सा. न. वि. वि. आपला फेब्रुआरी १९२९ चा अंक पोंचला. तो वाचून सुचलेले कांहीं विचार आपणास कळवीत आहें...१. 'प्रेमात्मक विवाह', लेखांक दुसरा, या लेखांत प्रेम या शब्दाची व्याख्या कोठें दिसत नाहीं, लेखांक १ मधें आली असल्यास माहिती नाहीं, नसल्यास आपले मताप्रमाणें प्रेमाचें अस्तित्व आपणांस मान्य असल्यास केव्हांतरी व्याख्या येईल अशी आशा आहे. २. पावित्र्या-

संबंधानें लिहून आलेल्या मजकुरांत पावित्र्य आणि शुद्धता या दोन अगदीं निरनिराळ्या कल्पना आहेत असें सांगितलें आहे, परंतु पावित्र्य म्हणजे काय तें सबंध लेख वाचला तरी समजत नाहीं. कौमार्याला दिलेली फाजील किंमत वेडगळपणाची आहे, परंतु थोडी अथवा मुळींच किंमत द्यावी अथवा नाहीं, किंवा दिल्यास वेडगळपणाच होईल किंवा काय. ३. संततिनियमनाची तिसरी आवृत्तीबद्दल जाहिरात वाचून संततिनियमन शब्दाचा अर्थ काय असावा याबद्दल वादविवाद झाला. कोणत्याही मराठी कोशांत अर्थ दिलेला असेल तर, किंवा आपले मताप्रमाणें हा शब्द काय दर्शवतो तें सवडीप्रमाणें कळवावें. माझे मताप्रमाणें गर्भधारणाप्रतिबंधशास्त्र इतकाच असावा...* * *

उ. १. ज्या पुस्तकाचा (Companionate Marriage) तो सारांश आहे त्यांत एक विशिष्ट प्रकारचा विवाह रूढ व कायदेशीर व्हावा असें सांगितलें आहे. त्या विवाहांत विशेष गोष्टी म्हणजे पतिपत्नींनीं वाटेल तितके दिवस संतति बंद ठेवणें, व संततिरहित जोडप्यास त्यांपैकीं एकाच्याही इच्छेनें घटस्फोट मिळणें, या आहेत. म्हणजे, कांहीं दिवस एकत्र राहून आपलें एकमेकांशीं पटेल अशी खात्री होईपर्यंत सर्व जोडप्यांनीं संतति बंद ठेवावी, व पटत नाहीं असें वाटल्यास घटस्फोट करतां येईल. सारांश प्रेम संपलें कीं विवाह संपायचा, असा आशय येण्याकरतां 'प्रेमात्मक विवाह' असें नांव आम्ही दिलें आहे. प्रेमाची व्याख्या वरील ग्रंथांत आहे असें वाटत नाहीं, परंतु त्याची सामान्य व्याख्या अशी देतां येईल कीं एखाद्या वस्तूचा किंवा माणसाचा आपणास शक्य तितका निकट व निरंतर सहवास घडावा असें वाटणें, याचें नांव प्रेम. प्रेमाचें अस्तित्व आम्हांस मान्य आहे इतकेंच नाहीं तर आमचे मतें प्रत्येक मनुष्यास कमीअधिक प्रमाणांत प्रेमाचा अनुभव येतोच. अर्थात स्वभावपरत्वें त्याचें आविष्करण वेगवेगळ्या प्रकारांनीं होईल. परंतु भटांनी लग्न लावलें कीं त्या दोन माणसांत प्रेम उत्पन्न झालेंच पाहिजे ही कल्पना हास्यास्पद आहे. प्रेम हें कर्तव्य झालें, कीं तें वेश्यांच्या प्रेमाच्या सदरांत जाईल. २. आपली शंका सदरहू लेखकाकडे पाठविली. ते उत्तरतातः 'पावित्र्याची प्रचलित कल्पना काय आहे व ती कशी चुकलेली आहे हेंच दाखव-

ण्याचा आमचा उद्देश होता. आमच्या मतें जेव्हां जेव्हां स्त्रीपुरुषांच्या पूर्ण संमतीनें व रोगप्रतिबंधाची व जरूर तर संततिनियमनाची पूर्ण काळजी घेऊन संयोग होतो, तेव्हां तेव्हां तो पवित्र म्हणजेच शुद्ध समजावा. मग त्यांचें लग्न व आजन्म प्रेम करण्याच्या आणाशपथा झाल्या आहेत कीं केवळ एकमेकांस कांहीं काळ सुख देण्याचाच त्यांचा हेतु आहे इत्यादि प्रश्नच उपस्थित होत नाहींत. लग्न झालें असून सुद्धां संमति नसेल ( मग वय कितीहि असो ) तर तो संबंध अनिष्ट व अपवित्रच होईल. हल्लीं नवऱ्याखेरीज कोणाही पुरुषाशीं, इच्छेनें किंवा इच्छेविरुद्ध संयोग झालेली स्त्री अपवित्र मानतात; हा अर्थ आम्हांस मान्य नाहीं. वळजवरी हा एक प्रकारचा अपघात आहे. ज्याच्या घरांत चोरी झाली व ज्याच्या झाली नाहीं अशा दोन माणसांत, किंवा ज्याचा पाय गाडीखालीं सांपडून मोडला व ज्याचा मोडला नाहीं अशा दोघांत आपण सामाजिक दृष्ट्या फरक मानीत नाहीं, त्याचप्रमाणें जिच्यावर वळजवरी झाली व जिच्यावर झाली नाहीं अशा दोन स्त्रियांत तेवढ्यामुळें फरक मानतां कामा नये. कौमार्याला आमचे मतें मुळींच किंमत देण्याचें कारण नाहीं. स्त्रियांवर मालकी चालवण्याची कल्पना नाहीशी झाली म्हणजे कौमार्याची किंमत आपोआप कमी होईल.'

फूल वापरल्यानें कोमेजतें, म्हणून अनाघ्रात पुष्पाला जास्त किंमत देणें किंवा अनाविद्ध रत्नाला नावीन्यामुळें किंमत देणें, याच तत्त्वावर आविद्धयोनि स्त्रीची महति समजणें चुकीचें आहे. अनेक स्त्रियांचा अनुभव घेतलेला कामशास्त्रांतील प्रसिद्ध इटॅलिअन तज्ज्ञ **कॅसानोव्हा** याला केवळ स्वार्थी उपभोगाच्या दृष्टीनें सुद्धां कौमार्याची किंमत वाटत नसे, इतकेंच नाहीं तर कुमारिकेचा नवशिकेपणा त्याला थोडा नडतच असे. येथीलही कांहीं तज्ज्ञांनीं आम्हांस असेंच मत दिलें आहे. २. 'संतति नियमन ' याचा अर्थ संतति नियमित ठेवणें, मर्यादेंत ठेवणें, फाजील वाढूं न देणें. हें दोन मार्गांनीं करतां येईल, एक गर्भधारणेचा प्रतिबंध करून, किंवा गर्भाचा पोटांतच किंवा उपजल्यावर नाश करून. दुसरा मार्ग बहुतेक सर्व देशांत गुन्हा समजला जातो. रशिया व स्वित्झर्लंदमध्यें मात्र तीन महिनेपर्यंत गुन्हा होत नाहीं. सं.

३० ५-३-२९

सा. न. वि. वि. आपण कामशास्त्राचा अभ्यास केला आहे असें एका मित्राकडून समजल्यावरून आपणांस लिहीत आहें. माझें वय २१ असून मी आय्. एस्. सी. च्या वर्गांत आहें. गेलीं पांच वर्षें मला मुष्टिमैथुनाची संवय जडली आहे. हल्लीं हें साधारणतः आठवड्यांतून दोनदां घडतें. शारीरिक दृष्ट्या मी यापासून खालावलों नाहीं, परंतु मानसिक दृष्ट्या खालावलों आहें असें वाटतें. शुद्ध ब्रह्मचर्यानें कसें रहावें हें मला कृपा करून कळवा. स्त्रीसमागमाचा मला अजून अनुभव नाहीं व त्याच्या उत्कट इच्छेमुळेंच मला या संवयीनें पछाडलें आहे....आपला × × ×

उ. स्त्रीसमागमापेक्षां मुष्टिमैथुनानें फारसें जास्त शारीरिक नुकसान होत नाहीं असें तज्ज्ञांचें मत आहे ( पत्र ३ चें उत्तर पहा ). या संवयीला खरा उपाय म्हणजे ( आरंभीं ) स्त्रीसमागमच होय, तथापि तें शक्य नसल्यास सुमारें २२ वर्षेंपर्यंत ब्रह्मचर्यानें फारसें नुकसान होणार नाहीं. याबद्दल विवेचन आमच्या 'संततिनियमन' पुस्तकाच्या पुरवणींत आहे. ब्रह्मचर्य शुद्ध किंवा पवित्र असतें हें खोटें आहे. स्त्रीसमागमानें किंवा मुष्टिमैथुनानेंही शरीर अपवित्र होतें ही वेडगळ कल्पना काढून टाका, म्हणजे मानसिक नुकसान होणार नाहीं. सं.

३१ २६-२-२९

सा. न. वि. वि. माझी पत्नी निवर्तल्याला कांहीं वर्षें झालीं. हल्लीं माझें वय चाळिसांवर आहे तरी मला समागमाची जरूर भासते. ही इच्छा कधीं कधीं अनिवार व त्रासदायक होते. मी वेश्यांकडे गेलेला आहें व रबरी पिशव्या वापरल्या आहेत, परंतु एकंदरींत मला हें पसंत नाहीं, कारण मला गुप्तरोगांची फार भीति वाटते. हा प्रांत रोगांचे दृष्टीनें फारच वाईट आहे. इंग्रजी समाजांत जशा स्नेहभावानें जवळ राहणाऱ्या स्त्रिया मिळतात, तशा आपल्यांत मिळत नाहींत. ही एक अडचण आहे व मला यावर उपाय सांपडत नाहीं. कांहीं असल्यास सवडीप्रमाणें लिहावें. आपला × × ×

उ. कामवासना चाळिसाच्या पुढें पुष्कळ दिवस टिकते. रोगप्रतिबंधाकरतां पिशव्यांवर अवलंबणें धोक्याचें आहे. याकरतां खात्रीचे उपाय उपलब्ध आहेत.

( 'जेलोटयूब'ची जाहिरात पहा. ) लग्नाशिवाय पुरुषांजवळ राहणाऱ्या स्त्रियांस इंग्लंडांतही सभ्य समजत नाहींत, व हिंदुस्थानांतही विलायतेप्रमाणेंच नोकरीस राहणाऱ्या बाया पुष्कळ वेळां हेंही काम करतात. आपल्याच दर्जाच्या स्त्रिया ज्यांस पाहिजे असतील त्यांस ही अडचण सर्वत्रच भासते व स्वैरसंभोगास समाजाची परवानगी नाहीं तोंपर्यंत ती भासणार. यूरोप, अमेरिकेंत सामाजिक निर्बंध शिथिल होत आहेत व येथेंही निःसंशय होतील, पण या गोष्टी एकदम होणें शक्य नसतें. सं.

३२.

## वेश्या नाहींशा होतील काय? ९-३-२९

कृ. सा. न. वि. वि. आपल्या मासिकांत वेश्यावृत्तीचा नायनाट करण्याच्या प्रयत्नांची हकीकत आपण दिलेली आहे व त्यावर आपलें ह्मणणेंही आपण देत असतां; तेव्हां प्रस्तुत ओळी प्रसिद्ध कराल अशी आशा आहे.

आमच्या मतें वेश्यावृत्ति ही अनादि आहे व जगाबरोबरच नाहींशी होईल. घरांतून वापरायच्या पाण्यापैकीं फालतू पाणी बाहेर जाण्यासाठीं जशा मोऱ्या असतात तसेंच समाजाच्या फालतु संभोगेच्छेच्या तृप्तीसाठीं वेश्यावृत्ति आवश्यक आहे. जातिवंत वेश्या नसतात तेथें ही तृप्ती समाजांत धुमाकूळ घातल्याशिवाय रहात नाहीं.

उदाहरणार्थ गुजराथेंत कित्येक स्थळीं वेश्यांचा असा समाज निराळा नाहीं तेथें ही तृप्ति विवाहित स्त्रियांकडून होत असते. संभोगेच्छाच अगोदर हवापाणी, सामाजिक घडामोडी इत्यादिकांप्रमाणें कमीजास्त तीव्र असते. उष्ण हवेंत ती तीव्र असते, ऐषआरामी जीवनानेंही ती वाढते. परदेशगमनाशिवाय ज्या समाजाचें चालत नाहीं त्यांत ती असते. केवळ पुरुषवर्गच परदेश गमन करूं लागला म्हणजे— आणि दीव, कोडीनार इत्यादि सौराष्ट्रीय भागांत ही परिस्थिति आहे—राहिलेल्या स्त्रियांच्या वांट्यास थोडेसेच पुरुष उरतात आणि त्याचा परिणाम प्रथम व्यभिचार ( हा शब्द पारंपरिक रीत्या वापरला आहे ) व मग वेश्यावृत्ति उत्पन्न झालीच.

आम्हीं ही स्थिति दीव वेटांत प्रत्यक्ष पाहिली आहे. समाजाची तूर्तची समजूत अशी आहे कीं त्याला व्यभिचार आवडतो पण त्याची प्रसिद्धी नको असते. व्यभिचाराचें व्यभिचारत्वच मुळीं या प्रसिद्धीवर अवलंबून आहे. स्त्रीवर्गांत व्यभिचाराची भीति पुढच्या गरोदर स्थितीमुळेंच असते. ती नष्ट झाल्यास व्यभिचाराचें निंद्य स्वरूप समाजाच्या दृष्टीनें तरी गेलें. ही परिस्थिति ज्यावेळीं जगांत उत्पन्न होईल तेव्हांच वेश्यावृत्ति नाहींशी होईल आणि विवाहाचें सामाजिक बंधनही बरोबरच जाईल. पण असें होणें इष्ट आहे काय? आपला, प्रो. वा. वा. सांवर्डेकर.

उ. आपल्या म्हणण्यांत बरेंच तथ्य आहे यांत शंका नाहीं, तथापि वेश्यावृत्तीचें मूळ पाहूं गेल्यास असें दिसतें कीं, संभोग ही घाणेरडी गोष्ट आहे व संभोगेच्छा लज्जास्पद आहे, ही वेडगळ समजूत वेश्यावृत्तीच्या मूळाशीं आहे. स्त्री ही देवता आहे, व स्त्री ह्मणजे अपवित्र वस्तु आहे, अशा दोन परस्परविरोधी समजुती व त्यांचे विसंगत परिणाम जगांतील जवळ जवळ सर्व समाजांत दिसून येतात. संभोगाचा घाणेरडेपणा या समजुतींवर अवलंबून आहे. मनुष्याच्या रानटी स्थितींतून या समजुती आलेल्या आहेत. जन्मदात्री म्हणून स्त्री अद्‌भुत झाली, व मासिक स्रावामुळें घाणेरडी झाली. अर्थातच या दोन्ही समजुती फोल आहेत हें आतांच्या शास्त्रीय युगांत स्पष्टच आहे. परंतु यामुळें संभोगाच्या नैसर्गिक क्रियेचें पाप झालें व ती अजीबात बंद करणें शक्य नसल्यामुळें या अडचणींतून मंत्राक्षतांनीं मार्ग काढावा लागला. या मंत्रांमुळें संभोग निष्पाप होतो असें मानणें म्हणजे गारोड्याच्या छूः मंतरानें काठीचा साप होतो असें मानण्यासारखेंच आहे, व अविचारी लोकच असें मानतील. ही घाणेरडेपणाची समजूत एकदां नाहींशी झाली म्हणजे स्वैरसंभोगांतील एक मुख्य अडचण गेली; कारण मग अविवाहित स्त्री जरी गरोदर झाली तरी त्यांत पाप राहणार नाहीं. नवऱ्याजवळ राहणाऱ्या विवाहित स्त्रियांस व्यभिचाराची मोकळीकच असते, कारण मूल झाल्यास तें नवऱ्यावर लादतां येतेंच. ही स्वैरवर्तनाची मोकळीक अविवाहित स्त्रियांस व विधवांसच कां मिळूं नये? अशी मोकळीक मिळाल्यास बहुतेक पुरुषांस आपली संभोगेच्छा वेश्यांशिवाय, प्रेमाच्या किंवा स्नेहाच्या जोरावर, तृप्त करतां येईल, व अर्थातच वेश्यांकडे जाणें हा मार्ग

हल्लींसुद्धां गौणच समजला जातो. ज्यांस इतरत्र मनसोक्त संभोग उपलब्ध नाहीं, असेच लोक वेश्यांकडे जातात व जाणार. परंतु तो उपलब्ध झाल्यास वेश्यांचें गिऱ्हाइक आपोआपच तुटेल व वेश्या कमी होतील. दीव बेटासंबंधीं आपलें वर्णन बरोबर असेल, परंतु 'थोडे पुरुष उरल्यामुळें प्रथम व्यभिचार व मग वेश्यावृत्ति उत्पन्न होते' हें आपलें म्हणणें सयुक्तिक दिसत नाहीं. पुरुष थोडे राहिल्यामुळें व्यभिचार वाढून त्या पुरुषांची सहजच तृप्ति होईल व वेश्यांची जरूरी राहणार नाहीं. वेश्यांचा धंदा अतृप्त पुरुषांवर अवलंबून असल्यामुळें अशा ठिकाणीं तो चालणार नाहीं; व सामान्यतः जेथें व्यभिचाराचें प्रमाण जास्त, तेथें वेश्यांचा धंदा चालणें कठीण कारण पुरुष केव्हांही वेश्यागमनापेक्षां व्यभिचारच पसंत करतात. ते तसें उघड कबूल करतील कीं नाहीं हा भाग वेगळा. विवाहाचें बंधन नाहींसें होणें इष्ट आहे काय ? असा आपला प्रश्न आहे. आमचे मतें हें अत्यंत इष्ट आहे. कायद्याच्या भीतीनेंच जे लोक चोरी करीत नाहींत, त्यांना आह्मी तरी किंमत देत नाहीं. ज्या स्त्रीपुरुषांच्या मनांत परस्पर प्रेम असेल त्यांस बंधनाची जरूर नसते, व तें नसल्यास त्यांना एकत्र रहावयास लावण्यांत काय फायदा ? अशा माणसांनीं शारीरिक व्यभिचार न केल्यास मानसिक तरी करतीलच. व्यभिचारानें होणारें नुकसान केवळ काल्पनिक आहे, कित्येक समाजांत तें पाप मानीत नाहींत व अशा समाजांचें कोणतेंही नुकसान होत नाहीं. बंधन नाहींसें झाल्यास व्यभिचार या शब्दाला कांहीं अर्थच राहणार नाहीं, जगांतील पुष्कळ पाप कमी होईल व खरोखर नुकसान कोणाचेंच न होतां लोक अधिक सुखी होतील. सं.

३३ १६-३-२९

सा. न. वि. वि.

मला डॉ...बाई यांनीं आपला सल्ला घेण्यास सांगितलें आहे. माझें वय ६० वर्षांचें आहे व माझी तिसरी बायको ४० वर्षांची आहे. बाकीच्या दोन बायका गेल्या. तिसऱ्या बायकोला १२ मुलें झालीं, पैकीं पहिलें, चौथे, सातवें व दहावें जिवंत असून त्यांचीं वयें २०, १५, १४ व ८ वर्षें आहेत. १२ वें मूल सात

महिन्यांचें होऊन १ महिन्यापूर्वी मेलें व बायको फार अशक्त झाली आहे. पुनः गर्भ राहिल्यास ती खात्रीनें मरेल, तेव्हां मला खात्रीलायक प्रतिबंधाकरतां औषध पाठवावें. आपले उपकार मी जन्मभर विसरणार नाहीं. आपला + + +

उ. माहिती पाठविली आहे. सं.

३४

सा. न. वि. वि. १९-३-२९

आज मुद्दाम पत्र लिहिण्याचें कारण कीं आपले लेख मला फारच आवडतात... मी आपल्याला माझी हकीकत कळवली होती त्यानंतर माझें व माझ्या बायकोचें या विषयावर बरेच वेळां भाषण झालें व तिलाही आपलें मासिक फार आवडतें, परंतु पूर्वी कळविल्याप्रमाणें तिला कामेच्छा फारच कमी आहे. माझी प्रकृती चांगली आहे व तिचीही आतां चांगली झालेली आहे. आज १ मुलगी झाल्याला ५ वर्षें पूर्ण झालें आहेत. व तिला आतां मूल पाहिजे अशीही इच्छा आहे, त्याचप्रमाणें जरी हल्लीं प्रकृति चांगली आहे तरी डॉक्टर असें सांगतात कीं दुसरें बाळंतपण झाल्याशिवाय प्रकृति पूर्वीप्रमाणें होणार नाहीं, तरी या बाबतींत आपणास जें काय वाटत असेल तें स्पष्टपणें कळवण्याची मेहेरबानी कराल अशी आशा आहे. आपल्याला जर कांहीं उपाय माहीत असेल ( कामेच्छा वाढवण्याकरतां ) तरीही कळवावा. आपला × × ×

उ. जिला मुळींच मूल झालें नाहीं अशा स्त्रीची प्रकृति एखादें मूल झाल्यानें सुधारण्याचा संभव असू शकेल, परंतु ज्यास्त मुलें झाल्यानें प्रकृति जास्त सुधारेल या म्हणण्यांत कांहीं तथ्य दिसत नाहीं. उलट गर्भावस्था व बाळंतपण हा थोडाबहुत धोक्याचा काळ असतो व पुष्कळ स्त्रिया बाळंतपणांत दगावतात. कामेच्छा वाढवण्यासाठीं पत्र २२ चें उत्तर पहा. सं.

३५. १६-३-२९

सा. न. वि. वि. ‘ पुष्कळ रतिप्रसंगीं पुरुषाकडून स्त्रीची तृप्ति होत नाहीं, पण कामशास्त्राचें थोडेंबहुत अध्ययन केल्यास असें होणार नाहीं ’ अशा अर्थाचा मजकूर समाजस्वास्थ्याच्या चालू अंकांत आहे. मेरी स्टोप्स यांनींही Enduring Passion या आपल्या नवीन पुस्तकांत यासंबंधीं चर्चा केली आहे. विशेषतः

आसन कोणतें असावें यासंबंधीं त्यांनीं थोडा मजकूर लिहिला आहे. पण त्यावरून नीट अर्थबोध होत नाहीं. तरी कायद्याच्या मर्यादेंत लिहिणें आपणास शक्य असल्यास पुढील अंकांत यासंबंधीं जास्त स्पष्टीकरण यावें. पुष्कळांस फायद्याचें होईल. कळावें. आपला × × ×

उ. स्टोप्सच्या पुस्तकांत दोन आसनांचा उल्लेख दिसतो. पैकीं एकांत पुरुषाचें वजन स्त्रीवर पडूं देण्याऐवजीं दोघांनीं कुशीवर निजावें असें सांगितलें आहे. दुसऱ्याची भाषा बरीच दुर्बोध आहे. परंतु या बाबतींत सर्वसाधारण नियम देतां येणार नाहीं. फेरपालट करून पाहून मग निवड करणें इष्ट आहे. यांतील मुख्य मुद्याची गोष्ट अशी आहे कीं पुरुषांचें उद्दीपन दृष्टिद्वारा सहज होतें, तसें स्त्रियाचें न होतां, त्यांस स्पर्शाची जरूर असते. या दृष्टीनें स्त्रीच्या शरीराचे कांहीं विशिष्ट भाग विशेष महत्त्वाचे असतात, विशेषतः ओष्ठ, चूचुक व योनीलिंग ( हें उत्थापनशील इंद्रिय स्त्रीच्या मूत्रद्वाराचे वरचे बाजूस असतें ). अशा तऱ्हेनें स्त्रीचें पुरें उद्दीपन होण्यापूर्वी समागम झाल्यास तिचें समाधान होणें शक्य नसतें, व तें न होतां ती अर्धवट उद्दीप्त स्थितींतच राहिल्यास तिच्या प्रकृतीवर अत्यंत अनिष्ट परिणाम होण्याचा संभव असतो. स्त्रिया समागमास जो थोडाबहुत कृत्रिम विरोध करीत असतात त्याचा या दृष्टीनें उपयोग असतो. शीघ्रपतनावर डॉ. स्टोप्स यांनीं एक उपाय सांगितलाच आहे. याशिवाय सुंता करणें हा एक उपाय आहे. यानें शिस्नाग्राची त्वचा उघडी पडल्यामुळें चिवट होते व त्यामुळें उद्दीपनास जास्त वेळ लागतो. सं.

३६. ४–४–२९

१. थोडाबहुत ताप असतांना किंवा ताप निघाल्यावरोवर समागमाची इच्छा होणें शक्य आहे काय ? व इच्छा झाल्यास समागम करावा काय ? तापांत किंवा इतर दुखण्यांत समागमानें आजार वाढेल किंवा शरीराचें नुकसान होईल काय ? टायफॉइडमधून बरा होत असलेल्या मनुष्यानें समागम केल्यावर आजार उलटून त्यांतच मेला अशी हकीकत कांहीं वर्षांपूर्वी ऐकली होती. २. आजारांत ( १०१–१०२ ताप असतां ) व बरेपणीं समागमाचा मेंदूवर व शरीरावर काय

परिणाम होतो ? समागमानें म्लानता येते काय ? ३. उपासांत समागम करावा काय ? व केल्याचा काय परिणाम होईल ? आपला × × ×

**उ.** १. इच्छा होणें शक्य आहे, परंतु त्याप्रमाणें वागणें इष्ट नाहीं. शरीरास कोणत्याही कारणानें थकवा किंवा क्षीणता आली असेल अशा वेळीं समागमानें नुकसानच होईल. २. निरोगी मनुष्य अतिरेक न करील तर त्याचें समागमानें कोणतेंही नुकसान न होतां तो शरीरास व मेंदूसही फायदेशीर होईल. समागमानें थकवा येत असल्यास अतिरेक होतो असें समजावें. ३. उपासानें क्षीणता आल्यास समागमानें नुकसान होईल. परंतु ज्यांस उपासानें क्षीणता येते त्यांनीं उपास करणें हा मूर्खपणा आहे...—सं.

३७ २३–२–२९

सा. न. वि. वि. कळविण्यास वाईट वाटतें कीं माझ्या बायकोच्या पोटांत उष्णवात असल्यामुळें साहजिकच गर्भावस्थेंत मुलांचें पोषण होत नाहीं व तीं बारीक व अशक्त निपजून तीन चार महिन्यांत मरतात...देशी वैद्य बाहेर गेल्यामुळें ती हल्लीं डॉक्टरणीकडून उपचार घेत आहे. पंचविसाव्या दिवशीं गर्भधारणेचा संभव नसल्यामुळें प्रतिबंधक उपायांशिवाय संयोग झाला, परंतु आज तीन दिवस उशीर झाला तरी मासिक स्रावाचा पत्ता नाहीं हें पाहून आश्चर्य वाटतें. तरी मासिक स्राव येण्याकरतां औषध उलट टपालानें पाठवून द्यावें, म्हणजे विनाकारण त्रास व खर्च होणार नाहीं, फार उशीर नसल्यामुळें असें औषध असलेंच पाहिजे अशी माझी खात्री आहे. विलंब होऊं नये म्हणून औषध लगेच पाठवावें. तें पोंचतांच सर्व किंमत व खर्च ताबडतोब पाठवीन. × × ×

**उ.** १. उष्णवात हें काय प्रकरण आहे हें आम्हांस माहीत नाहीं. आधुनिक वैद्यकांत हें नसतें. २ तीन दिवस उशीर झाला एवढ्यावरून गर्भधारणा असलीच पाहिजे असें नाहीं. तीन आठवडेपर्यंत उशीर झालेला आम्हांस माहीत आहे. ३. पत्र १ चें उत्तर पहा. ४ मासिक स्रावापासून अमूक दिवशीं गर्भधारणा होणार नाहीं ही समजूत चुकीची आहे. कांहीं दिवसांत संभव कमी असतो, पण असतो. सं.

३८. ८–४–२९.

सा. न. वि. वि. डच् कॅप वापरून पाहिली नाहीं, परंतु एकंदरींत संततिनियमनाच्या कोणत्याही कृत्रिम उपायांनीं दोन इंद्रियांच्या स्पर्शास अडथळा आल्यामुळें समागमसुखांत कमीपणा येईल असें वाटतें. अपूर्ण संभोग बरा असें कांहीं लोक म्हणतात, परंतु मला तर तें असाध्य व अनैसर्गिक वाटतें. त्यानें शरीरास इजा होणार नाहीं काय? २. स्त्रीपुरुषांमधील अनैसर्गिक संभोगाचे प्रकार, तसेंच समसंभोग, पशुसंभोग हेही संततिनियमनाचे खात्रीचे उपाय आहेत व हे फ्रान्समध्यें करतात असें म्हणतात. आपण यांचा पुरस्कार करतां काय? करीत नसाल तर कां नाहीं? ३ डच् कॅप, वड्या किंवा पिशव्या याशिवाय अलीकडे कांहीं उपाय निघाले आहेत काय? आपला ×××

उ. १. या सर्व उपायांचें विवेचन आमच्या 'संततिनियमन' पुस्तकांत केलें आहे. डच् कॅपनें स्पर्शास फारसा अडथळा येत नाहीं. अपूर्ण संभोगानें शरीरास इजा होते. २. नैसर्गिक संभोगापासून शरीराचा फायदा होतो व अनैसर्गिक प्रकारांपासून नुकसान होतें म्हणून आम्ही त्यांचा पुरस्कार करीत नाहीं. शिवाय या प्रकारांस बहुतेक देशांत गुन्हे मानतात. या बाबतींत फ्रान्सचें नांव ढोंगी इंग्रजांनीं बद्दू केलें आहे. वस्तुस्थिती अशी आहे कीं नैसर्गिक संभोगास फ्रान्समध्यें फारशी आडकाठी नाहीं. अविवाहित मुलींसही मुलें झालीं तरी तेथें विशेष वाईट समजत नाहींत. हें ढोंग इंग्लंडांतच जास्त आहे. शिवाय तेथें लोकांच्या नीतिमत्तेवर पाहरा असल्यामुळें तेथेंच हे अनैसर्गिक प्रकार फैलावलेले आहेत. यापेक्षां स्वैरसमागमास समाजाची परवानगी असलेली बरी नव्हे का? ३. संततिनियमनाचा सोपा व सोईचा उपाय अजून निघालेला नाहीं. सध्यां माहीत असलेला उत्तम उपाय म्हणजे डच् कॅप व वड्या दोन्ही वापरणें. सं.

३९. १४–४–२९

सा. न. वि. वि. आपल्या मासिकांत संभोग–कामरतिशास्त्राची चर्चा होत असल्यानें पुढील चार ओळी लिहित आहें. माझें वय आज वीस वर्षांचें असून

या वयांत मी वरील विषयासंबंधीं विचारणें म्हणजे थोडेंसें लज्जास्पद व धाष्टर्याचें आहे. १९२० सालीं शाळेंत असतांना आमच्या एका शिक्षकांनीं स्त्रीपुरुषसंबंध, त्यांतील रहस्य व त्यापासून प्रजोत्पादन या गोष्टींविषयीं माहिती सांगितली व त्याचा माझ्या मनावर भलताच परिणाम होऊन मला वीर्यनाशाची वाईट संवय जडली. त्याच्या दुष्परिणामांविषयीं म्हणजे अशक्तता, डोळे जळजळणें, काम न करणें यासंबंधीं मी लिहायला नकोच. मुष्टिमैथुन किंवा यासारखा दुसरा कांहींतरी प्रकार करून वीर्यपात झाल्याशिवाय मनाला समाधान वाटत नाहीं. १९२० ते २६ पर्यंत संभोगेच्छेपेक्षां वीर्यपाताचीच इच्छा जास्त होती व निदान ८ दिवसांनीं तरी हा प्रकार होत असे. याचे दुष्परिणाम एकसारखे भोगावे लागत असूनही आत्मसंयमन होत नाहीं आणि कळून वा न कळून या गोष्टी घडतात. या दोन वर्षांत स्त्रीसमागमाची इच्छा तीव्र वाढत गेलेली असून ब्रह्मचर्य दोन दिवसांपेक्षां जास्त वेळ पाळवत नाहीं. ब्रह्मचर्यपालनासाठीं जननेंद्रिय थंड पाण्यानें धुणें, स्त्रीविषयक कल्पना मनांत न आणणें, कडुनिंबाचा पाला खाणें, या माझ्या समजुतीच्या गोष्टी मी करून पाहिल्या, पण त्या सर्व निष्फळ ठरल्या असून माझा दिवसेंदिवस सर्वस्वी ऱ्हास होत आहे. याला प्रतिबंधक कांहीं उपाय आहे का? आतां एक दोन वर्षांत माझ्या विवाहाची तजवीज वडील मंडळी करूं लागणार; कदाचित् ती आजही लागली असेल. तर अशा स्थितींत विवाह करून स्वास्थ्य प्राप्त होईल, कीं न करतां? ही संभोगेच्छा सध्यां इतकी वाढलेली आहे कीं वेश्यागमन करून (कारण दुसऱ्या कोठें ही इच्छा तृप्त होण्याची सोय आहे?), समागमाचें सुख अनुभवावें असें पुष्कळदां मनांत येतें. या गोष्टीचा अनुभव घेतल्यास इच्छापूर्ति होईल कीं ती अधिकच वाढत जाईल! त्यापासून काय काय परिणाम होतील?...आ. ×××

उ. १ वीस वर्षांच्या मनुष्यानें यासंबंधीं प्रश्न विचारणें यांत कांहीं लज्जास्पद नाहीं व धाष्टर्यही नाहीं. २. मास्तरानें दिलेल्या माहितीचा असा परिणाम झाला असल्यास तो मास्तर मूर्ख किंवा बदफैली असला पाहिजे, योग्य रीतीनें माहिती दिल्यास असें होऊं नये. ३. स्त्रीसमागमाची इच्छा तीव्र वाढली आहे हें सुचिन्हच

आहे. यावरून स्वसंभोगानें फारशी इजा झाली असावी असें दिसत नाहीं. पत्र ३ पहा. संयमनास मदत म्हणून कडुनिंब किंवा दुसरें कोणतेंही औषध घेण्यांत नुकसान आहे. ४. स्त्रीसमागमाची इच्छा नैसर्गिक आहे व तो केल्यास इच्छा अधिकच वाढण्याचें कारण नाहीं. नियमितपणें अन्न खाणाराला नियमित भूक लागते. उपास करणारांस मात्र खाखा उठते. ५. विवाहानें नुकसान होण्याचें कारण नाहीं, परंतु कधींकधीं स्वसंभोग करणारांस स्त्रियासंबंधीं नपुंसकत्व येतें, व कधींकधीं ब्रह्मचर्यानें पूर्णनपुंसकत्व येतें. यासंबंधीं अमेरिकेंतील प्रसिद्ध तज्ज्ञ डॉ. रॉबिनसन यांनीं एका ४० वर्षांच्या धार्मिक मनुष्याची गोष्ट दिली आहे. तो निग्रही असल्यामुळें त्या वयापर्यंत त्यानें कडक ब्रह्मचर्य पाळलें. परंतु यावेळीं त्याचें एका २४ वर्षांच्या मुलीवर प्रेम बसून लग्न करावेंसें वाटलें. तेव्हां आपण नपुंसक आहों कीं काय हें जाणण्याकरतां तो डॉ. रॉबिनसनकडे गेला. त्यांस कांहीं शारीरिक व्यंग दिसलें नाहीं, परंतु स्त्रीसमागम शक्य होईल कीं नाहीं, हें नुसतें तपासून कळत नाहीं, प्रत्यक्ष अनुभवच घेतला पाहिजे, व भावी पत्नीचें नुकसान होऊं नये म्हणून हा अनुभव वेश्येकडे जाऊन घेतलेला बरा, असें त्यांनीं आपलें मत दिलें. परंतु तो धार्मिक मनुष्य असल्यामुळें हा उपदेश न ऐकतां त्यानें तसेंच लग्न केलें व नंतर आपण पूर्ण नपुंसक आहों असें त्यास समजलें व त्या बिचाऱ्या मुलीचें जन्माचें नुकसान झालें. पण धार्मिक लोकांस त्याची काय पर्वा ? आपला धर्म राहिल्याशीं कारण ! अशा प्रकारचा धर्म म्हणजे अनीतीचा कळस आहे. यापेक्षां वेश्यागमन शतपट बरें. त्या मनुष्यानें आत्मसंयमन केल्यामुळेंच त्यास नपुंसकत्व आलें असें डॉ. रॉबिनसन यांचें मत आहे. ६. वेश्यागमन करणें झाल्यास रोगप्रतिबंधक उपाय वापरणें जरूर असतें. सं.

४०. ३-४-२९

सा. न. वि. वि. मला बरेच वर्षांपासून स्वप्नावस्थेचा विकार आहे. सपत्नीक आहें तरी स्वप्नावस्थेचा कांहींच धरबंद नाहीं. प्रकृति साधारण बरी आहे. आपल्या पुस्तकांत दिलेल्या शस्त्रक्रियेनें ( रेतवाहक नलिकांचा छेद ) नियमन व स्वप्नावस्थेवर कायमचा गुण येऊन प्रकृति चांगली सुधारेल असें वाटतें. ऑपरेशन मुंबईस

होईल काय? खर्च किती येईल? दिवस किती मोडतील? ऑपरेशन स्वतः किती धोक्याचें? याशिवाय स्वप्नावस्थेवर दुसरा रामबाण उपाय आहे काय? आपला × ×

**उ.** या विकाराकरतां चांगल्या डाक्तराकडे जावें. आरोग्याच्या सामान्य नियमांकडे लक्ष द्यावें. डोंगरी हवेचा उपयोग होईल. येथें इतकें सांगणें जरूर आहे कीं स्वप्नावस्थेवर सरसकट ब्रोमाइड् देण्याची पुष्कळ डॉक्टरांस संवय असते. समागमाचें स्वप्न पडून, इंद्रियाचें उत्थापन होऊन रेतस्खलन होत असल्यास त्याचा उपयोग होईल, परंतु इंद्रिय शिथिल असतांच जर स्खलन होत असेल, तर त्यानें उलट नुकसान होईल. २. यावर शस्त्रक्रियेचा उपयोग होईल असें वाटत नाहीं. ३. अजमासें रु. १०० खर्च येईल, ८।१० दिवस मोडतील, मुंबईत होऊं शकेल.सं.

४१ ६–५–२९.

सा. न. वि. वि. स्त्रिया रजस्वला होऊन दुषीत रक्त दर महिन्यास वाहून शरीर साफ होतें त्याप्रमाणें मनुष्यास दुषित रक्त कोठें व कसें जातें. २. एखाद्या स्त्रीस मूल होत नसल्यास तिचे व तिचे नवऱ्याचे धातूस्राव तुम्हाकडे पाठविल्यास तुमचेकडून तपासून पुरुषत्व किंवा स्त्रीत्व आहे कीं काय कळवाल काय व ते कापडावर धरून पाठवल्यास चालेल काय? डॉक्टरावर आमचा भरंवसा नाहीं तुम्ही खात्रीनें कांहीं उपाय सुचवाल व फी पडल्यास काय घ्याल? ३. निओसालव्हरसान ९१४ ची किंमत काय? व त्या पिचंकारीचे दाम काय? ४. स्त्रीच्या गर्भाशयाच्या छिद्रावर चरबी चढून गर्भाशयाचे छिद्र चरबीमुळें बंद होते व त्यामुळें पोट रहात नाहीं हें खरें काय? व चरबी काढून टाकतां येते काय? सध्यां एवढें पुरे. आपला × × ×

**उ.** १. दर महिन्याला स्त्रियांचें थोडेंसें रक्त दूषित होऊन तें विटाळाच्या रूपानें बाहेर जातें ही कल्पनाच चुकीची आहे. गर्भधारणेची पूर्वतयारी म्हणून स्त्रीच्या गर्भाशयांत जास्त रक्त जमतें व ती न झाल्यास तें मासिक स्रावाचे रूपानें बाहेर पडतें. गर्भाला ज्या रक्ताचा उपयोग व्हायचा, तें दूषित असून कसें चालेल? २. पुरुषाचे रेतामधें रेतजंतु जिवंत आहेत कीं नाहींत हें सूक्ष्मदर्शक यंत्रानें रेत तपासल्यास समजतें, परंतु हें काम तेथल्या तेथेंच केलें पाहिजे, कापडावर धरून

पाठवून उपयोग नाहीं. कधीं कधीं हे जंतु मुळींच सांपडत नाहींत, कधीं मेलेले असतात, कधीं मरतुकडे असतात—ते चांगल्या स्थितींत असल्यासच सामान्यतः गर्भधारणा शक्य होईल. स्त्रीच्या स्रावांत शुक्रजंतूंसारखा कोणताही महत्त्वाचा भाग नसतो, तथापि या स्रावामुळें शुक्रजंतु मरतील कीं काय, हें समजणें शक्य आहे. हा स्राव आम्ल असल्यास ते मरतील व गर्भधारणा अशक्य होईल. ३. केमिस्टचा कॅटलाग मागवा. ४. आपण म्हणतां अशा तऱ्हेनें स्त्रिया वंध्या होतात असें वाटत नाहीं. कांहीं लठ्ठ स्त्रियांस मुलें होत नाहींत ही गोष्ट खरी, परंतु अशा स्त्रियांत बहुधा लठ्ठपणाचें व वांझपणाचें कारण एकच असतें, तें म्हणजे त्यांच्या बीजकोशाचें काय बरोबर होत नाहीं. त्याबरोबरच थायरॉइड् वगैरे इतर पेशींची मंदाई असते व त्यावर या दृष्टीनें उपाय केल्यास उपयोग होण्याचा संभव जास्त. शस्त्रक्रियांचे बाबतींत पुष्कळ वेळां जें यूरोप-अमेरिकेंत शक्य असतें तें येथें नसतें. सं.

४२. ६–५–२९

सा. न. वि. वि. १. प्रो. डायरच्या मतें संभोगापूर्वी बराच वेळ पुरुषानें शिस्नाग्रानें मदनछत्रावर घर्षण करावें, असें आहे. तसें झाल्यास स्त्रीमध्यें कामचेतना त्यांच्या म्हणण्याप्रमाणें होते. परंतु यापासून पुरुषास मुष्टिमैथुनासारखा अपाय होणें शक्य आहे कीं नाहीं? जर योनिमार्गांत चेतना होत नसेल तर मग वरच्या प्रमाणें करण्याचा फायदा काय? २. एका संभोगसमयीं स्त्रीबीजकोशांतील रेतजंतु किती बाहेर येतात? ३. गर्भधारणेनंतर गर्भाशयाचें तोंड अगदीं बंद होतें व त्यांतून बाहेर व बाहेरून आंत पोषक द्रव्याखेरीज इतर कोणतेंही द्रव्य जाऊं शकत नाहीं अशी माहिती एका पुस्तकांत दिलेली आहे. तर गर्भधारणेनंतर झालेल्या संभोगांत स्त्रीरज कसें बाहेर येतें? ४. तरुण पुरुषानें वृद्धा स्त्रीशीं समागम केल्यास पुरुषाची शक्ति जाते व आपल्यापेक्षां कमी वयाच्या स्त्रीशी संभोग केल्यास शक्ति येते अशी जुन्या सर्व वैद्यग्रंथांतून माहिती मिळते, याला शास्त्रोक्त आधार किंवा कारणें काय आहेत? ५. विटाळ कशाचा बनलेला असतो? तीं द्रव्यें कोठें उत्पन्न होतात व कोठें सांचून राहतो? व गर्भधारणेनंतर सुद्धां कांहीं स्त्रियांचा

विटाळ चालू असतो हें सर्व कसें व कां होतें? ६. शुक्र हें आपल्या पिशवींतून बाहेर सुटून तें प्रोस्टेट ग्लँडमधील पांढऱ्या रसांत मिसळतें व पुढें इतर कांहीं पेशींतील चिकट व तेलकट पदार्थाशीं एकजीव होऊन मग बाहेर पडतें असें डॉक्टरी बुकांत वाचण्यांत आलें आहे, तरी त्या रसांचा उपयोग काय? आपला + +

उ. मदनछत्र किंवा योनिलिंग हा भाग योनिमार्गापेक्षां अधिक उद्दीपनशील असतो ह्मणून प्रो. डायर यांनीं तसें सांगितलें असेल. अर्थात जेव्हां स्त्रीचें पुरें उद्दीपन झालें नसेल तेव्हां याचा उपयोग आहे. यापासून पुरुषास अपाय होण्याचें कारण नाहीं. २. स्त्रीबीजास रेतजंतु म्हणत नाहींत, रजोगोल म्हणतात, कारण त्यांस जंतूंप्रमाणें हालचाल नसते. दर महिन्यास एक—फार तर दोन—रजोगोल पक्व होऊन बीजकोशापासून सुटून वाहक नलिकांतून गर्भाशयांत उतरतात, व या सुमारास संभोग होऊन पुरुषाच्या रेतजंतूंशीं त्यांची गांठ पडल्यास दोहोंचा एकजीव होऊन गर्भ बनतो. रजोगोल संभोगाचे वेळीं बाहेर येतात असें नाहीं. ३. वरील उत्तर पहा. संभोगाचे वेळीं स्त्रीच्या स्रावाचा उपयोग योनिमार्गास स्निग्धता आणण्याकडे होतो यामुळें हा स्राव शेवटीं न होतां अगोदरच होतो, निदान होणें इष्ट असतें. त्याचा रजाशीं संबंध नसतो. ४. समागमाची गोष्ट बाजूला ठेवली तरी एकंदरींत वृद्धांस तरुणांच्या संगतीपासून फायदा होतो, व तरुणांचा तोटा होतो असें पुष्कळ शास्त्रवेत्त्यांचें मत आहे, पण त्याचें नक्की कारण समजलेलें नाहीं. ५. वरील पत्रास उत्तर पहा. हा सर्व बीजकोशाच्या अंतःस्रावाचा परिणाम आहे. याविषयीं अजून पूर्ण ज्ञान झालेलें नाहीं. ६. या रसांच्या मिश्रणानें वीर्यास वैपुल्य येऊन तें बुळबुळीत झाल्यामुळें त्याचा प्रवास सुलभ होतो. सं.

४३ ६—५—२९

सा. न. वि. वि. १. संततिनियमनाचे उपाय वापरून किंवा न वापरतां, मुलांमुलींस कोणत्या वयापासून अपाय झाल्याशिवाय समागम करतां येईल? २. कामवासना विकृत केव्हां समजावी? ३. सपिंडांच्या विवाहापासून—समगमापासून—नुकसान काय आहे? भाऊ बहीण, बाप मुलगी, किंवा आई आणि मुलगा यांना

समागमाची परवानगी कां नाहीं ? अशी परवानगी कोणास व कां असूं नये ? कामवासनेचा ( मदाचा ) विशिष्ट काळ सर्व प्राण्यांस असतो काय ? असा ऋतु मनुष्यास कधीं होता काय ? आपला × × ×

उ. १. मुलीस रजोदर्शनानंतर व मुलगे वयांत आल्यावर ( आवाज फुटणें, जननेंद्रियाचे आसपास केंस उगवणें वगैरे याचीं चिन्हें होत) समागमास हरकत नाही, त्यापासून अपाय होत नाहीं असें आधुनिक मत आहे. अर्थात् मुलगी १८ व मुलगा २१ वर्षांचा होईपर्यंत त्यांस मुलें होणें इष्ट नाहीं. तेथपर्यंत गर्भप्रतिबंध करावा. २. सामान्य नियमाबाहेरची कामवासना, म्हणजे नैसर्गिक समागम शक्य असतांहि स्वसंभोग, समसंभोग किंवा पशुसंभोग अधिक प्रिय वाटणें, किंवा अमर्याद वासना ही विकृत समजावी. अर्थात मर्यादा ठरवण्यास सामान्य नियम देतां येत नाहीं. दिवसांतून तीनदां नियमानें समागम करणारे पुरुषही असतात व असें कित्येक वर्षे करूनही त्यांस अपाय होत नाहीं, तेव्हां ती कामवासना अमर्याद म्हणतां येणार नाहीं. प्रकृतीस अपाय होईल तरच ती विकृति म्हणतां येईल. ३. सपिंडांच्या समागमापासून संतति झाली तरच नुकसान होण्याचा संभव आहे, एरव्हीं नाहीं. एखादा आनुवंशिक दोष आई व बाप या दोघांतहि असेल तर तो सामान्यतः मुलांत वाढत्या प्रमाणांत येतो असा अनुभव आहे व सपिंडांतच असें होण्याचा संभव जास्त असतो इतकेंच. सपिंडांच्या समागमास परवानगी न देणें हा कायद्याचा मूर्खपणा आहे; कारण असा कायदा अमलांत आणणें अशक्य आहे. विवाहास परवानगी न देणें योग्य आहे, कारण तेथें संततीचा प्रश्न येतो. परंतु हा कायदा अपुरा पडेल. वास्तविक पाहतां प्रत्येक लग्नापूर्वी वधूवरांस तपासून, सांसर्गिक रोग व आनुवंशिक दोष कोणते आहेत तें पाहून, मग परवानगी द्यायची कीं नाहीं हें ठरवलें पाहिजे. अशा प्रकारचा कायदा फ्रान्समधें व इतरत्रही करण्याचें घाटत आहे, व त्याची अत्यंत जरूर आहे. ४. कामवासनेचा विशिष्ट काल कांहीं प्राण्यांतच दिसतो. स्त्रियांचा मासिक स्राव हें त्याचेंच रूपांतर आहे व यावेळीं स्त्रियांस कामवासना जास्त असते. मनुष्याशीं साम्य असलेल्या कांहीं

बिनशेंपटाच्या वानरांतही मासिक स्राव आढळतो, यावरून मनुष्याच्या उत्पत्तीच्या अगोदरच तो वानर पूर्वजांत सुरू झाला असला पाहिजे असें दिसतें. सं.

४४. ८–५–२९

कृ. न. वि. वि. १. गर्भार बायको कशी नासावते ( गर्भपात ) व तिजला प्रतिबंध उपाय काय ? ( स्त्रीच्या खाण्यांत आलेल्या पदार्थांमुळें असा प्रकार होतो अगर नवऱ्याच्या वागणुकीमुळें होतो ? ) २. पहिल्याच प्रथम परंतु ५–६ दां नासावलेली बायको गर्भ धरूं शकेल का नाहीं ? व त्याचप्रमाणें न नासवणारी बायको नासावेल का नाहीं व नासावल्यास कां ? आपला × × ×

उ. १. नैसर्गिक गर्भपाताचीं कारणें अनेक असूं शकतील, तीं सर्व सांगतां येणार नाहींत. पुष्कळ वेळां पहिल्या महिन्याचे शेवटीं गर्भपात होतो व तो लक्षांतही येत नाहीं. पुष्कळ वेळां गर्मीच्या रोगामुळें होतो व शारीरिक किंवा मानसिक धक्क्यामुळेंही होईल. गर्भपाताकरतां जालीम औषधें घेऊनही पुष्कळ वेळां तो होत नाहीं, तेव्हां सामान्य खाण्याच्या पदार्थांनीं तो होणें शक्य दिसत नाहीं. संभोगानें गर्भाशयास धक्का बसणार नाहीं अशी खबरदारी घेतल्यास त्याचाही असा परिणाम होण्याचें कारण नाहीं. बायकोला झोडपणारा नवरा असल्यास या वर्तणुकीचा मात्र तसा परिणाम होणें शक्य आहे. २. पांच सहादां नासावणाऱ्या बायकोला गर्मी असण्याचा बराच संभव आहे. हें किंवा कांहीं इतर कारण असेल, तरी डाक्तराला दाखवून निकाल करून घ्यावा. बायको नासावली नाहीं तोंपर्यंतच ती ‘ न नासावणारी ’ असते. ती वरील कारणांमुळें नासावणें शक्य आहे. गर्मीमुळें गर्भपात होत असेल तर ती बरी झाल्यावर गर्भ टिकेल. गर्भपाताची संवय असलेल्या कांहीं बायकांस गर्भ राहिल्यापासून बाळंतपणापर्यंत आजारी माणसासारखें बिछान्यावर पडून राहिल्यानें मूल झाल्याचीं उदाहरणें आहेत. अर्थातच हें सर्वांस शक्य नसतें. सं.

४५. ९–५–२९

सा. न. वि. वि. सुमारें ३८–४० उमरीचे एक गृहस्थ आहेत, मनुष्य ताकदवान व बरोबरीच्या इसमांत चांगला दणदणीत आहे. रतिसुखाची इच्छा

तीव्र आहे. या गोष्टीस त्यांच्या पत्नीचीही ना नाहीं. अडचण आहे ती याच गृहस्थांची. यांचें जवळ जवळ प्रारंभीच वीर्यपतन होतें. दीर्घकालपर्यंत रतिविलासाचा मनमुराद आस्वाद घेतां यावा यासाठीं आपणास कांही उपाय सांगतां येईल काय? स्तंभक औषधी व उपचार आर्यवैद्यकाच्या पुस्तकांतून दिलेले आहेत, पण वनस्पतींचें व रासायनिक द्रव्यांचें ज्ञान व सुलभता नसल्यानें त्या गोष्टी निरुपयोगी ठरत आहेत. यासाठीं आपण सुचवाल ते उपाय सहजसाध्य असावे. खेडवजा ठिकाणींही ते संपादन करण्यास पंचाईत पडूं नये. थोडाबहुत खर्च करण्याची तयारी आहे. आपण जीं साधनें सुचवाल त्यांच्या किंमतीही कळवण्यास विनंति आहे. आपला* * *

उ. शीघ्रपतनावर मारी स्टोपस् यांनीं पुढील उपाय दिला आहेः—" दररोज शिस्नाग्रावरील त्वचा मागें ओढून तें साबणानें धुवून त्यावर पुढील औषध लावून त्वचा पुनः पुढें ओढावीः—१ औंस लिस्टरीन्, २० थेंब टिंक्चर बेंझॉइन्, १ औंस तुरटीची पूड, पाव औंस बोरिक ॲसिड्चे खडे. यांतील शेवटचीं दोन औषधें ८ औंस गरम पाण्यांत विरवावीं. तें थंड झाल्यावर पहिलें व नंतर दुसरें औषध त्यांत घालून हलवावें. दर वेळीं हलवून लावावें. हें सहा महिने वापरून उपयोग न झाल्यास पुढें वापरण्यांत अर्थ नाहीं." खेडेगांवांतील गैरसोयी आम्ही दूर करूं शकत नाहीं.

४६ १८–५–२९

सा. न. वि. वि...मला एका बाबतींत आपला सल्ला पाहिजे आहे. मीं आपण शिफारस केलेलें जेलोटयूब औषध निरनिराळ्या ५० वेश्यांकडे जाऊन वापरलें. मला एकदांही त्यामुळें रोग झाला नाहीं. परंतु यापूर्वी, म्हणजे मला या औषधाबद्दलची कांहीं माहिती नव्हती त्या वेळेस एकदां मृदुव्रण झाला होता. तो आठ दिवसांत बरा झाला. तेव्हांपासून शिस्नाग्राच्या मागच्या वाटोळ्या कडेवर अगदीं बारीक पुरळासारखे चामखीळ उठले आहेत, ज्याला इंग्लिशमध्यें warts असें म्हणतात. ते तसेच कायम होऊन बसले आहेत. त्यापासून मला कसलाच त्रास होत नाहीं. असें होण्याचें कारण व ते अजिबात नाहींसे करण्याचा उपाय कळवाल तर फार आभारी

होईन. एका व्हिनीरिअल स्पेशिॲलिस्टचा सल्ला घेतला. त्यानें ते कापावेत असें सांगितलें. कापण्याखेरीज आपणाकडे कांहीं उपाय आहे काय? नसेल तर कापणेंच हितावह होईल काय? त्यापासून कांहीं धोका आहे काय? का ते नसेच राहूं द्यावेत? इत्यादि गोष्टी कृपा करून लिहून कळवाव्यात. आपला * * *

उ. चामखिळांपासून त्रास होत नसेल तर कापण्याच्या भानगडींत पडूं नये. ते कशामुळें झालें हें सांगणें कठिण आहे. पुढील औषधानें फायदा होण्याचा संभव आहे व नुकसान होणार नाहीं. करून पहावें. मॅग्नीशिअम् सल्फेट व मॅग्नीशिअम् ऑक्साइड हीं दोन औषधें वजनानें सारख्या प्रमाणांत मिसळावीं, व त्या मिश्रणाची एक मोठी चिमूट दिवसांतून दोनदां जेवण्यापूर्वी पाण्यांतून घ्यावी. एक महिन्यांत उपयोग न झाल्यास सोडून द्यावें. सर्वांगावर मोठ्या चामखिळी उठतात त्यासुद्धां यानें पुष्कळ वेळां बऱ्या होतात. दुसरा उपाय म्हणजे विजेचा ( High-frequency Currents ), परंतु तो तज्ज्ञाकडून करावा. पुष्कळ वेळां एका बैठकींत काम होतें. सं.

४७. २३-५-२९

सा. न. वि. वि. १. कामशास्त्र मराठींत मिळेल काय ? कोठे ? किंमत ? काश्मीरी व जामनगरचें कोकशास्त्र तें खरें काय ? त्याचप्रमाणें इंग्रजी कोठें ? नांव व किंमत ? २. आपल्या मासिकांत पंढरीरायाला हांकलून सृष्टीला त्याचे जागीं बसवतां परंतु सृष्टीचे अबाधित नियम आहेत तर त्यावरून पुनरजन्म, महार, ब्राह्मण हा भेदाभेद सृष्टीच करते काय ? तिला मार्गदर्शक नाहीं काय व चैतन्य आपोआपच स्फुरतें काय ? विवेक व अविवेक जड वस्तुच निर्माण करिते का ? आपला नम्र XX.

उ. १. कामशास्त्र मराठींत किंवा इंग्रजींत मिळणें कठिण आहे. कोकशास्त्र आमच्या पाहण्यांत नाहीं, परंतु आधुनिक दृष्टीनें तें विशेष उपयोगी असेल असें वाटत नाहीं. २ सृष्टीला आम्हीं पंढरीरायाचे जागीं बसवीत नाहीं. सृष्टि हा एक शब्द आहे, कल्पना आहे, तिला वेगळें अस्तित्व नाहीं. सृष्टींतील नियम अबाधित असतात. सत्कृत्यांचें बक्षिस व दुष्कृत्यांची शिक्षा हीं सृष्टींत दिसत

नाहींत व हीं मनुष्याला हवींशीं वाटतात म्हणूनच त्यानें ईश्वर कल्पिला आहे. पुनर्जन्माच्याही कल्पनेचा तोच उपयोग. अशा कल्पनांनी विचारी माणसांचें समाधान होत नाहीं. जगांतील विषमतेमुळेंच ईश्वराची कल्पना विशेष हास्यास्पद वाटते. जड वस्तूंतूनच चेतनायुक्त प्राणी उत्पन्न झाले आहेत. हें आश्चर्य वाटेल खरें. परंतु विजेचें बटन दाबलें असतां दिवा लागणें हें काय कमी आश्चर्य आहे? व हें जड वस्तूंनींच होतें ना? महार व ब्राह्मण यांत नैसर्गिक भेद मुळींच नसतो. हा भेद मनुष्याच्या मूर्खपणामुळें झालेला आहे.

४८ जून १९२९

प्रश्न. वि. वि. माझें लग्न गेल्या फेब्रुवारींत झालें. माझ्या पत्नीचें वय १४ आहे. तिला शिकवावयाची माझी इच्छा आहे व त्याप्रमाणें मी सुरवात केली आहे. विचारप्रवण होण्यासाठीं तिला निदान ८।१० वर्षें शिकवावें लागेल. पण तेवढ्या अवधींत मूल झाल्यास सर्वच घोंटाळा होईल. म्हणून मूल होणें मला इष्ट नाहीं. पत्नीला शिकण्याची व मला शिकवण्याची जबर इच्छा आहे. ती ८।१० वर्षें शिकून सुविद्य झाली नाही तर मला आयुष्यांत गोडी वाटणार नाहीं. तिलाही तसेंच वाटतें ह्मणून आह्मी दोघांनीं संयमन करण्याचा निश्चय केला आहे. आतां हें संयमन आह्मां दोघांनाही कोणत्याही बाह्य उपायावांचून मनोनिग्रहानें अगदीं शक्य वाटतें. एकमेकां-वरच्या अकृत्रिम प्रेमानें हें शक्य आहे अशी माझी अनुभवानें खात्री झाली आहे. कारण अत्यंत उग्र व खडतर असें जें असिधाराव्रत तें मी गेले १५ दिवस पूर्ण आनंदानें व अगदीं श्रमावांचून पाळीत आहें. त्याला पत्नीचेंही अनुमोदन आहे. परंतु या गोष्टी पूर्णपणें स्वतःच्या इच्छेनें होत असल्या तरी यास कांहीं शास्त्रीय हरकत आहे काय? यानें कांहीं रोग होतील काय? याबद्दल मला आपला सल्ला पाहिजे आहे. मनांत कुढणें वगैरे कांहीं होणार नाहीं याबद्दल मी खात्री देतों. कारण मन मीं बरेंच निग्रही बनवलें आहे व शिकण्याच्या जबर इच्छेनें पत्नी पण तें बनवूं शकेल. तरी असें असूनही त्यांत कांहीं शास्त्रीय दोष असूं शकतील असें वाटतें ह्मणून आपणास विचारीत आहें.

**उ..** पत्नीला शिकवूं पाहणारांचे ब्रह्मचर्यांचेच काय, पण शिकवण्याचे बेतही पुष्कळ वेळां फसतात असें आम्हीं पाहिलें आहे. आपण आपले विचार पत्नीवर लादलेले दिसतात. एरवीं १४ वर्षांचे मुलीला आत्मसंयमनाची फारशी जरूर पडणार नाहीं. तरी पण असिधाराव्रत वगैरे प्रकार अत्यंत मूर्खपणाचे आहेत. अकृत्रिम प्रेमानें एकमेकांपासून अलिप्त राहण्यास मदत होते हें खोटें आहे. यापासून नुकसान झाल्याशिवाय राहणार नाहीं ( आमच्या ' संततिनियमन ' पुस्तकाची पुरवणी पहा. ) मनांत कुढणें न झालें तरी ब्रह्मचर्य राखण्याकरतां मनावर व शरीरावर जो ताण पडतो त्यामुळें हातून इतर कोणतेंही काम होत नाहीं. सारांश ब्रह्मचर्यापासून कोणत्याही प्रकारचा फायदा नसून तोटे मात्र अनेक आहेत. माफक समागमाचा परिणाम विशेषतः स्त्रियांचे प्रकृतीवर अत्यंत इष्ट होतो व ब्रह्मचर्य पाळणारी स्त्री दिवसेंदिवस सुकत जाते. नेमस्त समागम व कृत्रिम संततिनियमन हा एकच मार्ग आपणांस हितावह होईल. ब्रह्मचर्य हें एक पारंपरिक खूळ आहे व त्यानें वीस वर्षांचे पुढील पुरुषांचें अत्यंत नुकसान होतें. ते नपुंसक असल्यास मात्र नुकसान होणार नाहीं, परंतु नसल्यास या मार्गानें नपुंसक होण्याचा चांगलाच संभव आहे. अर्थात तसें झाल्यास ब्रह्मचर्य आपोआप पाळले जाईल हा एक फायदाही आहे ! सं.

४९. जुलै १९२९

**श्री.** संततिनियमन करण्यास मासिक खर्च किती येतो तें कळवावें. मेरी स्टोपसनीं महिन्यांतून स्त्रीस संभोगलालसा ६ दांच असते व तेव्हां ती पुरवावी असें म्हटलें आहे. त्याप्रमाणें आचरल्यास किती येईल तेंही कळवावें. + + +

**उ.** मारी स्टोपस यांनीं सहादां असें म्हटलें नाहीं, ' सहा दिवस ' म्हटलें आहे व त्यांचें हें ह्मणणें खरें नाहीं. शिवाय समागम एकट्या स्त्रीच्याच मर्जीवर कां रहावा हें समजत नाहीं. पुरुषांसही समान हक्क कां असूं नयेत ! आमचे मतें दोघांनींही तडजोड केली पाहिजे. केवळ शारीरिक दृष्टीनें पाहतां तर स्त्रीची इच्छा पुरवणें पुरुषास कधीं कधीं अशक्य होईल, तसें स्त्रियांचें होत नाहीं. शिवाय उसनें

अवसान आणल्याचे परिणाम पुरुषांचे प्रकृतीवर अत्यंत अनिष्ट होतात, तसे स्त्रियांचे प्रकृतीवर होत नाहींत. मारी स्टोपस् या स्त्री असल्यामुळें त्यांनीं तसें लिहिलें असावें व आम्हांस त्यांचें मत मुळींच ग्राह्य वाटत नाहीं. संततिनियमनाचा उत्तम मार्ग म्हणजे रबरी टोपी ( डच् कॅप ) व जंतुनाशक वड्या, पैकीं टोपीस रु. १॥ पासून रु. २॥ किंमत पडते व ती ६ महिने पासून वर्षभर टिकते. वड्यांची किंमत डझनास १२ आणे पासून रु. १॥ असते व दरवेळीं एक वापरावी लागते. कांहीं झालें तरी एक मूल वाढवण्यासही यापेक्षां जास्त खर्च येईल, मग अधिक झाल्यास प्रश्नच नाहीं. सं.

५०. गोवा, ५–६–२९

कृ. सा. न. वि. वि. १. बालविवाह केलेलीं लक्षावधि जोडपीं सुखानें संसार करीत असलेलीं दिसत आहेत. २. तसेच प्रीतिविवाहाचे हजारों खटले काडी मोड-ण्याकरतां कोर्टांत येत आहेत. ३. समागमस्वातंत्र्य म्हणजे वेश्याव्यवसाय नव्हे काय? ४. वेश्या जशी एकास सोडून दुसरा करिते, त्याचप्रमाणें समागगमस्वातंत्र्यानें होणार आहे. मग भेद काय राहिला? ५ समागमस्वातंत्र्यांत आपल्या नांवाचा, कुलाचा अभिमान राहणार नाही. ६. जोंपर्यंत स्त्रियांचें वय आहे तोंपर्यंत पुरुष मजा मार-तील. उतारवय झाल्यानंतर टाकून देतील. ७. लग्न झालें म्हणजे तिची अन्नवस्त्राची जबाबदारी पुरुषावर असते. ८. लग्न झालेल्या स्त्रीपुरुषांची नजर अन्य स्त्रीपुरुषावर गेली तर मनानें व्यभिचार घडतो म्हणून राजरोस व्यभिचार करण्यास मुभा असावी काय? ९ समागमस्वातंत्र्यानें माझें घर, माझी बायको, असा अभिमानच राहणार नाहीं. १०. लग्न करून एकमेकांस स्वातंत्र्याची मोकळिक देण्यापेक्षां लग्न न केलेलेंच चांगलें. ११ संततिनियमनाची जास्त मुलें होणारांस मात्र गरज आहे. १२. पुरुषांनी पिशवी वापरली म्हणजे स्त्रियांस वापरण्याची काय गरज आहे? १३. हिंदु-स्थानांत समागमस्वातंत्र्य सुरू होईल असें आपणांस वाटतें काय? १४. झुलु लोकांत स्त्रिपुरुष नग्न फिरतात तसें हिंदुस्थानांत फिरावें असें आपलें म्हणणें आहे काय? १५. कसेंही असलें तरी युरोपियनाप्रमाणें स्वातंत्र्य असणें योग्य होईल काय?

१६. संततिनियमनाचें व समागमस्वातंत्र्याचें खूळ कॉलेजांत सीरलें तर समाजस्वास्थ्य नांदेल असें दिसत नाहीं कारण पूर्वीपेक्षां सध्यां व्यभिचार अतिशय होत आहे. श्री.

उ. १. बारकाईनें पाहाणारास सुखी जोडप्यांचें प्रमाण अत्यंत कमी दिसतें. सर्व लोक दुःख उघड करून दाखवणारे नसतात. मुलें म्हणजे आईबापांची मालमत्ता नव्हे व त्यांचे पाहिजे तसे जन्माचे संबंध जोडण्याचा हक्क आईबापांस बिलकूल पोंचत नाहीं, हा बालविवाहांतील मुख्य दोष आहे. ते कधींच सुखी होत नाहींत असें नाहीं. २. विवाह करतांना दोघांचें प्रेम असलें म्हणजे तें जन्मभर टिकलेंच पाहिजे असे नाहीं. ३, ४. जी समागमाकरतां पैसे घेते ती वेश्या, अशी वेश्येची व्याख्या असल्यामुळें, पैसे घेतल्याशिवाय स्वैरसंभोग करणारी स्त्री वेश्या नव्हे. ५. एवींतेवीं बापाचें नांव मानीवच असतें, म्हणजे विवाहित स्त्रीचें मूल नवऱ्याचेंच आहे असें आपण धरून चालतों तें तसें असतेंच असें नाहीं. खात्री असते केवळ आईच्याच नांवाची, तेव्हां त्याचाच अभिमान बाळगावा म्हणजे झालें. कुळाला बापाच्याच नांवानें ओळखावें असें कोणीं सांगितलें ? ६, ७. जोंपर्यंत स्त्रियांच्या पोटाची व्यवस्था पुरुषांवर आहे तोंपर्यंत त्यांना समागमस्वातंत्र्य शक्यच नाहीं. पुरुष त्यांना आपली मालमत्ताच समजणार. स्त्रिया स्वतःचे पायावर उभें राहण्यास शिकल्या तरच स्वातंत्र्य शक्य आहे. ८. स्त्रीची व पुरुषाची खुषी असल्यास त्यांच्या आड कोणी येऊं नये व त्याला व्यभिचार अशी शिवी देण्याचें कारण नाहीं. मात्र त्यांच्या समागमामुळें अनिष्ट प्रजा किंवा रोगप्रसार होतां कामा नये. ९. घराप्रमाणें बायको व मुलें ही मालमत्ता नव्हे. अशा प्रकारचा अभिमान फुकट आहे. १० नये करूं पाहिजे तर. ११ संततिनियमनाची गरज स्त्रीच्या प्रकृतीकरतां किंवा सांपत्तिक स्थितीकरतांही लागते. जास्त मुलें म्हणजे किती ? आनुवंशिक रोग असेल त्यांस मुळींच मुलें होऊं नयेत. १२. आमचें 'संततिनियमन' पुस्तक पहा. १३ हिंदुस्थानांत होण्यास वेळ लागेल इतकेंच. हें शिक्षणाचें काम आहे. १४. सर्वांनीं नेहमीं नग्न हिंडावें असें आमचें म्हणणें नाहीं. व्यायामाकरतां व स्नानाकरतां नग्नता

इष्ट असते व व्यायाम उघड्या हवेंत केलेला बरा. हल्लीं हें शक्य नसतें. नग्नतेस समाजाची हरकत नसावी इतकेंच नव्हे तर व्यायाम व स्नान करतेवेळीं नग्न होण्याची चाल पाडली पाहिजे, कारण त्वचेच्या सर्व भागांस हवेची जरूर असते. निदान कपड्यांची सक्ती असूं नये. १५. ज्यापासून दुसऱ्याच्या स्वातंत्र्यास बाध येत नाहीं असें स्वातंत्र्य सर्वथैव योग्य आहे. १६. पूर्वीपेक्षां हल्लीं व्यभिचार वाढला हें खोटें. संततिनियमनास किंवा समागमस्वातंत्र्यास खूळ म्हटल्यानें तीं वाईट ठरत नाहींत. सं.

५१. १६–७–२९

सा. न. वि. वि. माझ्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तरांत आपण लिहिलेंत कीं (पत्र ३८ पंहा) नैसर्गिक संभोगापासून फायदा होतो व अनैसर्गिक प्रकारांपासून नुकसान होतें म्हणून आम्ही त्यांचा पुरस्कार करीत नाहीं...डच कॅप किंवा वड्या वापरणें नैसर्गिक आहे काय? समसंभोगापासून किंवा पशुसंभोगापासून कोणतें नुकसान आहे? मला वाटत नाहीं कीं नुकसान होत असेल म्हणून. यास गुन्हा मानला नसता तर आपण त्याचा पुरस्कार केला असता काय? संभोग-नियमन मुळींच करूं नये असें आपले मत आहे काय? एकंदरींत रेतस्खलन आपलें ध्येय आहे. तें कोणत्याही तऱ्हेनें कां होईना? रेतस्खलन झालें म्हणजे झालें. मुष्टिमैथुन केलें (अतिरेक न करतां) तर त्यांत आपल्याकडून हरकत होणार नाहीं? आपण असें करण्यास शिकवालच. या योगानें नैसर्गिक इच्छा नाहीशी होईल येवढीच आपल्याला भीति आहे—होईना कां? त्यांत कोणतें असें बिघडलें? त्यायोगें संततिनियमन तरी होतें ना? स्वैरवर्तन कोणतेंहि चांगलें नाहीं तर स्वैरसमागम समाजाचें स्वास्थ्य कसा टिकवील? स्वैरसमागमाची आपण कोणत्या तत्त्वावर उभारणी करतां? मुखपृष्ठ बायकांचेंच कां म्हणून? व तेंही नग्न? पोषाखही अस्वास्थ्य उत्पन्न करतो काय? मुखपृष्ठावर पूर्ण पोषाख (नग्ना-पेक्षां किंवा अर्धनग्नापेक्षां) असलेली बाई पाहिजे होती—कारण आपण अजून नग्नाचे पूर्ण पुरस्कर्ते झालां नाहींत, झाल्यास आपल्यालाही नग्नच रहावें लागेल. + + +

उ. संतापामुळें कल्पनांचा घोटाळा होतो तो असा. सर्वच अनैसर्गिक गोष्टी वाईट असतात असें नाहीं, उदाहरणार्थ विद्युत्प्रकाश. डच कॅप व वस्त्यांपासून नुकसान नसून फायदा आहे म्हणून आम्ही त्यांचा पुरस्कार करतों. नुकसान नाहीं एवढेंच कारण पुरस्कार करण्यास पुरेसें नाहीं. तेव्हां समसंभोग वगैरेपासून नुकसान नाहीं अशी कल्पना केली तरी त्यांचा पुरस्कार केला पाहिजे असें नाहीं.

परंतु त्यांपासून नुकसानही आहे. पुरुषांचा समसंभोग घेतल्यास, त्यांपैकीं जो स्त्रीची जागा घेईल त्याला पुष्कळ वेळां शारीरिक इजा होते असें एका फ्रेंच दाक्तरानें सप्रमाण सिद्ध केलें आहे, व यांत आश्चर्य नाहीं. दोन्ही स्त्रिया असल्यास असे नुकसान होण्याचा संभव नसतो. शिवाय, कांहीं लोक नैसर्गिक विषमसंभोगाचे अभावीं समसंभोगी बनतात, व कांहींची उपजत प्रवृत्तीच तशी असते, यामुळें ही गोष्ट पुरस्कारावर मुळींच अवलंबत नाहीं, व तो कोणी काय म्हणून करावा? स्वसंभोगाची गोष्ट थोडी निराळी आहे. याची सुरवात पुष्कळ वेळां हेतुपूर्वक नसते व पुढेंही ही संवय नैसर्गिक समागमाच्या अभावींच लागते. मुलांचीं व मुलींचीं वेगवेगळीं वसतिगृहें, तुरुंग, गलबतावरील खलाशी वगैरे ज्या ज्या ठिकाणीं स्त्रीपुरुषांस एकमेकांपासून अलिप्त रहावें लागतें, तेथें याचा फैलाव होतो. ही संवय पक्की लागल्यावर मात्र नैसर्गिक संभोग अपुरा वाटूं लागतो व तो उपलब्ध असतांही संवय कायम राहते. यामुळें असें दिसतें कीं भुकेला कोंडा या न्यायानेंच मनुष्य स्वसंभोगाकडे वळतो. तेव्हां सुग्रास अन्नाऐवजीं कोंडाच खावा असें ह्मणणारे आह्मी नसल्यामुळें याचा पुरस्कार करीत नाहीं. शिवाय अतिरेक न झाल्यास यापासून फारसें नुकसान नाहीं असें जरी तज्ज्ञांचें मत आहे, तरी नैसर्गिक समागमापासून होणारे फायदे त्यानें होत नाहींत, हें तरी नुकसानच नव्हे काय? पशुसंभोगाचीही गोष्ट अशीच आहे, तेव्हां वेगळा विचार नको. संभोगनियमन मुळींच करूं नये, ह्मणजे लोकांनीं करूं नये. ज्याचें त्यानें प्रकृतीच्या मानानें करावें, असे आमचें मत निःसंशय आहे. कोणाची भूक किती हें जसें समाजास ठरवतां येत नाहीं, व ठरवल्यास असह्य जुलूम होईल तद्वतच ही गोष्ट आहे. 'एकंदरींत रेतस्खलन आपलें ध्येय आहे' असे

# समाजस्वास्थ्य

आपण काय आधारावर ह्मणतां ? मानवी स्त्रीपुरुषांचा समागम केवळ शारीरिक नसतो, त्यांत मानसिक समाधानही लोकांस इष्ट वाटतें, तें रेतस्खलनानें होत नाहीं. आत्महत्या करून सुद्धां संततिनियमन होईल, परंतु त्याचा आम्ही पुरस्कार करीत नाहीं ! संततिनियमन इष्ट आहे, परंतु त्याचे सर्वांत सुलभ मार्ग कोणते हे पाहून त्यांचाच आम्ही पुरस्कार करणार. स्वैरवर्तन कोणतेंही चांगलें नाहीं ही आपली समजूत चुकीची आहे. स्वैर म्हणजे वाईट असें आपण धरून चालतां, परंतु प्रकृतीस जपणारा मनुष्यही स्वैरच वागत असतो. स्वैर म्हणजे स्वतःच्या मर्जीप्रमाणें वर्तन. तें वाईटच असतें असें समजल्यास सर्व माणसें बेअकली ठरतील व त्यांत आपलाही समावेश होईल. आजारी पडण्याइतकें खाणारे लोक एकंदरींत फारच थोडे असतात, तसेंच या बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य दिल्यास अतिरेक करणारे फारच थोडे निघतील. खाण्यापेक्षांही यांत अतिरेक होण्याचा संभव कमी, कारण यांत दोन माणसांची संमति लागते, निदान लागली पाहिजे. हल्लीं बायकांवर बळजबरी करण्याचा हक्क नवऱ्यास असल्यामुळें त्यांस अतिरेक शक्य असतो. विवाह ही संस्थाच वाईट आहे. गुलामगिरीची ज्यांस संवय झाली त्यांस स्वातंत्र्याची महति समजणें कठिण. आपण म्हणतां कीं मुखपृष्ठावर पूर्ण पोषाख असलेली बाई पाहिजे होती, म्हणजे हात पाय, तोंड सुद्धां झांकायचें, असेंच ना ? नसल्यास कां नाहीं ! पुनः एकदां सांगतों कीं होय, पोषाख अस्वास्थ्य उत्पन्न करतो. फाजील जिज्ञासा हें अस्वास्थ्य नव्हे काय ?

नग्नता ही रानटी आहे अशी आपल्यासारख्यांची कल्पना असते, ती चूक आहे. सॉक्रेटिसच्या वेळच्या ग्रीक लोकांस रानटी म्हणण्याचें धाडस कोणी करणार नाहीं, व तेव्हां नग्न व्यायामाची चाल होती. हल्लींचे जपानी लोक रानटी नाहींत, तेथील स्त्रीपुरुष एकमेकांसमक्ष नग्न स्नान करतात. फ्रान्स व जर्मनींत नग्न संघ निघाले आहेत. शोभा किंवा संरक्षण हाच केवळ कपड्याचा उपयोग आहे असें अमेरिकेंतील जज्ज लिंडसे म्हणतात. सोंवळ्या इंग्लंडांतील जगप्रसिद्ध लेखक एच्. जी. वेल्स यांनीं ‘ देवांसारखीं माणसें ’ वर्णन करतांना एका काल्पनिक देशांतील स्त्रीपुरुष पूर्ण नग्न रहात असत असें सांगितलें आहे. ही सुधारणेची उच्च पायरी असें त्यांचें मत आहे. आपणही डाक्टर असल्यामुळें आपणांस हें सहज समजलें पाहिजे

कीं, सर्व त्वचेस हवा न मिळेल तर ती सुस्थितींत रहात नाहीं. आम्ही नग्नतेचा पुरस्कार करतों तो या दृष्टीनेंच. नग्न राहण्याची सध्यां कोणास परवानगी नाहीं व असेल तरीही सक्ती असावी असें आम्ही म्हणत नाहीं व आम्ही तसें राहिलें पाहिजे असें ठरत नाहीं. सं.

५२. ८–८–२९

पुरुषानें स्त्री गर्भार राहिल्यावर किती महिनेपर्यंत संभोग द्यावा व त्यापासून स्त्रीचे गर्भास इजा होणार नाहीं, अशाबद्दल आपलें मत काय आहे ते प्रसिद्ध करावें. मनोवांछित संतति या पुस्तकांत स्त्रीचा विटाळ पहिल्या महिन्यांत बंद झाल्याबरोबर पुरुषानें संभोग करूं नये असें लिहिलें आहे.

उ. सामान्यतः पहिले आठ महिनेपर्यंत संभोगास हरकत नाहीं असें आधुनिक डाक्टरांचें मत आहे. 'सामान्यतः' ह्मणण्याचें कारण कधींकधीं त्यामुळे गर्भपात होण्याचा संभव असतो, परंतु अशा स्त्रिया फारच थोड्या असतात. हा संभव पहिल्या तीन महिन्यांतच जास्त असतो, व शेवटच्या महिन्यांत प्रसूति फाजील लवकर होण्याचा संभव असतो. गर्भावस्थेंत संभोगाचे वेळीं एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवावी लागते कीं गर्भाशयावर वजन पडतां किंवा त्यास जोराचा धक्का लागतां कामा नये. आपण ह्मणतां तें पुस्तक आधुनिक दृष्टीचें नाहीं. सं.

५३. ६–९–२९

स. न. वि. वि. संतानियमनाचीं तत्त्वें मान्य असूनसुद्धां पाश्चात्य कृत्रिम उपाय अमलांत आणण्यास पुष्कळांना कसेंसेंच वाटतें. अर्थात राहतां राहिलेला एकच एक नैसर्गिक उपाय ह्मणजे आत्मसंयमनाचा ! परंतु तो सर्वसाधारण माणसांना किती अशक्य आहे हें आपण अनेकदां सांगितलें आहेच. अशा परिस्थतींत पृथक्–शय्या हा प्रचार क्वचित गौण उपाय ह्मणून चांगला होईल असें मला वाटतें. कांहीं महिन्यांपूर्वी महात्मा गांधींनी एका अमेरिकन डॉक्टरच्या या विषयावरील पुस्तकावर अभिप्राय देतांना असें लिहिल्यांचें आठवतें कीं पतिपत्नी जवळ असतां संभोगाची वारंवार इच्छा होते; तरी होतां होईल तों त्यांनीं स्वतंत्र झोंप-

णेंच इष्ट आहे! आमच्या हिंदुसमाजांत तर गर्भाधान दिवसापासून तो दोघांपैकीं एकाच्या अंतापर्यंत पतिपत्नींची एक शय्या सुटत नाहीं. ह्यावर कित्येक वेळां हल्लींची महगता व जागेची टंचाई ही सबब पुढें आणण्यांत येते, परंतु तींत हांशील नाहीं...सर्व स्त्रियांनी मिळून एके ठिकाणीं व पुरुषांनीं दुसऱ्या ठिकाणीं असें झोंपलें असतां जागेच्या अडचणीची तक्रार रहात नाहीं. पृथक्-शय्येच्या आचरणानें इतर कांहीं फायदे दिसून येतात. अतिपरिचयानें, पतिपत्नींना रतिसुखाचें महत्त्व व माधुरी तितकीशी वाटत नाहीं. दुसरें असें कीं, भोगासाठीं स्त्रियांना अगोदर ' शास्त्रोक्त तयार ' करण्यास लागणाऱ्या उत्तेजक क्रीडा आमच्या ह्या रोजच्या जवळ झोंपण्यामुळें केल्या जात असतील किंवा नाहीं ह्याची शंका आहे. मला वाटतें वेश्येकडे जाण्याचें हेंही एक कारण असूं शकेल! आणखी एक फायदा घरांतल्या लहान मुलांबाळांच्या जात्याच कुतूहलवृद्धीला पतिपत्नींच्या एकत्र झोंपण्यानें जे वेडेवाकडे फांटे फुटतात त्यालाही आळा बसेल! पृथकशय्या सुप्रजाजननाच्या दृष्टीनें पुष्कळ फायदेशीर आहे. स्वामी शिवानंद ह्यांनीं आपल्या ' मनोवांछित संतति ' ह्या बहुमोल ग्रंथांत देखील सद्‌हु तत्त्वाचा अवलंब करण्यास उपदेश केला आहे. प्रस्तुत तत्त्वावर आपणही आपलें अधिकारी मत जरूर द्यावें. आपला...सु. य. जोशी.

उ. आत्मसंयमन नैसर्गिक आहे हें विधान चुकीचें आहे. भूक लागली असतां उपास करणें, झोंप येत असतां प्रयत्नानें जागें राहणें किंवा आत्मसंयमनानें कामवासना दडपून टाकण्याचा यत्न करणें, यांस नैसर्गिक कसें म्हणतां येईल? हीं कांहीं प्रसंगीं इष्ट असतील, तीं नैसर्गिक मात्र नव्हत. शक्य असल्यास पतिपत्नींच्या निजावयाच्या खोल्या किंवा निदान बिछाने वेगळे असावे हें मत आम्हांस मान्य आहे. परंतु सान्निध्यानें कामवासना जास्त होते या म्हणण्यांत वाटतें तितकें तथ्य नाहीं, कारण प्रारंभीं जरी तसें झालें तरी कालांतरानें कंटाळा येण्याचाच संभव जास्त. संततिनियमनास याचा बिलकुल उपयोग नाहीं. वेगळ्या खोल्या श्रीमंतांसच शक्य असतात, इतरांस नसतात. मुलांच्या कुतूहलासंबंधीं पाहूं गेल्यास पतिपत्नींनी दररोज वेगळें निजून एखाद्या दिवशींच एकत्र निजणेंच चमत्कारिक वाटण्याचा संभव जास्त. स्वामी शिव्यानंदांच्या मताचा विचार करण्याचें कारण दिसत नाहीं. सं.

# पत्रव्यवहार

५४. २४-९-२९

सा. न. वि. वि. बर्नार्ड मॅकफेडन हे एक सुप्रसिद्ध अमेरिकन गृहस्थ असून त्यांचें ' फिझिकल कल्चर ' हें मासिकही सर्वप्रसिद्ध आहे...हिंदुस्थानांतील सुशिक्षितांत त्याचा बराच प्रसार झाला असून त्यांतील मतांचा छाप आमचेवरहि पडूं लागला आहे. त्यापासून कांहीं फायदे झाले असले तरी तोटेही होत आहेत. त्यांतील प्रमुख तोटा म्हणजे अन्नाच्या बाबतींत होत चाललेली आमची गैरसमजूत होय. ड. मॅकफॅडन् यांनीं उपवासाचा व अल्पाहाराचा उपदेश केला तरी मनुष्यांतील सत्व व कार्यक्षमता कमी होऊं नये यावरही त्यांचा कटाक्ष आहे. म्हणून चरबीची फाजील वाढ न करणारे असे पौष्टिक पदार्थ ते सुचवतात...वास्तविक आम्हांस आहाराचे बाबतींत सर्वांपेक्षां जास्त सुधारणा करणें अवश्य आहे. पण ती करण्याचा मार्ग म्हणजे आहे तें सोडून उपासमार करावयाची हा नसून, योग्य पदार्थ आम्ही आहा-रांत घेतले पाहिजेत हा होय. आधींच फाजील कृश असलेलें शरीर जास्त अशक्त करण्याचा वेडेपणा हल्लीं बरेच लोक करीत आहेत. मॅकफेडन यांच्या उपदेशाच्या इतर अंगांकडे म्हणजे व्यायाम, मोकळी हवा, सूर्यस्नान–यांतही योग्य काळजी घेतली पाहिजे–इकडे त्यांनीं लक्ष अवश्य द्यावें, पण उपवास व अल्पाहार हा सर्वांस लागू असलेला नियम नाहीं. सी. वि. केळकर.

उ. सकस अन्न खाणें म्हणजे तूप मुबलक खाणें अशी पुष्कळांची कल्पना असते, ती खोटी आहे. कांहीं चरबी अन्नांत असणें जरूर आहे. परंतु विशिष्ट मर्यादेपलीकडे तिचा उपयोग नसून मेद वाढण्याचा संभव असतो. पचनाच्या व व्हिटॅमीन्सच्या दृष्टीनें तुपापेक्षां लोणी बरें व चरबीचा हिशोब करतांना त्यांत तेलही धरलें पाहिजे. धान्य, कंदमुळें, मांस, पालेभाज्या, दूध व अंडीं यांच्या योग्य प्रमाणांत मिश्रणालाच उत्तम आहार म्हणतां येईल. मॅकफॅडन यांच्या नजरेखालीं त्यांच्या उपदेशाप्रमाणें उपास करून एक सुदृढ मनुष्य प्राणास मुकला, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. सं.

५५. १८-९-२९

सा. न. वि. वि...पत्रव्यवहारांत ( पत्र ४८ पहा ) नमूद केलेलें ' असि-

धाराव्रत ' म्हणजे काय, असें एका बाईनीं आपणास विचारण्यास सांगितलें आहे... करतां सदर व्रत कोणत्या महिन्यांत कसें करणें व त्याचा वसा वगैरे काय तें सविस्तर कळविण्याची मेहेरबानी करावी. आपला × × ×

**उ.** आपटे यांच्या संस्कृत-इंग्रजी कोशांत असिधाराव्रताच्या दोन व्याख्या आहेत...यत्रैकशयनस्थापि प्रमदा नोपभुज्यते। असिधाराव्रतं नाम वदंति मुनिपुंगवाः॥ किंवा, युवा युवत्या सार्धं यत् मुग्धभर्तृवदाचरेत्। अंतर्निवृत्तसंगः स्यात् असिधाराव्रतं हि तत्॥ म्हणजे (१) एका शयनावर असलेलीही स्त्री उपभोगिली जात नाहीं (त्याला) मोठे मुनि असिधाराव्रत म्हणतात, किंवा तरुण तरुणीबरोबर अजाण नवऱ्याप्रमाणें आचरण करून संगापासून त्याचें मन दूर होतें, तें असिधाराव्रत. स्त्रीपुरुषांनीं एका शयनावर मधें नंगी तरवार ठेवून निजणें, असा याचा मूळ अर्थ असावा. वरील दोन्ही व्याख्यांत पुरुषाचे आत्मसंयमनासच विशेष महत्त्व दिलें आहे, तेव्हां या व्रतापासून बायकांस कांहीं पुण्य लागेल असें दिसत नाहीं! सं.

५६. २४–९–२९

आपण सप्तंबरच्या अंकांत माझें पत्र (पत्र ४६) प्रसिद्ध केलें आहे, त्यासंबंधीं आणखी कांहीं लिहिणें जरूर आहे. एका डॉक्टर मित्रानें माझें इंद्रिय पाहिल्यावर तो मोठ्यानें हंसला, व मला जे चामखीळ वाटत होते ते चामखीळ नसून ते उंचवटे नैसर्गिकच असतात असें सांगितलें. ज्या डॉक्टरानें ते कापावे असें मत दिलें होतें त्यानें मुळीं ते पाहिलेच नव्हते! माझें अज्ञान नुकतेंच उघडकीस आलें म्हणून बरें, नाहींतर मला अतिशय मानसिक त्रास झाला असता. इतरांस असा भ्रम होऊं नये म्हणून या पत्राचा सारांश प्रसिद्ध करावा. आ. × × ×

५७.

न. वि. वि....माझ्या एका मित्रास परवां असें आढळलें कीं, त्याच्या इंद्रियास पुढें बोंडापाशीं सूज येऊन तें लाल झालें आहे आणि त्यांतून किंचित पू निघत आहे. लाल होऊन आठ दिवस झाले. पू परीक्षा केल्यावरून तो गनोरिआ आहे. पण फार सौम्य संसर्ग असावा असें डॉ. चें मत पडलें. संसर्ग कुठला भोंवला हें

नक्कीं ठरवतां येत नाहीं. ते डॉक्टर औषध देत आहेत. पण माझा तुमच्यावर विश्वास असल्यानें, तज्ज्ञता आणि प्रामाणिकपणा दोहींतही आपल्यावरच त्यानें अवलंबून रहावें म्हणून मी अभिप्राय दिला. तरी आपण आपल्याला जें उत्तम वाटेल तें औषध धाडावें. अजून रोग पहिल्या अवस्थेंत आहे. थोडीशी जळजळ होते, अगदीं थोडी. किंचित पू येतो. लघवीला त्रास होत नाहीं, सूज आणि लालपणा जात आहे. तरी काय तें औषध त्वरित व्ही. पी. नें धाडावें, पण पार्सलवर कांहीं औषधाचें नांव लिहूं नये...त्याचप्रमाणें खालील प्रकरणीं अभिप्राय कळवावा आणि हवेंतर त्याचें मोल त्या व्हीपींतच सामील करावें:–( १ ) माझा मित्र ज्याला औषध हवें तो २५।२६ वर्षांचा आहे. त्याला पू निघालेला दिसला त्याच दिवशीं त्याचा एका बारा तेरा वर्षे वयाच्या मुलीशीं संबंध झाला, मग त्यास पू कळला. तेव्हां त्याच्या ह्या संबंधानें त्या मुलीला, निरपराध बिचारीला, हा रोग लागेल कीं काय ? अगदीं पहिल्याच संसर्गाला रोग लागतोच कीं नैसर्गिक शक्तीमुळें तो पुष्कळ वेळां लागतही नाहीं संभोग झाला तरी ? ( २ ) जर त्या मुलीला तो रोग होणारच ठरलें तर तो होण्याचे आधीं तो मुळींच टाळण्यास आतां काय औषध द्यावें, किंवा झाला तर तत्काळ बंद करण्यास काय औषध द्यावें, तें धाडावें. ( ३ ) आपण जेलोटयूब पुरुषांसाठीं प्रतिबंधक ह्मणून दिलेंत पण स्त्रियांनीं बचावण्यासाठीं काय युक्ती योजावी? पुरुषाला रोग असल्यास त्याच्याशीं स्त्रियांना संग करतां येणें शक्य करण्यासारखी युक्ति नाहीं कां ? संग करूनही रोग टाळण्याची ? ( ४ ) आपल्या पुस्तकांत आपण सिफिलिस बरा करतां येण्यासारखा रोग लिहितां, पण गनोरिआही तसा नाहीं काय ? ( ५ ) आपलें जेलोटयूब जवळ असतांही विश्वासानें तें वापरलें नाहीं ह्मणून ह्या तरुणाला रोग झाला. घरच्याच संबंधीं झालासें दिसतें. पण नक्की ठरवणें कठिण. पण वरच्या मुलीचें मात्र कारण असणें शक्य नाहीं. तिला तो रोग नाहीं. आणि त्याच दिवशीं पू दिसला, आणि आधीं दोन तीन दिवस त्या तरुणास सूज होती. पण शंका नसल्यानें त्यानें त्या मुलीच्या आग्रहानें संबंध केला. ( ६ ) कोणास एकदां गनोरिआ झाला कीं मग त्याला पुन्हां संग जन्मभर करणें अशक्य आहे कीं काय ?

त्याच्या संसर्गानें निरपराध स्त्रियांना तो लागूं नये म्हणून ? या दोन्ही अडचणी टाळतां येतील का पुन्हां ?

उ. औषधांचे बाबतींत दाक्तराचाच सल्ला घ्यावा. १. पू वहात असल्यास संसर्ग होण्याची जवळजवळ खात्रीच असते. २. हेंही दाक्तर करूं शकेल. पत्राचें उत्तर जाऊन उपाय करण्यास वेळ नसतो. ३. स्त्रियांकरतां प्रतिबंधाचे मार्ग आमच्या ' गुप्तरोगांपासून बचाव ' या पुस्तकांत दिलेले आहेत. ४. गनोरिआ ( परमा ) ही बरा होतो. ५. आपलें वर्णन बरोबर असल्यास त्या मुलीपासून संसर्ग झाला असें दिसत नाहीं. ६. रोग बरा झाल्यावर समागमास हरकत नाहीं. तेथपर्यंत समागमाचा प्रसंगच आल्यास जाड रबरी पिशवी वापरावी. सं.

५८. २७–१०–२९

सा. न. वि. वि. माझी अशी कल्पना होती कीं आपल्या पुस्तकांत सर्व प्रकारचे गुप्तरोगांविषयीं माहिती असेल, म्हणजे उदाहरणार्थ मुष्टिमैथुन वगैरेसंबंधीं... मला माझ्या १३ व्या किंवा १४ व्या वर्षीं ही संवय आपोआप, अर्थात कुतूहल उत्पन्न होऊन, लागली. तेव्हांपासून आतांपर्यंत–माझें वय २३ चालू आहे–तशीच चालू आहे. मला यांतून फार सुटावेंसें वाटतें परंतु कांहीं एक चालत नाहीं. प्रथम मी हाताचें साहाय्य घेत असें, हल्लीं पालथें पडून करतों. मला स्त्रीसमागम करण्याची उत्कट इच्छा आहे. माझें अजून लग्न न झाल्यामुळें वेश्येशिवाय दुसरा मार्ग उरला नाहीं. मला माझ्या पौरुषत्वाची शंका येत आहेच. त्या शंकेचें निरसन करण्याकरतां वेश्येकडे जाणें भाग आहे. परंतु येथें चांगल्या वेश्या नाहीत व त्यांचेपासून रोगाची भीती व माझे पालक मला लग्न करण्याबद्दल घाई करीत आहेत, पण त्यांना माझा रोग माहीत नाहीं व मी लग्न करण्यास धजावत नाहीं. तेव्हां अशा स्थितींत काय करावें ? मी माझी प्रकृति पुण्यांतील एका प्रसिद्ध डॉक्टराकडून तपासून घेतली व त्यांना शरीरांत कांहींच दोष सांपडला नाहीं, व त्यांनीं बेलाशक लग्न करावें असें सांगितलें. तरीपण एखाद्या स्त्रीशीं संभोग करून पौरुषत्व अजमावल्याशिवाय लग्न करण्याची माझी छाती होत नाहीं. वेश्येशिवाय या कामाकरतां स्त्री मिळवणें कठिण

व वेश्येपासून रोग होण्याची भीति, तेव्हां मी आपलें जेलोटयूब औषध घेऊन वेश्येकडे जावें काय? (२) मला स्त्रीसमागम नीट रीतीनें होऊं लागला व पुढें लग्न केलें तर मुलें होतील किंवा नाहीं? (३) माझे वीर्य सकस असें इतक्या वर्षांच्या संवयीनंतर राहूं शकेल कीं नाहीं? (४) नसल्यास त्यावर कोणतें औषध घ्यावें? (५) औषधानें वीर्य सकस बनेल किंवा निरनिराळ्या आसनांनीं व व्यायामांनीं बनेल? + + +

उ. मुष्टिमैथुन ही वाईट संवय आहे, रोग नाहीं, म्हणून आमच्या पुस्तकांत उल्लेख नाहीं. संवय औषधानें बरी होणार नाहीं, त्याला मनोनिग्रहाची आवश्यता आहे. पौरुषाबद्दल शंका असल्यास अनुभव पाहणें बरें. व जेलोटयूब वापरणें जरूर आहे. (२) मुलें होतील कीं नाहीं, निदान या दृष्टीनें आपल्या वीर्यांत कांहीं दोष आहे कीं काय, हें डॉक्टर सूक्ष्मदर्शक यंत्रानें तपासून सांगूं शकतील. (३) अजूनही वीर्य सुस्थितींत असणें शक्य आहे. (४,५) या प्रश्नांचीं उत्तरें आपणास तपासणाऱ्या डॉक्टरासच देतां येतील. सं.

५९. १५-११-२९

सा. न. वि. वि. आज माझें वय २७ वर्षांचें आहे. १५ पासून २२ पर्यंत मुष्टिमैथुनाची संवय होती...शरीर निर्बल होऊन इंद्रियास शिथिलता आली आहे. इंद्रिय बारीक झालें आहे, परंतु कामवासना मात्र कमी नाहीं. तेव्हां इंद्रियाची वृद्धि होण्याला + + + कंपनीच्या ऑइंटमेंटचा उपयोग होईल काय? किंवा दुसरें औषध असल्यास कळवा. × × ×

उ. इंद्रिय मोठें होण्यासाठीं मलमाच्या जाहिराती निव्वळ फसवणुकीच्या असतात. एकंदर प्रकृती सुधारल्यास इंद्रिय पूर्वस्थितीवर येईल, त्यास वेगळें औषध लागत नाहीं. सं.

६०. नवंबर १९२९.

सा. न. वि. वि. मी ७ वर्षांचा असतांना शाळेंत माझी एका बऱ्याच मोठ्या मुलाची दोस्ती झाली. मी बराच देखणा आहें व हा मुलगा थोडासा स्त्रैण प्रकृतीचा असून लोकांनीं आपलें चुंबन वगैरे घेऊन आपले लाड करावे असें त्यास वाटत असे.

त्यानें माझ्याशीं सलगी केली व अज्ञानामुळें मी त्याला बळी पडलों. तो माझ्या इंद्रियाशीं मन मानेल तसा खेळत असे व मी त्याला प्रतिबंध केला नाहीं. हा प्रकार मी १७ वर्षांचा होईपर्यंत चालू होता. अर्थात यापूर्वीच माझें रेतस्खलन होऊं लागलें होतें व वरील प्रकार दिवसांतून दोन तीन वेळां चालू असल्यामुळें मी अगदीं अशक्त झालों. इतक्यांत सुदैवानें तो तेथून गेला, परंतु मुष्टिमैथुनाची संवय मला चांगलीच जडली. पुढें एक दोन वर्षांत लघ्वीचे किंवा शौचाचे वेळीं रेतस्राव होऊं लागला इतकेंच नव्हेतर कोणत्याही पदार्थाचा किंचित स्पर्श झाल्या बरोबर स्राव होई. हा प्रकार एक महिना चालला तेव्हां मी घाबरून जाऊन मुष्टिमैथुन बंद केलें व चहा व उष्ण पदार्थ खाण्याचें बंद केलें. चांगलीं पुस्तकें व चांगली संगत यांचे साहाय्यानें मी सहा महिन्यांत जवळजवळ बरा झालों. परंतु मला मानसिक दौर्बल्य होतें. स्त्री दृष्टीस पडली, तिचा आवाज, फार काय तिच्या कपड्याचा आवाज जरी मी ऐकला तरी मनांत वासना उत्पन्न होई. अशावेळीं मी एखाद्या स्त्रीवर हातही टाकला असता, पण ईश्वराला माझी काळजी म्हणून तसें झालें नाहीं. मी धार्मिक पुस्तकें वाचलीं, करमणुकीचे अनेक मार्ग पाहिले, थोडाबहुत प्रवास केला व तीन वर्षेपर्यंत मन ताब्यांत ठेवलें, पण शेवटीं मी हरलों. पूर्वीच्या संवयीमुळें माझें इंद्रिय अगदीं लहान झालें होतें. या सुमारास माझ्याच वयाच्या एका इसमाचें इंद्रिय माझ्या दृष्टीस पडलें तें माझ्यापेक्षां इतकें अधिक जोमदार दिसलें कीं मला माझ्या इंद्रियाच्या सामर्थ्याबद्दल शंका येऊं लागली. आपल्यामध्यें कांहीं पौरुष राहिलेंच नाहीं व स्त्रीसमागम आपणास करतां येणार नाहीं अशी भीती वाटूं लागली. व शेवटीं याचा माझ्या मनावर इतका परिणाम झाला कीं आतां कांहीं झालें तरी आपलें सामर्थ्य एकदां अजमावून पाहिलेंच पाहिजे, त्याशिवाय गत्यंतर नाहीं असें वाटून मनाला सारखी हुरहुर लागून मी एकसारखा त्याचाच विचार करीत प्रत्येक स्त्रीकडे कामुक दृष्टीने पाहूं लागलों. शेवटीं माझ्या २१ व्या वर्षी, मी ज्याची वाट पहात होतों अशी संधि मजकडे आपोआप चालून आली. मी देखणा असल्यामुळें एक मुलगी मजवर भुलून तिनें समागमाची इच्छा दर्शवली व मी कबूल केलें. प्रथम भेटीला प्रयत्न फोल झाल्यामुळें मी तिला पुनः गांठून पुनः एकदां संधि देण्याबद्दल विनवून सांगितलें व तिनें कबूल केलें, तेव्हां

यश तर मिळालें, परंतु इंद्रिय लहान व अशक्त असल्यामुळें पुरेसें समाधान झालें नाहीं असें तिनें सांगितलें. तरीही आमचा संबंध आठ दिवस चालू होता, व त्यानें माझी प्रकृति अत्यंत खालावली. त्यानंतर आमची पुनः भेट झाली नाही. ती वेश्या नाही, व ही गोष्ट तुह्मी गुप्त ठेवाल अशी आशा आहे. या संबंधामुळे माझा सर्व उत्साह नाहींसा होऊन मी अत्यंत निराशावादी बनलों आहे. त्याचे इतर परिणामही वाईट झाले. आतां मला स्त्रियांशिवाय कांहीं दिसतच नाहीं. कोणत्याही स्त्रीकडे मी अदबीनें न पाहतां कामुक दृष्टीनेंच पाहतों. स्त्रियांस मातृसमान मानण्याची माझ्यांत शक्तीच नाहीं. कोणत्याही स्त्रीच्या सांनिध्यानें माझें उत्थापन होतें व इंद्रियांतून पातळ वीर्य बाहेर येतें. उत्थापन क्षणभरही टिकत नाहीं व वीर्य पातळ होत चाललें आहे. इंद्रिय अत्यंत लहान असल्यामुळें स्त्रीला मी अप्रिय होईन या भीतीनें मी लग्न लांबणीवर टाकलें आहे. उत्थापनही पूर्ण होत नाहीं व फार वेळ टिकतही नाहीं, पण वारंवार मात्र होतें; व कधीं कधीं तें होतांच वीर्यस्खलन होतें. तेव्हां ( १ ) हें कसें बंद करतां येईल? (२) वीर्य पुनः घट्ट व प्रजाजननास योग्य कसें होईल? (३) इंद्रिय मोठें कसें होईल? ( ४ ) मी लग्न करावें काय? ( ५ ) मी हल्लीं × × × गोळ्या घेतों त्या तशाच घेऊं काय?

उ. आपणास फाजील भीती वाटत आहे, परंतु आपली प्रकृति योग्य उपचारानें ताळ्यावर येण्यासारखी आहे. आपणांस एखाद्या विश्वासू डाक्तराकडे जाणें शक्य असल्यास त्यापेक्षां चांगला मार्ग नाहीं, कारण आपणांस केवळ पोटांत औषध घेऊन भागणार नाहीं. परंतु अशा रोग्यांचे बाबतींत डाक्तरही पुष्कळ वेळां चुका करतात, म्हणूनच खालील सूचना केल्या आहेत. आपणास 'ब्रोमाइडस' चा उपयोग नाहीं, 'स्ट्रिक्नीन् सल्फेट' देणें जरूर आहे; व त्याबरोबरच 'हैड्रॅस्टीन् हैड्रोक्लोराइड्' व 'अर्गोटीन' द्यावें. यापैकीं 'स्ट्रिक्नीन' जास्त महत्त्वाचें आहे व तें दिवसांतून तीनदां $\frac{1}{60}$ ग्रेन पासून सुरवात करून $\frac{1}{15}$ ग्रेन पर्यंत जरूर पडल्यास वाढवावें. शिवाय इंद्रियाचे खालचा ( मलद्वारापर्यंत ) भाग थंड पाण्यानें रात्रीं व सकाळीं, निदान रात्रीं तरी धुवावा. नुसत्या पाण्याऐवजीं त्यांत

नं. १. अॅसेटिक इथर १ औंस
रोझमरी ऑइल २ ड्राम
ऑरिगॅनम ऑइल २ ड्राम } एकत्र करणें.

नं. २ अमोनिअम क्लोराइड ८ औंस

या दोहोंपैकीं नं. १ चें औषध एक लहान चमचा व नं. २ चें एक मोठा चमचा एक पाइंट (२० औंस) पाण्यांत टाकून तें वापरल्यास अधिक फायदा होईल. याशिवाय सिल्व्हर नैट्रेटचें पाणी एकास ५००० किंवा १०००० या प्रमाणांत तयार करून तें सुमारें २ पासून ८ ड्रामपर्यंत मूत्रमार्गांत रबराचे नळीनें घालावें व नळी जवळजवळ मूत्राशयापर्यंत जाऊं द्यावी व वरील प्रमाण हळुहळू एकास ३०००, २०००, १०००, किंवा ५०० पर्यंत वाढवावें. हें सर्व दाक्तराने करणें जरूर आहे. स्वतः करण्याचे भानगडींत पडूं नये. (२, ३) यासाठीं वेगळ्या औषधाची जरूर नाहीं, उपयोगही नाहीं. (४) रोग पुरा किंवा जवळजवळ बरा होईपर्यंत लग्नाचा विचारही करूं नये. (५) सर्व रोग्यांस सारखेंच लागू पडणारें औषधच जगांत नाहीं, तेव्हां या गोळ्या ताबडतोब बंद कराव्या. परस्त्री मातेसमान मानतां येत नाही या आपल्या तक्रारींत फारसा अर्थ नाहीं. बहुतेक निरोगी लोकांचीही अशीच स्थिती असते. समागमास जे अनेक सामाजिक अडथळे असतात, त्यांचा हा परिणाम आहे. यामुळें बहुतेक पुरुष बहुतेक स्त्रियांकडे कामुक दृष्टीनेच पाहतात, व स्वैर समागमास समाजाची पूर्ण परवानगी मिळेपर्यंत ही स्थिती बदलणार नाहीं.

६१ २१-११-२९

वि. वि. माझी कामवासना अतिशय प्रबल आहे. रोज एकदां तरी व्यवहार होतो पण पत्नीची कामवासना मंदावलेली दिसते व त्यामुळें तिच्या मनावर व शरिरावरही परिणाम होईल असें वाटतें तरी तिची कामवासना पूर्वीप्रमाणेंच कोणत्या उपायानें होईल तें कळवावें ( माझें वय ४५ असोन पत्नीचें ३५ आहे, दोघेंही सुदृढ आहोंत व आतांपर्यंत १२ मुलें झालीं. ) मला परस्त्रीसंगाचा अगदींच वीट आहे, तो मीं आजपर्यंत केला नाहीं व पुढें करावासा वाटणारही नाहीं, व कामवासना दाबून ठेवली तर माझे मनावर परिणाम होईल व पत्नीचे मनाविरुद्ध व्यवहार केल्यास तिला अपाय,

तर तिची कामवासना प्रबल होईल असा उपाय बरा असें मला वाटतें तरी उपाय कळवावा. माझी कामवासना कोणत्या उपायानें वाढवलेली नसोन ती मुळचीच आहे... आपण आम्हां कुटुंबवत्सल लोकांचेवर उपकार करीत आहांत याबद्दल आम्ही ऋणी आहोंत व आपणास यश येवो. आ. × × ×

उ. आपणास उपाय सुचवणें कठीण आहे. तथापि आपल्या वयांत दररोज एकदांपेक्षां कमी वेळां समागम केल्यानें आपल्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होईल असें वाटत नाहीं. ही गोष्ट प्रथम करून पाहण्यासारखी आहे. प्रकृति बिघडूंच लागली तर दुसरा विचार करणें भाग आहे. कमी समागमानें आपली प्रकृति बिघडते व जास्त केल्यास पत्नीची बिघडते, असेंच होऊं लागल्यास त्याला उत्तम मार्ग कोणता? पत्नीची कामवासना औषधानें वाढवावी असें आपण म्हणतां, परंतु पत्नी हें काय तंतुवाद्य आहे, तर त्याची खुंटी पिळून वाटेल त्यानें आपल्या सुराशीं मिळवून घ्यावें? अशी कल्पना करा कीं आपल्या पत्नीनें उद्यां आम्हांस पत्र लिहिलें कीं यजमानांची कामवासना औषध देऊन कमी करावी, तर आम्ही तिला काय उत्तर द्यावें? कृत्रिम रीतीनें कामवासना कमी किंवा अधिक करण्याच्या प्रयत्नानें सामान्यतः नुकसानच होईल. अर्थात् रोगानें कामवासना कमी झाली असल्यास ती ताळ्यावर आणण्यांत फायदाच आहे, पण या बाबतींत तसें दिसत नाहीं. तेव्हां पत्नीला औषध देण्यापेक्षां परस्त्रीचाच मार्ग आम्हांस नीतीचा वाटतो. दोन माणसांच्या खुषीनें समागम झाल्यास त्यांत अनीति नाहीं, व आपल्या पत्नीस आपण कारण समजावून सांगितल्यास तिचीही त्याला आडकाठी नसावी. अशा रीतीनें परस्त्रीसंगाची परवानगी पतीला खुषीनें देणाऱ्या स्त्रिया आम्हीं पाहिल्या आहेत. राहतां राहिली एकच अडचण, कीं आपल्यास परस्त्रीसंगाचा वीट आहे. पण काय करणार? प्रकृति बिघडल्यावर न आवडणारें कडू औषध देखील आपण घेतोंच कीं नाहीं.? सं.

६२.

सा. न. वि. वि. (१) स्त्रियांचा समसंभोग म्हणजे काय व तो कसा शक्य आहे? तसेंच स्त्रियांचा स्वसंभोग कसा होऊं शकतो? (२) दोन स्त्रिया समसंभोगाचे योगानें

आपली तृप्ति करूं शकतात असें वाचण्यांत आलें आहे. त्यांत कितपत तथ्य आहे ? (३) के. चिपळूणकरांच्या पुस्तकपरीक्षणांत खालील विधान आढळलें. हिरोडोटस म्हणतो, इजिप्शियन् लोकांचें सगळेंच उलटें ! त्यांच्यांत स्त्रिया उभ्यांनीं मूत्रविसर्जन करतात व पुरुष बसून करतात !–ही गलिच्छ गोष्ट अशक्यच वाटते ! वस्त्रपरिधानपद्धति निराळी असली तरी कितपत तें शक्य आहे ? स्वच्छतेच्या दृष्टीनें स्त्रियांना उभ्यांनीं मूत्रविसर्जन अशक्य आहे ! (४) रतिसौख्यांत अधिक आनंद उपभोगांत यावा म्हणून 'चौऱ्यांशीं आसनें' निर्माण झालीं असें अनेकांचें मत आहे. पण आसनांचा खरा उपयोग वेश्यांकडे जातांना त्यांच्या अत्युकट इच्छेची तृप्ति करण्याकडे असावा असें वाटतें. कारण कांहीं आसनें सामान्य गृहिणींना अनिष्ट होऊं शकतात. तर सामान्य गृहस्थानें नेहमींच्या आसनाव्यातिरिक्त इतर आसनें उपयोगांत आणवींत कीं नाहीं? असल्यास कोणतीं ? (५) फोटोहाऊस, नाशिक, येथें आसनांचे फोटो विकत मिळतात. असल्या फोटोना सरकार कायदेशीर बंदी करूं शकत नाहीं काय ? मग नग्न फोटो विकण्यास प्रत्यवाय कोणता ? (६) आपण वस्त्र म्हणजे अस्वस्थता उत्पन्न करणारा प्रकार समजून मुखपृष्ठावर स्त्रीचें नग्न चित्र घातलेंत. आपणांस जर नग्न फोटो घालणें हें स्वास्थ्याचें लक्षण वाटतें, तर फोटोंतील स्त्रीला वाचकांकडे तोंड करून कां काढली नाहीं ? आपणांस जर तेवढें धैर्य नाहीं तर नग्नतेचा प्रचार करण्याचा आव कां आणतां ? आपला, नरहर गंद्रे.

उ. १. स्त्रियांचा समसंभोग म्हणजे दोन स्त्रियांनी समाधान होईपर्यंत परस्परांचें उद्दीपन करणें. योनिलिंग नांवाचें जें उत्थापनशील इंद्रीय स्त्रियांस असतें, त्याचें उद्दीपन परस्पर संघर्षणानें किंवा अन्य मार्गानें करतां येतें. स्वसंभोगाचाही अर्थ यावरून स्पष्ट होईल. पुरुषांपेक्षां स्त्रियांचें उद्दीपन अधिक प्रकारांनी होऊं शकतें, व या उद्देशानें मूत्रमार्गांतही घातलेले निरनिराळे पदार्थ आंत अडकून बसल्यामुळें डॉक्टरा-कडे जावें लागून उघडकीस येतात. अशा पदार्थांची एक लांबलचक यादी डॉ. रॉबिनसन यांनी दिली आहे. २. ही गोष्ट प्राचीन काळापासून माहीत आहे व जुन्या वैद्यकांत तर अशा संभोगापासून अस्थिरहित संतति होते असें सांगितलें आहे. अर्थात

हें विधान अज्ञानमूलक आहे. ( ३ ) आपणांस माहीत नसलेल्या गोष्टीला गलिच्छ ह्मणण्याचें कारण दिसत नाहीं. स्त्रियांना काय शक्य आहे हें आपण कशावरून ठोकून देतां ? पुरुषांस सुद्धां उभ्यांनीं मूत्रविसर्जन करतांना कपडे खराब होऊं नये अशी इच्छा असल्यास हाताची मदत घ्यावी लागते, तशीच स्त्रियांसही घ्यावी लागेल बाकी ही गोष्ट सर्वथैव शक्य आहे, हें आम्हांस माहीत आहे. ( ४ ) ही आपली कल्पना अत्यंत चुकीची आहे व याला कोणताही आधार नाहीं. वात्स्यायनाच्या कामसूत्रांत तर कामशास्त्राचा अभ्यास कुमारिकांनीं करावा व याची माहिती दाई, वडील बहिण किंवा इतर अनुभवी स्त्रीकडून घ्यावी असें स्पष्ट ह्मटलें आहे. डॉ. मारी स्टोपस विवाहीत आहेत, त्यांनीं ही आपल्या पुस्तकांत आसनांचा विचार केला आहे. डॉ. व्हान ड व्हेल्ड यांनीं तर केवळ विवाहितांकरतांच आपलें पुस्तक लिहिलें आहे, व विवाहित स्त्रीपुरुषांस एकाच प्रकारामुळें एकमेकांचा कंटाळा येऊं नये ह्मणूनच अनेक आसनें दिलीं आहेत. वेश्यांची कामवासना उत्कट असते, हीही कल्पना खोटी. उत्कट वासनेमुळें वेश्येचा धंदा करणाऱ्या स्त्रिया असतात पण फारच कमी. सामान्यतः त्या या दृष्टीनें मंदप्रकृतीच असतात. उत्कट वासनेची बतावणी करणें हें धंद्याचें कसब आहे, परंतु तेंही पुष्कळांस साधत नाहीं असें अनुभवी मित्र सांगतात. ( ५ ) हे फोटो जाहिरातींवरून जसे असावेसे वाटतें, तसे नाहींत. कायद्यांत अश्लीलतेची व्याख्याच दिलेली नसल्यामुळें कायदेशीर बंदी कशास करतां येणार नाहीं हे सांगणें कठीण आहे, परंतु हे फोटो मनुष्यांचे नसून चित्रांचे आहेत. ( ६ ) आपलें म्हणणें तात्त्विक दृष्ट्या बरोबर आहे परंतु कायद्याच्या प्रश्नामुळे नाइलाज झाला. कायदा मूर्खपणाचा असला तरी तो मोडण्याचीं आमची तयारी नाहीं. आमच्याप्रमाणें ज्यांची उपजीविका नोकरीवर अवलंबून आहे अशा लोकांस दंड किंवा तुरुंगवास पतकरून कायदा मोडणें शक्य नसतें. आम्ही नग्नतेचा प्रचार करण्याचा आव घालीत नाहीं, आमचेकडून होईल तितका प्रचार आम्ही करीत आहों. सं.

६३.

सा. न. वि. वि. मासिकाच्या १२ व्या अंकांत १५ मार्च १९२९ चें एक पत्र

आहे...त्याप्रमाणें इकडील एका व्यक्तीची हकीकत आहे, पण आपण जा संपादकीय अभिप्राय दिला आहे त्याच्या उलट आहे. अतृप्तसंभोग झालेल्या स्त्रियांना विकार जडतो, त्यांची वृत्ति भ्रमिष्टासारखी होते व असाच हा योग बरेच दिवस चालल्यास प्रकृतीवर अनिष्ट परिणाम घडतो, व अशा वेळीं गर्भधारणा झाल्यास बालक खुजट निपजतें व अल्पायुषी बनतें. पण प्रसूतीनंतर तिच्या वृत्तींत किंचित् सुधारणा झालेली दिसते. पुनः तिच्याशीं अतृप्त रतिसंभोग घडल्यास या विकाराचें टयुबरक्युलोसिस रूपांतर होतें, आणि अशा वेळीं गर्भधारणा झाल्यास तिचा अंत होतो. अशीं उदाहरणें बरींच आमच्या पाहण्यांत आलेलीं आहेत...यावरून असें अनुमान निघतें कीं ज्या स्त्रियांना अतृप्त संभोग घडलेला असतो त्यांचें रजस्खलन बरोबर झालें नसल्यानें त्यांना विकार जडतो व स्खलन बरोबर झालें असतां प्रकृती सुधारते. प्रसूतिकालीं रजस्खलन होत असल्यानें व तें अतृप्त संभोगानें सांठलेलें यावेळीं बाहेर पडल्यानें स्त्रियांच्या प्रकृतीवर परिणाम चांगला झालेला दिसून येतो. आपला + + +

**उ.** कामशास्त्रासंबंधीं ज्या अत्यंत चुकीच्या कल्पना सर्वत्र पसरलेल्या असतात त्यांचा आपण बराच मोठा संग्रह केलेला दिसतो. रतिप्रसंगीं स्त्रियांचें रज बाहेर पडतें, नाहींतर तें सांठून राहतें, ही कल्पना पुरुषांच्या रेतस्खलनावरून उसनी घेतलेली आहे, परंतु खोटी आहे. अतृप्त संभोगामुळें स्त्रियांवर अनिष्ट परिणाम होतो खरा, परंतु उद्दीपनाचें नैसर्गिक शमन न झाल्यामुळेंच होतो. रजाचा एक गोलक महिन्यांतून एकदां पक्व होऊन गर्भाशयांतून बाहेर पडतो, किंवा गर्भधारणा झाल्यास तेथेंच राहतो. त्याचा तृप्तीशीं संबंध नसतो व ती न झाल्यामुळें टयुबरक्युलोसिसही होत नाहीं. प्रसूतीच्या वेळीं सांठलेलें रज बाहेर पडतें हीही कल्पना तितकीच खोटी आहे, कारण रज सांठतच नाहीं. सं.

६४. १७–२–३०

श्री. स्नानाची आवश्यकता बहुतेकांस पटलेली आहे. आपल्याकडे निदान पांढरपेशा वर्ग दिवसांतून एकदां तरी स्नान केल्याखेरीज रहात नाहीं. पण हल्लीं रूढ असलेली स्नानाची वेळ चुकीची आहे असें वाटतें. विद्यार्थी, प्रोफेसर, वकील,

डॉक्टर, नोकरवर्ग म्हणजे अपवाद वगळून बहुतेक सगळे लोक दुपारच्या जेवणापूर्वी स्नान करून लगेच जेवण्यास बसतात. स्नान योग्य तऱ्हेनें फारच थोडे लोक करीत असतील. पण कसेंही केलें तरी स्नान केल्याबरोबर जेवणें हितकारक नाहीं असें वाटतें. रक्त त्वचेच्या बाजूस जास्त ओढलें गेल्यामुळें लगेच खाल्लेल्या अन्नाच्या पचनासंबंधीं त्रास होणें संभवनीय वाटतें. कांहीं विद्यार्थी वगैरे सायंकाळीं स्नान करतात, पण त्यांची संख्या फारच थोडी. तरी स्नान केव्हां करावें, स्नानाचा व जेवणाचा संबंध, यासंबंधीं माहिती प्रसिद्ध करावी. तसेंच दिवसांतून दोन वेळ स्नान केल्यास कितपत फायदा होतो, व दुसऱ्या वेळीं करावयाचें स्नान केव्हां करावें, याचाही खुलासा करावा. × × ×

उ. स्नान करून लगेच जेवण्यांत नुकसान नाहीं कारण रक्त परत पोटाकडे येण्यास पुरेसा वेळ असतो. मात्र पचनक्रिया चालू असतां ह्मणजे जेवणानंतर तीन तासपर्यंत स्नान करूं नये. शिवाय अशक्त लोकानीं सकाळीं अनशापोटीं स्नान करणें इष्ट नसतें. तेव्हां सकाळीं अल्पाहार करून दुपारचे जेवणापूर्वी स्नान करण्यास हरकत नाहीं. सायंकाळीं स्नान करणारांनींही हेंच लक्षांत ठेवलें ह्मणजे झालें. नदींत वगैरे स्नान करणें किंवा पोंहणें झाल्यास सर्व शरीर एकदम पाण्यांत बुडवावें. व्यायामाशिवाय नुसतें पाण्यांत डुंबूं नये, थकवा आलेला असल्यास किंवा थंडी वाजत असल्यास पाण्यांत शिरूं नये; परंतु व्यायाम केल्यानंतर स्नान करणें झाल्यास घाम जिरेपर्यंत वाट पाहूं नये, श्वासोच्छ्वास नेहमींच्या गतीनें होऊं लागला म्हणजे झालें. ऊन लागत असल्यास टोपी घालावी. थंडीनें कुडकुडून दांतखिळी वाजूं लागेल इतका वेळ पाण्यांत राहूं नये. त्वचेचे किंवा हृदयाचे विकार नसल्यास नदींतल्या स्नानानें कोणत्याही वयांत फायदाच होतो, परंतु वृद्धांनीं, लहान मुलांनीं व गरोदर स्त्रियांनीं फार वेळ पाण्यांत राहूं नये. घरीं, नदींत तलावांत किंवा कोठेंही स्नान करतांना पूर्ण नग्न होण्याची चाल पाडणें अत्यंत इष्ट आहे. घरीं स्नानास स्वतंत्र खोली सर्वांकडे शक्य नाहीं, तरी सुद्धां स्नानाकरतां नग्न होण्याची चाल ठेवली पाहिजे. ज्या घरांत परका मनुष्य नाहीं तेथें ही चाल समंजस लोकांस एकदम पडतां येईल. सार्वजनिक ठिकाणीं ती एकदम पडणें शक्य नाहीं, तेव्हां या मताच्या लोकांनीं संघ स्थापन करून स्वतःची सोय केली

पाहिजे व शक्य तितक्या लोकांशीं चर्चा करून या मताचा प्रचार केला पाहिजे. नग्न स्नानाशिवाय स्वच्छता राहणें शक्य नसतें व पोहतांना चड्डी किंवा इतर वस्त्र नेसणाऱ्या लोकांचा कांहीं भाग ओला राहिल्यामुळे त्यांस थंडी होऊन फायद्याऐवजीं नुकसान होतें. शिवाय निष्कारण जिज्ञासेने हल्लीं पुष्कळ लोकांचें जें शारीरिक व मानसिक नुकसान होतें तें बंद होईल, म्हणजे त्यांचें मन तिकडेच गुंतून न राहतां त्यांस इतर उद्योग करण्यास वेळ मिळेल व तो ते शांत चित्तानें करतील. नग्नतेपासून होणारा फायदा सर्व विद्वान डॉक्टरांनी कबूल केला आहे. आतां रूढीचाच प्रश्न राहिला आहे. ती बदलणें हें समंजस लोकांचें काम आहे. सं.

६५. ७–५–३०

...हल्लीं युरोपांत नग्नतेचा वाढता प्रसार आहे त्यासंबंधीं तिकडील मतें व त्यापासून होणारे फायदे व तशा तऱ्हेनें आपले इकडे कायद्याचे व समाजाचे दृष्टीनें राहतां येणें शक्य आहे कीं काय व याविषयीं आपले विचार काय आहेत हें विस्तृत लिहाल काय ? (२) संततिनियमनाकरतां जे पुरुष व स्त्रिया रबराच्या पिशव्या वापरतात त्यामुळें त्यांना संभोगाचे वेळीं नैसर्गिक आनंद लाभतो अगर नाहीं ? ( ३ ) हल्लीं समाजांत पुरुषांना शीघ्रपतन हा एक मोठा रोग होऊन बसल्याचें दिसतें. यामुळें शेकडा ७५ लोक तरी ग्रासलेले आहेत असें वाटतें. तरी यावर एखादा उपाय अगर बहुतेकांस सारखेंच लागू पडण्यासारखें एखादें औषध आहे काय ? असल्यास त्याचें नांव व किंमत काय ?

उ. आजपर्यंत कित्येक अंकांत नग्नतेसंबंधीं मजकूर आलाच आहे. नग्नतेचा प्रचार येथें करणें झाल्यास तो संघशक्तीनेंच करणें शक्य आहे. एखादाच मनुष्य नग्न राहूं लागल्यास त्याला वेड्यांच्या इस्पितळांत जावें लागेल ! यासंबंधीं मित्रमंडळींत चर्चा होऊन एखाद्या खाजगी बागेंत अशा तऱ्हेचा संघ स्थापन करणें शक्य आहे. अशा ठिकाणीं संघाचे लोकांनीं नग्नतेची संवय केल्यास कायदा कांहीं करूं शकणार नाहीं. हा संघ आरंभापासूनच मिश्र असावा व प्रथम त्यांत विचारी लोकच घेतले जातील व उल्लू लोक येणार नाहींत. अशी खबरदारी घेतली पाहिजे. संघशक्ति

ग्रं. १२८

## पत्रव्यवहार

निर्माण झाल्यावर त्यांत एखादा उल्लू मनुष्य आल्यास त्यावरही इष्टच परिणाम होऊन त्याचा उल्लूपणा नाहींसा होईल. अशा ठिकाणीं पोहण्याकरतां एखादा तलाव असल्यास उत्तम, त्यानें नग्नतेची संवय होण्यास मदत होईल. घरांत मतभेद न झाल्यास व घर इतरांच्या फार जवळ नसल्यास ज्यानें त्यानें आपआपल्या घरीं नग्न राहूं लागण्यास हरकत दिसत नाहीं. कोणी भेटावयास आल्यास चटकन गुंडाळून घेतां येईल असें वस्त्र असलें ह्मणजे झालें. नग्नतेपासून सर्वांसच फायदा होतो व असा संघ स्थापन केल्यास त्यांतील लोकांनीं आपलीं मुलेंही तेथें न्यावीं, ह्मणजे त्यांचेवर परिणाम अत्यंत इष्ट होईल. (२) रबरी पिशव्या पातळ असल्यास त्या फाटून निरुपयोगी होण्याचा संभव असतो व जाड असल्यास सुखांत तर व्यत्यय येईलच परंतु त्यापासून दोघांचेही प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होतील. ( ३ ) पत्र ४५ चें उत्तर पहा. शिवाय थंड पाण्यांत दोन मिनिटें जघनस्नानाचा उपयोग होण्याचा संभव आहे. केवळ ढुंगणच पाण्यांत बुडेल अशा रीतीनें पिंपांत किंवा मोठ्या पातेल्यांत बसावें, किंवा तेंही न जमल्यास तेवढ्या भागावर थंड पाणी शिंपडावें. आणखींही उपाय सांगतां येतील परंतु एकच उपाय सर्वांस लागू पडेल अशी खात्री नाहीं.—सं.

१०५८८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ८३५८

# सूचिपत्रक


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| **अजिंक्य** | ११३ |
| अमेरिकन मूर्खपणा | १६० |
| **अलेक्झांदर** | ३८ |
| अश्लीलता | १९४, २०२ |
| असिधाराव्रत | २२८, २३७ |
| असे पति देवचि ललनांना | १०३ |
| आजारांत संभोग | २१६ |
| आत्मसंभोग | १८५ |
| आत्मसंयमन | २३५ |
| आत्मा | २६ |
| इंग्लंडमधील कायदे | ४४ |
| इटलींतील ,, | ४६ |
| ईश्वराची स्तुति | ५९ |
| उद्दीपन | २१६ |
| उंदीर | ६७ |
| उपजलेल्या मुलांच्या डोळ्यांत औषध | ५२ |
| ऋतुकाल | १५५ |
| **ऋषींची** भुताटकी | २५ |
| एकत्र कुटुंबपद्धति | १२८ |
| एक वैवाहिक आयुष्य | १४३ |
| **एलिस्, हॅवलॉक** | १३९ |
| ओनीडा समाज | ६९ |
| अंडाशय | ८५ |
| **काउंट कायसरलिंग** | ७ |
| कान | ७४ |
| कामशास्त्र | २१५, २२७ |
| कायदे ( वेश्यांसंबंधीं ) | ३६ |
| ,, करणारांची अक्कल | ११ |
| **कॅथरीन मेयो** | ५६ |
| **कॉन्स्टन्टाईन** | ३८ |
| कॉलरा | १३ |
| **किर्लोस्कर खबर** | ६ |
| **केतकर** | १२७, १६२ |
| कॅंस | ७३ |
| **केळकर** | ८० |
| कोर्टिंग | १९५ |
| खऱ्या गोष्टी | ९३ |
| गर्भधारणा | ५४ |
| गर्भपात | ९, ६१, १७५, १९५, २१७, २२५ |
| गर्भावस्थेंत संभोग | १८६ |
| गर्भाचा उगम | ९० |

## सूचिपत्रक


| विषय | पृष्ठ | विषय | पृष्ठ |
|---|---|---|---|
| गुप्तरोग | १४,२५,१७७ | त्वचेवर राहणारे प्राणी | ७६ |
| **गुरुकिल्ली** | १९३ | दांत | ७५ |
| गोपालन | १६२ | **देशपांडे** | १६२ |
| घटस्फोट | ९५,९९,१२४ | धातुक्षय | १८० |
| चसा | ७४ | धुपणी | ६४ |
| चर्मपत्र | ११८ | धुरकटणें | १७१ |
| **चिपळूणकर** | १४३ | धूळ | १११ |
| छेकोस्लोव्हेकियामधील कायदे | ४७ | धोक्याची सूचना | १६३ |
| जठररस | ११९ | नखें | ६७ |
| जननेंद्रिय | १२७ | नग्नता | १५५,१६०,१६९,१७४, १९४,२३०,२३४,२५० |
| जपानमधील कायदे | ४७ | | |
| जपानांतील स्नानपद्धति | ४ | नग्न शरीर दाखवणें | ६० |
| जर्मनीतील वेश्यांची व्यवस्था | ६८ | नलिकेचा छेद | १८८ |
| **जॉइस** | ८ | नाटकांतील नग्नता | ६० |
| जीवनतत्त्वें | २९ | नॉर्वेमधील कायदे | ४५ |
| **जोशी** | ५४ | नीग्रो | २ |
| टक्कल | १६९ | पचन | ११८ |
| डॉक्टर, आणखी एक | १२७ | पडदा | २ |
| डाक्टरांचा अधाशीपणा | ११२ | पडसें | १४० |
| डेन्मार्क मधील कायदे | ४५ | पतिता कीं पतिव्रता | १६४ |
| डोळ्यांची काळजी | ८८ | पतिपत्नी | ९५ |
| तोंड | ७५ | पति हा देव | १०३ |
| तोतरेपणा | ५२ | पत्रव्यवहार | १७५ |
| त्वचा | ७१ | परमा | २०३,२३८ |
| त्वचेचे रोग | ७५ | परम्याचे जंतु | ६१ |

| विषय | पृष्ठ | विषय | पृष्ठ |
|---|---|---|---|
| पशुसंभोग | २२४,२३२ | बहुपतिव्रत | १९९ |
| पाणी किती प्यावें ? | १२ | बहुपत्नीव्रत | १९९ |
| पाय | ७२ | बळजबरीचे खटले | ६२ |
| पावित्र्य | १०७ | बाहेरख्यालीचे दुष्परिणाम | ३२,११४ |
| **पॅजेलो** | ९४ | बुरखा | २,३ |
| पित्ताशय | १२० | बेल्जिअम् मधील कायदे | ४७ |
| पृथक्शय्या | २३५ | बोबडे बोल | २४ |
| **पोशे** | १७० | ब्रह्मचर्य | ८ |
| पोहोण्याचे तलाव | १६१ | भुताटकी | २५ |
| **प्येर लॉती** | २ | भ्रूणहत्या | ६१ |
| प्रचलित विवाह | ११७ | **मंगो पार्क** | १५३ |
| प्रजोत्पादन | १० | मनुष्याची उत्पत्ति | ५१ |
| प्रणयीपत्र | १५७ | महाल | २०४ |
| प्रथम समागम | ८३ | मांसाहार | ९,१५९ |
| प्रशियांतील कायदे | ४४ | मागसलेले विचार | ८० |
| प्रेम | २०८ | मायोपिया | ८९ |
| **फंक** | २९ | **मॅकफॅडन** | २३७ |
| फांकलेलें प्रेम | ९४ | **मॅस्केलीन** | २७ |
| **फोरेल** | ४ | मित्र, आजन्म | १८३ |
| फ्रान्समधील कायदे | ४३ | मुलें न होणें | ८२ |
| फ्रान्समधील राज्यक्रांति | १५८ | मुष्टिमैथुन | १७८,१८०,२०७,२११, २१९,२४०,२४३ |
| **फ्लॅमॅरिऑं** | २८ | | |
| **फ्लेक्सनर** | ४५ | मूत्राचें पावित्र्य | १५३ |
| **बरवे** | १६२ | **मेचनिकॉफ** | ११ |
| बलात्कार | १५५ | **मोझेस** | ३६ |

## सूचिपत्रक


| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| म्युसे | ९४ |
| यति | १५६ |
| योनिमार्ग | ८५,२०८ |
| योनिलिंग | २१६,२२२ |
| रांजणवाडी | ९० |
| रानटी लोकांच्या चालीरीति | १२ |
| रॉथ | २ |
| रॉबिनसन | २५,९३ |
| रिशे | २८ |
| रुमेनिआमधील कायदे | ४७ |
| रूसो | १५९ |
| लग्नापूर्वी सर्टिफिकीट | ५३ |
| लंघनीचिकित्साशिक्षक | ५४ |
| लज्जा | १ |
| लॉज | २६,२७ |
| लिएब | १० |
| लूथर | ४१ |
| वधूवर | १५१ |
| वस्त्रें | ९० |
| वांझपणा | ३२,८२ |
| विधवावपन | १५६ |
| विनय | १ |
| विवाह | ११७ |
| विवाहसंस्था | १२३ |
| विवाहेच्छूंकरतां ऑफिस | ७ |
| विषादप्यमृतं ग्राह्यम् | १०५ |
| वेश्या | १४,३६,४८,६१,६३,६८, १८३,१८९,१९३,२१२ |
| वेश्यांची नोंदणी | ४८ |
| वेश्यांच्या जाहिराती | ६३ |
| वैवाहिक आयुष्य | १४३ |
| व्याभिचार | २१३ |
| व्हिटॅमीन | २९ |
| व्हॉल्टेर | १५९ |
| शस्त्रक्रिया | २१ |
| शॉ, बर्नार्ड | ७ |
| शीघ्रपतन | २१५,२२६ |
| शृंगार | १०२ |
| श्रीकृष्ण | १६२ |
| संयमन | २२८ |
| संवेदना | १५३ |
| संकेतगृह | १७, ७७ |
| संडास | ११२ |
| संततिनियमन | २०, २४, ८७, ११४, १२८,१४२,१५२,१६३, १८०,१८२,१८५,१८७, १८८,१९६,२००,२०४, २०८,२१८,२२३,२२४, २२९,२३०,२३५ |
| संततिनियमनावरील आक्षेप | ८७ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| समसंभोग | २३२, २४२, २४५ |
| समागमस्वातंत्र्य | १९६ |
| समागमेच्छा | १९६ |
| संपूर्ण जीवन | १५५ |
| संभोग | १५३ |
| संमतिवयाची कमिटी | १५४ |
| सांपत्तिक स्वातंत्र्य | १२३ |
| **सँड** | ९४ |
| सॉव्हिएट राज्यांतील विवाह | २२ |
| सुखाचा संसार | १५० |
| सुंता | १०५, १५८, १६० |
| **सेंट् लुई** | ३९ |
| **सेलिग्मन्** | २ |
| **स्टीफनसन्** | ९ |
| स्त्रियांचें दूध | ६७ |
| स्त्रियांचे लेख | १४१ |
| स्त्रीजीवनावर प्रकाश | १४९ |
| स्त्रीपुरुषसंयोग | ९७ |
| स्त्रीशिक्षण | १४६ |
| स्नान | ७२, २४८ |
| स्पेनमधील कायदे | ४७ |
| स्वप्नावस्था | १७७, २३० |
| स्वयंपाकांतील स्वच्छता | ११ |
| स्वित्झर्लंदमधील कायदे | ४६ |
| स्वीडनमधील कायदे | ४५ |
| हवा | ११० |
| हातांची जोपासना | ६७ |
| हॉलंदमधील कायदे | ४६ |


REFBK-0004355